(या ग्रंथाच्या इंग्रजी आवृत्तीला डी. लिट् ही पदवी व राष्ट्रपती शंकरदयाल शर्मा यांच्या हस्ते पारितोषिक प्राप्त झाले आहे)

# कपोलकल्पित आर्य आणि त्यांच्या स्वाऱ्या

डॉ. नी. र. वऱ्हाडपांडे

लाखे प्रकाशन
नागपूर

# कपोलकल्पित आर्य आणि त्यांच्या स्वाऱ्या

डॉ. नी. र. वऱ्हाडपांडे

**प्रकाशक व मुद्रक**
लाखे प्रकाशन
सौ. संध्या चंद्रकांत लाखे
मुकुंदराज पथ, महाल, नागपूर-३२
दूरध्वनी क्र. ०७१२-२७६८८१४

**प्रथम आवृत्ती**
२८ मे २००९

**© डॉ. नी. र. वऱ्हाडपांडे**

**अक्षर जुळवणी**
न्यू विदर्भ कॉम्प्युटर्स
नागपूर

**मुखपृष्ठ/रचना व मांडणी**
मंगेश कल्याणकर
ऋतुजा ग्राफिक्स
९३७०९९६५५९

**मूल्य : २१५ रुपये**

# प्रास्ताविक

"कपोलकल्पित आर्य आणि त्यांच्या स्वाऱ्या" या विषयावरील माझा पहिला लेख १९६० च्या सुमारास साहित्य संस्कृती मण्डळाच्या नवभारत मासिकात प्रकाशित झाला होता. त्याच सुमारास दिल्लीच्या (Organizer) या साप्ताहिकात माझे या विषयावरील लेखन सुरू झाले. हे साप्ताहिक दिल्ली येथील परराष्ट्रांच्या दूतावासात व परदेशातही बरेच वाचले जात होते.

या विषयावरील माझ्या विचारांना बरीच निश्चित आल्यावर संस्कृत भाषा प्रचारिणी सभेच्या विद्यमाने मी एक व्याख्यानमाला गुम्फली. या व्याख्यानांना नागपूर विद्यापीठाचे त्या वेळचे उपकुलगुरू बोकरे व प्रसिद्ध राजनैत श्रीकान्त जिचकार उपस्थित होते. जिचकारांनी या व्याख्यानमालेचा समारोप केला व "आर्यांचे आक्रमण" ही एक निराधार कल्पना आहे असे मला आता पटले आहे व पाठ्यपुस्तकातून ती काढून टाकण्याचा प्रयत्न केला पाहिजे असे प्रतिपादन केले. आपटे इतिहास संकलन समितीचे कार्यकर्ते या व्याख्यानमालेस हजर होते त्यांनी ही व्याख्यानमाला प्रकाशित करण्याचे पत्करून श्री जिचकार यांचे उद्दिष्ट सफल करण्याचा संकल्प जाहीर केला. The Mythical Aryans and their Invasion या शीर्षकाखाली ती व्याख्यानमाला प्रकाशित होऊन तिच्या दोन आवृत्त्या निघाल्या. आपटे इतिहास संकलन समितीने या विषयावर देशभर माझी व्याख्याने करविली व तज्ज्ञांची एक अखिल भारतीय परिषद् बोलावून ठराव केला की पाठ्यपुस्तकातून आर्यांची स्वारी ही एक सर्वमान्य गोष्ट म्हणून न शिकविता केवळ एक उपपत्ती म्हणून इतर उपपत्तीबरोबर शिकविण्यात यावी.

उत्तर प्रदेश सरकारने हा ठराव मान्य करून पाठ्यपुस्तकातून ही

अनेकांतील एक उपपत्ती म्हणून शिकविण्याचा निर्णय घेतला.

आपटे इतिहास संकलन समितीने आपले निर्णय भारतापुरते मर्यादित न ठेवता जगातील या विषयाच्या अनेक तज्ज्ञांनी माझे पुस्तक पाठविले. एवढेच नव्हे, तर या विषयाशी सम्बद्ध असलेल्या विषयावर संशोधन करणाऱ्या परदेशातील देखील विद्यार्थ्यांना व प्राध्यापकांना माझे पुस्तक पाठवून आपल्या संशोधनात त्याचा विचार करण्याची विनंती केली. याचा परिणाम दिसून येऊन लेक्सिकॉन या २१ खण्डांच्या विश्वकोशात "आर्याक्रमण ही अनेक कल्पनांपैकी एक आणि न पटणारी कल्पना आहे. आर्य संस्कृती भारताबाहेरून आली असे म्हणण्यास काही प्रमाण नसून ती उत्तर भारतातून दक्षिण भारतात पसरली याबद्दल शंका नाही" अशी आर्य या शब्दाखाली नोंद केली आहे.

मी माझे पुस्तक कालिदास संस्कृत विद्यापीठाकडे डी. लिट या पदवीसाठी सादर केले. विद्यापीठाने योग्य ती कारवाई करून मला डी. लिट ही पदवी समारम्भपूर्वक प्रदान केली. जिचकार यांच्या प्रयत्नाने भारताचे राष्ट्रपती श्री शंकरदयाल शर्मा यांनी माझ्या एकन्दरीत संशोधनाला मान्यता म्हणून ११००० रुपयांचे शेवडे पारितोषिक प्रदान केले.

हे पुस्तक नुसते वाचावयाचे नसून अभ्यास करावयाचे आहे. या विषयाचा अभ्यास नसलेल्या काही वाचकांना ते समजणे कठीण जाईल म्हणून खाली आर्याक्रमण सिद्धान्ताचे स्वरूप थोडक्यात माण्डत आहे.

## आर्यांच्या स्वारीची कल्पना

**१. हेतू :-**

१) भारताचे ख्रिस्तीकरण

२) संस्कृत भाषेपासून युरोपीय भाषा निघाल्या असतील हे दुःसह

**२. तथ्य :-**

१) संस्कृत भाषा व तिचे युरोपीय भाषांशी साम्य

२) संस्कृत भाषा सर्व युरोपीय भाषांपेक्षा प्राचीन आहे.

**३. कल्पनेचे इमले**

१) इण्डोयुरोपीय भाषा व द्रविड भाषा हे वर्गीकरण. सोल्टा, पिसानी, ॲलन व ट्रुबेट्स्कॉय यांना मान्य नाही. तमिळ ही इण्डोयुरोपीय भाषा नाही हे मत ज्याला हिन्दी, मराठी वगैरे भारतीय भाषांचा गन्ध नाही त्या कॉल्डवेलने मांडले. त्याने सांगितलेली द्रविड भाषेची लक्षणे हिन्दीला लागू आहेत हे काशीनाथ शर्मांनी दाखवून दिले आहे.

२) जिला इण्डोयुरोपीय म्हणता येईल अशी एक भाषा होती या कल्पनेच्या आधारे एक काल्पनिक भाषा तयार करून यात काल्पनिक शब्द मानले गेले व भाषेतील शब्दसमूहावरून ती बोलणाऱ्यांचे वसतिस्थान ठरविता येते या कल्पनेने ती बोलणाऱ्यांचे वसतिस्थान ठरविले आहे. म्हणजे ही चवथ्या घाताङ्काची कल्पना झाली.

विज्ञानपूत उपपत्तीच्या आधारे जी अनुमाने काढता येतात ती काटेकोर असली पाहिजेत. इण्डोयुरोपीय भाषा मानणारे भाषाशास्त्र खरे मानले तर आर्यांचे मूलस्थान निश्चितपणे सांगता आले पाहिजे. पण तसे मुळीच नाही. भाषाशास्त्राच्या आधारे नॉर्वेपासून तो भारतापर्यन्तचे सर्व देश आर्यांचे इण्डोयुरोपीय भाषा बोलणाऱ्यांचे वसतिस्थान ठरविण्यात आले आहेत. इण्डोयुरोपीय भाषा भारतात वा युरोपातच असणार! तेव्हा इण्डोयुरोपीय लोक भारतात वा युरोपात कुठेतरी राहत होते हे अनुमान चीनी लोक चीनमध्ये राहत असले पहिजेत या अनुमानासारखे आहे.

३) भाषेत कालान्तराने जे फरक होतात त्यावरून युरोपीय पण्डित ग्रन्थांचा काळ ठरवितात. पण इतका फरक होण्यास इतका काळ लागतो हे ठरविण्यास ऐतिहासिक तथ्ये उपलब्ध नाहीत. निदान पाश्चात्त्य पण्डितांनी ज्ञात भाषांच्या ज्ञात इतिहासावरून अशा फरकांचे काळ ठरविलेले नाहीत.

४) तथ्यांच्या आधारावर एकच कल्पना बसविता येते असे नाही. तेव्हा कोणतीही कल्पना हे एक तथ्यच आहे असे समजून त्यावर नवीन कल्पना उभारणे पूर्णपणे अवैज्ञानिक आहे. विशेषतः जेव्हा कल्पना वादग्रस्त असतात तेव्हा त्यांचा तथ्य म्हणून वापर करणे तर्कशास्त्राला पूर्णपणे सोडून आहे.

एका वादग्रस्त कल्पनेच्या आधारे दुसरी कल्पना उभारणे हा एक प्रकार झाला. दुसरा प्रकार एका कल्पनेचे समर्थन करण्यासाठी दुसरी कल्पना करणे. कल्पनेचे समर्थन तथ्यांच्या आधारे केले पाहिजे. दुसऱ्या कल्पनेच्या नव्हे.

न्यूनतम बुद्धि देखील सांगेल की संस्कृत जर साऱ्या युरोपीय भाषापेक्षा प्राचीन आहे तर संस्कृत व युरोपीय भाषा यातील साम्य संस्कृत भाषेतून उद्भवले ही कल्पना सरळ आहे. तशी कल्पना न करता एखाद्या काल्पनिक भाषेत हे मूळ शोधणे हा द्रविडी प्राणायाम आहे. या तत्त्वाला तर्कशास्त्रात ओकॅमचा वस्तरा असे म्हणतात.

भाषेच्या आधारावर वेद खि. पू. १४०० पेक्षा प्राचीन नाहीत अशी कल्पना केली. त्यानंतर एशिया मायनर मध्ये एक शिलालेख सापडला. त्यात वैदिक देवतांचा उल्लेख आहे. तेव्हा वेद ख्रि. पू. १४०० पेक्षा प्राचीन आहेत असे मानण्याचा प्रसङ्ग आला. यातून निसटण्यासाठी मॅक्डोनेल म्हणतो की वेद व एशियामायनरमधील शिलालेख या दोघांनीही एका तिसऱ्या अधिक प्राचीन आधारातून या देवता घेतल्या. ही कल्पना देखील ओकॅमच्या वस्तऱ्याने छाटून फेकण्यासारखी आहे. वेद हे तथ्य आहे व मॅक्डोनेलचे तिसरे उगमस्थान ही कल्पना आहे. जेथे तथ्याने काम भागते तेथे कल्पना कशाला?

वेद ख्रि. पू. १४०० च्या नंतरचे आहेत अशी कल्पना. ही कल्पना युरोपीय भाषा व संस्कृत यातील फरकाला शे-दोनशे वर्षांपेक्षा जास्त काळ लागू नये या कल्पनेवर आधारलेली आहे. व वेदाव्यतिरिक्त त्याहून प्राचीन अशा एखाद्या संस्कृतीत वैदिक देवता होत्या ही दुसरी कल्पना. या दुसऱ्या कल्पनेचे प्रयोजन पहिल्या कल्पनेचे समर्थन करण्यासाठी दुसरी कल्पना करणे हे एक खोटे लपविण्यासाठी दुसरे खोटे बोलण्यासारखे झाले.

**सम्भाव्यता**

वैज्ञानिक कल्पना करतांना सम्भाव्यतेचा विचार केला पाहिजे. बरोच्या मते ऋग्वेद ख्रि.पू. १००० पेक्षा प्राचीन नाही. व ऋग्वेदकाळी लिपीचा शोध लागला नव्हता. पण मोहंजोदरोत लिपी सापडली आहे. मोहंजोदरोचा काळ ख्रि.पू. २५०० ते ३००० असा सांगण्यात आला आहे. पुराविदात याबद्दल वाद नाही. आता बरोला अडचण पडली की ख्रि.पू. २५०० मध्ये लिपी होती पण ख्रि.पू. १००० मध्ये नव्हती हे कसे काय? तेव्हा त्याने कल्पना लढविली की दरम्यानच्या १५०० वर्षांच्या काळात भारतीय लोक लेखनकला विसरून गेले!!!

ज्यांना लेखनकला माहीत आहे असे लोक लेखनकला विसरून गेले असे उदाहरण इतिहासाला माहीत नाही. दुसरी जास्त चांगली लिपी प्रचारात आल्यामुळे पहिली विसरली गेली असे हाऊ शकते. पण लेखनकलाच अजीबात विसरणे फारसे सम्भाव्य नाही.

एका कल्पनेवर दुसरी कल्पना उभारणे हे सत्य कधीही हाती लागणार नाही असा बुद्धिपूर्वक प्रयत्न करण्यासारखे आहे. समजा एका कल्पनेची सम्भाव्यता .५ आहे. तीवर दुसरी कल्पना उभारली तिची संभाव्यता .४ आहे. तर या दोन्ही कल्पनांची मिळून संभाव्यता ०.२० म्हणजे त्यांच्या स्वतंत्र संभाव्यतेपेक्षा पुष्कळच कमी होईल. .२ अशी सम्भाव्यता असलेल्या चार कल्पनांवर एखादी उपपत्ति उभारली असेल

तर तिची संभाव्यता ०.००१६ एवढी होईल. या दशांश मूल्यात चार स्थाने व दोन शून्ये आहेत यावरून तिचे मूल्य शून्यापेक्षा फारसे जास्त नाही. आर्याक्रमण सिद्धान्ताची सत्यता यापेक्षा जास्त असू शकत नाही.

आर्याक्रमणसिद्धान्त हा पुरातत्त्वाच्या संशोधनातला एक अडसर झाला आहे. मोहोंजोदरोची लिपि वाचताना हे लेख संस्कृत भाषेतले नाहीत असे गृहीत धरून वाचनाचा प्रयत्न केला जातो. हा प्रयत्न मुळातच चुकीचा आहे. ख्रि.पू. २५०० ते ३००० या काळात या ठिकाणी वैदिक लोकांशिवाय दुसरे कुणी राहत होते असे समजण्यास काहीच आधार नाही. तेव्हा हे लेख वैदिक आहेत असे समजून त्यांचे वाचन केले पाहिजे. तसे न करता जिच्या अस्तित्त्वाबद्दल काही पुरावा नाही व जिचा कोणताही लेख सापडत नाही अशा आदिद्रविड नावाच्या भाषेतले हे लेख आहेत असे समजून ते वाचण्याचा प्रयत्न केला जातो. असे कारण म्हणजे संशोधनाचे श्रम वाया जातील अशी बुद्ध्या दक्षता बाळगण्यासारखे आहे.

■ ■

# अनुक्रम


| | | |
|---|---|---|
| १. | आर्यवंशाची कल्पना | ११ |
| २. | भाषांचे वर्गीकरण आणि आर्यांचे मूलस्थान | ३२ |
| ३. | आर्यांचे मूलस्थान : तीन भाषाशास्त्रीय मते | ४५ |
| ४. | पुनः एकदा उत्तर ध्रुव | ६० |
| ५. | ऋग्वेदातील सोम | १०९ |
| ६. | ऋग्वेदातील तथाकथित आर्य-अनार्य संघर्ष १ | १३१ |
| ७. | ऋग्वेदातील तथाकथित आर्य-अनार्य संघर्ष २ | १५० |
| ८. | ऋग्वेदातील तथाकथित आर्य-अनार्य संघर्ष ३ | १७३ |
| ९. | सिंधु संस्कृती व वेदवाङ्मय | १९२ |


■ ■

# ...१...
# आर्यवंशाची कल्पना

"Max Muller, on an unlucky day, used the word "Aryan Race". Thus arose out of talk alone, an imaginary creature : Aryan Man"

Heredity Race & Society
By
Dunn & Dobzansky

जगातील मानवांचे वर्गीकरण आर्य, द्रविड, सेमेटिक, मंगोल वगैरे वंशात करता येते अशी कल्पना सार्वत्रिक आहे. या कल्पनेप्रमाणे आर्य हे गोरे, सरळ नाकाचे, बारीक ओठांचे व सरळ म्हणजे कुरळ्या नसलेल्या केसांचे असतात. यावर सहज येणारा आक्षेप असा की आनुवंशिक गुणधर्म दोनपेक्षा जास्त आहेत. त्यातले हे चारच निवडून आर्यांची व्याख्या करणे समर्थनीय आहे, काय? समर्थन एकच की युरोपीय लोक साधारणपणे असे असतात. पण हे सोडून दुसरे चार गुणधर्म घेतले तर युरोपीयांचे देखील आपसात फारच थोडे साधर्म्य आहे, असेही दिसून येऊ शकते. दुसरे असे की या आनुवंशिक गुणधर्मामध्ये काही साहचर्य नाही. त्वचेचा रंग गोरा असला तर त्यावरून डोळ्यांचा व केसांचा रंग अमुक असेल, नाक, ओठ व केस यांचा आकार अमुक असेल असे काहीच म्हणता येत नाही. तेव्हा हे सारे गुणधर्म जमेस धरून वंशाचे वर्गीकरण केले तर इतके वंश कल्पावे लागतात की तितक्या व्यक्तीच जगात नाहीत. एकूण जन्मसिद्ध शारीरिक वंशांच्या आधारे मानवांचे वर्गीकरण करणे अशक्य आहे.

लुई अल्बर्टो मसादो हे व्हेनेझुएलामध्ये 'मानवी बुद्धिमत्तेचे' मंत्री नियुक्त केले गेले होते. त्यांनी बुद्धिमान् होण्याचा अधिकार[१] या नावाने पुस्तक लिहिले आहे. या पुस्तकात ज्या मुद्यांची चर्चा केली गेली आहे त्यांवर गेल्या काही वर्षांत बरेच वादळ माजून राहिलेले आहे. हे प्रश्न असे :-१) मानवी बुद्धिमत्ता व इतर क्षमता आनुवंशिक असतात काय? २) आनुवंशिक असतील तर मानवाचे जन्मतःच कमी अधिक बुद्धिमान् व सक्षम असे वंश आहेत काय? ३) मानसिक क्षमता आनुवंशिक असतील तर पशूप्रमाणेच मानवाला सुजनन लागू करून अतिमानव निर्मिता येईल काय? ...निर्मिता येईल असे मानून काही वैज्ञानिकांनी नोबेल पारितोषिक मिळविलेल्या काही पुरुषांच्या वीर्याने काही स्त्रियांचे कृत्रिम रेतन केले. याविरुद्ध बरीच ओरड झाली आहे... ४) मानवांत जन्मसिद्ध विषमता असेल, तर आपल्या समतावादी तत्त्वज्ञानाचे काय?

शरीराची ठेवण, त्याच्या क्रिया, रोग वगैरे अनेक गोष्टी आनुवंशिक आहेत, मानसिक क्षमताच तेवढ्या आनुवंशिक नाहीत या मताची प्रारंभिक संभाव्यता फारच कमी आहे. शरीर व मन यांत एवढे द्वैत मानण्यास काहीच आधार नाही.

मेन्दूचे अध्ययन करून त्याच्या विशिष्ट भागाला इजा झाल्याने भाषाक्षमता घटते, दुसऱ्या एका भागाला इजा झाल्याने विशिष्ट प्रकारच्या स्मृतीला बाधा येते वगैरे गोष्टी सिद्ध झालेल्या आहेत. तसेच बुद्धिमान् पुरुषांच्या मेन्दूत निम्नोनतता जास्त असते, असे दिसून आले आहे. मेन्दूची संरचना व बुद्धिमत्ता यांची फारकत करणे अशक्य आहे हे कबूल न करणे हा दुराग्रह आहे व मेन्दूची संरचना बऱ्याच अंशी आनुवंशिक असते याबद्दल संशय घेता येत नाही. तेव्हा बुद्धिमत्ता आनुवंशिक नाही, असे मानणे कठीण आहे.

उलटपक्षी ती आनुवंशिक आहे असे सिद्ध करणारा बराच पुरावा उपलब्ध आहे. जुळी भावंडे, सख्खी भावंडे, चुलत भावंडे वगैरे क्रमाने रक्तसंबंध अधिकाधिक दूर होत जातो. याच क्रमाने बुद्धिमत्तेतील साम्यदेखील अधिकाधिक कमी होत जाते. भावंडे ज्या परिस्थितीत वाढतात ती परिस्थितीदेखील याच क्रमाने कमी-सारखी होत जाते. म्हणून या क्रमाने दिसणारा बुद्धिमत्तेतील फरक आनुवंशिकतेमुळे पडत नसून परिस्थितीमुळे पडतो, असे यावर उत्तर देण्यात येते. पण वेगळ्या घरांत राहणाऱ्या जुळ्या मुलांच्या बुद्धिमत्ता मापून पाहता, परिस्थितीमुळे आनुवंशिकतेचा प्रभाव कमी झाला, तरी बऱ्याच





अंशाने कायम राहतो, असे दिसून येते.

मानवाच्या बुद्धिमत्तेचे अध्ययन केवळ सांख्यिकीच्या आधारेच करता येते, प्रयोगाच्या आधारे करता येत नाही. पण उंदरावर या बाबतीत प्रयोग करण्यात आलेले आहेत. अन्न व औषधे यांचा मानवावर काय परिणाम होईल हे पाहण्यासाठी आधी उंदरावर प्रयोग करूनच अनुमाने बांधली जातात. ही अनुमाने बहुधा लागू पडतात. आनुवंशिकतेच्या बाबतीत जे उंदराला लागू आहे, ते मानवाला लागू होणार नाही, असे म्हणणे समर्थनीय ठरणार नाही.

## उंदरावरील प्रयोग


या प्रयोगात चक्रव्यूहातून बाहेर येणे ही बुद्धिमत्तेची कसोटी मानण्यात आली होती. उपाशी उंदरांना चक्रव्यूहात ठेवण्यात आले होते. अन्न, चक्रव्यूहाच्या बाहेर होते. जो उंदीर चक्रव्यूहाच्या अधिक लवकर बाहेर येऊन अन्न खाईल तो जास्त हुशार असे बुद्धिमत्तेचे गमक ठरविले होते. या गमकाच्या आधारे सर्वांत जास्त हुशार ठरणारे उंदीर सर्वात कमी हुशार ठरणाऱ्या उंदरांपासून वेगळे करण्यात आले. प्रजोत्पत्तीच्या बाबतीत या दोन गटांतील उंदरांना एकमेकांशी संबंध ठेवू देण्यात आला नाही. याप्रमाणे एक हुशार उंदरांची व एक मूर्ख उंदरांची अशा उंदरांच्या दोन पिढ्या निर्माण झाल्या. अशा रीतीने अठरा पिढ्यांपर्यंत प्रयोग करण्यात आला. अठराव्या पिढीतील सर्वांत हुशार उंदरांच्या गटातील अगदी कमी हुशार उंदीरदेखील मूर्ख उंदराच्या गटातील सर्वांत हुशार उंदरापेक्षा जास्त बुद्धिमान् होता.

असे झाल्यावर ते उंदरांचे गट एकत्र मिसळण्यात आले. या मिश्र उंदरांच्या सहा पिढ्या झाल्यावर असे आढळून आले, की त्या उंदरांच्या समूहात ज्यांची सरासरी हुशारी दोन वेगळ्या उंचवट्यांनी दाखवावी लागेल असे दोन भिन्न गट नव्हते. सर्व समूहाची सरासरी एकाच उंचवट्याने दाखविता येत होती.

दोन उंचवट्यांचा सांख्यिकीय अर्थ पुढील स्पष्टीकरणाने स्पष्ट होईल.

ज्यांची सरासरी बुद्धिमत्ता ७५, न्यूनतम ५०, वा अधिकतम १०० या बुद्ध्यांकाने दाखविता येईल असा शंभर व्यक्तींचा गट घेतला; व ज्यांची १२५, १०१ व १५० या बुद्ध्यांकाने दाखवावी लागेल असा शंभराचा दुसरा गट घेतला. हे दोन्ही गट एकात

मिसळून होणाऱ्या दोनशेच्या एका गटाच्या बुद्धीचे बाहुल्यवितरण काढले तर ते असे येईल-




येथे दोन गट एकात मिसळले तरी ७५ व १२५ अशा दोन गटांच्या दोन सरासऱ्या दाखविणारे दोन उंचवटे दिसतात. असे दोन उंचवटे दिसले, तर घेतलेल्या गटात दोन प्रकारच्या व्यक्ती आहेत असे म्हणता येते. तसे नसेल, तर सारा गट एकाच प्रकारचा आहे असे ठरेल.

उंदरांच्या बाबतीत असेच ठरले.

उंदरात बुद्धिमत्ता आनुवंशिक आहे, असे या प्रयोगाने सिद्ध होते. उंदरात बुद्धिमत्ता आनुवंशिक असेल तर मानवात ती आनुवंशिक का नसावी?

**वंशकल्पना**

मानवाचे अनेक विशेष आनुवंशिक असतात एवढ्यावरून काही लोक मानवसमाज वेगवेगळ्या वंशांत विभागलेला आहे असे समजतात. पण असे समजणे चूक आहे. कारण आनुवंशिक गुणविशेष एकमेकांहून स्वतंत्र असतात.

युरोपात अ व ई हे शुद्ध आर्य जोडपे होते अशी कल्पना करा. या जोडप्याला एक मुलगा व एक मुलगी झाली. या मुला-मुलींनी आपसात लग्न केले. या लग्नातून तिसरी पिढी निर्माण झाली व या क्रमानेच अ व ई यांचा वंश दुसऱ्या कुणाशी संकर न होता फोफावला.

आता मंगोलियात ए व उ हे मंगोल जोडपे होते अशी कल्पना करा. या जोडप्यालाही दुसऱ्या कुणाशीही संकर न होता संतती झाली. याप्रमाणे आर्य व मंगोल वंशाच्या संतती निर्माण झाल्या.

असे झाले असते, तर मंगोल वंशाच्या संततीत कोणतेच अमंगोल गुण राहिले





नसते व आर्य वंशाच्या संततीत कोणतेच अनार्य गुण राहिले नसते. आर्य व अनार्य वंशाच्या पूर्वजांमध्ये जे गुण समान असतील तेवढे वगळून इतर कोणत्याही गुणांपैकी एक गुण माहीत झाल्यावर त्या व्यक्तीच्या ठायी दुसरे कोणते आनुवंशिक गुण आहेत हे सांगता आले असते. समान गुण सोडल्यास मंगोल संत तीत फक्त मंगोल गुण व आर्य संततीत फक्त आर्य गुण असणार.

पण असे दिसत नाही. कोणताही आनुवंशिक गुण घेतला तरी तो ज्याच्या ठायी आहे त्याच्या ठायी दुसरा कोणता आनुवंशिक गुण असेल याचे मुळीच अनुमान करता येत नाही. गोरा माणूस कुरळ्या केसांचा असेल किंवा सरळ केसांचाही असू शकेल, त्याचे डोळे घारे असतील वा काळेही असतील, त्याचे ओठ जाड असतील वा बारीकही असतील. तेव्हा वेगळ्या वंशात उत्पन्न झालेले मानवसमूह आज अस्तित्वात नाहीत हे स्पष्ट आहे.

हाच मुद्दा अधिक विस्ताराने असा मांडता येईल. आज अस्तित्वात असलेले मानवसमूह निरनिराळ्या वंशांचे असतील तर सांख्यिकीच्या दृष्टीने खालील प्रकार दिसून आला पाहिजे. एका वंशाच्या लोकांच्या शरीरविशेषांत सहबन्ध असेल, म्हणजे काही विशेष त्यांच्यापैकी बहुतेकात दिसतील व काही त्यांच्यापैकी बहुतेकात दिसणार नाहीत.

हे साहचर्य गणिताने काढता येते. समजा, ज्यांच्या त्वचेचा रंग काळा असतो त्यांच्या डोळ्यांचाही रंग काळाच असतो असे सर्वदा आढळून आले, तर त्वचेच्या व डोळ्यांच्या रंगांत पूर्ण सहबन्ध आहे असे म्हणता येईल. पण त्वचेच्या वर्णावरून डोळ्यांच्या वर्णाबद्दल काहीच अनुमान काढता न आले, तर हा सहबन्ध शून्य निघेल. त्वचेच्या रंगावरून डोळ्यांच्या रंगाबद्दल अचूक अनुमान काढता न आले तरी १० टक्के, ५० टक्के वगैरे संभाव्यता सांगण्याचे अनुमान करता आले, तर हा सहबन्ध शून्यापेक्षा जास्त पण एकापेक्षा कमी अशा दशांशात निघेल.

असे सहबन्ध जगात आहेत काय हे पाहण्यासाठी जगातल्या मानवांचा एक प्रातिनिधिक गट आपण घेऊ. प्रातिनिधिक गट कसा घ्यावा याच्या सांख्यिकीत खास पद्धती सांगितल्या आहेत. प्रातिनिधिक गटात जगात निरनिराळ्या प्रकारच्या मानवांची संख्या ज्या प्रमाणात आहे त्याच प्रमाणात त्या प्रकारातून व्यक्ती निवडल्या जातील.

समजा असा एक दहा हजारांचा गट आपण घेतला. या गटाच्या शरीरविशेषांचे मापन व पाहणी केली. या शरीरविशेषांत काय सहबन्ध आहे याचे गणित केले व ते खालील तालिकेत मांडले :-

**१. निरनिराळ्या शरीरविशेषांतील सहबन्ध दाखविणारी तालिका**

| शरीर विशेष | नाक | डोळे | वर्ण | उंची | रक्त | डोके | कान |
|---|---|---|---|---|---|---|---|
| नाक | १ | ० | ० | ० | ० | ० | ० |
| डोळे | ० | १ | ० | ० | ० | ० | ० |
| वर्ण | ० | ० | १ | ० | ० | ० | ० |
| उंची | ० | ० | ० | १ | ० | ० | ० |
| रक्त | ० | ० | ० | ० | १ | ० | ० |
| डोके | ० | ० | ० | ० | ० | १ | ० |
| कान | ० | ० | ० | ० | ० | ० | १ |

नाकाचा नाकाशी व डोळ्यांचा डोळ्यांशी सहबन्ध हा स्वतःचा स्वतःशीच सहबन्ध असल्यामुळे म्हणजे परिपूर्ण आहे. दुसरे सारे सहबन्ध शून्य आहेत, हे वरील तालिकेवरून दिसून येईल.

अशा तालिकेचे वर्गविश्लेषण करण्याची एक पद्धती सांख्यिकीत आहे. वर्गविश्लेषण केल्याने कोणत्या विशेषांचा आपसात जास्त सहबन्ध असल्यामुळे ते एका वर्गात पडतात हे शोधून काढता येते. शरीरविशेषांचे याप्रमाणे विश्लेषण केल्यावर त्यात काही वर्ग पडल्याचे दिसून आले, तर जितके वर्ग पडले तितके वंश मानवात आहेत असे म्हणता येईल.

पण असे वर्ग पडण्यासाठी वरील तालिकेतील सहबन्ध शून्यापेक्षा जास्त असावे लागतात. ते तसे नाहीत. यामुळे मानवाचे वांशिक वर्ग पडू शकत नाहीत, वंशकल्पना सांख्यिकीच्या दृष्टीने असिद्ध ठरते.

## सांख्यिकीचा अधिक प्रकाश

मुद्दा अधिक स्पष्ट करण्यासाठी याच्या विरुद्ध उदाहरण घेऊ. शरीरविशेष न घेता, निरनिराळी वाद्ये वाजविण्याचे कौशल्य, हस्तकौशल्य, अंगुलिनैपुण्य, निरनिराळ्या





खेळांतील नैपुण्य, शब्दांच्या बाबतीतली स्मरणशक्ती, व्याकरणाचे नियम पाळण्यातली निपुणता वगैरे विशेषांचे मापन केले व त्यांच्यांतील सहसबन्ध काढून वरच्यासारखी तालिका बनविली तर वरील तालिकेतील शून्यांच्या जागी. २, .३, .५, .८ इत्यादी अनेक प्रकारच्या दशांश संख्या येतील. या तालिकेचे वर्गविश्लेषण केले तर संगीतपटुत्व, क्रीडापटुत्व व भाषापटुत्व असे निश्चित वर्ग पडलेले आपल्या दिसून येतील. तेव्हा संगीतपटू, भाषापटू, क्रीडापटू असे मानवी व्यक्तीचे वर्ग मानणे शास्त्रपूत आहे. पण त्यांचे वांशिक गट मानणे शास्त्रपूत नाही.

वंशकल्पना शास्त्रपूत नाही असे दाखविण्यास मागे उंदरांवरील प्रयोगात ज्या बाहुल्यवितरणाचा उपयोग केला त्याचा उपयोग होऊ शकतो. समजा आपण यदृच्छेने निवडलेल्या हजार माणसांच्या उंचीचे मापन केले, व तिचे बाहुल्यवितरण काढले तर या बाहुल्यवितरणात मागील आलेखात दाखविल्याप्रमाणे एकापेक्षा जास्त उंचवटे असणार नाहीत. म्हणजे उंचीच्या बाबतीत हा हजार मानवांचा गट निरनिराळ्या वांशिक गटांचा बनलेला नाही, असे म्हणता येते. उंचीप्रमाणेच दुसरा कोणताही शरीरविशेष घेतला तरी मानवाच्या प्रातिनिधिक गटाच्या आलेखात दोन उंचवटे येत नाहीत. अर्थात् कोणत्याही शरीरविशेषाच्या बाबतीत जगातील मानवांचे वर्गीकरण निरनिराळ्या वंशांत होऊ शकत नाही.

## वंश आणि रक्त

वंशाचा रक्ताशी फार संबंध आहे, असे समजण्यात येते. किंबहुना कधी कधी वंश या अर्थी रक्त हा शब्द वापरण्यात येतो. रक्ताचे नाते म्हणजेच जन्मसिद्ध नाते. मानवांमध्ये चार प्रकारचे रक्त असते. रक्तक्षय होऊन रुग्णाला जेव्हा दुसऱ्या कुणाचे रक्त देण्याची पाळी येते, तेव्हा वाटेल त्याचे रक्त देऊन भागत नाही. त्याच्या रक्ताशी जुळणारेच रक्त द्यावे लागते. एखाद्या माणसाचे रक्त असे असते, की त्याला कोणाचेही रक्त दिले तरी चालते. अशा रक्ताला सर्वस्वीकारी रक्त म्हणतात. दुसरे एक प्रकारचे रक्त असे असते की जे कुणालाही दिले तरी चालते. अशा रक्ताला सर्वदेय रक्त म्हणतात. बाकी दोन प्रकारचे रक्त असे असते की ते फक्त स्वतःच्याच जातीचे रक्त घेऊ शकते. दुसऱ्या जातीचे रक्त त्यात मिसळले तर रुग्ण मरतो. प्रत्येक माणसाचे रक्त तपासून ते यांपैकी कोणत्या जातीचे आहे हे ठरविता येते. वंशवाद्यांनी कल्पिलेले निरनिराळे

वंश जर वास्तविक असतील तर एका तथाकथित वंशामध्ये एकाच प्रकारचे रक्त आढळायला पाहिजे. पण असे आढळून येत नाही.

बरे, रक्ताच्या बाबतीत अगदी शुद्ध असे मानववंश आज न आढळले तरी ज्यांत वंशवाद्यांच्या मताप्रमाणे जास्त भेसळ झाली आहे अशा मानवसमूहात रक्तवैभिन्य जास्त आढळायला पाहिजे व ज्यांच्यात कमी भेसळ झालेली आहे त्यांच्यांत ते कमी आढळायला पाहिजे. असे खरोखरच आढळते काय, हे खालील क्रमावरून पाहता येईल -

रक्तवैभिन्याच्या बाबतीत निरनिराळ्या मानवसमूहांचा क्रम

१. चिनी
२. मॉस्कोवासी रशियन गोरे
३. हिंदू
४. हंगेरीतील जिप्सी
५. पश्चिम आफ्रिकेतील नीग्रो
६. अमेरिकन गोरे
७. न्यू गिनीतील मिलेनीसियन
८. जर्मन श्लेष्विग होल्स्टिन
९. मूलवासी आस्ट्रेलियन
१०. उत्तर अमेरिकेतील इण्डियन

वरील क्रमात वंशवाद्यांना धक्का देणाऱ्या अनेक गोष्टी आहेत. मॉस्कोनिवासी रशियन गोऱ्यामध्ये ज्यांच्या वरंशभिन्नतेबद्दल फार गवगवा करण्यात येतो त्या हिंदूपेक्षा जास्त रक्तभिन्नता आहे.

मूलवासी ऑस्ट्रेलियन लोकांमध्ये अमेरिकन इंडियनांपेक्षा रक्तभिन्नता अधिक आहे. अमेरिकन इंडियन लोकांमध्ये पहिल्या प्रकारच्या रक्ताचे शतमान ऐंशी ते एक्क्याण्णव आहे, उलट ऑस्ट्रेलियन आदिवासींमध्ये ते ५२ आहे. यावरून वंशकल्पना खरी असेल, तर असे अनुमान निघायला पाहिजे, की अमेरिकन इंडियन हा इतर वंशांशी कमीत कमी संकर झालेला वर्ण आहे, व ऑस्ट्रेलियन आदिवासी हा बराच संकर झालेला वर्ण आहे. पण प्रा. सेलिग्मन या वंशवाद्याने कबूल केले आहे, की ऐतिहासिक





२. रिस्ले/सेलिग्मनप्रणीत भारतातील निरनिराळ्या वंशांची लक्षणे

| विशेष वंश निवास व लोक | द्रविड श्रीलंका तामिळनाडू मध्यप्रदेश, आन्ध्र, छोटा नागपूर, गंगेचे खोरे, पनिया व संथाल | मंगोल द्रविड दक्षिण बंगाल ओरिसा ब्राह्मण कायस्थ बंगलादेशी मुसलमान | आर्यद्रविड उत्तर प्रदेश राजस्थान बिहार श्रीलंका, हिंदुस्थानी ब्राह्मण चांभार | सीथोद्रविड पश्चिमभारत मराठी, ब्राह्मण कुणबी, कूर्गी | मंगोल आसाम कनेट लेप्चा बोडो | इण्डोआर्य पंजाब राजपुताना काश्मीर, रजपूत खत्री, जाट | तुर्कोइराणी सीमाप्रांत बलुचीस्तान बलोच, ब्राहुइ अफगाण |
|---|---|---|---|---|---|---|---|
| उंची | ठेंगणी | मध्यम | मध्यम | मध्यम | ठेंगणी/मध्यम | उंच | उंच |
| वर्ण | काळा | काळा | हलका तपकिरी ते काळा | गोरा | पिवळा तपकिरी | गोरा | गोरा |
| केस | कुरळे | | | विरळ | | | |
| डोळे | काळे | | | | | काळे | काळे क्वचित घारे |
| डोके | लांब | रुंदसे | लांब | रुंद | रुंद | लांब | रुंद |
| नाक | रुंद | रुंद | मध्यम ते रुंद | धारदार पण फार लांब नाही | रुंद ते धारदार | निरुंद उठावदार | मध्यम उठावदार |
| चेहऱ्यावर केस | | विपुल | | | विरळ वक्र पापण्या सपाट चेहरा | विपुल | विपुल |

प्रमाणावरून ऑस्ट्रेलियन आदिवासी हाच सर्व वंशांपेक्षा इतर वंशांशी कमी संबंध आलेला वंश आहे, असे म्हणावे लागते.

## भारतातील तथाकथित वंश

रिस्ले व सेलिग्मन यांच्या मते भारतात असलेले निरनिराळे वंश, त्यांची शरीरलक्षणे व निवासस्थाने तालिका २ मध्ये दिल्याप्रमाणे आहेत.

ही तालिका वाचून कोणती गोष्ट सहज लक्षात येत असेल तर ती ही, की तीत वापरलेली गमके पूर्णतः स्वच्छंदी आहेत. शेकडो आनुवंशिक गुणविशेषांपैकी फक्त सात-आठ शरीरविशेषांच्या आधारावर वंशाचे वर्गीकरण केलेले आहे. बरे, हे सात-आठ शरीरविशेष सर्वांना एकाच न्यायाने लागू केलेले आहेत म्हणावे तर तसेही नाही.



लक्षणेदेखील मानण्यात आली आहेत. या लक्षणांना आधार काय? द्रविड व इंडोआर्य यांच्या लक्षणांची आळीपाळीने अदलाबदल करून उंची, काळेपणा, सरळ केस, काळे डोळे, लांब डोके व निरुंद पण 'उठावदार' नाक असले की क्ष नावाचा एक वंश होतो असे का म्हणू नये? अशा तऱ्हेने लक्षणांचे वाटेल तसे समूह कल्पून वरील तालिकेतील सात वंशांच्या जागी सातशे वंशदेखील कल्पिता येतील.

तसेच वरील विशेषांपैकी किती विशेष समान असले म्हणजे वंश समान आहे असे मानावे? तथाकथित द्रविडांचे मंगोल द्रविडांशी दोन, आर्यद्रविडांशी एक, सीथोद्रविडांशी शून्य, मंगोलांशी जेमतेम एक, इंडोआर्यांशी दोन व तुर्कोइराणीयांशी जेमतेम एक विशेष समान आहे. शून्य विशेष समान असूनही सीथोद्रविडांना द्रविडच म्हटले आहे. केवळ दोन विशेषांच्या समानतेच्या आधारावर मंगोल द्रविड व आर्यद्रविड

आहे.

रिस्लेने पश्चिम महाराष्ट्रीयांना सीथोद्रविड व वैदर्भीयांना द्राविड ठरविले. म्हणजे महाराष्ट्रात त्याच्या मते 'आर्यांचा' पत्ता नाही. चिं. वि. वैद्य, ना. गो. चापेकर वगैरे वेदाभ्यासकांना आपण वैदिक आर्य आहोत असे वाटत होते. त्यांना रिस्लेच्या या वर्गीकरणाने बराच धक्का बसला असेल. अनेक युक्तिवाद करून, विशेषतः नाकाच्या मापावरून आपणच केवळ नव्हे तर मराठे आर्य आहेत असे चिं. वि. वैद्यांनी मोठ्या हिरिरीने प्रतिपादले. एकूण सोयीची लक्षणे घेऊन कोणालाही कोणत्याही वंशात घालता येईल. एके काळी वंशवाद्यांनी लंबशीर्षक - डोलिकोसेफालिक - व सपाटशीर्षक - ब्रॅकीसेफालिक - ही लक्षणे निर्णायक मानली होती; पण या लक्षणांप्रमाणे स्कॉण्डिनेव्हियातील गोरे पश्चिम आफ्रिकेतील काळ्यांशी समवंशी ठरतात म्हणून ही लक्षणे 'तापलेल्या बटाट्याप्रमाणे' टाकून देण्यात आली!

**कोणे एके काळी**

अशी गोंधळाची परिस्थिती असण्याचे वंशवाद्यांच्या मते असे कारण आहे, की हजारो वर्षांपासून वंशांचा संकर झालेला आहे. पण फार प्राचीन काळी शुद्ध वंश अस्तित्वात होते. या निरनिराळ्या शुद्ध वंशांच्या लोकांमध्ये संबंध येऊन मिश्र प्रजा उत्पन्न झाली.

या मिश्र प्रजेत मिश्र जनी असतात. विशिष्ट आनुवंशिक गुणधर्म निर्मिणाऱ्या जैव परमाणूंना जनी म्हणतात..., भारतातला एखादा गोरा माणूस घेतला तर तो स्वतः गोरा असला तरी काळ्या मुलांना जन्म देऊ शकतो; कारण त्याच्या शरीरात काळ्या रंगाला जन्म देणाऱ्या जनीदेखील असतात. म्हणजे तो स्वतः शुद्ध गोऱ्या जनी असणाऱ्या व शुद्ध काळ्या जनी असणाऱ्या अशा दोन प्रकारच्या व्यक्तींच्या संकराने जन्माला आलेला असतो. अर्थात् शुद्ध वंश आज अस्तित्वात नसले, तरी कधी काळी अस्तित्वात असले पाहिजेत.

पण हे अनुमान चूक आहे. शुद्ध वंशापासून मिश्र वंश जन्माला येऊ शकतात तसेच मिश्र वंशापासूनदेखील मिश्र वंश जन्माला येऊ शकतात. तेव्हा शुद्ध वंशापासून मिश्र वंश अस्तित्वात येऊ शकतात हा शुद्ध वंशाच्या प्रा चीन अस्तित्वाचा पुरावा होऊ शकत नाही. आज अस्तित्वात असणारे पाणी, वायू वगैरे पदार्थ उदजन, प्राणवायू





वगैरे मूलतत्त्वांचे बनलेले आहेत, शुद्ध नाहीत. प्रयोगशाळेत मूलतत्त्वांचा समन्वय करून हे पदार्थ बनविता येतात. पण यावरून सृष्टीत कधीकाळी फक्त मूलतत्त्वेच होती व त्यांच्या समन्वयाने पृथ्वी, आप वगैरे महाभूते झाली असे त्यावरून सिद्ध होत नाही. विश्व अनादी कालापासून समन्वितच असण्याचा संभव आहे.

मानवाच्या ज्ञात इतिहासात पूर्वी कधीही शुद्ध वंश अस्तित्वात असल्याचा पुरावा नाही. उत्खननात सापडलेले सांगाडे अत्यल्प आहेत, पण त्यांचा कोणताही समूह सर्व शरीरविशेषांच्या बाबतीत एकरूप नाही.

मानवाचे अनेक विशेष आनुवंशिक असले तरी त्या बहुतेकांवर परिस्थितीचा इतका परिणाम होतो, की एखाद्या मानवी गटाचे दर्शनी विशेषावरून वांशिक वर्गीकरण करण्याच्या आधी त्या विशेषाचा अर्जित वंश किती व आनुवंशिक किती याचे सांख्यिकीच्या तन्त्रांनी विश्लेषण करणे आवश्यक आहे. अर्जित विशेष वंशदायाने संक्रान्त होत नाहीत असे म्हणतात. पण गेल्या शंभर वर्षांत युरोपीय व जपानी लोकांच्या उंचीत बरीच वाढ झाली आहे. ही वाढ त्यांच्या वंशात फरक पडल्यामुळे झाली नाही हे स्पष्ट आहे. उंचीप्रमाणेच उष्ण प्रदेशातून थंड प्रदेशात गेल्यावर काही लोकांच्या त्वचेच्या वर्णात फरक पडतो.

या घटकांची उपपत्ती क किरण, विशिष्ट आहार इत्यादिकांमुळे जनीमध्ये फरक पडतो - अर्थात अर्जित गुण वंशदायाने संक्रान्त होत नाहीत असे मानले तरी त्यांना निर्माण करणाऱ्या परिस्थितीमुळे जनीत फरक पडतो व मग जनींच्या द्वारा ते गुण वंशदायाने संक्रान्त होतात या वाइसमन इत्यादी वैज्ञानिकांच्या शोधानुसार देता येईल. एका भूभागात राहणाऱ्या लोकांत काही जन्मसिद्ध गुणधर्म समान असतात याची उपपत्ती ते गट वेगळ्या वंशाचे आहेत या कल्पनेत न शोधता आधी त्या भूभागातील परिस्थितीत शोधली पाहिजे. वंशवाद्यांनी अशी दक्षता बाळगलेली नाही.

भारतातले बहुतेक लोक सावळे व युरोपातले गोरे आहेत याची उपपत्ती वंशभिन्नतेत न शोधता भारत हा उष्ण प्रदेश आहे व युरोप हा थंड प्रदेश आहे यात शोधली पाहिजे हे वरील तथ्यावरून स्पष्ट आहे. ''हवामानाचा परिणाम होऊनही भारतात काही अतीव गोरे लोक आहेत. ते प्राचीनकाळी भारतात आलेल्या गोऱ्या जमातींचे वंशज आहेत. गोऱ्यांची पूर्वज फार थोड्या संख्येने व बाहेरून आले असले पाहिजेत,'' असे मानले तर कॉर्नवॉल वगैरे पाश्चात्त्य प्रदेशांत काळ्या वर्णाचे लोक आढळतात, म्हणून प्राचीन

काळी युरोपात थोड्या संख्येने काही काळे लोक बाहेरून आले असले पाहिजेत, असे मानावे लागेल.

## मानवांचे सुजनन

निरनिराळ्या वंशांचे निरनिराळे मानवसमूह जगात आहेत ही कल्पना याप्रमाणे शास्त्रीय विचारांच्या कसोटीस उतरत नसली तरी मानवाचे पुष्कळसे महत्त्वाचे गुणधर्म आनुवंशिक आहेत हे नाकारता येत नाही. असे जर आहे तर पशूप्रमाणे मानवावरही सुजनन लागू करून अतिमानव निर्माण करण्यात काय अडचणी आहेत असा एक प्रश्न उपस्थित होतो. याचे उत्तर मानसिक गुणधर्मांच्या स्वतन्त्रतेत आढळते. एका गुणधर्मावरून दुसऱ्या गुणधर्माच्या अस्तित्वाचे अनुमान करणे दूरापास्त व कधीकधी अशक्य असते असे मागे दाखवून दिले आहे. अर्थात् सुजनन करून काही काळानंतर एखाद्या गुणाचा जिच्यात परमोत्कर्ष झाला आहे अशी पिढी निर्माण करता येईल. पण ही पिढी तो गुण सोडून इतर गुणांच्या बाबतीत अगदी सामान्य असेल. तेव्हा सुजननाने सर्वगुणश्रेष्ठ असा मानव निर्माण करता येईल हे अशक्य आहे. बरे एखाद्या गुणापुरताच अतिश्रेष्ठ मानव निर्माण करायचे ठरविले तरी हा गुण कसा निवडायचा? कोणत्या गुणाच्या बाबतीत सर्वश्रेष्ठ पिढी निर्मायची? बुद्धिमत्तेच्या बाबतीत अशी पिढी निर्मावी म्हटले तर बुद्धिमत्ता निदान १२० प्रकारची तरी आहे. यापैकी कोणत्या प्रकारच्या बुद्धिमत्तेचा उत्कर्ष साधायचा? जी बुद्धिमत्ता सगळ्यांत महत्त्वाची असेल तिचा उत्कर्ष साधावा असे म्हणून भागत नाही. सगळ्यांत महत्त्वाची बुद्धिमत्ता कोणती हे समाजाच्या गरजांवर अवलंबून असते. गरजेपेक्षा जास्त प्रमाणात एखाद्या विशिष्ट प्रकारच्या बुद्धिमत्तेचा उत्कर्ष असलेल्या व्यक्ती निर्मिल्या तर गरजेपेक्षा पुरवठा जास्त झाल्यामुळे हे 'अतिमानव' समाजात निरुपयोगी म्हणून कुजत पडतील.

सर्व तऱ्हेच्या बुद्धिमत्तेचा एकसमयावच्छेदेकरून उत्कर्ष साधून एखादी पिढी निर्मिणे शक्य आहे असे मानले तरी त्यामुळे समाजाचे भले होईल कशावरून? ज्या समाजात सर्वच लोक रसेल व आइन्स्टाइन यांच्या तोडीचे बुद्धिमान् आहेत असा समाज कितपत चांगला चालू शकेल याची शंका आहे. सर्वच लोकांना रसेल व आइन्स्टाइन यांना साजेसे काम देणे कोणत्याही समाजाला जमणार नाही व जेथे सर्वच बृहस्पती आहेत अशा समाजातले बहुसंख्य लोक बुद्धिविलासाची संधी न मिळाल्याने दुःखी राहतील. एवढेच नव्हे, तर त्यांच्या वाट्याला आलेले हलके काम नीट करू शकणार





नाहीत. तेव्हा मानवाच्या बाबतीत आयुष्याची वाताहत करणाऱ्या रोगाचे निर्मूलन करणे एवढेच सुजननाचे कार्य असू शकेल. पण असे आनुवंशिक रोग कोणते आहेत हे निश्चितपणे सांगणे कठीण आहे.

## नोबेल विजेत्यांवरील प्रयोग

सुजननाची कल्पना कित्येकांना इतकी आकर्षक वाटते, की नुकतेच सर्वश्रेष्ठ मानव निर्माण करण्यासाठी काही निवडक बुद्धिमान् स्त्रियांना काही नोबेल विजेत्यांच्या वीर्याने कृत्रिम रेतन करण्यात आले. या प्रयोगातून काय निष्पन्न होणार? एक तर नोबेल विजेते बुद्धिमत्तेच्या १२० प्रकारांपैकी बऱ्याच प्रकारांत श्रेष्ठ ठरले, तरी इतर अनेक प्रकारांत सामान्य वा निकृष्टदेखील असणार. शिवाय अपत्यांच्या ठायी आईबापांचे श्रेष्ठ गुणच येतात असे नाही. "तुम्ही माझ्याशी लग्न करा म्हणजे आपली मुले तुमच्यासारखी बुद्धिमान् व माझ्यासारखी सुंदर होतील" असे एक नटी बर्नार्ड शॉला म्हणाली, तेव्हा या उलट "ती माझ्यासारखी सुंदर व तुझ्यासारखी बुद्धिमान् झाली तर?" असा शॉने प्रश्न टाकला.

ज्या स्त्रियांना नोबेल विजेत्यांचे वीर्य देण्यात आले, त्या स्वतः देखील बुद्धिमान् आहेत म्हणून असे होणार नाही असे काही वाचकांना वाटेल. पण वंशदाय फक्त आईबापांपुरताच मर्यादित नाही. आई व बाप या दोघांच्या पूर्वजांचे गुणदेखील मुलात उतरू शकतात. शिवाय साधारणपणे असे दिसून आले आहे, की अतिबुद्धिमान् पितरांची मुले पितरांच्यापेक्षा कमी बुद्धिमान् व अतिमूर्ख पितरांची पितरांपेक्षा कमी मूर्ख निपजतात. म्हणजे सरासरीकडे जाण्याची अपत्यांची प्रवृत्ती असते. याला सांख्यिकीत प्रतिसरण - रिग्रेशन - म्हणतात. तेव्हा या प्रयोगातून जन्माला येणारी मुले सर्वसाधारण मुलांपेक्षा जास्त बुद्धिमान् निपजतील यापेक्षा जास्त अपेक्षा भाग्यायत्त आहेत.

शिवाय बुद्धी असामान्य असली म्हणजे बौद्धिक क्षेत्रातले यशही असामान्य असते असे नाही. बर्ट्रंड रसेलने आपल्या एका मित्राबद्दल असे लिहून ठेवले आहे, की "मला एखादे गणित वाचायला जितका वेळ लागत होता तितक्या वेळात हा मित्र ते गणित सोडवून देखील ठेवायचा." एवढे असून हा मित्र गणिताच्या क्षेत्रात मुळीच चमकला नाही, आन्तरराष्ट्रीय कीर्तीचा गणिती म्हणून रसेलचीच कीर्ती झाली. आयुष्यात यश मिळायला केवळ क्षमता पुरेशा नाहीत, इतर अनेक योगायोग जुळून यावे लागतात.

त्यांपैकी पुष्कळसे वंशदायावर अवलंबून नाहीत.

एकूण नोबेल विजेत्यांवरील प्रयोगातून काही अद्भुत निर्माण होण्याचा संभव थोडा आहे.

## व्यक्तिभेद व समतेचे तत्त्व

सुजननाने अतिमानव निर्मिता येईल हे एक अशास्त्रीय स्वप्न आहे, जननशास्त्राच्या दृष्टीने वंशकल्पना असिद्ध आहे वगैरे गोष्टी खऱ्या असल्या, तरी आजच्या जगात गोरे, नीग्रो, मंगोल, सेमेटिक वगैरे नावाने ओळखले जाणारे लोकसमूह आहेत. या लोकसमूहांत एक दुसऱ्यापेक्षा श्रेष्ठ आहे की नाही हा प्रश्न उरतोच.

या बाबतीत एक महत्त्वाचा मुद्दा लक्षात घेतला पाहिजे. तो हा की जेव्हा एखादी कसोटी वापरून तिच्यावर अ गटापेक्षा ब गट श्रेष्ठ असे म्हणण्यात येते तेव्हा त्या दोन गटांच्या सरासरीची तुलना करून तसे म्हणण्यात येते. नीग्रो लोक गोऱ्यांपेक्षा बुद्धिमत्तेत कमी आहेत असे जेव्हा काही लोक म्हणतात तेव्हा नीग्रो गटाच्या गुणांची सरासरी गोऱ्या गटाच्या गुणांच्या सरासरीपेक्षा अधिक आहे एवढेच त्यांना म्हणायचे असते. पण सरासरीतला हा फरक फक्त पाच-दहा अंकांचा असतो. उलट सर्वांत बुद्धिमान् गोरा व सर्वांत मूर्ख गोरा यांच्यातील फरक शंभराने व्यक्त करावा लागतो, म्हणजे वंशभेदापेक्षा व्यक्तिभेद कितीतरी पटींनी अधिक असतो. मग नीग्रोपेक्षा गोरे अधिक बुद्धिमान् असतात असे एखाद्या कसोटीवर दिसले तरी त्याची मातब्बरी ती काय?

शिवाय असे सगळ्याच कसोट्यांवर दिसत नाही हे लक्षात ठेवले पाहिजे. काही कसोट्यांवर गोऱ्यांपेक्षा नीग्रोंचे गुण अधिक भरतात. शिवाय नीग्रो व गोरे या दोघांनाही सारख्याच न्याय्यपणे लावता येतील अशा कसोट्या तयार करणे सोपे नाही हेही या संदर्भात लक्षात ठेवले पाहिजे.

वंशभेद अस्तित्वात नाहीत व असले तरी ते क्षुद्र आहेत, व्यक्तिभेद हेच खरे डोळ्यांत भरण्यासारखे व व्यावहारिक दृष्ट्या महत्त्वाचे आहेत, पण ते बऱ्याच अंशी आनुवंशिक आहेत असे ठरले तरी जैविकीच्या दृष्टीने सर्व मानव समान नाहीत असेच ठरते. मग मानवसमतेचे तत्त्व अशास्त्रीय नाही काय?

या प्रश्नाचे उत्तर द्विविध आहे. एक तर सर्व व्यक्ती समान असतात याचा अर्थ





त्यांचे गुणधर्म समान असतात असा नाही, तर सर्वांच्या सुखदुःखाचे मूल्य सारखे असते, प्रत्येक व्यक्तीचे मूल्य स्वयंसिद्ध आहे, कोणतीही व्यक्ती दुसऱ्या एखाद्या व्यक्तीच्या सुखाचे केवळ साधन नाही, तिचे सुख हे इतर कोणत्याही व्यक्तीच्या सुखासारखेच स्वयमेव साध्य आहे या अर्थी सर्व मानव समान आहेत.

प्रत्येक व्यक्तीचे मूल्य सारखे आहे याचा अर्थ प्रत्येक व्यक्तीचे आर्थिक मूल्य सारखे आहे असा कधी कधी करण्यात येतो. व्यक्तीचे आर्थिक मूल्य हा शब्दप्रयोग वस्तुतः चूक आहे. एखादा माणूस जन्मभर जे पैसे मिळवितो ते त्या व्यक्तीचे आर्थिक मूल्य असे म्हणणे बरोबर नाही. कारण, तितक्या मूल्याला तो माणूस स्वतःला विकून घेत नसतो. एखादा माणूस जोडे विकीत असला तरी त्या जोड्यांचा दर्जा कितपत आहे हे तपासून पाहणे व पसंत नसल्यास त्यातील कमतरता दूर करावयास लावणे इतपतच जोडे खरीदणाऱ्याचा त्याच्यावर अधिकार असतो. जोड्याचा दर्जा सोडून जीवनाच्या इतर अंगांच्या बाबतीत, म्हणजे त्याने लग्न करावे की नाही, वा कोणाशी करावे, कोणती पुस्तके वाचावी, वगैरे ठरविण्याचा जोडे खरीदणाऱ्यास अधिकार नसतो. अर्थात माणूस जे पैसे कमावतो त्याने त्याच्या सगळ्या व्यक्तित्वाचे आर्थिक मूल्य ठरत नाही.

साऱ्या व्यक्तित्वाचे आर्थिक मूल्य ठरूच शकत नाही. व्यक्तित्व ही पैशाने मोजता येण्यासारखी वस्तू नाही.

अर्थात प्रत्येक व्यक्तीचे मूल्य सारखे असते याचा अर्थ प्रत्येक व्यक्तीचे आर्थिक मूल्य सारखे असते असा नाही.

दुसरे असे, की व्यक्ती-व्यक्तींत जो नैसर्गिक भेद आहे त्यावरून एक व्यक्ती दुसऱ्या व्यक्तीपेक्षा श्रेष्ठ आहे असे विधान करता येत नाही. फार काय एक व्यक्ती दुसऱ्या व्यक्तीपेक्षा बुद्धिमान् आहे असे विधान करणेदेखील कठीण आहे. कारण, बुद्धिमत्ता ही एकाच प्रकारची नाही. थर्सटनने बुद्धिमत्तेचे सात प्रकार मानले आहेत. हे सात प्रकार मापण्यासाठी सात निरनिराळ्या कसोट्या लागतात. शंभर व्यक्तींना या सात कसोट्या दिल्या तर त्यांपैकी साठ व्यक्ती यांपैकी निदान एका कसोटीवर तरी पहिल्या पंचवीस टक्के लोकांत बसतील इतके गुण मिळवितात. म्हणजे किमान साठ टक्के लोक तरी कोणत्या तरी एका बुद्धिमत्तेच्या कसोटीवर पहिल्या पंचवीस टक्क्यांत बसू शकतील इतके बुद्धिमान् असतात.

गिलफर्डच्या मते बुद्धिमत्तेचे केवळ सातच प्रकार नसून १२० प्रकार आहेत. अर्थात् सातच कसोट्या न देता या १२० कसोट्या दिल्या तर साठ टक्के काय, शंभर टक्के लोक निदान कोणत्या तरी एका कसोटीवर पहिल्या पंचवीस टक्के लोकांत समाविष्ट होण्याचा संभव आहे.

असे होण्याचे कारण असे, की बुद्धिमत्तेच्या निरनिराळ्या प्रकारांमध्ये फारच कमी सहबन्ध आहे. दोन कसोट्यांच्या गुणांत एक म्हणजे पूर्ण सहबन्ध असेल तर एका कसोटीवर पहिला येणारा दुसऱ्याही कसोटीवर पहिला येतो व एका कसोटीवर दुसरा येणारा दुसऱ्याही कसोटीवर दुसराच येतो असे म्हणता येते. पण कोणत्याही दोन मनोवैज्ञानिक कसोट्यांमध्ये एवढा पूर्ण सहबन्ध नसतो. तो साधारण .४ या दशांशाने व्यक्त करता येईल इतका असतो.४ इतकाच सहबंध असेल तर दोन कसोट्यांत केवळ सोळा टक्के मेळ आहे असे म्हणता येते. अशा तऱ्हेचा माफक मेळ असणाऱ्या कसोट्या असल्या तर एका कसोटीवरून दुसऱ्या कसोटीवरील गुणांचा अंदाज करणे कठीण जाते. एखाद्या समूहातील व्यक्तींचे प्रातिनिधिकपणे मापन करणाऱ्या कसोट्या असतील तर एका कसोटीवर सामान्यापेक्षा जास्त गुण मिळविणारा माणूस दुसरीवरही सामान्यपेक्षा जास्त गुण मिळवील याचा संभव, त्या कसोट्यांतील सहबन्ध शून्य असला तरी, पन्नास टक्के असतो. या दोन कसोट्यांत माफक सहबन्ध असेल तर हा सहबन्ध आणखी वीस टक्केपर्यंत वाढेल, म्हणजे सत्तर टक्के होईल असे समजा. सत्तर टक्के मेळ असला तरी एका कसोटीवर मूर्ख ठरलेला माणूस दुसऱ्या कसोटीवर अतिबुद्धिमान् ठरण्याचा तीस टक्के संभव उरतोच.

माफक सहबन्ध असेल तर एवढा सहबन्ध उरतो. पण निरनिराळ्या प्रकारच्या कसोट्या शुद्ध केल्या तर पुष्कळशा कसोट्यांतील सहबन्ध शून्यापर्यंत नेता येतो. म्हणजे एका कसोटीत मूर्ख ठरलेला माणूस दुसऱ्या कसोटीत बृहस्पती ठरण्याचा संभव केवळ २० टक्के नसून, पहिल्या कसोटीत सर्वोत्तम ठरलेला माणूस दुसऱ्या कसोटीत बृहस्पती ठरण्याच्या संभवाइतकाच आहे. अर्थात् अ पेक्षा ब हुशार आहे हे विधान कसोटीसापेक्ष आहे. अमुक कसोटीवर अ जास्त हुशार आहे एवढाच याचा अर्थ आहे. पण दुसऱ्या एखाद्या कसोटीवर ब, अ पेक्षा हुशार असेल हे नक्की. मग अ पेक्षा ब हुशार आहे हे विधान करण्यात अर्थ काय?

यावर असे म्हणण्यात येईल, की अ ब पेक्षा साठ टक्के कसोट्यांवर हुशार





ठरला व ब अ पेक्षा फक्त चाळीस टक्के कसोट्यांवरच हुशार ठरला तर अ, ब पेक्षा हुशार आहे असे का म्हणू नये?

### महापुरुषत्व कपोलकल्पित आहे

साऱ्याच कसोट्यांनी मापल्या जाणाऱ्या बुद्धिमत्ता सारख्याच महत्त्वाच्या असतील तर असे मानता येईल, पण दोन कसोट्यांनी मापल्या जाणाऱ्या दोन प्रकारच्या बुद्धिमत्ता, एका कसोटीवर मापल्या जाणाऱ्या एका प्रकारच्या बुद्धिमत्तेपेक्षा श्रेष्ठ आहेत असे म्हणण्यास आधार काय?

सामाजिक उपयुक्ततेशिवाय कोणत्याही क्षमतेचे वा गुणाचे महत्त्व ठरविण्यास काही आधार नाही. क्ष कसोटीने मापल्या जाणाऱ्या बुद्धिमत्तेची समाजाला अतिशय गरज असेल व ळ, क्ष, ज्ञ इत्यादी अनेक प्रकारच्या कसोट्यांनी मापल्या जाणाऱ्या बुद्धिमत्तेच्या या प्रकारांची समाजाला मुळीच गरज नसेल तर ळ, क्ष, ज्ञ इत्यादी प्रकारच्या बुद्धिमत्तांपेक्षा क्ष ही एकमात्र बुद्धिमत्ता अधिक मोलाची आहे असे म्हणावे लागेल.

पण सामाजिक उपयुक्तता अपरिवर्तनीय नाही. विशिष्ट अवस्थेतील समाजाला क्ष ही बुद्धिमत्ता उपयुक्त असेल, पण दुसऱ्या एखाद्या अवस्थेतील समाजाला तिचा मुळीच उपयोग नसेल. प्रत्येक व्यवसायाचा समृद्धी वाढविण्यास ताबडतोब उपयोग झाला पाहिजे, किंवा ज्या विद्येचा मोक्ष मिळण्यास उपयोग होत नाही त्या सर्व विद्या तुच्छ आहेत असे मानणारा समाज घ्या. या समाजात शुद्ध गणितात रामानुजन्सारखी बुद्धिमत्ता असणारा पुरुष जन्माला आला तर त्याच्या बुद्धिमत्तेचा काही उपयोग आहे काय? त्या समाजात या रामानुजन्च्या बुद्धिमत्तेचा विलास समजणारे एकदोन लोक असले तरी पोटार्थी व्यवसायाच्या दडपणामुळे वा मोक्षदायक विद्यांच्या मागे बहुतेक वेळ गेल्यामुळे शुद्ध गणिताचा आस्वाद घेण्याच्या परिस्थितीत नसणार. तेव्हा हा रामानुजन् त्या समाजात फार हुशार म्हणून चमकण्याचा संभव नाही.

उलट ज्या समाजात बुद्धिविलास, मग तो आर्थिक उत्पादनास सहायक नसला तरी, आदरणीय समजला जातो त्या समाजात या रामानुजन्च्या कार्यात रस घेणारे अनेक लोक आढळतील. या समाजात शुद्ध गणित हे फार काळ शुद्ध न राहता लवकरच प्रयुक्त होऊन कोठे तरी वापरले जाईल, लोकोपयोगी यंत्रे निर्माण करण्यास त्याचा उपयोग होईल व अशा समाजात गणिताशी दूरचाही संबंध नसणाऱ्या लोकांना हा

रामानुजन् बृहस्पती म्हणून ज्ञात होईल. अर्थात् लक्षावधी लोक जे सामान्य म्हणून जीवन जगतात ते त्यांच्या ठायी कोणतेच असामान्य गुण नसतात म्हणून नव्हे, तर त्या असामान्य गुणांचा तत्कालीन समाजाला उपयोग नसतो वा उपयोग करण्यासारखी परिस्थिती निर्माण झालेली नसते म्हणून. तेव्हा थोर गणल्या जाणाऱ्या पुरुषांच्या ठायी थोर गुण असतात व सामान्य गणल्या गेलेल्या पुरुषांच्या ठायी थोर गुण नसतात ही समजूत चुकीची आहे.

या प्रश्नाशी निगडित असा दुसरा प्रश्न आहे. ज्यांच्या क्षमता ते ज्या समाजात वावरले त्या समाजाला उपयुक्त ठरल्या नाहीत ते लोकोत्तर न ठरता सामान्य ठरतात हे समजण्यासारखे गुण शेकडो लोकांत सापडतात, पण तरी ते सामान्य समजले जातात याची उपपत्ती कशी लावायची?

माणसाच्या जे जे वाट्याला येते ते सर्व त्याच्या गुणावर अवलंबून नसते हे येथे लक्षात ठेवले पाहिजे. खालील उदाहरणावरून हे स्पष्ट होईल.

अ व ब आय्.सी.एस्. व इंडियन ऑडिट्स या दोन्ही परीक्षांना बसले. अ दोन्ही परीक्षांत नापास झाला व ब इंडियन ऑडिट्समध्ये पास झाला व नोकरीला लागला. पुढच्या वर्षी अ पुनः दोन्ही परीक्षांना बसला. ब ने आय्.सी.एस्. ला बसण्यासाठी परवानगी मागितली. पण "आधी राजीनामा द्या व मग आय्.सी.एस्. ला बसा" असे त्याला सांगण्यात आले. अ दुसऱ्या खेपेस दोन्ही परीक्षा पास झाला व आय्.सी.एस्. ही अधिक वरची नोकरी म्हणून आय्.सी.एस्. मध्ये गेला. याप्रमाणे अ पेक्षा जास्त हुशार असल्यामुळेच ब आय्.सी.एस्. होऊ शकला नाही.

कधी कधी एखाद्याला यश का मिळते याची मुळीच उपपत्ती लागत नाही. भारतात लाखो देवळे आहेत, पण त्यांतले एखादेच एवढे महत्त्वाचे ठरते की तेथे यात्रेकरूंची रीघ लागते. उलट दुसरी काही देवळे अशी असतात की त्यावर ढिगार जमून ती समाधिस्थ होतात. असे का होते याची उपपत्ती ती देवळे व त्यांतील मूर्ती यांचे पडताळता येण्यासारखे गुणधर्म तपासून कधीही लागणार नाही. जी कथा पवित्र स्थानांची तीच पवित्र पुरुषांची, वा अकारण थोर मानल्या गेलेल्या काही व्यक्तींची. लहानसहान अशा असंख्य कारणांच्या संनिपाताने असे घडत असते. या असंख्य कारणांपैकी फारच थोडी ज्ञात असतात व त्यांचा संनिपात योगायोगाच्या नियमांनी होत असतो.

तेव्हा आर्य नावाचा एक बहुगुणसम्पन्न वंश केव्हातरी मध्य एशिया वा मध्य





युरोपमध्ये राहत होता. तेथून तो जगभर पसरला, इतरापेक्षा सर्वतोपरी श्रेष्ठ असल्यामुळे त्याने जगाच्या बहवंश भागावर राज्य केले व जगाला विज्ञान, साहित्य व कलाकौशल्या आदी देणग्या देऊन संस्कृतिसम्पन्न केले ही समजूत मुळातच अशास्त्रीय आहे.

आजकाल जनुकांच्या बाबतीत वैशिष्ट्य असलेले कोणते समूह कोठून कुठे पसरले हे बी जनुकाचे वितरण कोठे कसे आहे यावरून ठरविता येते. लेक्सिकॉन नावाचा २१ खण्डांचा अमेरिकन विश्वकोश हल्ली प्रचारात आहे. त्यात असे सांगितले आहे की बीजनुकप्रधान मानवी समाजाचे स्थलान्तर उत्तर भारतातून दक्षिण भारत व पूर्व युरोप येथे झाले. तेथून ते इंग्लंड अमेरिका व ऑस्ट्रेलिया येथे याच क्रमाने झाले. तसेच ते उत्तर चीनमधून दक्षिण चीनमध्ये झाले.

सारांश आर्याक्रमणसिद्धान्त देशान्तराचा जो इतिहास सांगतो त्याच्या अगदी उलट आजचे विज्ञान सांगते. तसेच आजचे विज्ञान या बी जनुकात सर्व चांगले गुण एकवटलेले असतात असे सांगत नाही.

■ ■

# ...२...

# भाषांचे वर्गीकरण आणि आर्यांचे मूलस्थान

'To day such' (linguistic) "arguments about racial origins are usually seen as little more than speculation'
Lexicon (American Encyclopedia in 21 volumes)

**आर्य, सेमेटिक, द्रविड व मंगोल असे भाषांचे वर्गीकरण करण्यात आले आहे. त्यात इंग्रजीला आर्य भाषा म्हणून संस्कृतच्या वर्गात व तामिळला द्रविड म्हणून संस्कृतपेक्षा वेगळ्या वर्गात टाकले आहे. हा प्रकार तामिळ व इतर भारतीय भाषा यांच्या अज्ञानावर आधारलेला आहे. इंग्रजीपेक्षा तामिळचे संस्कृतशी किती तरी आधिक साधर्म्य आहे. तसेच द्रविड या शब्दाला परंपरेत नसलेला 'कृष्णेच्या दक्षिणेकडचे' असा नवीनच अर्थ दिला आहे. परंपरेप्रमाणे महाराष्ट्रीय व गुजराथी हे पंच द्रविडात मोडतात व मल्याली मोडत नाहीत.**



**उत्तर** भारतातील भाषा व युरोपातील बहुवंश भाषा या एका 'इंडोयुरोपीय' कुलातल्या आहेत, म्हणजे त्या इंडोयुरोपीय नावाच्या एका भाषेपासून, उद्भवलेल्या आहेत व दक्षिण भारतातील भाषा यापेक्षा वेगळ्या 'द्राविड' कुलातील आहेत हे मत निदान गेल्या शंभर वर्षापासून मान्य झाले आहे. 'इंडोयुरोपीय' भाषांतील साम्य, त्या कोणत्यातरी एका भाषेपासून उद्भवल्या म्हणून उद्भवलेले नसून उसनवारीमुळे उद्भवले असावे असे ट्रूबेट्स्कॉय, सोल्टा पिसानी आणि ॲलन यांच्यासारख्या जगद्विख्यात भाषाविदांनी अनेक वेळा प्रतिपादन केले असूनही हे मत मागे पडले नाही.

या मताच्या अनुषंगाने दुसरे एक मत सार्वत्रिक पसरले आहे व ते म्हणजे ही मूळ 'इंडोयुरोपीय' भाषा बोलणारे आर्य नावाचे लोक होते, ते मुळात भारताच्या बाहेर राहत होते, त्यांनी भारतावर स्वारी केली व ते येथे स्थायिक होऊन राहिले.

उपरिनिर्दिष्ट दोन्ही मते कितपत सयुक्तिक आहेत, याचा येथे विचार करण्याचे योजले आहे.

## 'इंडोयुरोपीय' भाषांतील साम्य

इंडोयुरोपीय हे नाव ज्यांना देण्यात आले आहे त्या भाषांमध्ये खालील साम्ये आढळतात.

१. या भाषांतील धातू वा मूलरूपे बहुधा सारखी आहेत. म्हणजे अर्थव्यक्तीसाठी त्यांनी प्रयुक्त केलेले ध्वनिक्रम सारखे आहेत.

२. या मूळ धातूंपासून नाम, क्रियापद व इतर पदे साधित करण्याची रीत सारखीच आहे.

३. रूपसिद्धी म्हणजे वाक्यातील पदांचा परस्परसंबंध द्योतित करण्यासाठी धातूत करण्यात येणारे विकार सारख्याच प्रकारचे आहेत.

४. सर्वनामे, संख्यावाचके व घरगुती नात्यांचे द्योतक असे नित्योपयोगी शब्द सारखे आहेत. पुष्कळशा भाषाशास्त्रज्ञांच्या मते असे शब्द कोणीही दुसऱ्या भाषेतून घेणार नाही, ते मूळ भाषेतलेच असले पाहिजेत.

वरील सर्व साम्यांत रूपसिद्धीतले साम्य फारच नजरेत भरणारे व दुर्लक्षिण्यास अशक्य आहे.

## काही भ्रम

इंग्रजी भाषेने भारतातील भाषांवर कसा परिणाम केला हे लक्षात घेतले की वर भाषांची समान जातकुळी सिद्ध करण्यासाठी जी साम्ये दाखविण्यात आली आहेत ती समान जातकुळी सिद्ध करण्यास असमर्थ आहेत हे कळायला वेळ लागत नाही. भारतीय भाषा इंग्रजीपासून निघालेल्या नाहीत हे आपल्याला माहीत आहे. पण वरील युक्तिवाद मानले तर भारतीय भाषा इंग्रजीतून उद्‌भवलेल्या आहेत, असे म्हणावे लागेल.

पुष्कळ वेळा असे म्हणण्यात येते की उसनवारी फक्त शब्दांचीच होत असते. शब्दांना विभक्ती वा इतर प्रत्यय लागून त्यांच्यात जे बदल होतात त्यांची उसनवारी होत नाही. पण हेही खरे नाही. इंग्रजीने एन् मॅस हा शब्दप्रयोग फ्रेंचांपासून उसना घेतला आहे. एन्चा अर्थ इंग्रजीतील इनने व्यक्त होतो. पण फक्त फ्रेंचमधून उसन्या घेतलेल्या शब्दप्रयोगातच इ च्या ऐवजी एन् वापरले जाते. जसे एन् रूट, एन् ट्रेन इत्यादी. मराठीमध्ये बस हा इंग्रजी शब्द आला आहे. याचे अनेकवचन मराठीच्या व्याकरणाप्रमाणे बसा असे होत नाही, तर मराठीतदेखील इंग्रजीच्या व्याकरणाप्रमाणे बसेस असेच होते. यावरून हे स्पष्ट होते की परभाषेतून शब्द उसने घेताना त्यातील व्याकरणक्रिया देखील उसन्या घेतल्या जातात व व्याकरणक्रिया समान असल्यामुळे इंडोयुरोपीय भाषांतील साम्यांची उपपत्ती उसनवारीने लागू शकत नाही ही समजूत निराधार ठरते.

जिव्हाळ्याच्या कौटुम्बिक नात्यांचे द्योतक शब्द व संख्यावाचके दुसऱ्या भाषेतून उसनी घेतली असणे शक्य नाही ही समजूत देखील इंग्रजी प्रभावाने खोटी पाडली आहे. आई/बाबांचे डॅडी/मम्मी झाल्याचे प्रत्यही पाहत असताना जिव्हाळ्याच्या नात्यांचे शब्द परभाषेतून घेतले जाऊ शकत नाहीत असे म्हणण्यास कोणी धजावणार नाही. त्याचप्रमाणे भाजीवाले देखील इंग्रजी संख्यांत आपल्या किमती सांगतात यावरून संख्यावाचके उसनी घेतली जाणार नाहीत हेही निराधार ठरते.

सर्वनामाबद्दल थोडी अडचण आहे खरी. एखाद्या भारतीय भाषेने सर्वनामे इंग्रजीतून उसनी घेतल्याचे ऐकिवात नाही. 'ही गेला' व 'शी आली' असे कोणी म्हणत नाही.

पण तथाकथित इंडोयुरोपीय भाषांतील सर्वनामे सारखी आहेत असे समजण्यासही काही आधार नाही. इंग्रजीच्या ही, शी, इट् व दे या सर्वनामांशी जुळणारी संस्कृत सर्वनामे कोणती आहेत? सः, सा, तद् व ते ही या अर्थाची संस्कृत सर्वनामे आहेत.





ते व दे यातच फक्त साम्य भासते. बाकीची इंग्रजी व संस्कृत सर्वनामे स्वतंत्र भासतात. शी व सा मधील सचे शशी साम्य फारच सूक्ष्म आहे. हे देखील देशी समान दिसते तरी ते साम्य मुख्यतः ए या स्वराचे आहे, दे ही पासूनच आले आहे. हीचे हे व मग दे होते.

सा व शी मध्ये स समान असल्यामुळे इंग्रजी व संस्कृत सर्वनामांमध्ये नाते आहे असे मानले तर तामिल यन आणि नान आणि संस्कृत अहम् मध्ये अनुनासिक समान आहे, संस्कृत वयम् व तामिल यम् मध्ये य व म समान आहेत म्हणून तामिल सर्वनामे देखील संस्कृतोद्‌भव आहेत असे का म्हणू नये?

## 'इंडोयुरोपीय' भाषेची पुनर्रचना

या प्रमाणे इंडोयुरोपीय म्हणून वर्गीकृत केलेल्या भाषा एका भाषेतून उद्भवल्या आहेत या कल्पनेच्या मुळाशी असलेले तत्त्वच निराधार ठरल्यावर, 'इंडोयुरोपीय' भाषांच्या आधारे प्राचीन इंडोयुरोपीय भाषेची पुनर्रचना करून तिला पुनर्जन्म देण्याचा प्रयत्न मुळातच वांझोटा आहे हे उघड आहे. बरो म्हणतो की पुनर्रचित इंडोयुरोपीय भाषेचे स्वरूप कोणत्या इंडोयुरोपीय भाषा पायाभूत मानून ही भाषा रचली गेली यावर अवलम्बून आहे. केवळ ग्रीक व लॅटिन भाषा आधारभूत मानून रचलेली 'इंडोयुरोपीय' ही एकेकाळी मूळ इंडोयुरोपीय म्हणून मिरवीत होती.

अशा पुनर्रचनेत दुसरी अडचण अशी आहे की भाषेत होणारी परिवर्तने कोणत्या दिशेने होतात हे निश्चित नाही. मॅक्समूलरच्या मते भाषेतील परिवर्तनाचे स्वरूप चक्राकार असते. संश्लेषणात्मक भाषा विश्लेषणात्मक होऊ पाहतात व विश्लेषणात्मक भाषा म्हणजे ज्या भाषांमध्ये पूर्व व परस्थानिक मूळ शब्दांत इतके मिसळून गेलेले असतात की ते वेगळे भासत नाहीत, एकमेकांशी जुळताना त्यात विकार होतात; उलट विश्लेषणात्मक भाषांमध्ये मूळ शब्द व पूर्व/परस्थानिक स्पष्टपणे वेगळे ओळखता येतात, काही विश्लेषणात्मक भाषांत त्यांच्यात मुळीच विकार होत नाहीत व ते स्वतंत्र शब्दाप्रमाणे वेगळे लिहिले जातात. भाषा याप्रमाणे संश्लेषणाकडून विश्लेषणाकडे व पुनः विश्लेषणाकडून संश्लेषणाकडे परिवर्तन पावत असतील तर भाषेतले कोणते रूप आधीचे व कोणते नंतरचे हे देखील ठरविता येणार नाही, मग सध्या उपलब्ध असलेल्या भाषांच्या पूर्वीच्या अवस्था कालक्रमाने कल्पून मूळ इंडोयुरोपीय भाषेची पुनर्रचना करणे

कसे शक्य आहे?

एकूण इंडोयुरोपीय म्हणविल्या जाणाऱ्या भाषांतील साम्य उसनवारीने उद्भवले आहे, त्या भाषा कोणत्या तरी मूळ भाषेतून उद्भवल्या आहेत म्हणून नव्हे असे मानण्यास कोणतीच अडचण नाही, एवढेच नव्हे तर असे मानणेच तार्किक दृष्ट्या अधिक सरळ आहे.

उसनवारीचा मुद्दा स्वीकारल्यावर कोणी कोणाची उसनवारी केली हा प्रश्न साहजिकच उद्भवतो.

या प्रश्नाचे उत्तर कठिण आहे. मॅकडोनेलच्या मते ऋग्वेदाच्या भाषेला केवळ उच्चारभेदाचे नियम लावले की तिचे आवेस्त्याच्या भाषेत रूपान्तर होते. ऋग्वेद आवेस्त्यापेक्षा पाचशे वर्षे अधिक प्राचीन आहे. बरो असे स्पष्ट म्हणत नाही पण त्यालाही आवेस्त्यापेक्षा ऋग्वेद अधिक प्राचीन आहे हे अमान्य दिसत नाही. ऋग्वेद हा इंडोयुरोपीय भाषांतील सर्वात प्राचीन ग्रंथ होय याबद्दल सर्व भाषाविदांचे एकमत आहे असे समजण्यास हरकत नाही कारण ऑक्स्फर्डच्या कोशात देखील The oldest Indo-European language असा संस्कृतचा उल्लेख आहे.

आवेस्त्यानंतरची 'इंडोयुरोपीय' वर्गातील तिसरी महत्त्वाची भाषा ग्रीक ही आहे. या भाषेतील होमर हा सर्वात प्राचीन कवी आवेस्त्याच्या नंतरचा आहे हेही भाषाशास्त्रज्ञांना मान्य आहे असे समजण्यास हरकत नाही.

तेव्हा 'इंडोयुरोपीय' भाषांचा कलानुक्रम असा : १. ऋग्वेदाचे संस्कृत, २. आवेस्त्याचे झेन्द व ३. ग्रीक. या कालानुक्रमाबरोबरच भौगोलिक अनुक्रमही मिळतो. ऋग्वेद भारतात रचला गेला हे भाषाशास्त्रज्ञांना मान्य आहे, तसेच आवेस्त्याचे जन्मस्थान इराण याबद्दल वाद नाही. तेव्हा उसनवारी जी झाली ती कालानुक्रमाने संस्कृतपासून झेन्द व झेन्दपासून ग्रीक अशी झाली. भौगोलिक क्रमाने भारतापासून इराण व इराणपासून ग्रीस अशी झाली.

## समान धातूंच्या प्रवासाची दिशा

या उसनवारीची प्रक्रिया समजण्यास ज्ञात इतिहासापलीकडे जाऊन तर्क लढविण्याची जरूर नाही. एकीकडे पाणिनीचा गान्धार व दुसरीकडे जयद्रथाचा शिवी हा प्रान्त यांना लागून असलेला इराण संस्कृत भाषेच्या प्रभावाखाली होता असे मानण्यास कल्पनाशक्तीला





फार ताण देण्याची जरूर नाही. फार प्राचीन काळचा उल्लेख शोधायचा तर रामाचा पूर्वज रघु याने पारसीकांवर स्वारी केली अशी परंपरा कालिदासाने उल्लेखिली आहे. बाणाच्या हर्षचरितात पारसीक देश जिंकणे सोपे आहे असे सम्राट हर्षवर्धनाच्या सैन्यातील राजकुमार बोलत असल्याचे वर्णन आहे. तेव्हा रघूच्या काळापासून तो हर्षाच्या काळापर्यंत इराण हा देश भारतीय सम्राटांच्या दिग्विजयकक्षेतला देश मानला जात होता असे दिसते. असे असेल तर इराण संस्कृत संस्कृतीच्या अंतर्गत होता असे अनुमान निघते.

भारतीय भाषा बोलणाऱ्या प्राचीन इराणी लोकांचे साम्राज्य आयोनियापर्यंत म्हणजे ग्रीसपर्यंत होते ही गोष्ट इतिहासप्रसिद्ध आहे. या प्राचीन इराणी भाषेचा ग्रीक भाषेशी संपर्क आला तो राज्यकर्त्यांची भाषा म्हणून. अर्थात या राज्यकर्त्यांच्या भाषेचा ग्रीक भाषेवर प्रभाव पडला व ग्रीक भाषेत या इराणी भाषेद्वारा संस्कृत धातू शिरले.

ग्रीस हे साऱ्या पाश्चात्त्य जगाच्या संस्कृतीचे उगमस्थान मानले जाते. रोमन लोकांनी ग्रीसवर सैनिकी विजय मिळविले तरी ग्रीक भाषेचा ते ज्ञानभाषा म्हणून अभ्यास करीत. या अभ्यासाच्या द्वारा ग्रीक भाषेतील संस्कृत शब्द रोमन लोकांच्या लॅटिन भाषेत शिरले.

रोमन लोकांचे साम्राज्य साऱ्या युरोपभर होते. लॅटिन ही साऱ्या युरोपात राज्यकर्त्यांची भाषा होती. राज्यकर्त्यांची भाषा म्हणून लॅटिनचा अभ्यास करण्याचा प्रघात युरोपात सार्वत्रिक झाला व लॅटिन ही साऱ्या युरोपची संपर्क भाषा म्हणून शेकडो वर्षे वावरली. रोमन साम्राज्य नाहीसे झाल्यावर देखील लॅटिनचा अभ्यास साऱ्या युरोपभर होतच होता. अगदी परवापरवापर्यंत खुद्द इंग्लंडमध्ये लॅटिन न येणाऱ्या माणसाला सुशिक्षित समजत नसत.

लॅटिनबरोबरच ग्रीक भाषेचा अभ्यास देखील ज्ञानभाषा म्हणून साऱ्या युरोपभर होत असे. परिणामतः लॅटिन व ग्रीक या दोन भाषांच्या प्रभावाने या भाषांतील संस्कृत धातू साऱ्या युरोपातील भाषांमध्ये पसरले हे स्पष्ट आहे.

युरोपीय भाषांतील समान धातू उसनवारीने आलेले आहेत, या भाषा एका कुलातल्या आहेत म्हणून आलेले नाही, हे बरोने[४] नजरेस आणून दिलेल्या पुढील तथ्यावरून देखील सिद्ध होते :- समान धातू सोडले तर युरोपातील भाषा एकमेकांशी अत्यंत विसदृश आहेत. उलट भारतातील बहुवंश भाषा इतक्या सारख्या आहेत की,

यांपैकी एक भाषा शिकणाऱ्याला दुसऱ्या भाषेचे ज्ञान करून घेणे सहज शक्य आहे. यावरून भारतीय भाषांचे मूळ एकच आहे, उलट युरोपीय भाषांतील समानता या सर्व भाषा संस्कृत धातूंच्या प्रभावाखाली आल्यामुळे निर्माणा झाली आहे. त्यांचे मूळ एक असल्यामुळे नव्हे असे सरळ अनुमान निघते.

## द्राविडी हिंदी व द्राविडी संस्कृत

वर बव्हंश भारतीय भाषा असा शब्दप्रयोग केला आहे. युरोपीय भाषाविदांनी केलेले 'आर्य' भाषा व 'द्रविड' भाषा हे वर्गीकरण मानलेले नाही; कारण उत्तर भारतातील भाषा 'आर्य' कुलातल्या व तामिल, तेलगू, कन्नड, मल्यालम् या दक्षिण भारतातल्या भाषा 'द्राविड' कुलातल्या हे वर्गीकरण समर्थनीय नाही. तामिल 'आर्य' कुलातली भाषा नाही हे सिद्ध करण्यासाठी काल्डवेलने जे दहा मुद्दे दिले आहेत ते 'आर्य' भाषांनादेखील लागू होतात हे खालील तालिकेवरून दिसून येईल.

(पुढे काल्डवेलचा मुद्दा मांडल्याबरोबर तामिलबरोबरच, संस्कृत, हिंदी, मराठी व इंग्रजी या 'आर्य' भाषांची ही उदाहरणे दिली आहेत. त्यामुळे या भाषांना भिन्न वर्गात टाकणे कितपत समर्थनीय आहे हे त्यांची तुलना करून ठरविता येईल.)

१

'द्रविड' संज्ञांना, जे शब्दाहून वेगळे केले जाऊ शकतात असे परस्थानिक जोडले जातात. एकवचन व बहुवचन यात केवळ एवढाच फरक आहे की, एकवचनात विभक्तिप्रत्यय मूळ शब्दाला जोडला जातो, तर बहुवचनात वचनद्योतक रूपानंतर जोडला जातो. बहुवचनाचा प्रत्यय लागल्यावर साऱ्या संज्ञांना, मग त्यांचे वचन वा लिंग कोणतेही असो, एकवचनाला लागणारेच परस्थानिक लागतात.

**उदाहरणे**

**तामिल :** वेलकारन्, वेलकारेंक, वेलकारनाले, वेलकराल, वेलकारालकु, वेलकाराकुउ.

**संस्कृत :** शब्दाहून वेगळे ओळखू येणारे परस्थानिक आहेत. बाकीचे विशेष लागू होत नाहीत.

**हिन्दी :** सेवकने, सेवकको, सेवकसे, सेवकोंने, सेवकोंको, सेवकोतकको, सेवकगणने.





**मराठी :** सेवकाने, सेवकाला, चतुर्थीला वेगळा प्रत्यय नाही, सेवकांनी, सेवकांना, सेवकासारख्यांना, सेवकगणाने.

**इंग्रजी :** विभक्तिप्रत्यय नसतात, इन्, ऑफ वगैरे विभक्तिदर्शक शब्द स्वतंत्र आहेत.

२

कु की आणि गे हे तामिलमध्ये चतुर्थीचे प्रत्यय आहेत.

**उदाहरणे**

संस्कृत, मराठी व इंग्रजी हे प्रत्यय नाहीत.

**हिन्दी :** एकोणिसाव्या शतकापर्यंत चतुर्थीचा प्रत्यय म्हणून कुचा वापर हिन्दीत होत असे. कच्या ऐवजी गचा वापर गंगानगर व हरयाणामध्ये ऐकू येतो.

३

'इंडोयुरोपीय' भाषांमध्ये जो अर्थ व्यक्त करण्यासाठी पूर्वस्थानिक वापरले जातात तो अर्थ व्यक्त करण्यासाठी द्राविड भाषांमध्ये परस्थानिक वापरले जातात. या परस्थानिकांना स्वतंत्र शब्द मानता येत नाही. ते केवळ गुण वा संबंध सूचित करणारे साधारण संज्ञाशब्द असतात व अर्थसहायक म्हणून त्यांचा उपयोग होतो.

क्रियाविशेषणे हे संज्ञाशब्द असतात वा ल्युडादिकृदन्त असतात. ज्या क्रियेचे ते विशेषण असतात तिच्या पूर्वी ते वापरले जातात.

**उदाहरणे**

**तामिल :** १. वेलकार कहा, वेलकारनोडे, वेलकान्किटे,
२. शरेन् पडी पडिक्येपो माले पडी.

**संस्कृत :** १. सेवकस्य हेतोः, सेवकेन सह, सेवकस्य समीपम्
२. वेगेन गच्छ, पठितुं गच्छ, रात्रौ पठ.

**हिन्दी :** १. सेवकके हेतू, सेवकके पास,
२. तेजीसे पढो, पढ़ने जाओ, रातमे पढो.

**मराठी :** १. सेवकाच्यासाठी, सेवकाच्यासह, सेवकाच्याजवळ
२. वेगाने जा, जेवायला ये, रात्री वाच.
इंग्रजी लागू नाही

४

१. संस्कृत व इतर 'इंडोयुरोपीय' भाषात विशेषणाची देखील संज्ञा व सर्वनाम याप्रमाणे विभक्तिरूपे होतात. त्यांना लिंग, वचन, कारक वगैरे सर्व काही असते. 'द्राविड' भाषांमध्ये विशेषणे अशी रूपे घेत नाहीत.

२. विशेषणे जेव्हा विशेष्याच्या पूर्वी प्रयुक्त न होता गुणबोधक संज्ञांच्या रूपाने प्रयुक्त होतात तेव्हा तीदेखील संज्ञांप्रमाणे चालविली जातात. परंतु जेव्हा ती एखाद्या विशेष्याच्या पूर्वी त्याचे विशेषण म्हणून येतात तेव्हा ती आपल्या मूळ अधिकृत रूपातच वापरली जातात.

**उदाहरणे**

| | | |
|---|---|---|
| तामिल | - | शूरंगल |
| संस्कृत | - | १. शूरेण, २. शूरसैनिकेन. |
| हिंदी | - | १. शूर सैनिकोने, २. शूरोंने |
| मराठी | - | १. शूर सैनिकांनी, २. शूरांनी |
| इंग्रजी | - | Brave Soldiers |

५

१. 'द्राविड' भाषांमध्ये शत्रन्त व क्तान्त क्रियारूपे विशेषणांच्या जागी प्रयुक्त केली जातात.

२. याचा परिणाम असा की यांच्या जागी जेव्हा विशेषणांचा प्रयोग होतो तेव्हा ती विशेषणेदेखील शत्रन्त व क्तान्तरूपांच्या तुल्य रूपे धारण करतात.

३. कृदन्त रूपांमध्ये क्रिया व विशेषणे या दोहोंचीही रूपे असतात.

**उदाहरणे**

**तामिल :** शिरोकेर उलहम्, अलहिन शापड

**संस्कृत :** १. हसन्वसन्तः, मृतो अश्वः २. स्वल्पं धनम्, महती आशा





३. गता दिवसाः

**हिंदी :** १. हसती दुनिया, सड़ा अन्न २. थोडा पैसा, बडी शान, ३. प्रमाणे

**मराठी :** १. हसता वसन्त, मेलेला घोडा, २. थोडा पैसा, मोठी शान ३. प्रमाणे

**इंग्रजी :** 1. Laughing gas 2. Dead horse 3. Little money, Great pomp

द्राविड भाषांमध्ये सर्वनामाच्या उत्तमपुरुष बहुवचनाची दोन रूपे आहेत. एकात ऐकणाऱ्याचा अन्तर्भाव होतो, दुसऱ्यात होत नाही.

**उदाहरणे**

**तामिल :** १. नांग, २. नांब

संस्कृत व इंग्रजीत अशी रूपे नाहीत

**हिन्दी :** हम्, अप्पन

**मराठी :** १. आम्ही, २. आपण

७

'द्राविड' भाषांमध्ये कर्मणि व भावे प्रयोग नाहीत. या प्रयोगांचा अर्थ व्यक्त करण्यासाठी क्रियापदाला भाग पाडणे या अर्थाचे सहायक क्रियापद जोडले जाते.

**उदाहरणे**

**तामिल :** यनकु, शय्यवेण्डि, हरिन्दुदु, अवन्क, कोहवेण्डिडरक, शण्डेकोडवेण्डिकु

**संस्कृत :** कर्मणि व भावे प्रयोग आहेत पण भाग पाडणे या अर्थाच्या क्रियापदाने त्यांचा अर्थ व्यक्त करण्याचा प्रघातही आहे.
अहं भोजितः, अहं गन्तुं योद्धुं च वशीकृतः

**हिन्दी :** मुझे करना पडा, उसको जाना होगा और लडना पडेगा।

**मराठी :** मला जावे लागेल, त्याला जावे लागेल व लढावे लागेल.
कर्मणि व भावे प्रयोग आहेत पण त्यांचा उपयोग विरळा आहे.

**इंग्रजी :** कर्मणि प्रयोग उपलब्ध आहे पण त्याचा अर्थ भाग पाडणे या अर्थाची क्रियापदे वापरूनदेखील व्यक्त केला जातो.
He was made to go.

८

'द्राविड' भाषांमध्ये संयोजक तत्त्वांच्या ऐवजी पूर्वकालिकाच्या प्रयोगाची प्रथा अधिक आहे.

**उदाहरणे**

**तामिल :** अवन् शापूट्ट आपिस पोनान्, अवन् शाप्टान् न आपिस पोनान्.
**संस्कृत :** स भुक्त्वा शालां गतः, स भुक्तवान् शालां गतः
**हिन्दी :** वह भोजन करके दप्तर गया, उसने भोजन किया और फिर वह दप्तर गया।
**मराठी :** तो जेवण उरकून शाळेत गेला, त्याने जेवण उरकले व तो शाळेत गेला.
**इंग्रजी :** Having taken meals, he went to school.

९

'द्राविड' भाषांमध्ये संबंधसूचक सर्वनामांच्या जागी कृदन्त रूपांचा प्रयोग करण्याची प्रवृत्ती आहे. तामिलचे बन्द, बन्दल, बन्दुल इत्यादींचे अर्थ आला, आलेला, येऊन चुकलेला व येणारा असा आहे.

**उदाहरणे**

**तामिल :** मुळहरवन्, यन्न शय्यामाटान्, यवन् मुळहरान् अवन् यद्वुन उळिक्तिन्
**संस्कृत :** यश्चरति स मधु विन्दतिच्या जागी चरन्वै मधु विन्दति
**हिन्दी :** "जो डूबता है वह क्या नहीं पकडता?" ऐवजी "डूबता क्या न पकडता?"
**मराठी :** "जो बुडतो त्याला काडीचा आधार असतो." या ऐवजी "बुडत्याला काडीचा आधार."





१०

१. तामिलमध्ये कर्ता वाक्याच्या सुरुवातीला असतो व क्रियापद शेवटी असते. २. विशेषण विशेष्यापूर्वी असते. ३. क्रियाविशेषण क्रियापदापूर्वी असते. ४. क्रियेचे कर्म व त्याची सर्व विशेषणे क्रियापदाच्या पूर्वी असतात. ५. विशेषणात्मक कृदन्त विशेष्य संज्ञेच्या पूर्वी वापरले जाते. ६. नकारात्मक अंश सकारात्मक अंशाच्या पूर्वी येतो, ७. संबंधकारकवाचक शब्द संबंधाच्या पूर्वी येतो. ८. पूर्वस्थानिकाच्या ऐवजी परस्थानिक कारकभाव व्यक्त करतात.

**उदाहरणे**

**तामिल :** १. रामन् पोनान् २. रामतु पयूनन्, ३. शाशरेनूनडा, ४. अवन् नल्ल साचेया शापाड, ५. ओउर् कुदरे, ६. पोह माटेन, ७. वुडसोन्दकारन्.
या उदाहरणांत विभक्तिप्रत्यय पुढे आले आहेत, मागे नव्हे.
**संस्कृत :** १. रामो गच्छति, २. बुद्धिमान् बालक, ३. वेगेन धावति, ४. तेन स्वादु पौष्टिक अन्न भुक्तम्।, ५. तिष्ठन् गोः, ६. न हि गच्छति।, ७. गृहस्य स्वामी.
या उदाहरणांत विभक्तिप्रत्यय पुढे लागले आहेत, मागे नव्हे.
**हिन्दी :** १. राम गया, २. होशियार बालक, ३. तेजीसे चला, ४. उसने स्वादिष्ट और पौष्टिक अन्न खाया, ५. गयी गाय, ६. नही जाऊंगा, ७. घर का मालक. वरील उदाहरणांत विभक्तिप्रत्यय पुढे लागले आहेत, मागे नव्हे.
**मराठी :** १. राम गेला, २. हुशार मुलगा, ३. वेगाने चला, ४. त्याने स्वादिष्ट व पौष्टिक अन्न खाल्ले, ५. गेलेली गाय, ६. नाही जाणार, ७. घराचा मालक. वरील उदाहरणात विभक्तिप्रत्यय पुढे लागले आहेत.
**इंग्रजी :** 1. Ram went, 2. Clever Child, 3. Standing Cow, 4. Will not go.
वरील उदाहरणांच्या आधारे संस्कृत, हिंदी, मराठी व इंग्रजी या भाषा 'द्राविड'

आहेत की नाहीत याचा विचार केला तर आपल्याला खालील तालिका मिळते :-

काल्डवेलप्रणीत 'द्राविड' वैशिष्ट्ये व 'इण्डोयुरोपीय' भाषा

**वैशिष्ट्ये**

| भाषा | किती पूर्णतः लागू होतात | किती अंशतः लागू होतात | किती मुळीच लागू होत नाहीत |
|---|---|---|---|
| संस्कृत | ६ | २ | २ |
| हिन्दी | दहाही | ० | ० |
| मराठी | ८ | १ | १ |
| इंग्रजी | ३ | ३ | ४ |

**टीपा-**

१. काशीनाथ शर्मा : द्राविड परिवारकी भाषा हिंदी.
२. मॅक्समूलर : भाषाविज्ञान संपादन, अद्यतनीकरण व अनुवाद : उदयनारायण तिवारी
३. P. D. Gune : An Introduction to Comparative philology.
४. T. Burrow : The Sanskrit Language.
५. R. N. Dandekar : Exercises in Indology.
६. Macdonell : Vedic Reader.
७. Chambers' Twentieth Century Dictionary.

■ ■





# ...३...

# आर्यांचे मूलस्थान : तीन भाषाशास्त्रीय मते

India is the mother of most of our languages.
Will Durant (Case for India)

मैक्स मूलरने संस्कृत भाषेच्या स्वरूपाच्या आधारे इण्डोयुरोपीय भाषेची कल्पना करून ही भाषा बोलणारे मध्य एशियात किंवा एशियात कोठे तरी राहत होते, असे अनुमान केले आहे. केंब्रिज इतिहासाने ते हंगेरीत राहत होते, असे काही काल्पनिक शब्दांच्या आधारे ठरविले आहे. बरो यांनी युरोपातील भाषामध्ये भारतीय भाषाच्या मानाने वैविध्य जास्त आहे, व भाषेच्या मूलस्थानी भाषेत वैविध्य जास्त असते, असा युक्तिवाद करून इण्डोयुरोपीय भाषी आर्य युरोपात कोठेतरी राहत होते असे ठरविले आहे.

काल्पनिक भाषेच्या आधारावर युक्तिवाद खऱ्या जगाला लागू होण्याचा संभव फारसा नाही. तसेच भाषेच्या मूलस्थानी भाषेत वैविध्य जास्त असते असे मानले तर इंग्लंडपेक्षा अमेरिकेत इंग्रजीचे वैविध्य कमी आढळले पाहिजे. पण असे आढळत नाही.

**आर्य** नावाचा एक वंश होता व तो भारताबाहेरून आला हा सिद्धान्त बिनतोड अशा भाषाशास्त्रावर आधारलेला आहे, असे नेहमी सांगण्यात येते. पण आर्य भारताबाहेरून आले याबाबतीत एवढे निर्णायक समजण्यात आलेले भाषाशास्त्र ते कोणत्या प्रदेशातून आले याबाबतीत मात्र एकमुखी नाही. स्कॅण्डिनेव्हियापासून तो भारत, एवढ्या विस्तृत प्रदेशातील निदान अर्धा डझन प्रदेशांना आर्यांचे मूलस्थान म्हणून मान्यता देणारे भाषाशास्त्रज्ञ आहेत. या विविध मतांपैकी वानगीदाखल येथे तीन मतांचा विचार करायचे योजले आहे. असा विचार केल्याने आर्य भारताबाहेरून आले या सिद्धान्ताच्या मुळाशी असलेल्या भाषाशास्त्रीय पुराव्याचे तार्किक मूल्य किती आहे हे पुरेसे स्पष्ट होईल.

## पहिले मत : केम्ब्रिज इतिहासातील आर्यप्रकरण

प्रस्तुत विचारात केम्ब्रिज विद्यापीठाने प्रकाशित केलेल्या भारताच्या इतिहासात दिलेला सिद्धान्त आधी घेऊ. केम्ब्रिज इतिहासातील युक्तिवाद असा आहे :-

भारत व युरोप यांतील अनेक भाषा अत्यन्त सारख्या आहेत. "आपल्याला माहीत आहे की या भाषा बोलणारे अगदी प्राचीन लोक गोरे होते." त्यांना वीरो वा आर्य वा इण्डोयुरोपीय म्हणू. या लोकांच्या भाषांमध्ये पुष्कळसे शब्द समान आहेत. या भाषा इतक्या अन्तरावर पसरलेलया आहेत व अशा परिस्थितीत वाढल्या आहेत, की उसनवारीने या समानतेची उपपत्ती लागत नाही. या समान शब्दांचा विचार केला तर प्राचीन आर्य लोकांना माहीत असलेल्या वनस्पती व प्राणी, तसेच त्यांचे उद्योग याबद्दल अनुमाने काढता येतात. या भाषांतील कमालीचे सादृश्य लक्षात घेता, या भाषा बऱ्याच काळापर्यन्त एका बन्दिस्त प्रदेशात वाढल्या व या दीर्घ काळात त्यांच्यातील साम्य आकारास आले असे दिसते. आर्यांच्या भाषेत समुद्राला शब्द होता की नाही याची शंका आहे. लॅटिनमध्ये समुद्राला मायर म्हणतात. इण्डोयुरोपीय भाषांतील या शब्दाचे नातलग पाहिले तर इंग्रजीतल्या मूर वा दलदल शब्दाने त्यांचा अर्थ व्यक्त होतो. आर्यांना बीच, ओक, विलो व काही सूचिफल-कोनीफरस झाडे याची माहिति होती. प्राण्यांपैकी गाय, मेंढ्या, घोडा, कुत्रा, डुक्कर व हरिण हे त्यांना ज्ञात होते. गाढव, उंट, हत्ती वगैरे प्राणी त्यांना अज्ञात असावेत. बकऱ्याला त्यांच्या भाषेत अनेक शब्द आहेत. यावरून बकरा त्यांना बऱ्याच नंतरच्या काळात कळला असे दिसते.





त्यांना मका हे धान्य माहीत होते. लांडगा व अस्वल हे प्राणी माहीत असले, तरी सिंह व वाघ हे प्राणी माहीत होते, असे दिसत नाही.

वरील वर्णनावरून असे दिसते की रशियातील कोनिग्स्बर्गपासून क्रिमियाला मिळणारी एक रेषा काढली व ती एशियामायनरपर्यंत वाढविली, तर आर्यांचे निवासस्थान या रेषेच्या पश्चिमेस असले पाहिजे. कारण बीच हे झाड या रेषेच्या पश्चिमेस सापडते.

ज्या प्रदेशात भौगोलिक वैचित्र्य नाही तेथे घोडा व गाय हे दोन्ही प्राणी सापडणे शक्य नाही.

युरोपात असा कोणता प्रदेश आहे की जेथे कुरणाशेजारीच शेते, सखल प्रदेशातील धान्याच्या लागवडीसाठी सोईस्कर असलेला प्रदेश, कळपांना व पक्ष्यांना चरण्यास सुलभ अशी उंच भागातील कुरणे, वर सांगितलेली बीच वगैरे झाडे व हंस वगैरे पक्षी आहेत?

असा प्रदेशा म्हणजे पूर्वेकडे कार्पेथियन, दक्षिणेकडे बाल्कन, पश्चिमेकडे आस्ट्रियन आल्प्स व उत्तरेकडे एअरबर्जने सीमित केलेला युरोपातील प्रदेश होय.

## प्रा. दाण्डेकरांचे मत

प्रा. दाण्डेकरांना हे मत मान्य नाही. त्यांचे म्हणणे थोडक्यात असे :-

आर्यांचे मूलस्थान म्हणून केम्ब्रिज इतिहासाने ज्या प्रदेशाचे वर्णन केले आहे तो प्रदेश म्हणजे हंगेरी होय. आर्यांचे मूलस्थान हंगेरी होते या मताविरुद्ध असे विचारता येईल की स्थाइक झालेल्या एका शेतकरी जमातीला देशान्तर करण्याचे कारण काय? प्राचीन इण्डोयुरोपीय भाषेत हंगेरीत सार्वत्रिक असलेल्या मत्स्याहाराचे वाचक शब्द का सापडत नाहीत? आणखी असे, की हंगेरीमध्ये इण्डोयुरोपीय लोकांना निःसंशयपणे माहीत असलेली बाण व इतर शस्त्रे उत्खननात सापडली नाहीत. याच्या उलट, प्राचीन डान्यूबीय संस्कृतीत इण्डोयुरोपीयनांना अज्ञात असलेल्या देवीमातेच्या पूजेचे अवशेष सापडतात. वस्तुतः हंगेरीतील शेतकरी समाजात भटक्या व लढाऊ इण्डोयुरोपीय जमातीची मनोवृत्ती मुळीच आढळत नाही. शिवाय घोडे व इतर पशू यांच्या पालनासाठी फक्त हंगेरी हा देशच सोईस्कर आहे असे कशाच्या आधारावर म्हणायचे?

"मूळ इण्डोयुरोपीयांना बीच माहीत होता. हा बीच कोनिग्स्बर्गपासून क्रिमिया आणि एशियामायनरपर्यन्त काढलेल्या रेषेच्या पूर्वेस सापडत नाही म्हणून इण्डोयुरोपीयांचे मूलस्थान या रेषेच्या पूर्वेस असू शकत नाही" हा युक्तिवाद बरोबर नाही; कारण प्राचीन

इण्डोयुरोपीयांना बीच माहीत नव्हता "असे दाखावून देता येते."

आर्य हंगेरीतून आले या मताचे याप्रमाणे 'खण्डन' केल्यावर ते उत्तर किर्गिझ प्रान्तातून आले असे दाण्डेकर 'सिद्ध' करतात. या सिद्धान्ताची अनुमानपरंपरा येणेप्रमाणे आहे :-

याबाबतीत मेसोपोटेमियाचा प्रभाव लक्षणीय आहे. अस्त्सर व पेलेक्कू हे इण्डोयुरोपीय शब्द अक्काडियन इश्तर व असीयिन पिलक्कू यांच्याशी नाते दाखवितात. प्राचीन इण्डोयुरोपीय शब्दावर अन्तराशियातील शब्दांचा प्रभाव देखील दिसून येतो. हे फक्त अल्ताइक संस्कृतीच्या द्वाराच संभवते. उदाहरणार्थ, गुओस हा इण्डोयुरोपीय शब्द आतापर्यंत मानण्यात आल्याप्रमाणे सुमेरियन गि-इ-पासून आलेला नसून अल्ताइक कुओसपासून आलेला आहे. प्राचीन इण्डोयुरोपीय भाषेवर उर्गो-फिनिकचा प्रभाव देखील इतकाच महत्त्वपूर्ण आहे. यावरून असे निष्पन्न होते, की प्राचीन इण्डोयुरोपीय भाषेचे मूलस्थान- सुमेरियन- अक्काडियन-मेसोपोटेमियन भाषिक क्षेत्राच्या जवळ मानले पाहिजे. अनेक भाषांत विभागले जाण्यापूर्वीची इण्डोयुरोपीय भाषा याच विविध प्रभावांखाली आली असली पाहिजे. उत्तर किर्गिझ हाच असा जवळचा प्रदेश आहे की, जेथे हा त्रिविध प्रभाव पडू शकेल.

इण्डोयुरोपीय, माणसाळविलेला वाळवंटी घोडा वापरीत यावरून देखील त्याचे अल्ताइक प्रदेशाशी सांस्कृतिक संबंध सिद्ध होतात.

Cow हा इंग्रजी शब्द अल्ताइकपासून आलेला आहे. इण्डोयुरोपीयांनी अश्वमेधदेखील तेथूनच घेतला. इण्डोयुरोपीय, बकरे व मेंढ्या यांचा मोठ्या प्रमाणावर वापर करीत यावरून देखील त्यांच्या मूळ टोळ्या पूर्वेकडील रशियातील विस्तीर्ण माळरानापासून तो पूर्वेकडील पहाडी प्रदेशापर्यंत पसरल्या होत्या असे दिसते. प्राचीन इण्डोयुरोपीयांना वाघ, चित्ता व उंट यांचे ज्ञान नव्हते. यावरून देखील त्यांचे मूलस्थान उरल-अल्ताइक भागात म्हणजे उत्तर किर्गिझ भागात होते असे दिसते.

इण्डोयुरोपीय मेदू म्हणजे - उत्तर किर्गिझमध्ये न होणारा- मध या शब्दावरून केलेला प्राचीन इण्डोयुरोपीय उत्तर किर्गिझ रहिवासी नव्हते हा युक्तिवाद बरोबर नाही. कारण, मेदूचा अर्थ मध असा नसून कोणत्या तरी बोरसदृश फळाचा रस असा असला पाहिजे.

प्राचीन इण्डोयुरोपीयांना शेतीचे ज्ञान नव्हते यावरून देखील उत्तर किर्गिझ हेच





त्यांचे मूलस्थान होते या मताला पुष्टी मिळते. त्यांना शेतीचे ज्ञान नव्हते. हे त्यांच्या भाषेतील सेरी, मेल्ग, अग्रोस, मेल वगैरे शब्दांवरून ब्रॅण्डस्टीनने सिद्ध केले आहे.

प्राचीन इण्डोयुरोपीय, मृताला एका थडग्यात पुरीत. त्या थडग्यावर भोवतालच्या जमिनीतून खोदून काढलेली माती टाकीत. या थडग्याच्या भोवती एक वा दोन लाकडी कुंपणे देखील बांधीत असे दिसते. ऋग्वेद १४/१८/४ व १८/१३ यांत याच पद्धतीचे वर्णन आहे. यावरून इण्डोयुरोपीयांच्या दूरच्या शाखांत देखील हीच पद्धत प्रचलित होती असे दिसते. किर्गिझ प्रांतात वर वर्णन केलेल्या थडग्याशी सदृश असे 'कुर्गन' मिळाले आहेत व ते रशियन पुरावेत्त्यांच्या मते नवपाषाणयुगाइतके म्हणजे ख्रिस्तपूर्व २५०० इतके जुने आहेत.

कोरलेल्या आकृती-विशेषतः चाबकाच्या दोरीचे वळ असलेली मातीची भांडी- ही इण्डोयुरोपीयांची विशेषता होती असे समजले जाते. या भांड्यांचे मूलस्थान देखील उत्तर किर्गिझच्या माळरानात शोधता येते. जेथे दगडाचे परशू सापडले आहेत अशा स्थलांचे परीक्षण केले तर किर्गिझ हेच आर्यांचे मूलस्थान होते या मताला पुष्टी मिळते.

किर्गिझमधून इण्डोयुरोपीय बल्ख भागात आले. बल्खमध्ये मातीचे ढिगारे असलेली व भोवताली एक वा दोन लाकडी कुंपणे असलेली थडगी सापडली आहेत. मूळ इण्डोयुरोपीय भाषेतील शब्दांचे अर्थ व इण्डोयुरोपीय बोलींच्या निकटच्या पूर्वज भाषांतील शब्द यांची तुलना केली असता, पहिल्यातील अर्थ दुसऱ्यात कायम ठेवले गेले आहेत. उलट, युरोपीय शाखांतील इण्डोयुरोपीय भाषांत ते बदलले आहेत असे दिसून येते. म्हणून मूळचे आर्य इण्डोयुरोपीय मूलस्थानापेक्षा फार वेगळ्या नसलेल्या प्रदेशात देशान्तर करून गेले असले पाहिजेत. असा प्रदेश म्हणजे बल्खच्या जवळील प्रदेश होय.

भारतात आलेल्या आर्यांनी आपल्या भाषेचा व संस्कृतीचा पगडा अखंडितपणे व सखोलपणे भारतावर बसविला. पण निकट पूर्वेकडे देशांतर केलेल्या आर्यांना मूळच्या हुरियन जनतेवर आपल्या संस्कृतीचा व भाषेचा असा पगडा बसविता आला नाही. त्यांचा प्रभाव, ते राज्यकर्ते असूनही वरवरचाच राहिला.

## प्रा. बरो यांनी उचलून धरलेले 'आधुनिक' मत

केम्ब्रिज इतिहास व दांडेकर या दोघांनीही मूळ इण्डोयुरोपीय भाषेतील शब्द

कोणते होते याची कल्पना करून त्यावरून आर्यांच्या मूलस्थानाचा शोध घेण्याचा प्रयत्न केला आहे. पण ऑक्स्फर्ड येथील संस्कृतचे पीठ भूषविणारे प्रा. बरो यांच्या मते ही पद्धत चुकीची आहे, कारण अशा पद्धतीने एकच भाषा निष्पन्न होत नसून अनेक भाषा निष्पन्न होतात. मग या अनेक भाषांपैकी कोणती मूळ इण्डोयुरोपीय मानायची? एक काळ असा होता की, संस्कृत व ग्रीक यांची तुलना करून सिद्ध केलेल्या भाषेलाच मूळ इण्डोयुरोपीय म्हणत. स्टुअर्ट इ. मानने फक्त युरोपातील इण्डोयुरोपीय भाषांचा विचार केला, व एक इण्डोयुरोपीय भाषा कल्पिली. बरोच्या मते जगातील सर्व इण्डोयुरोपीय भाषांची सर्वमान्य यादी करून त्या सर्व भाषांच्या आधारावर एकसंध व एकमात्र अशी इण्डोयुरोपीय भाषा निष्पन्न करणे शक्यतेच्या कोटीतले नाही. तेव्हा आर्यांचे मूलस्थान शोधण्यासाठी ही पद्धत निरुपयोगी आहे.

आजकाल ही पद्धत टाकून, भाषाविद् आर्यांचे मूलस्थान युरोपात कुठेतरी होते असे मानतात. मात्र, हे आर्य म्हणजे भारतावर स्वारी करणारे इण्डोआर्य नव्हेत, तर त्यांचेही अतिप्राचीन पूर्वज-मूळ इण्डोयुरोपीय भाषा बोलणारे लोक. या सिद्धांताचा आधारभूत युक्तिवाद अगदी 'सीधासोपा' व 'परिणामकारक' आहे. तो म्हणजे युरोपातच अतिप्राचीन काळापासून संख्येने व वैचित्र्याने अत्यधिक अशा इण्डोयुरोपीय भाषा आढळतात. फार प्राचीन काळी एशियातल्या फार मोठ्या प्रदेशावर इण्डोयुरोपीय या एकमात्र इण्डोयुरोपीय भाषेचा प्रसार होता. तिच्यात फारच थोडे वैचित्र्य होते. याउलट, युरोपात, तौलनिक दृष्टीने पाहिले असता, मर्यादित प्रदेशात, एकमेकींपासून बऱ्याच भिन्न असलेल्या इण्डोयुरोपीय भाषा आढळतात. यावरून असे निश्चितपणे सिद्ध होते, की इण्डोइराणीय प्रदेशातील इण्डोयुरोपीय भाषा ही वासाहतिक विस्तारामुळे तेथे आली. उलट, युरोपातील फार प्राचीन काळापासून चालत आलेल्या भाषावैचित्र्यावरून तेथील इण्डोयुरोपीय भाषा अज्ञात भूतकाळापासून तेथेच होती असे मानावे लागते.

फार प्राचीन काळातील एशियामायनरमधील भाषांच्या वितरणाचा अभ्यास केला तर इण्डोयुरोपीय भाषा त्याच्या पश्चिमेस व इण्डोयुरोपीयेतरभाषा त्याच्या पूर्वेस असल्याचे आढळून येते. यावरून असे सिद्ध होते की आर्यांच्या स्वाऱ्यांची दिशा पश्चिमेकडून पूर्वेकडे असली पाहिजे.





## भाषाशास्त्रातील अन्तर्विरोध

आर्यांच्या मूलस्थानाबद्दलच्या तीन भाषाशास्त्रीय युक्तिवादांचा सारांश वर दिला आहे. त्यावरून हे स्पष्ट होईल, की आर्यांचे मूलस्थान ठरविण्याच्या दृष्टीने महत्त्वाच्या असलेल्या कोणत्याच बाबतीत भाषाशास्त्रांचे एकमत नाही. त्यांचा सारा भर इण्डोयुरोपीय या वर्गीकरणावर आहे. पण या वर्गात कोणत्या भाषा मोडतात याबद्दलदेखील त्यांच्यांत एकमत नाही. उदाहरणार्थ, स्टुर्टेव्हण्टच्या मते हिटाइट ही इण्डोयुरोपीय भाषा नाही. बरोप्रभृती तिला इण्डोयुरोपीय भाषा मानतात.

मुळात इण्डोयुरोपीय भाषा कोणत्या याबाबतीतच मतभेद असल्यावर त्यांच्या आधारे मूळ इण्डोयुरोपीय भाषेचे स्वरूप अजमावण्यात सतरा पंथ असणे अपरिहार्यच आहे.

म्हणूनच भाषाशास्त्रज्ञांनी आर्यांच्या बाबतीत अगदी परस्परविरोधी सिद्धांत मांडले आहेत. गाइल्सच्या मते आर्य लोक प्रेताचे दहन करीत, उलट दाण्डेकर म्हणतात, की ते प्रेते पुरीत हे "सिद्ध झाले आहे." ब्रॅण्डेस्टीन व दाण्डेकर यांच्या मते ते भटके होते. उलट, स्टुअर्ट मान म्हणतो, की ते शेतीवर उपजीविका करीत. गाइल्सच्या मते त्यांना बीचवृक्ष माहीत होता. उलट, दाण्डेकर म्हणतात, की त्यांना बीच माहीत नव्हता "हे दाखवून देता येते."

शिवाय इण्डोयुरोपीय भाषांत जी साम्ये आहेत त्यांचा उलगडा करण्यासाठी त्या सर्वांच्या मुळाशी एक भाषा होती अशी कल्पना करण्याची आवश्यकता आहे या आर्यांचे मूलस्थान शोधणाऱ्यांच्या गृहीतकृत्याच्या बाबतीतच मुळी भाषाविदांची एकवाक्यता नाही. द्रबेदझुकॉय, सोल्टा, पिसानी व ॲलन या भाषाविदांच्या मते हे साम्य स्वतंत्रपणे देखील उद्भवले असणे शक्य आहे. म्हणूनच कीथ स्पष्टपणे म्हणतो, की इण्डोयुरोपीय भाषांतील साम्यावरूनच वंशीय देशांतराची कल्पना सिद्ध होणे 'अशक्य' आहे.

## तर्कबुद्धीची दुर्दशा

परस्परविरुद्ध मतांप्रमाणेच तर्कशास्त्राच्या एखाद्या प्राथमिक विद्यार्थ्याला देखील हसू येईल अशी, विचाराची दुर्दशा भाषाशास्त्रज्ञांनी केली, आहे. इण्डोयुरोपीय भाषेच्या एकसंध स्वरूपाचा पत्ता लावणे शक्य नाही असे बरो सूचित करतो. असे असता मूळ इण्डोयुरोपीय भाषेचे स्वरूपच केवळ नव्हे, तर तिच्यातील एकजात सर्व शब्दांचा कोश

तयार केल्याचा दावा हे भाषाविद करतात. इण्डोयुरोपीय भाषेच्या यच्चयावत् सर्व शब्दांचा हा काल्पनिक कोश घेऊन मूळ इण्डोयुरोपीयांना बीच माहीत नव्हता, समुद्राच्या अस्तित्वाचा पत्ता नव्हता, मासे व मीठ हे पदार्थ त्यांनी स्वप्नातही पाहिले नव्हते वगैरे भरमसाट तर्क त्यांनी केले आहेत.

मूळ इण्डोयुरोपीय भाषेचा असा संपूर्ण कोश तयार करणे म्हणजे मृगजळातून जळ काढणे होय, हे कळण्यास सामान्य बुद्धी पुरेशी आहे. एक तर भाषाविदांना आपल्या हयातीत प्रचलित असलेलेच शब्द गोळा करणे शक्य आहे. स्वतःच्या हयातीत प्रचलित नसलेल्या शब्दांपैकी फक्त लेखननिविष्ट शब्दच त्यांना उपलब्ध होऊ शकतात. लेखनाव्यतिरिक्त प्रचलित असलेले, पण त्यांच्या हयातीपूर्वी लुप्त झालेले शब्द उपलब्ध होणे शक्य नाही. लेखननिविष्ट शब्द देखील सर्वच सर्व उपलब्ध होऊ शकत नाहीत; कारण छपाईची कला निघ्यापूर्वीच बह्वंश लिखाण नष्ट झालेले आहे. तेव्हा मूळ इण्डोयुरोपीय भाषेचे यच्चयावत् शब्द सापडणे तर सोडाच, यादवकालीन मराठीतले सर्व लिखित शब्द सापडणे देखील अशक्य आहे. मग लिखित नसलेले व केवळ बोलण्यात प्रचलित असलेले शब्द सापडण्याची कल्पना करायला नको.

तेव्हा इण्डोयुरोपीय भाषेत अमुक वस्तूला शब्द नव्हता म्हणून इण्डोयुरोपीयांना अमुक वस्तू अज्ञात होती असे तर्क करणे हा सामान्य तर्कबुद्धीवर मोठाच गहजब आहे.

बरे इण्डोयुरोपीय भाषेतील यच्चयावत् शब्द या भाषाशास्त्रज्ञांच्या हाती लागले आहेत असे मानले तरी यावरून फार तर त्यांना बीच, मासा वगैरे पदार्थ माहीत होते की नाही याबद्दल तर्क करता येतील; पण ते भटके होते की शेती करणारे होते, काळे होते की गोरे होते या गोष्टींचा निकाल नुसत्या शब्दांवरून कसा लागणार? इण्डोयुरोपीय गोरे होते ''असे आपल्याला माहीत आहे'' असे केंब्रिज इतिहास म्हणतो. हे कसे माहीत झाले? मराठी भाषेतील कोणत्या शब्दावरुन महाराष्ट्रीय काळे की गोरे याचे अनुमान करणार? सेरी, अॅग्रोस, मेल वगैरे तथाकथित इण्डोयुरोपीय शब्दांवरून मूळ इण्डोयुरोपीयांना शेतीचे ज्ञान नव्हते असे अनुमान ब्रॅण्डेस्टीन काढतो. यादवकालीन मराठीत आगगाडीला शब्द नव्हता म्हणून तत्कालीन मराठी भाषकांना आगगाडी माहीत नव्हते असे अनुमान सयुक्तिक आहे. पण त्या काळात अस्तित्वात असलेल्या कोणत्या शब्दावरून त्या काळातील मराठी भाषकांना आगगाडी माहीत नव्हती असे अनुमान काढता येईल?





वस्तुतः भाषाविदांना मूळ इण्डोयुरोपीय शब्द गवसले आहेत असे मानले तरी हे शब्द म्हणजे नुसते अर्थशून्य ध्वनी आहेत. या शब्दांचे इण्डोयुरोपीय अर्थ काय होते हे कशाच्या आधारावर ठरवायचे? शब्दांचे अर्थ कळायला ते एखाद्या संदर्भात वापरलेले उपलब्ध नाहीत, कारण ती भाषाच काल्पनिक आहे. तेव्हा त्या भाषेतील शब्दांचे अर्थ त्या भाषेप्रमाणेच काल्पनिक असणार.

इण्डोयुरोपीय शब्द कल्पनेने काढण्याप्रमाणेच त्यांचे अर्थही कल्पनेने बसवण्यासाठी ब्रॅण्डस्टीनने एक पद्धत वापरली आहे. ज्या अस्तित्वात असलेल्या इण्डोयुरोपीय भाषांतील शब्दांवरून मूळ इण्डोयुरोपीय शब्दांची कल्पना करण्यात आली आहे, त्या भाषांमध्ये, त्या शब्दांच्या अर्थामध्ये कसकसे फेरफार होत गेले आहेत याचा अभ्यास करून मूळ इण्डोयुरोपीय भाषेतील शब्दांचे अर्थ लावायचे. हे फेरफार कसे होतात याबद्दल ब्रॅण्डस्टीनने काही नियम बनविले आहेत. उदाहरणार्थ, पशू या शब्दाचा कालान्तराने पैसा असा अर्थ होतो; पण पैसा या शब्दाचा कालान्तराने पशू असा अर्थ होणार नाही. या नियमाचा आशय थोडक्यात असा दिसतो, की विशिष्ट अर्थावरून सामान्य अर्थ निष्पन्न होऊ शकत नाही. पशू हे एकप्रकारचे धन आहे. म्हणून हा शब्द सर्व प्रकारच्या धनाचा वाचक जो पैसा त्याच्या अर्थी वापरला गेला. पण पैसा म्हणजे सर्व प्रकारचे धन हा शब्द केवळ पशुधन या अर्थी वापरला जाण्याची शक्यता नाही.

ब्रॅण्डस्टीनच्या अशासारख्या नियमांच्या स्वच्छन्दतेवरून इण्डोयुरोपीय भाषेतील शब्दांचे जे अर्थ बसविण्यात आले आहेत ते कितपत ग्राह्य आहेत हे स्पष्ट होते. अर्थाचा बदल सामान्याकडून विशिष्टाकडे होऊ शकत नाही, विशिष्टाकडून सामान्याकडेच फक्त होऊ शकतो या म्हणण्यास काही आधार नाही. जीवन हा सामान्य शब्द आहे; पण त्याचा अर्थ जीवनास आवश्यक असलेला एक विशिष्ट पदार्थ म्हणजे पाणी असा झाला. अर्थात अर्थान्तर सामान्याकडून विशिष्टाकडे देखील होऊ शकते.

ब्रॅण्डस्टीनच्या नियमाच्या अगदी उलट नियम बरोने मान्य केला आहे. फिनो-उर्गियन भाषेत मासा याअर्थी वापरल्या जाणाऱ्या शब्दाचा इण्डोयुरोपीय भाषेत विशिष्ट जातीचा मासा असा अर्थ झाला. जी भाषा एखाद्या शब्दाच्या मूळ अर्थाचा संकोच करते त्या भाषेने तो शब्द उसना घेतला असा नियम मानावा असे बरो सूचित करतो- या नियमानुसार इण्डोयुरोपीय भाषांनीच फिनो-उर्गियन मासावाचक शब्द उसना घेतला असे त्याच्या मते सिद्ध होते.

ब्रॅण्डस्टीनप्रमाणे बरोचा नियम देखील स्वच्छंदी आहे. या दोघांनी परस्परांच्या मताला छेद देणारी उदाहरणो दिली आहेत. भाषाशास्त्रात कुणाचा पायपोस कुणाच्या पायात नाही अशी स्थिती असल्याचा प्रत्यय यावरून येईल.

शब्दांचे अर्थ बसविण्याच्या या सावळागोंधळी पद्धतीच्या आधारावर आर्यांचे वसतिस्थान ठरवू गेले तर जगातल्या कोणत्याही प्रदेशाला आर्यांचे वसतिस्थान म्हणता येईल. दाण्डेकरांना मान्य असलेल्या इण्डोयुरोपीय भाषेत मेदु हा शब्द आहे. मेदु म्हणजे मधु म्हणजे मध व हा मध तर दाण्डेकरांनी आर्यांचे मूलस्थान म्हणून कल्पिलेल्या उत्तर किर्गिझ प्रदेशात नाही. पण ही अडचण दांडेकरांना विचलित करीत नाही. सारेच कल्पनेने ठरवायचे म्हटल्यावर मधु शब्दाचा मध असाचा अर्थ का करा? दाण्डेकर म्हणतात :- ''इण्डोयुरोपीय मेदु म्हणजे मध नव्हे, तर कोणत्या तरी बोरसदृश फळाचा रस.'' हे त्यांना कसे कळले हे त्यांनी सांगितले नाही.

याच उदाहरणावरून आर्यांचे मूलस्थान शोधणाऱ्या भाषाविदांच्या तर्कहीनतेचे दुसरे एक प्रत्यन्तर येते. त्यांच्या मते इण्डोयुरोपीय भाषेत जे शब्द होते ते सर्व इण्डोयुरोपीय मूलस्थानात सापडणाऱ्या वस्तूंचेच द्योतक होते. हर्टच्या मते इण्डोयुरोपीयांना बीच माहीत होता त्या अर्थी ज्या प्रदेशात बीच होतो त्याच्या पूर्वेस त्यांचे वसतिस्थान नसले पाहिजे. मॅक्समूलर पामीरच्या पठारावर आर्यांचे मूलस्थान कल्पितो. या कल्पनेविरुद्ध गाइल्स म्हणतो, की इण्डोयुरोपीय भाषेत ज्या पशुवृक्षादींना शब्द आहेत ते पामीरच्या पठारावर होत नाहीत. म्हणून पामीरचे पठार त्यांचे मूलस्थान मानता येत नाही. इंग्रजी भाषेत वाळवंट, उंट वगैरेंना शब्द आहेत त्याअर्थी इंग्रजी भाषा ही इंग्लंडमध्ये न उद्‌भवता अरबस्तानात उद्‌भवली असली पाहिजे असे म्हणण्यासारखेच हे आहे. जी भाषा ज्या देशातील असेल त्या देशातील वस्तूंचे वाचक असेच शब्द फक्त त्या भाषेत असू शकतात, दुसरे शब्द असू शकत नाहीत असे मानले तर कोणत्याही भाषेत दुसऱ्या देशांची नावे देखील असू शकणार नाहीत.

''इण्डोयुरोपीयांचे मूलस्थान अत्यन्त बन्दिस्त असल्यामुळे त्याचा बाहेरच्या जगाशी संपर्क नव्हता. त्यामुळे इंग्रजी भाषेचे वरील उदाहरण गैरलागू आहे,'' असे यावर केम्ब्रिज इतिहासकार म्हणतील. पण एवढ्या बन्दिस्त प्रदेशात राहणारे इण्डोयुरोपीय ग्रेटब्रिटनपासून कृष्णेच्या तटापर्यन्त पसरले, या देशान्तराला त्यांच्या बन्दिस्त प्रदेशाची





आडकाठी आली नाही, एवढेच नव्हे तर त्यांच्या भाषेचे विशेष एवढ्या विस्तृत व विविध प्रदेशांवर हजारो वर्षे टिकून राहिले असे मानण्यातला वदतोव्याघात एवढ्या मूर्धाभिषिक्त इतिहासाच्या लेखकांनी लक्षात घेतला नाही हे आश्चर्य आहे.

### भारतीय भाषांचे मूलस्थान : दिल्ली

मूळ इण्डोयुरोपीय भाषेवर सुमेरी-अक्काडीय-मेसोपोटेमियन असा त्रिविध प्रभाव पडला असला पाहिजे व त्यावरून तिचे जन्मस्थान या प्रदेशांच्या जवळ शोधले पाहिजे असे दाण्डेकर म्हणतात. म्हणजे एकूण मूळ इण्डोयुरोपीय ही ज्या भाषेतून आजच्या शेकडो इण्डोयुरोपीय भाषा निघाल्या अशी एक मूलभूत भाषा नसून स्वतःच इतर अनेक भाषांच्या प्रभावाने बनलेली भाषा होती. असे जर आहे तर तिला एका विवक्षित भाषाकुलांची जननी मानण्यात काय अर्थ आहे?

शिवाय इण्डोयुरोपीय भाषा ज्या अनेक भाषांच्या प्रभावातून उद्‌भवली त्या भाषा कोणत्या कुलातल्या मानायच्या? इण्डोयुरोपीय भाषेतून निघालेल्या नसल्यामुळे त्यांना इण्डोयुरोपीय मानता येत नाही. उलट इण्डोयुरोपीय भाषेचे मूलस्थान ठरविण्यास मदत होऊ शकेल इतका प्रभाव त्यांनी इण्डोयुरोपीय भाषेवर केला, तेव्हा त्या इण्डोयुरोपीय भाषेपेक्षाही प्राचीन असून तिच्या जनकत्वाचा मान त्यांच्याकडे जातो. मग अशा भाषा इण्डोयुरोपीय नाहीत असे कसे म्हणायचे? दाण्डेकरांच्या विचारसरणीत असा वदतोव्याघात आहे.

मूळ इण्डोयुरोपीय भाषेचा शोध घेणे व्यर्थ आहे म्हणून त्याऐवजी थोड्या प्रदेशात अत्याधिक संख्येने इण्डोयुरोपीय भाषा जेथे आढळतात तेच आर्यांचे मूलस्थान मानावे असा बरो यांचा युक्तिवाद आहे.

या युक्तिवादानुसार दिल्ली हे साऱ्या भारतीय भाषांचे मूलस्थान ठरते. दिल्लीत भारतातील साऱ्या प्रान्तांचे लोक येऊन स्थाइक झाले आहेत. या लोकांनी घरे बांधण्यासाठी सहकारी संस्था स्थापन केलेल्या आहेत, व त्यांना विशिष्ट भागात जमिनी देण्यात आलेल्या आहेत. काश्मिरी लोकांना पंपोश कॉलनीत जागा दिलेली आहे, महाराष्ट्रातील लोकांना पंजाबी बागमध्ये जागा देण्यात येणार असे कळते. म्हणजे काही दिवसांनी भारतातल्या निरनिराळ्या भाषा दिल्लीतल्या निरनिराळ्या ठिकाणी वसलेल्या

आढळतील. म्हणजे इतर कोणत्याही शहरापेक्षा दिल्लीमध्ये भारतीय भाषांचे वैचित्र्य थोड्याशा प्रदेशात अत्याधिक प्रमाणात आढळेल. मग दिल्ली हे या सर्व भाषांचे मूलस्थान आहे असे का म्हणू नये?

आश्चर्याची गोष्ट अशी की बरो हे आपल्या 'सीध्यासोप्या' व 'परिणामकारक' युक्तिवादाला चिकटून राहत नाहीत. ते म्हणतातः- ''सुरवातीपासून इराणी भाषेने निरनिराळ्या बोलींत विभाजित होण्याची प्रवृत्ती प्रकट केली आहे. या बोली लवकरच स्वतन्त्र भाषांचे रूप घेत्या झाल्या. पण इण्डोआर्यनची तशी स्थिती नाही. भौगोलिक व इतर कारणांमुळे या भाषेने सर्व उत्तर भारतात एकरूपता कायम राखली आहे.''

म्हणजे एकूण एखाद्या प्रदेशातील भाषा निरनिराळ्या बोलींत परिणत होतात की एकरूपता राखतात हे 'भौगोलिक' व 'इतर कारणांवर' अवलंबून आहे. मग एका सीमित प्रदेशात एकाच कुळातल्या अधिक भाषा आहेत की नाहीत याचा त्या भाषांचे मूलस्थान शोधण्याच्या दृष्टीने काय उपयोग? मूलस्थानाऐवजी 'भौगोलिक व इतर कारणे' याची उपपत्ती लावू शकतील. आर्यांचे मूलस्थान युरोपात होते हे सिद्ध करण्यासाठी आपण दिलेला युक्तिवाद 'सीधासोपा' व 'परिणामकारक' आहे या आपल्या दाव्यावर बरोने याप्रमाणे स्वतःच हरताळ फासला आहे.

### कालनिर्णय व भाषाशास्त्र

'अ' भाषेचा प्रभाव 'ब' भाषेवर पडला असे म्हणता येण्यासाठी 'अ' अधिक प्राचीन की 'ब' अधिक प्राचीन याचा भाषाशास्त्राहून स्वतंत्र निर्णय आधी झाला पाहिजे याची जाणीवपूर्वक दखल भाषाविदांनी घेतलेली नाही. कधी कधी ते 'अ' पूर्वी झाली असे नुकतेच गृहीत धरतात, तर कधीकधी भाषाशास्त्राच्या आधारेच भाषांचे पौर्वापर्य ठरवितात. केवळ भाषेच्या आधारावर ऋग्वेद आवेस्त्यातील प्राचीनतम भागाच्या ५०० वर्षे आधी झाला असे मॅक्डोनेल म्हणतो तर त्याच आधारावर ऋग्वेद त्या भागापेक्षा प्राचीन नाही असे बरो म्हणतो. केवळ भाषेच्या आधारावर मिरोनाव्ह हिटाइटला वेदपूर्व ठरवितो व केवळ भाषेच्या आधारावर वैदिक तस्मिन् इण्डोहिटाइट तो-स्मि पासून झाले असे स्टुर्टेव्हण्ट म्हणतो.

इण्डोयुरोपीयांना समुद्र माहीत नव्हता हे सिद्ध करण्यासाठी केम्ब्रिज इतिहासाने असा युक्तिवाद केला आहे, की लॅटिनमध्ये मायर हा जो समुद्रवाचक शब्द आहे





त्या शब्दाशी नाते असलेल्या इतर इण्डोयुरोपीय शब्दांचा अर्थ मूर वा दलदल असा होतो, या 'इतर भाषा' लॅटिनपेक्षा जास्त प्राचीन आहेत व लॅटिनपेक्षा जास्त प्राचीन असलेल्या इण्डोयुरोपीय भाषांत समुद्रवाचक शब्द नाहीत असे मानल्याशिवाय या युक्तिवादाची संगती लागत नाही. असे असून मायर हा शब्द इण्डोयुरोपीय भाषातील सर्व समुद्रवाचक शब्दांपेक्षा अधिक प्राचीन आहे असे सिद्ध करण्याचा केम्ब्रिज इतिहासाने प्रयत्न देखील केलेला नाही.

अक्काडियन-सुमेरियन-मेसोपोटेमियन भाषांचा प्रभाव इण्डोयुरोपीयावर पडला, त्याअर्थी मूळ इण्डोयुरोपीय भाषेचे स्थान या प्रदेशांच्या जवळ शोधले पाहिजे असा युक्तिवाद दाण्डेकर करतात. असा युक्तिवाद करताना अक्काडियादी भाषा मूळ इण्डोयुरोपीयपेक्षा अधिक प्राचीन आहेत व इतक्या प्राचीन काळी देखील त्या सध्याच्या ठिकाणीच होत्या हे सिद्ध करण्याची आपल्यावर जबाबदारी आहे, याची त्यांना जाणीव नाही.

कालनिर्णयाच्या आधारे भाषाशास्त्राचे सिद्धान्त न बसविता, भाषाशास्त्र हेच कालाचे निर्णायक समजण्याच्या या प्रवृत्तीच्या विरुद्ध प्रवृत्ती बरोच्या विवेचनात कुठेकुठे आढळून येते. त्याने या ठिकाणी भाषाशास्त्राच्या आधारे कालनिर्णय न करता आधी माहीत असलेल्या कालिक पोर्वापर्यावरून भाषिक परिवर्तनाबद्दल अनुमाने काढली आहेत. ''फार प्राचीन काळापासून'' युरोपमध्ये इण्डोयुरोपीय भाषा अत्याधिक प्रमाणात आहेत, ''फार प्राचीन काळापासून'' एशियामायनरमध्ये भाषेचे वितरण असे होते की, त्यावरून आर्यांचे पश्चिमेकडून पूर्वेकडे देशांतर सिद्ध होते, वगैरे विधान त्याने केली आहेत. अर्थात् भाषांचे प्राचीनत्व आधी निश्चित झाल्याशिवाय भाषिक परिवर्तन व त्याला कारण म्हणून सांगण्यात आलेले देशांतर वगैरेबद्दल अनुमाने निघू शकत नाहीत हे त्याला मान्य आहे असे वाटते.

हे एकदा मान्य केल्यावर त्याची सगळी विचारपद्धतीच ढासळून पडते याचे मात्र त्याला भान नाही. पृष्ठ ३४ वर तो म्हणतो :- ''संस्कृत भाषा ही बहुतेक बाबतींत दुसऱ्या कोणत्याही इण्डोयुरोपीय भाषेपेक्षा जास्त प्राचीन व मूळ इण्डोयुरोपीय भाषेशी अधिक सदृश आहे.'' ऑक्स्फर्डच्या इंग्रजी कोशात देखील इण्डोयुरोपीय भाषांतील सर्वांत प्राचीन असे संस्कृतचे वर्णन आहे. संस्कृतचे हे प्राचीनत्व मान्य केल्यावर साऱ्या

इण्डोयुरोपीय भाषांतील सादृश्याचा उगम संस्कृतात आहे असे मानण्यात हरकत कोणती? ज्या गोष्टीची उपपत्ती संस्कृतसारख्या एका प्रत्यक्ष अस्तित्वात असलेल्या भाषेच्या आधारे लागते तिच्यासाठी इण्डोयुरोपीय नावाच्या एखाद्या काल्पनिक भाषेची जरूर काय? दृष्टाने ज्याची मीमांसा होऊ शकते त्याच्या मीमांसेसाठी अदृष्टाकडे धाव घेण्याचा व्यर्थ खटाटोप कशाला?

तसेच संस्कृतचे प्राचीनत्व मान्य केल्यावर भारतात प्रचलित होण्यापूर्वी संस्कृत भारताबाहेर प्रचलित होती असे सिद्ध केल्याशिवाय आर्यांचे मूलस्थान भारताबाहेर शोधण्यास आधार उरत नाही.

संस्कृतच्या या प्राचीननत्वामुळे भारत जरी नाही तरी भारताजवळच्याच एखाद्या प्रदेशात आर्यांचे मूलस्थान मानण्याची पूर्वी भाषाविदांची प्रवृत्ती होती. पण यावर बरो म्हणतो :- "जर्मन, कोल्ट, ग्रीक, वगैरे इण्डोयुरोपीय लोकांचे पूर्वज कोणत्याही काळी एशियात राहत होते याला काहीही पुरावा नाही." म्हणजे कोणत्याही लोकांचे मूलस्थान शोधण्यास भाषाशास्त्र निर्णायक नाही, त्यासाठी भाषाशास्त्राव्यतिरिक्त काही पुरावा नसेल तर भाषास्त्रावरून केलेले तर्क खोटे मानले पाहिजेत अशी कबुलीच या वाक्यात बरोने दिली आहे. पण हा न्याय भारताला लागू करायला मात्र तो तयार नाही. भारतीयांचे पूर्वज कधीकाळी युरोपात राहत होते याला एका तकलादू भाषाशास्त्रीय अनुमानाव्यतिरिक्त दुसरा काही पुरावा त्याला देता आलेला नाही. जी गोष्ट भारतीयांच्या पूर्वजांच्या बाबतीत त्याने 'साधीसोपी' व 'परिणामकारक' मानली आहे ती युरोपीयांच्या बाबतीत मात्र त्याला कवडीमोलाची वाटते.

तीच कथा दाण्डेकरांची आहे. इण्डोयुरोपीय भाषापैकी सर्वात प्राचीन भाषा संस्कृत आहे ही भाषाविदांची कबुली ज्याप्रमाणे आर्यांचे मूलस्थान भारत होते हे सिद्ध करते, त्याचप्रमाणे इण्डोयुरोपीय भाषांचा भारतीय भाषांवर जो प्रभाव आहे तो अत्यंत सखोल व स्थायी आहे, उलट, भारताच्या पश्चिमेकडील प्रदेशात जो प्रभाव आहे तो वरवरचा आहे अशी कबुली देताना भारतीय भाषा इण्डोयुरोपीय भाषेने प्रभावित झाल्या नसून तिच्या साक्षात वंशज आहेत व पश्चिमेकडच्या भाषा या साक्षात् वंशज नसून केवळ तिच्या प्रभावाखाली आलेल्या आहेत हेच याचे कारण असले पाहिजे अशी शंका सुद्धा दाण्डेकरांना आली नाही.





एकूण आर्यांचे मूलस्थान भारताबाहेर होते असे प्रतिपादन करणाऱ्या भाषाशास्त्राची आधारवाक्ये स्वच्छंदी व तर्कपद्धती एखाद्या तर्कशास्त्राच्या पुस्तकात हेत्वाभासांची उदाहरणे देण्यासच केवळ उपयुक्त आहे.

**संदर्भ -**

Cambridge History of India.
Exercises in Indology by R.N. Dandekar.
The Sanskrit Language by T. Burrow, New & Revised Edition, 1973.

■ ■

कपोलकल्पित आर्य आणि त्यांच्या स्वाऱ्या

...४...

# पुनः एकदा उत्तर ध्रुव

## (लो.टिळकांच्या मताचे परीक्षण)

**लो. टिळकांनी वैदिक आर्य मूलतः उत्तर ध्रुवावर राहत होते व सुमारे १०००० वर्षांपूर्वी हिमप्रलयामुळे उत्तर ध्रुव सोडून भारतात आले, ऋग्वेदात याच्या काही स्मृती आहेत असे प्रतिपादन केले आहे. पण टिळकांनी उद्‌धृत केलेले सर्व उल्लेख वाटेल तशी ओढाताण करून व काल्पनिक अर्थ घेऊनच उत्तर ध्रुवाला लागू होतात. शिवाय १०००० वर्षांपूर्वी हिमप्रलय संपला, सुरू झाला नाही. आर्य हिमप्रलयाच्या काळात उत्तर ध्रुवावर राहात होते व हिमप्रलय ओसरल्यावर उत्तर ध्रुव सोडून भारतात आले ही कल्पना उघडपणेच त्याज्य आहे.**



**आर्य** कपोलकल्पित आहेत या मताचे प्रतिपादन करताना एक मोठी अडचण येते व ती म्हणजे लो. टिळकांच्या नावाचा प्रभाव. आर्यांचे भारताबाहेरून आगमन टिळकांनाही मान्य होते व टिळकांना मान्य असलेला सिद्धान्त एवढा निराधार असणार नाही, असे अनेकांचे म्हणणे पडते.

लो. टिळकांनी आर्क्टिक होम इन द वेदाज हा ग्रंथ लिहून वैदिक आर्यांचे पूर्वज ध्रुवप्रदेशात राहत होते, तेथे सुमारे चौदा हजार वर्षांपूर्वी हिमप्रलय झाला म्हणून त्यांनी तो प्रदेश सोडला, क्रमाक्रमाने ते भारतात येऊन राहिले, वैदिक वाङ्मय बारकाईने तपासून पाहिले असता त्यात आर्यांच्या प्राचीन ध्रुवनिवासाची प्रमाणे मिळतात, असे प्रतिपादन केले हे सुप्रसिद्ध आहे. टिळकांचा हा सिद्धांत, चि.वि. वैद्य, चित्रावशास्त्री, वगैरे वेदाभ्यासकांना मान्य आहे. मात्र आतापर्यंत एखाद्या सुप्रसिद्ध पाश्चात्त्य विद्वानाने हा सिद्धांत मानल्याचे वाचनात आले नव्हते. पण आता कोणतेही मत सर्वमान्य होण्यास या देशात अत्यावश्यक असलेली पाश्चात्त्य मान्यता देखील टिळकांच्या मताला प्राप्त झाली आहे. लेव्हिन या सोव्हिएट भारतवेत्त्याने वेदवाङ्मयात ध्रुवप्रदेशाचे उल्लेख आहेत या म्हणण्याला दुजोरा दिला आहे.

जी. एस. बोनगार्ड लेव्हिन हे आन्तर राष्ट्रीय संस्कृत अध्ययन संस्थेचे उपाध्यक्ष, पौरस्त्य विद्यासंस्था व रशियाचे विज्ञानपीठ याचे सदस्य, व नेहरू पारितोषिकाचे विजेते आहेत. त्यांनी भारताचा इतिहास लिहिला आहे. अशा या मान्य विद्वानाने 'ओरिजिन ऑफ द आर्यन्स' या नावाचा ग्रंथ नुकताच प्रसिद्ध केला आहे. या ग्रन्थात टिळकांच्या सिद्धान्ताला पोषक असे प्रतिपादन आहे.

लो. टिळक व आता लेव्हिन यांनी मान्य केलेला सिद्धान्त ही माझ्या मताचे प्रतिपादन करण्याच्या मार्गात एक मोठीच अडचण आहे. त्यामुळे, लेव्हिन व लो.टिळक यांच्या ग्रन्थांचे कसोशीने परीक्षण केले असता, आर्यांची स्वारी ही एक कपोलकल्पना आहे, इतिहास नाही हे माझे मत बदलण्याची जरूर नाही असे दिसून येते, हे दाखवून देणे आवश्यक आहे.

लेव्हिन यांचा ग्रन्थ ताजा, त्यांचे प्रतिपादन त्रोटक, व समजण्यास अधिक सोपे असल्यामुळे आधी लेव्हिन यांच्या ग्रन्थाचा विचार करू.

## ध्रुवमण्डल

हा विचार सुरू करण्यापूर्वी ध्रुवप्रदेशाचे वैशिष्ट्य स्पष्ट केले पाहिजे. पृथ्वी स्वतःभोवती एखाद्या भोवऱ्याप्रमाणे फिरते. या चक्राकार गतीचा जो आस आहे त्याच्या उत्तर व दक्षिण टोकांना उत्तर व दक्षिण ध्रुव म्हणतात. उत्तर ध्रुवप्रदेश म्हणजे उत्तर ध्रुवाजवळचा प्रदेश. या प्रदेशात राहणाऱ्या लोकांना विषुववृत्ताच्या बरेच उत्तरेस जे खगोल आहेत ते अस्त पावताना कधीच दिसणार नाहीत, कारण पृथ्वी पश्चिमेकडून पूर्वेकडे फिरते, उत्तरदक्षिण फिरत नाही. भोवऱ्याच्या डोक्यावर एक हिरव्या रंगाचे वर्तुळ असते. या वर्तुळाच्या कक्षेत एखादा निरीक्षक बसला आहे अशी कल्पना केली तर त्याला भोवऱ्याच्या मध्यभागाच्या जरा वर असलेला पदार्थ नेहमीच दिसू शकेल. उलट भोवऱ्याच्या मध्यावर असलेल्या एखाद्या निरीक्षकाला, हा पदार्थ ज्या बाजूला आहे त्याच्याविरुद्ध दिशेला भोवऱ्याबरोबर फिरल्यावर, भोवरा मधे आल्यामुळे, हा पदार्थ दिसणार नाही. अर्थात् ध्रुवप्रदेशावरील निरीक्षकाला विषुववृत्ताच्या उत्तरेस असलेले खगोल अस्ताला गेलेले म्हणजे क्षितिजाखाली नाहीसे झालेले, न दिसता स्वतःच्या डोक्याभोवती चकरा मारताना दिसतील.

पण सूर्य साऱ्या वर्षभर विषुववृत्ताच्या उत्तरेस नसतो. तो दक्षिणायनात दक्षिणेकडे गेला म्हणजे उत्तर ध्रुवप्रदेशातील निरीक्षकाला दिसेनासा होतो. निरीक्षक ध्रुवबिंदूच्या जवळ असेल तर त्याला सूर्य वर्षातून सहा महिने दिसेल व सहा महिने दिसणार नाही; म्हणजे तेथे सहा महिने दिवस व सहा महिने रात्र राहील. ध्रुवबिंदूपासून जेवढे दक्षिणेस जाऊ तेवढे दिवसरात्रीचे हे प्रमाण बदलत जाईल. पण ध्रुवप्रदेशामध्ये कोठेही अनेक दिवस - म्हणजे चोवीस तासांची अनेक आवर्तने - उषा व रात्री अनुभवास येणार नाहीत. अर्थात ध्रुवप्रदेशात पुढील लक्षणे दिसली पाहिजेत :-

१) निरीक्षकाच्या डोक्याभोवती फिरणारे खगोल.

२) चोवीस तासापेक्षा जास्त टिकणाऱ्या उषा, रात्री वगैरे.

लेव्हिन व टिळक यांच्या मते अशा भौगोलिक परिस्थितीच्या परंपरागत आठवणी आर्य जातीच्या सांस्कृतिक जीवनात आढळतात.

## लेव्हिन यांचे प्रतिपादन

ग्रीक लोकांनी त्यांच्या बरेच उत्तरेस राहणाऱ्या सीथियन लोकात प्रसृत असलेल्या





कल्पना ग्रंथित केलेल्या आहेत. ''अति उत्तरेस सहा महिने निजणारे लोक राहतात. तेथे सहा महिने दिवस व सहा महिने रात्र असते; एका दिवसात पेरणीपासून कापणीपर्यंत शेतीची कामे होतात; हा प्रदेश अति थंड आहे, वगैरे लोकवृत्त सीथियन लोकात प्रचलित आहे.'' असे हिरोडटसने लिहून ठेवले आहे. ख्रिस्तपूर्व सातव्या शतकात सीथियाच्या अति उत्तरेस प्रवास करून आलेल्या अरिस्टियासचे उल्लेख ग्रीक वाङ्मयात आढळतात. ''अति उत्तरेस ग्रिफिन नावाचे प्राणी आहेत. हे प्राणी सुवर्णरक्षक, अजपाद, व एकाक्ष असतात. ग्रिफिन ज्याचं रक्षण करतात ते सोने ऱ्हिपियन नावाच्या पर्वतातून वाहणाऱ्या नद्यांच्या पात्रात असते.'' ॲरिस्टॉटल म्हणतो की हा ऱ्हिप पर्वत सप्तर्षींच्या अगदी खाली म्हणजे थेट उत्तर ध्रुवावर आहे. प्लिनीच्या मते हा प्रदेश हिममय आहे. या प्रदेशात उत्तर व सीथियन समुद्र आहे.

महाभारतात सुवर्णमेरूचे वर्णन आहे. मेरूवर सहा महिन्याचा दिवस व सहा महिन्याची रात्र असते व ध्रुवाचा तारा अगदी डोक्यावर असतो. हा मेरू हजारो योजने उंच आहे. येथे वेगशाली मरुतांचे वास्तव्य आहे. सर्व खगोल या मेरूभोवती प्रदक्षिणा करतात. प्लिनीप्रमाणेच मेरूच्या उत्तरेस श्वेत वा क्षीर समुद्र आहे असे भीष्म सांगतो. रामायणात देखील मेरूच्या पायथ्याशी असलेल्या समुद्राचा उल्लेख आहे.

पारशांच्या आवेस्त्यात अति उंच हर पर्वताचा उल्लेख आहे. या पर्वताभोवतीच सूर्य, चंद्र व तारे फिरतात. हा हर, मेरूप्रमाणेच सोन्याचा आहे व त्यातून अदर्वी नावाची नदी वाहते. हा हर सूर्याला टेहळण्याइतका उंच आहे. पृथ्वीवरच्या सर्व नद्या, ऱ्हिप, हर वा मेरूतून उगम पावतात अशा ग्रीक, पारसी व हिन्दू लोकांत परंपरा आहेत.

मेरूप्रमाणेच हर देखील साऱ्या पृथ्वीभर पूर्वेपासून पश्चिमेपर्यन्त पसरलेला आहे. सीथियन लोकांची तशीच परंपरा आहे. ऱ्हिप पर्वताजवळ मोठा समुद्र आहे. बोरूकश हा देखील रुन्द आखाते असलेला झरय्या म्हणजे समुद्र आहे; व तो हराजवळ आहे. या हर पर्वतावरच सप्तर्षि उगवतात येथे अति तीव्र हिवाळा आहे.

आवेस्त्यापेक्षा प्राचीन असलेल्या ऋग्वेदात उत्तर ध्रुवाचे उल्लेख आहेत; एवढेच नव्हे तर मेरूचे ग्रीक लोकात प्रसिद्ध असलेले ऱ्हिप हे नाव देखील आहे. सम्बन्धित ऋचा अशी आहे :-

**पाति प्रियं रिपो अग्रं पदं वेः ।**
**पाति यह्वश्चरणं सूर्यस्य ॥**

**पाति नाभा सप्तशीर्षाणमग्निः ।**
**पाति देवानामुपमादमृष्वः ॥**

**अर्थ :-** पक्ष्यांचे स्थान असलेल्या व्हिप पर्वताचे प्रिय शिखर, स्वसामर्थ्याने सूर्याची दैनंदिन गती, अक्षस्थानी सप्तशीर्ष व देवांचे भोग या सर्वांचे उदात्त असा अग्नी रक्षण करतो.

या ऋचेतील रिप म्हणजेच ग्रीकांचा व्हिप. त्याला देवानामुपमादम् म्हणजे देवाचे विलासस्थान म्हटले आहे. मेरूच्या आसमन्ताद् इन्द्रादी देव वास्तव्य करून सोमपानादि विलास करतात असे महाभारत पुराणादिकात उल्लेख आहेत. हर बेरेजेति हे देवांचे भोगस्थान आहे. अशी झोरॅस्ट्रियन परंपरा देखील आहे. पुराणात कधी कधी मेरू ध्रुवाप्रमाणेच सप्तद्वीपांचा म्हणजे साऱ्या पृथ्वीचा मध्य मानला आहे.

मेरू व हर बेरेजेति यांच्या शिखरावर पक्षी राहतात अशी हिंदू व इराणी परंपरा आहे. प्राचीन ग्रीक कथात देखील व्हिप पर्वतावर पक्षांचे थवे राहतात अशी वर्णने आहेत. मेरू वा हर पर्वतावरूनच पक्षांनी सोमवल्ली पळवून आणली अशी हिंदू व इराणी परंपरा आहे. गरुडाने मोठा पराक्रम करून स्वर्गातून अमृत आणले अशी महाभारतात कथा आहे.

अशा या अति दूरच्या प्रदेशात दैवी साहाय्यावाचून क्वचितच कोणी जात असे अशी इण्डोइराणीय परंपरा आहे. गालवाला गरुड तेथे घेऊन गेला. नारदाला विष्णूने दिव्य शक्ती दिली म्हणून तो श्वेत वा क्षीरसमुद्रापर्यंत जाऊन आला. शुकाने आकाशमार्गाने तेथे प्रवास केला. अरिस्टियास या प्रदेशात गेला तो देखील आपला आत्मा वाटेल तेव्हा शरीरापासून वेगळा करून परत बोलावण्याची अद्भुत शक्ती त्याच्या ठायी असल्यामुळे.

संस्कृत वाङ्मयात आठ पायांचा शरभ नावाचा सिंहघाती प्राणी वर्णिलेला आहे. तो एका उडीत दऱ्या पार करू शकतो. हा शरभ काल्पनिक नसून अति उत्तरेतील जंगलातला लॅास आहे. याला पूर्वी सहा पाय होते. पण त्याला आपल्या सामर्थ्याचा गर्व झाला म्हणून देवाने त्याचे दोन पाय कापून त्याला चतुष्पाद केले अशी कथा उग्रिय लोकात प्रचलित आहे. उग्रिय लोक या प्राण्याला सार्प किंवा शॉर्प म्हणतात. ऋग्वेदातील एका इन्द्रसूक्तात सोम आणण्याच्या कामगिरीत साहाय्यभूत झालेल्या शरभाचा उल्लेख आहे. अथर्ववेदात शरभाला उद्देशून एक मन्त्र आहे.





या सर्व साम्यावरून असे अनुमान निघते की, इण्डो-इराणीय टोळ्यांचा फिनोउग्रीय लोकांशी निकटचा संबंध आला व या संबंधांतून उपर्युक्त उत्तर ध्रुवीय कल्पनांचा त्यांच्यात प्रादुर्भाव झाला.

सीथिया, ग्रीस व रोम या सर्वांमध्ये भू भाग उत्तरेकडे उंच होत जातो अशी कल्पना आहे. साऱ्या नद्या उत्तरेकडून वाहतात असा भारतीय, इराणीय व सीथियन लोकांचा समज होता.

दुसऱ्या शतकातला भूगोलवेत्ता टॉलेमी याने आपला भूगोल सर्मॅटियाला जाऊन आलेल्या प्रवाशांच्या वृत्तांताच्या आधारे लिहिला आहे. तो व्होल्गा नदीला ऱ्हा म्हणतो. आवेस्त्यात रहा नावाची नदी हर पर्वतातून म्हणजे मेरूतून उगम पावते असे म्हटले आहे. अर्थात् टॉलेमीची माहिती दक्षिणपूर्व युरोपात राहणाऱ्या इराणीभाषी लोकांकडून मिळविली असली पाहिजे.

डॉ. गार्डन वॉस्सॉन यांनी रशियाच्या उत्तरेकडे आर्क्टिक समुद्रालगतच्या सैबेरिया प्रदेशात आढळणारी फ्लाय अगॅरीक ही मश्रुम जातीची वनस्पती हाच वेदातला यज्ञाच्या वेळी पिण्यात येणारा सोम असे प्रतिपादन केले आहे. हा सोम भारतात मिळत नव्हता हे ''सोमं मन्यते पपिवान् यत्संपिंशन्त्योषधिम्। सोमं यं ब्रह्माणो विदुर्न तस्याश्नाति कश्चन॥'' ''कोणती तरी औषधी कुटणाऱ्यांना आपण सोम पितो आहोत असे वाटते. पण जो सोम ब्राह्मणांना माहीत आहे तो कोणालाच प्यायला मिळत नाही.'' या ऋचेवरून स्पष्ट आहे. तेव्हा सोम पिण्याचा प्रघात सैबेरिया नजीकच्या एखाद्या प्रदेशातला असला पाहिजे.

एकूण सर्व गोष्टींचा विचार करता डिनीपर ते उरल पर्यंतचा दक्षिणपूर्व युरोप हाच प्रदेश आर्यांचे मूलस्थान असला पाहिजे, कारण वर दिलेली वर्णने याच प्रदेशाला लागू होतात. येथील नद्या उत्तरेकडून दक्षिणेकडे वाहतात, हा प्रदेश उत्तरेकडे उंच होत गेला आहे. व्होल्गा, उरल, डॉन, डिनीपर या सर्व उत्तरेकडून दक्षिणेकडे वाहतात. यांचा उगम अति उत्तरेत अत्यंत दुर्गम प्रदेशी आहे.

ध्रुव प्रदेशाच्या उल्लेखावरून आर्य उत्तरध्रुवाजवळच राहत होते हा टिळकांचा सिद्धान्त मानता येत नाही; कारण आर्यसमूहामध्ये ध्रुवप्रदेशासम्बन्धी जी माहिती प्रचलित आहे ती तो प्रदेश मानवास अगम्य, देवांचे निवासस्थान, अद्भुत गुणांनी युक्त अशा स्वरूपात आहे. तिच्यात सत्यापेक्षा कल्पनेचा भाग अधिक आहे. आर्यांचे स्वतःचेच

पूर्वज तेथे राहत असते तर अशा तऱ्हेची परंपरा निर्माण झाली नसती. शिवाय सम्भाव्य इतिहासकालात प्राचीन आर्यांच्या समाजाइतकी सुधारणा असलेला समाज अस्तित्वात असण्यासारखी परिस्थिती ध्रुवमण्डळात नव्हती.

डिनीपर ते उरल प्रदेश हा आर्यांचे मूलस्थान आहे असे म्हटल्यावर जर्मन लोकांचा या मूलप्रदेशाशी कधी सम्बन्ध होता वगैरे प्रश्न उद्भवतात. इण्डो-इराणीयांप्रमाणे, जर्मनांचा या प्राचीन आर्यजीवनाशी सम्बन्ध दाखविता येत नाही. त्यामुळे वस्तुतः जर्मन लोकांना आर्य म्हणवून घेण्याचा अधिकार नाही.

## लेव्हिन यांच्या प्रतिपादनाचे खण्डन

अशा तऱ्हेचे युक्तिवाद ऐकले की मन स्तम्भित झाल्यावाचून राहत नाही. लेव्हिनने सीथियन, ग्रीक, इराणीय व भारतीय यात प्राचीन काळापासून उत्तर ध्रुवप्रदेशासम्बन्धी काही खरी, काही दन्तकथात्मक अशी माहिती प्रचलित होती एवढेच दाखवून दिले आहे. एवढ्यावरून त्या लोकांचे पूर्वज उत्तर ध्रुवाजवळच्या एखाद्या प्रदेशात राहत होते हे कसे सिद्ध होईल? नाना फडणीसाच्या एका पत्रात फ्रेंच राज्यक्रान्ती व फ्रान्स याविषयी उल्लेख आहे.

ज्या डॉ. वारन् यांच्या ग्रन्थावरून टिळकांना आर्यांचे पूर्वज उत्तर ध्रुवावर शोधण्याची स्फूर्ती झाली त्यांच्या मते सर्व मानवजातीचे पूर्वजच उत्तर ध्रुवावर राहत होते, केवळ आर्यांचे नव्हे. याला प्रमाण म्हणून त्याने सर्वच मानवजातीच्या इतिहासातून ध्रुवमण्डळाबद्दलचे उल्लेख काढून दाखविले आहेत. असे उल्लेख खरोखरच असतील तर लेव्हिन यांच्या युक्तिवादाची ती अयुक्तापत्ती म्हणजे रिडक्शियो अँड ॲबसर्डम् आहे. सर्व मानवजातीचा इतिहास पाहिला असता ज्या प्रदेशांचा उल्लेख मुळीच सापडत नाही असे कोणते व किती प्रदेश पृथ्वीच्या पाठीवर आहेत याचा मागोवा वॉरन् यांनी घेतलेला नाही. त्यांनी तसे केले असते तर कोलंबसापर्यन्त आशिया/यूरोपला अज्ञात असलेल्या अमेरिकेचा सम्भाव्य अपवाद सोडला तर सर्व मानवजातीच्या इतिहासात ज्याचा कुठेच उल्लेख येत नाही असा कोणताच प्रदेश नाही हे त्यांच्या लक्षात आले असते. मग सर्व मानवजातीचे मूळ ज्ञात पृथ्वीच्या सर्वच प्रदेशात का शोधू नये?

कोणत्याही जातीचे प्राचीन वाङ्मय घेतले तर त्यात जगाचा भूगोल सांगणारा एखादा भाग सापडणे साहजिक आहे. याच न्यायाला अनुसरून महाभारतात सप्तद्वीपा





वसुमतीचे वर्णन आहे. त्यात मेरूचाही उल्लेख असला तर त्याचा आर्यांच्या मूलस्थानाशी काय सम्बन्ध? महाभारतात वर्णिलेल्या इतर प्रदेशांना आर्यांचे मूलस्थान का मानू नये?

ध्रुवप्रदेशाच्या उल्लेखांचे मूलस्थान शोधण्याच्या दृष्टीने महत्त्व नसले तरी असे उल्लेख वेदवाङ्मयात खरोखरच आहेत काय हा प्रश्न उरतोच. तेव्हा आता लेव्हिन यांनी सुचविलेल्या उल्लेखाची चर्चा करू.

## ऋग्वेदात ग्रीकांचा ऱ्हिप आहे काय?

लेव्हिनच्या म्हणण्याप्रमाणे रिप शब्दाचा अर्थ ऱ्हिपियन पर्वत असा असू शकेल. पण या शब्दाचे सायणाने, शत्रू किंवा शत्रुत्व वा पृथ्वी असे अर्थ केले आहेत. लेव्हिनने उद्धृत केलेल्या ओळीत पृथ्वी असा अर्थ केला आहे व तो बरोबर लागू पडतो. ऱ्हिप पर्वत, पृथ्वी वा रिपु यापैकी कोणताही अर्थ सर्व ठिकाणी लागू होत नाही.

प्रस्तुत ऋचेत रिप शब्दाचा अर्थ ऱ्हिप पर्वत असा न करता पृथ्वी असा केला तरी रिपो अग्रम् म्हणजे पृथ्वीचे अग्र असा उल्लेख टळत नाही. सायणाने वेः म्हणजे फिरणाऱ्या, रिपो म्हणजे पृथ्वीचे असा अर्थ केला आहे. फिरणाऱ्या पृथ्वीचे अग्र ध्रुवाशिवाय दुसरे असू शकत नाही. पण ऋग्वेदकाली पृथ्वी फिरते याचे ज्ञान होते असे मानणे कठीण आहे, कारण पुढे आर्यभट्टाने ही कल्पना नवीन काढली असे भारतीय खगोलशास्त्राचे इतिहासकार सांगतात. तेव्हा वेः म्हणजे फिरणाऱ्या असा अर्थ न करता पक्षांचे असाच अर्थ करावा लागतो. पण पृथ्वीचे अग्र ते पक्षांचे प्रिय स्थान असे म्हटले तरी पृथ्वीचे अग्र म्हणजे काय! ध्रुवच की नाही? नाही. असेच म्हणण्याची जरुरी नाही. पृथ्वीचे अग्र म्हणजे सर्वात उंच पर्वताचे शिखर. हा हिमालयाच्या शिखराचा उल्लेख असू शकेल. ऋग्वेदात हिमालयाचा उल्लेख आहे पहा :-

**यस्य इमे हिमवन्तो महित्वा,**
**यस्य समुद्रं रसया सहाहुः ।**
**यस्येमाः प्रदिशो यस्य बाहू,**
**कस्मै देवाय हविषा विधेम॥**

हिमालयाची सारी शिखरे, पृथ्वीसहित समुद्र, व दिशारूपी बाहू हे सर्व ज्याचे ऐश्वर्य आहे अशा कोणत्या देवाला आम्ही हवन करावे?

"न्हिप हा शब्द अभारतीय आहे. तो वेदातच फक्त आला आहे, उत्तरकालीन वाङ्मयात त्याचा मागमूस देखील नाही. तेव्हा वैदिक आर्यांचा दक्षिणपूर्व युरोपात राहणाऱ्या लोकांशी आलेल्या संबंधांचा तो निदर्शक आहे. हा संबंध तुटून हजारो वर्षे लोटल्यावर तो संस्कृत भाषेतून लुप्त झाला," असा युक्तिवाद करणे शक्य आहे म्हणून इतर ठिकाणी आलेल्या रिप शब्दाचे विवेचन करणे उपयुक्त होईल.

रिप शब्द ज्यात आला आहे अशा साऱ्या ऋचा पुढे दिल्या आहेत :-

**-१-**

**मा नो गुह्या रिप आयोरहन्दभत् मा न आभ्यो**
**रीरधो दुच्छुनाभ्यः।**
**मा नो वि यौः सख्या विद्धि तस्य नः सुम्नायता**
**मनसा तत्त्वेमहे ॥**

आम्हाला शत्रूच्या हिंसारूपी माया कोणत्याही दिवशी न बाधोत. आम्ही कधीही दुःखवश न व्हावे. ज्या सख्याच्या बळावर आम्ही तुझी याचना करतो त्या सख्यापासून आम्हाला वियुक्त करू नकोस. आमचे ते सख्य आमच्या सुखेच्छेने जाण.

**-२-**

**उदिन्वस्य रिच्यतेंऽशो धनं न जिग्युषः।**
**य इन्द्रो हरिवान्न दभन्ति तं रिपो दक्षं दक्षाति सोमिनि॥**

ज्याप्रमाणे जिंकणाऱ्याचे धन सगळ्यात जास्त असते त्याप्रमाणे या इन्द्राचा सोमाचा वाटा सर्व देवांपेक्षा जास्त आहे. त्याला शत्रू मारू शकत नाहीत. हरि अश्वयुक्त इन्द्र यजमानाला बल देतो.

**-३-**

**अव वेदिं होत्राभिर्यजेत रिपः काश्चिद्वरुणध्रुतः सः।**
**परि द्वेषोभिरर्यमा वृणक्तूरुं सुदासे वृषणा उ लोकम्॥**

हे कामपूरक मित्रावरुणांनो, सुदास राजास श्रेष्ठ स्थान प्रदान करा. अयज्ञ लोक वरुणाच्या हिंसेचे लक्ष बनोत. अर्यमन् देव आमची शत्रूपासून मुक्तता करो.





**-४-**

**वि तिष्ठध्वं मरुतो विक्ष्विच्छत गृभायत रक्षसः संपिनष्टन।**
**वयो ये भूत्वी पतयन्ति नक्तभिर्ये वा रिपो दधिरे देवे अध्वरे ॥**

हे मरुतांनो तुम्ही प्रजामध्ये अधिवास करता. राक्षसांचे पेषण करण्याची इच्छा करता, त्या राक्षसांना धरा. ते राक्षस रात्री पक्षांचे रूप घेऊन येतात. ते यज्ञामध्ये बाधा करतात.

**-५-**

**प्र मातुः प्रतरं गुह्यमिच्छन् कुमारो न वीरुधः सर्पदुर्वीः।**
**सिसं न पक्वमविदच्छुचन्तं रिरिह्वांसं रिप उपस्थे अन्तः।**

ज्याप्रमाणे स्तन्य पिण्यासाठी कुमार गुडघ्यावर सरकतो त्याप्रमाणे हा अग्नी पृथ्वी मातेच्या लता व त्यांची गुप्त मुळे यांची इच्छा करीत व तिच्या उत्सङ्गाखाली पक्व अन्नतुल्य वनस्पती आणि आस्वाद घेत पसरणारी मुळे शोधत पसरतो आहे.

रिपचा न्हिप पर्वत हा अर्थ पाति प्रियं या प्रमाणेच प्र मातुः प्रतरम् येथे देखील लागू शकेल. रिप उपस्थे म्हणजे पृथ्वीच्या उत्सर्गाखाली वा उदरात, तसेच रिप पर्वताच्या उदरात असे देखील म्हणता येईल. पण इतर कोठेही तो लागू होत नाही. १ मध्ये रिप पर्वताची गुह्ये आम्हाला न मारोत. २ मध्ये रिप पर्वत इन्द्राला मारू शकत नाही व ३ मध्ये वरुणाचा रिप पर्वत इत्यादींचा काही अर्थ होत नाही. अधिक ठिकाणी लागू होण्याच्या दृष्टीने व जास्त चांगला अर्थ लागण्याच्या दृष्टीने पृथ्वी हा अर्थ सोडून रिप पर्वत हा अर्थ का घ्यावा याचे समर्थन लेव्हिनने दिले नाही.

एकूण लेव्हिनने उद्धृत केलेल्या ऋचेत ध्रुवप्रदेशाचा उल्लेख आहे असे मानण्यासाठी एकतर ऋग्वेदकाळी भू-भ्रमणाची कल्पना होती किंवा वेदकालापेक्षा पुष्कळ अर्वाचीन काळी युरोपात प्रचलित असलेला व संस्कृतवाङ्मयात कुठेही न आढळणारा न्हिप हा पर्वतनामवाचक शब्द ऋग्वेदात आहे असे मानावे लागते.

### शरभ व सोम

शरभ हा अति उत्तरेतला शॉर्प वा लॉस नावाचा प्राणी आहे असे म्हणताना लेव्हिनने नामसादृश्याव्यतिरिक्त कोणताही पुरावा दिलेला नाही. लॉस हा सिंहघाती आहे असे लेव्हिन म्हणत नाही. तसेच त्याचे सहा पाय केवळ पूर्वीच्या अवतारातले

व काल्पनिक आहेत. सिंहघाती व सहा पायाचा एखादा प्राणी कुठे असल्याचे दिल्लीच्या पशुगृहातील तज्ज्ञांनी ऐकले नाही व विश्वकोशातही त्या बद्दल काही माहिती सापडत नाही. तेव्हा संस्कृत वाङ्मयातील शरभ हा अति उत्तरेतील निवासात आर्यांनी प्रत्यक्ष पाहिलेला एक प्राणी आहे, असे अनुमान काढण्यास आधार नाही.

शरभ ही आर्यांची अति प्राचीन स्मृती असली तर त्याचे उल्लेख फक्त उत्तरकालीन वाङ्मयातच कसे आढळतात ही लेव्हिनला रुखरुख लागून राहिली होती, म्हणून ऋग्वेदात देखील शरभाचा उल्लेख आहे असे त्याने प्रतिपादन केले. हा तथाकथित उल्लेख असा आहे :-

**विश्वेत्ता ते सवनेषु प्रवाच्या या चकर्थ मघवन्निन्द्र सुन्वते ।**
**पारावतं यत्पुरुसंभृतं वस्वपावृणोः शरभाय ऋषिबन्धवे ॥**

हे इन्द्रा, सोम पिणाऱ्या यजमानासाठी तू जी कर्मे करतोस ती अनन्त आहेत. परावताचे पुष्कळ साठवून ठेवलेले धन तू ऋषिबन्धू शरभाला दिले.

येथे ऋषिबन्धू शरभ नावाचा प्राणी विवक्षित आहे असे समजण्यास काहीच आधार नाही. हे एका ऋषीचे नाव आहे असे सायण म्हणतो. तेव्हा लेव्हिनने दाखविलेला उल्लेख कपोलकल्पित आहे. उत्तरकालीन वाङ्मयातील शरभाची कल्पना व अति उत्तरेतील लोकांत प्रचलित असलेली लॉसची कल्पना सारखी असली तरी त्यावरून एकीकडच्या कथा दुसरीकडे पसरल्या यापलीकडे काहीच सिद्ध होत नाही.

शरभाप्रमाणेच सोमही भारतीय नाही असे लेव्हिन व्यतिरिक्त इतरही म्हणतात. अमेरिकन आर. वास्सॉन अर्मेनिताला सोम म्हणतात. सोमाला पाने, फळे व मुळे नसतात, फक्त बुंधा व टोपी असते. ही टोपी डोळ्यासारखी दिसते. सोम लाल व सूर्यासारखा असतो. दुपारी सूर्याच्या प्रकाशाने तो प्रकाशतो व रात्री चंद्राप्रमाणे रुपेरी दिसतो. त्याचा रस सोनेरी असतो वगैरे वर्णन ज्याला लागू होईल असा सोम भारतात सापडत नाही हे एक सोमपायी आर्यांच्या अभारतीयत्वाचे प्रमाण म्हणून सांगण्यात येते.

पण या मतात अर्थ नाही. फ्लाय अगॅरिक, ॲमॅनिता वगैरेंना सोम म्हणताना वास्सॉन प्रभृतींनी या वनस्पती प्राणघातक असतात, उलट सोम कितीही प्याले तरी त्याने प्राण जातो असे कुठेही वर्णन नाही याचा विचार केला नाही.

शिवाय सोमाच्या काड्या सपर्ण असतात, या वर्णनावरून सोमाला पाने नसतात हे वास्सॉन यांचे म्हणणे निराधार ठरते. सोमाचा रंग हरित, काळसर, आणि ताम्बूस





असा अनेक प्रकारे वर्णिला आहे. सोमरस दिसण्यात भांगेसारखा असावा असे अनेक वेदाभ्यासकांचे मत आहे. आवेस्त्यात हउमाबरोबर भांग हा शब्द देखील येतो यावरून या मताला पुष्टी मिळते. मजबूत पर्वत, शर्यणावत् सरोवर, आर्जिकीय देश, तसेच सुषोमा, पस्त्या, सिन्धु आदी नद्यांकाठी सोम उत्पन्न होतो असे उल्लेख आहेत. ही सर्व स्थाने हिमालय पर्वत व पंजाबातील डोंगराळ प्रदेश यामध्ये आहेत.

''सोमं मन्यते पपिवान्'' या ऋचेचा सायणाने असा अर्थ केला आहे की जे रासायनिक, यज्ञादी क्रियेच्या अंगरूपाने विधिवत् सोमपान न करता नुसतेच मजेसाठी सोमपान करतात त्यांना जो सोम ब्राह्मण यज्ञामध्ये विधिपूर्वक पितात तो प्यायला मिळत नाही. विधिपूर्वक व समाजमान्य रीतीने जो स्त्रीसमागम होतो तो विवाह, याव्यतिरिक्त जो होतो तो व्यभिचार हीच कल्पना सोमपानाच्या वैध व अवैध प्रकाराबद्दल येथे व्यक्तविली आहे.

शतपथ ब्राह्मणामध्ये सोमाऐवजी पूतिक म्हणजे रानशेर वापरावे असे सांगितले आहे यावरून काही लोक शतपथ ब्राह्मणकाली सोम मिळेनासा झाला होता; कारण आर्यांनी देशान्तर केले होते असे अनुमान काढतात. आजकाल साखर दुर्मिळ झाल्यामुळे साखरेऐवजी गूळ वापरावा असे कुणी म्हटले तर तेवढ्यावरून भारतीयांनी साखर दुर्मिळ असलेल्या ठिकाणी देशान्तर, केले आहे असे अनुमान काढण्यासारखे हे आहे.

### लो. टिळकांचे आर्क्टिक होम : वैदिक उषा

लेव्हिनप्रमाणे ध्रुवप्रदेशाचे नुसते उल्लेख दाखविल्याने आर्यांच्या मूळस्थानाबद्दल काहीच अनुमान काढता येणार नाही. हे लो. टिळकांनी ओळखले होते व म्हणून अशा उल्लेखात भूतकाळ वापरलेला आहे व त्यावरून असे पूर्वी म्हणजे पूर्वजांच्या काळी होते असे या उल्लेखात आहे व म्हणून ती मूलस्थानाचा उल्लेख ठरतो असा त्यांनी युक्तिवाद केला आहे. शिवाय आर्यांचे पुष्कळसे धार्मिक विधी ध्रुवमण्डळाच्या भौगोलिक परिस्थितीतच फक्त शक्य होते असा त्यांचा दुसरा युक्तिवाद आहे. टिळकांच्या ४६९ पृष्ठांच्या ग्रन्थातील प्रत्येक युक्तिवादाचा विचार करण्याची जरूर नाही. जे युक्तिवाद ते निर्णायक समजतात त्यांचाच येथे विचार करू.

### ध्रुवपक्ष

तानीदहानि बहुलान्यासन्या प्राचीनमुदिता सूर्यस्य। या ओळीत सूर्याच्या उदयकाली

पुष्कळ दिवस निघून गेलेले होते असे म्हटले आहे. सूर्योदयापूर्वी पुष्कळ दिवस निघून जाणे फक्त ध्रुवप्रदेशातच शक्य आहे. तेथे उषा उगवल्यावर सूर्य उगवायला बरेच दिवस लागतात. कटिबन्धातील प्रदेशात उषेच्या उदयानंतर सूर्योदयापूर्वी पुष्कळ दिवस जाऊ शकत नाहीत.

### खण्डन

सायणाने वरील ओळीत अहानि याचा अर्थ दिवस असा न करता 'तेजांसि' म्हणजे बहुवचनी प्रकाश असा केला आहे. "सूर्योदयापूर्वी ज्यावेळी पुष्कळशी तेजे फाकली होती..." असा त्याच्या मते अर्थ होतो. अहानि या पदाचा प्रकाश हा लाक्षणिक अर्थ आहे, वाच्यार्थ नाही असा यावर आक्षेप येऊ शकतो पण लाक्षणिक अर्थाने येथे अहानि हा शब्द वापरलाच नाही, असे म्हणण्यास आधार नाही.

वस्तुतः येथे लाक्षणिक अर्थ घेण्याची जरूर नाही. उदिता हे उषेचे विशेषण घेतले तर "ज्या दिवशी उषा सूर्याच्या पूर्वी उगवली असे पुष्कळ दिवस गेले," असा सरळ अर्थ होतो. उषा उगवावी व मग सूर्य उगवावा हा क्रम अगणित दिवसापासून चालत आला आहे असा भूतकालाच्या अनन्ततेबद्दलचा विचार यात प्रकट झाला आहे.

टिळक म्हणतात त्याप्रमाणे "सूर्याच्या उदयकाली बहुत दिवस गेले" असा अर्थ केला तरी हे दिवस उषेच्या व सूर्योदयाच्या मधे गेलेले आहेत असे समजण्यास काहीच प्रमाण नाही. उषा सूर्याच्या उदयकालीः उदितौ. त्याच्या आधी उगवली असे अनेक दिवस गेले असाच अर्थ निघतो.

### ध्रुवपक्ष

शश्वत्पुरोषा व्युवास देवी या ओळीत प्राचीन काळी उषा दीर्घकाळ पर्यन्त प्रकाशत असे, असे म्हटले आहे. हा ध्रुवीय उषेचा उल्लेख आहे.

### खण्डन

शश्वत् म्हणजे नेहमी, पुनः पुनः, अनेक वेळा असे अर्थ होतात. प्राचीन कालापासून न चुकता उषा रोज प्रकाशत आली आहे, एखाद्या दिवशी ती उगवलीच नाही असे कधी झाले नाही असा या श्लोकाचा स्पष्ट अर्थ आहे. "शश्वत्सिद्धैरुपचितबलिं भक्तिनम्रः परीयाः।" "ज्या शंकराच्या पावलाला सिद्ध लोक शश्वत् उपहार अर्पण





करतात त्याला तू भक्तीने प्रदक्षिणा घाल" असे कालिदासाचा यक्ष मेघाला म्हणतो. याचा अर्थ उपहार देण्याची क्रिया अखण्डमधे काहीच वेळ न जाता-चाललेली असते असा नाही. उपहार अर्पण करण्याची क्रिया पाच मिनिटात देखील संपू शकेल. पण ती शाश्वत आहे, म्हणजे नेमाने, न चुकता चालणारी आहे एवढाच अर्थ आहे.

### ध्रुवपक्ष

**यो अक्षेणेव च क्रिया शचीभिर्विश्वक्तस्तम्भ पृथिवीमुतद्याम् ।**

इन्द्राने एका आसाने दोन चाके धरून ठेवावी त्याप्रमाणे पृथ्वी आणि आकाश धरून ठेवले आहे, 'अवंशे द्यामस्ताभयत्' इंद्राने खांबाशिवाय आकाश धरून ठेवले आहे. 'स सूर्यः पर्युरू वरांसि इन्द्रो ववृत्याद्रथ्येव चक्रा।' सूर्य चाकाप्रमाणे फिरतो, इत्यादी विधानावरून हे स्पष्ट आहे की, या ओळी लिहिणाऱ्याला एक खांबावर राहणाऱ्या तंबूप्रमाणे आकाश दिसत होते व ते त्या खांबभोवती एखाद्या मेरी गो राउंडप्रमाणे, मजाचक्कर प्रमाणे, फिरत होते. पृथ्वी व आकाश यांना बांधून ठेवणारा आस हा पृथ्वीचा आस होय. आकाश या आसाभोवती फिरताना फक्त ध्रुवप्रदेशातच दिसू शकते.

### खण्डन

आकाशातील सूर्य, चंद्र, तारे व ग्रह आधाराशिवायच कसे राहतात हा प्रश्न पडणे स्वाभाविक आहे. आकाश व पृथ्वी एकमेकांवर न कोसळता, आपापल्या जागी राहतात असे हे साधे विधान आहे. खांबाशिवायच आकाशाला धरून ठेवले आहे, या वाक्यावरून ऋचाकाराला अभिप्रेत असलेल्या आसाचे कार्य एखादा खांब तंबूला धरून ठेवतो त्याप्रमाणे आकाशाला धरून ठेवणे हे आहे, आकशरूपी घुमटाच्या चक्राकार गतीला अन्वित करणे हे नाही हे स्पष्ट आहे. तसेच सूर्य चक्राकार फिरतो हे विधान घुमटासारख्या आकाशातून रोज पूर्वेकडून पश्चिमेकडे जाणाऱ्या सूर्याला देखील लागू आहे.

रथाच्या आसाच्या टोकाशी असलेली दोन्ही चाके फिरतात. येथे आस म्हणजे पृथ्वीचा आस व चाके म्हणजे उत्तरध्रुवावरील निरीक्षकाला, स्वतःभोवती फिरणारे आकाश व फिरणारी पृथ्वी अभिप्रेत आहे, असे म्हणता येत नाही; कारण अशा निरीक्षकाला अंतरिक्षच फक्त फिरताना दिसते, पृथ्वी फिरताना दिसत नाही. रथाचे एकच चाक फिरताना दिसते व दुसरे स्थिर दिसते म्हणून रथाचा आस व त्याची चाके

यांची उपमा गैरलागू आहे. पृथ्वी व अंतरिक्ष ही दोन्ही रथाच्या चक्राप्रमाणे फिरतात असे त्याने म्हटले अशी पळवाट काढण्याची सोय नाही, कारण रथाची दोन्ही चाके एकाच दिशेने फिरतात, उलट सापेक्ष गतीच्या तत्त्वाप्रमाणे आकाश व पृथ्वी विरुद्ध दिशेने फिरतात.

वस्तुतः येथे खगोलांच्या फिरण्याशी आसाचा सम्बन्ध नसून दोन चाकांना एकमेकांवर आदळू न देता आपापल्या जागी ठेवण्याचे आसाचे कार्यच फक्त विवक्षित आहे.

## ध्रुवपक्ष

**अतारिष्म तमसस्पारमस्य प्रति वां स्तोमो अश्विनावधायि।**
**एह यातं पथिभिर्देवयानैर्विद्यामेषं - वृजनं जीरदानुम्॥**

हे अश्विनींनो, हे स्तोत्र तुमच्या प्रति आहे. आम्हाला अंधकारातून तारून देवयान मार्गाने या, आम्हाला अन्न, शक्ती व जयदायी संपत्ती द्या.

**प्रमे पन्था देवयाना अदृश्रन्नमर्धन्तो वसुभिरिष्कृतासः ।**
**अभूदु केतुरुषसः पुरस्तात्प्रतीच्यागादधिहर्म्येभ्यः॥**

आपल्या महालातून निघणाऱ्या उषेचा ध्वज फडकल्यामुळे तेजस्वी व सुखद देवयान म्हणजे उत्तरायण सुरू झाले आहे.

सूर्य विषुववृत्ताच्या उत्तरेस जाऊ लागला की उत्तरायण सुरू झाले असे म्हणतात. या उत्तरायणात कटिबन्धातील प्रदेशात उन्हाळा व ध्रुव प्रदेशातला लॉंब दिवस सुरू होतो. उषा उगवल्यामुळे देवयान म्हणजे उत्तरायण सुरू झाले हे विधान फक्त उत्तरध्रुवावरच शक्य आहे. इतर ठिकाणी उषा रोजच उगवते. तिच्या उगवण्याने उत्तरायण सुरू होत नाही.

## खण्डन

देवयान या शब्दाच्या उत्तरायण या अर्थावर ही सारी इमारत उभी आहे. देवयान या शब्दाचा येथील अर्थ देवांचा म्हणजे तेजोगोलांचा मार्ग म्हणजे आकाश हे स्पष्ट आहे. नारद सूर्याच्या उदयावृत्तिपथाने म्हणजे ज्या मार्गाने सूर्याच्या उदयाची अनेक आवर्तने होतात, त्या आकाशमार्गाने जात होता असे कालिदासाने म्हटले आहे. 'उपवीणयितुं ययौ रवेरुदयावृत्तिपथेन नारदः ।' -कालिदास उत्तरध्रुवावर राहात होता





असे टिळकांचे मत नाही असे असून तो आकाशाला रवीच्या आवृत्तीचा म्हणजे चक्राकार गतीचा पथ असे म्हणतो हेही या सम्बन्धात लक्षात घेण्यासारखे आहे. आकाश या अर्थी कालिदासाने देवयानासारखेच ज्योतिष्पथ वगैरे आणखी दुसरे समानार्थी शब्द वापरले आहेत.

दुसऱ्या ऋचेचा अर्थ सायणाने असा केला आहे :- "तेजांनी संस्कृत व अहिंसक असा देवांचा मार्ग दिसू लागला आहे. पूर्व दिशेला उषेचा ध्वज दिसतो. उन्नत प्रदेशावरून ती पश्चिमेकडे आमच्याकडे येते आहे." म्हणजे येथे सूर्याच्या पूर्व-पश्चिम गतीचा निःसंदिग्ध उल्लेख आहे. येथे उषा पूर्वेकडे उगवली आहे असे स्वतः टिळकही भाषांतर करतात. उत्तरध्रुवावर उषा पूर्वेकडे उगवत नाही व उषा पूर्वेकडे उगवली असे म्हणणारा कवी आता उषा उगवली त्या अर्थी उत्तरायण सुरू झाले असे म्हणणार नाही.

## ध्रुवपक्ष

प्राचीन परंपरेमध्ये दक्षिणायनामध्ये मृत्यू येणे वाईट समजतात. इच्छामरणी भीष्म यामुळेच उत्तरायणाची वाट पहात शरपंजरी पडला होता. पारशांच्या आवेस्त्यामध्ये देखील दक्षिणायनाबद्दल हाच पूर्वग्रह आहे. दक्षिणायनात म्हणजे हिवाळ्यात मृत्यू आला असता काय करावे असे विचारले असता अहुरमझ्दा म्हणाला, एक खड्डा खणून त्यात प्रेत एकदोन रात्री वा महिनाभर पुरून ठेवावे, तोपर्यंत पक्षी उडू लागतील, वनस्पती वाढतील, पूर वाहतील व वारा जमिनीवरील पाणी शोषून घेईल. यावरून हे सिद्ध होते की हिवाळा म्हणजे ध्रुवीय रात्र. ती संपल्यावर म्हणजे सूर्योदय झाल्यावर अन्त्यविधी करावा, हे पक्षी उडू लागतील वगैरे वर्णनावरून स्पष्ट आहे. ध्रुवप्रदेशात हिवाळ्यात म्हणजे लांब रात्रीच्या काळात अंत्यविधीसारखे व्यवहार करणे अशक्य होते; कारण त्यावेळी घराबाहेर अतिशय थंडी व अंधार असे. दक्षिणायनात मरणे याप्रमाणे आप्तेष्टांना त्रास देणारे होते; म्हणून त्याविरुद्धचा ग्रह निर्माण झाला.

## खण्डन

हिवाळ्यात मरण्याविरुद्ध कटाक्ष असता तर हिवाळ्याभर अंत्यविधी करू नये असे का म्हटले नाही? रात्र व महिने अशी भाषा वापरायची काय जरूर होती? हिवाळ्याभर प्रेत ठेवणे शक्य नव्हते असे मानले तर एकदोन रात्री थांबून काय साधणार होते? अग्नीचा उपयोग माहीत नव्हता काय? बाहेर जाणे कठीण असले तरी जे लोक

मंडपात होमकुंड पेटवून अश्वमेधासारखे यज्ञ करीत, त्यांना प्रेत घरातच जाळणे शक्य नव्हते काय?

पक्षी उडू लागतील या वर्णनावरून ही वेळ सकाळची होती असे म्हणायचे तर पूर वाहतील, वारा पाणी शोषून घेईल वगैरे वर्णनाची काय वाट? या गोष्टी सूर्योदयाच्या वेळीच होतात काय?

दुसरा आक्षेप असा की वेदकाली प्रेताचे दहन करण्याची चाल नसून प्रेते पुरण्याची चाल होती असे १०.१८ या सूक्तावरून काही लोक म्हणतात. सायणाच्या अनुसार पुरण्याची भाषा अस्थिकुंभाला उद्देशून आहे, मृतदेहाला उद्देशून नाही. तरी या अर्थाचे स्पष्ट शब्द सूक्तात नाहीत, तेव्हा टिळकांचा युक्तिवाद मानण्यासाठी प्रेते पुरण्याची चाल नव्हती असे सिद्ध होणे आवश्यक आहे. कारण आवेस्त्यामधील वचनावरून प्रेत महिनाभर पुरून ठेवणे शक्य होते; तरी अंत्यविधी शक्य नव्हता असे दिसते. प्रेत पुरणे शक्य होते तर प्रेत पुरण्याचा अंत्यविधी का शक्य नव्हता? अर्थात् हा अंत्यविधी प्रेत पुरण्याव्यतिरिक्त दुसरा काही तरी होता.

### ध्रुवपक्ष

ऐतरेय ब्राह्मणामध्ये अश्विनशस्त्र नावाचा एक विधी आहे. या विधीचा काल "ऊर्ध्वमर्धरात्राद् प्रकाशीभवस्यानुविष्टम्भम्" म्हणजे जेव्हा रात्रीचा अंधार उषेच्या प्रकाशाने नाहीसा होत असतो तो. ऋग्वेदात ७/६७/२ व ७/६७/३ या ऋचाच हाच काळ सांगितला आहे. या विधीत हजार ऋचा म्हणाव्या लागतात. या हजार ऋचा म्हटल्यावर देखील सूर्योदय झाला नाही तर ऋग्वेदाची दहाही मण्डले म्हणावी असे आपस्तम्बाने म्हटले आहे. उषेच्या उदयापासून सूर्योदयापर्यन्त एवढा वेळ फक्त ध्रुवप्रदेशातच लागू शकतो.

### खण्डन

या युक्तिवादावर साहजिकच असा प्रश्न उपस्थित होतो की हा विधी ज्या ऐतरेय ब्राह्मणात सांगितला आहे ते ध्रुवप्रदेशात रचले गेले असे टिळकांचे म्हणणे नाही, मग ऐतरेय ब्राह्मणाने ध्रुवप्रदेशातच फक्त शक्य असलेला असा विधी कसा सांगितला? असा विधी पूर्वी होता असे शब्द ऐतरेय ब्राह्मण वापरीत नाही, वर्तमान विधीच सांगत आहे. पूर्वीच्या प्रथा गैरलागू असल्या तरी चालू राहतात या तत्त्वावर याची उपपत्ती





लागत नाही, कारण अशा प्रथा चालू राहण्यास त्या शक्यतेच्या कोटीतल्या असल्या पाहिजेत. तेव्हा ऐतरेय ब्राह्मण ध्रुवप्रदेशात रचले गेले असे मानल्याशिवाय टिळकांचा अर्थ उपपन्न ठरत नाही.

शिवाय विधीचा काल सांगणाऱ्या वाक्याची ओढाताण केल्याशिवाय ध्रुवपक्षीय अर्थ त्यातून निघत नाही. अर्धरात्रीनन्तर प्रकाशीभाव स्थिर होईपर्यंत असा या वाक्याचा सरळ अर्थ आहे. वि + स्तम्भ म्हणजे स्थिरीभाव व अनु म्हणजे जवळ किंवा पर्यन्त असे अनुगंगं वाराणसी, म्हणजे वाराणसी गंगेजवळ आहे. उषेनन्तर पूर्ण सूर्योदय होईपर्यन्त या टिळकांच्या अर्थातील उषेनन्तर हा अर्थ कुठून आला हे कळत नाही 'ऊर्ध्वमर्धरात्राद्' असे आधी शब्द नसते तर प्रकाशीभावस्यानुविष्टम्भम् याचा अर्थ प्रकाशीभावाच्या क्रियेशी समकाल असा करता आला असता. पण 'ऊर्ध्वमर्धरात्राद्' असे स्पष्ट शब्द असल्यावरदेखील तसा अर्थ केल्याने अर्धरात्रीनंतर हे शब्द निरर्थ ठरतात. सरळ अर्थ केल्यास मध्यरात्रीपासून सूर्योदयापर्यन्त या विधीचा काल आहे हे स्पष्ट आहे व हा काल पाच सहा तासांचा आहे. हजार सूक्ते म्हणण्यास पुरेसा आहे.

टिळकांनी वेदाच्या ज्या दोन ऋचांचा हवाला दिला आहे त्यात अश्विनशस्त्राच्या विधीला चोवीस तासाहून देखील अधिक वा ध्रुवीय उषेइतका काळ लागतो हे कुठे म्हटले आहे याचा खुलासा केलेला नाही. संबंधित ऋचा अशा आहेत :-

**अशोच्यग्निः समिधानो अस्मे उपो अदृश्रन्तमसश्चिदन्ताः।**
**अचेति केतुरुषसः पुरस्ताच्छ्रिये दिवो दुहितुर्जायमानः॥**
**अभि वां नूनमश्विना सुहोता स्तोमैः सिशक्ति नास्त्या विवक्वान्।**
**पूर्वीभिर्यातं पथ्याभिरर्वाक् स्वर्विदा वसुमता रथेन ॥**

समिद्ध अग्नी प्रकाशत आहे. अंधकाराचा अन्त होऊन उषा दिसू लागली आहे. या आकाशदुहितेचा ध्वज दुरून दिसतो आहे.

हे अश्विनींनो तुम्ही स्वर्विद व धनसंपन्न रथाने आपल्या पुरातन मार्गाने जवळ या. होता तुमची स्तोत्रांनी पूजा करीत आहे.

यात अश्विनशस्त्राचा काळ उषेनंतर व सूर्योदयाच्या पूर्वीच्या आहे असे कुठे म्हटले आहे?

हजार सूक्ते म्हटल्यावर देखील सूर्योदय न च झाला तर ऋग्वेदाची दहाही मण्डले म्हणावी या सूचनेवरून सूर्यदर्शनाची वेळ निश्चित सांगता येणार नाही अशा एखाद्या

घटनेला उद्देशून हे वाक्य आहे, हे स्पष्ट होते. ध्रुवप्रदेशातील सूर्योदय ही अनिश्चित घटना नाही. वर्षानुवर्षीच्या वास्तव्याने सूर्योदय केव्हा होणार हे तेथील रहिवाशांना नक्की कळण्यासारखे होते. म्हणून सूर्योदय न च झाल्यास काय करावे हे सांगण्याची गरज नव्हती. तेव्हा धुक्याने झाकल्या गेल्यामुळे सूर्यदर्शन न होण्यासारख्या अनिश्चित घटनेचा येथे उल्लेख असला पाहिजे.

**ध्रुवपक्ष**

व्युष्टयै स्वाहा, उदेष्यते स्वाहा, उद्यते स्वाहा या वाक्यात प्रकाशलेली, पुढे उगवणारी व उगवत असलेली असे उषेचे तीन भेद केले आहेत. भारतातील उषा एवढी अल्पकालीन आहे की तिचे असे बारीकसारीक भेद करणे निरर्थक आहे. तेव्हा ही ध्रुव प्रदेशातली उषा असली पाहिजे.

**खण्डन**

मागे प्रकाशून गेलेली म्हणजे पूर्वीच्या दिवसांची, पुढे उगवणारी म्हणजे पुढील दिवसांची व उगवत असलेली म्हणजे आता डोळ्यासमोर असलेली असा या वाक्यांचा सरळ अर्थ आहे. समोर दिसत असलेल्या उषेचेच हे तीन भाग आहेत असे समजण्यास आधार नाही.

**ध्रुवपक्ष**

"हे उषे लवकर प्रभात होऊ दे, अशी रेंगाळू नकोस," असे म्हटले आहे यावरूनही ध्रुवप्रदेशातली दीर्घ उषा असली पाहिजे.

**खण्डन**

सम्बन्धित ऋचा अशी आहे :-

**व्युच्छा दुहितर्दिवो मा चिरे तनुथा अपः ।**
**नेत्या स्तेनं यथा रिपुं तपाति सूरो अर्चिषा ॥**

टिळकांनी यातील दुसऱ्या ओळीकडे लक्ष दिले नाही. मार्गातील स्तेनाप्रमाणे म्हणजे चोराप्रमाणे प्रकाशमान सूर्य तुला त्रस्त न करो असे दुसऱ्या ओळीत म्हटले आहे. टिळकांना हा अर्थ अमान्य नाही. दुसऱ्या ओळीत सूर्य तुला न तापवो असे उषेला म्हटले असल्यामुळे पहिल्या ओळीत उषेला "आपला कारभार लवकर आटप,





आता पुष्कळ झाले असे बजावले आहे" असे म्हणण्यात वदतो व्याघात आहे. सूर्याने उषेला तापवल्याशिवाय तिचा अस्त होणार कसा?

मार्गातील चोराप्रमाणे सूर्य तुला त्रास न देवो असे म्हणणारा कवी, उषेला कंटाळून सूर्योदयासाठी आतुरता तर सोडाच, उषा लवकर उगवो पण सूर्योदय मात्र लौकर न होवो, म्हणजे उषाच दीर्घकाल टिको अशी अगदी विरुद्ध इच्छा व्यक्तवीत आहे. ही इच्छा ध्रुवनिवाशाची नसून भारतातल्या कडक उन्हाळ्याने त्रासलेल्या ऋचाकाराची आहे यात शंका नको.

**ध्रुवपक्ष**

**कियात्या यत्समया भवाति या व्यूषुर्याश्च नूनं व्युच्छान्।**
**अनु पूर्वा कृपते वावशाना प्रदीध्याना जोषमन्याभिरेति ॥**

गेलेल्या व येणाऱ्या अशा दोन प्रकारच्या उषा धरून फारच दीर्घकाल होतो. ध्रुवप्रदेशातील दीर्घ उषेच्या निरनिराळ्या अवस्थांना निरनिराळ्या उषा म्हटले आहे. उषेच्या या साऱ्या अवस्था मिळून बराच दीर्घ काळ होतो. मूरने तर गेलेल्या व येणाऱ्या उषांच्या मध्ये दीर्घ काल जातो असा अर्थ केला आहे. हा अर्थ तर ध्रुवप्रदेशाला सरळच लागू होतो. कारण एक उषा गेल्यानंतर दुसरी यायला कित्येक दिवस लागू शकतात.

**खण्डन**

वस्तुतः उषेचा अनेकवचनी उल्लेख ध्रुवसिद्धान्ताला पोषक नसून मारक आहे. एकाच दीर्घ उषेच्या निरनिराळ्या अवस्थांना बहुवचन लागू होते ते दूरान्वयाने. निरनिराळ्या दिवशी उगवणाऱ्या उषांना ते सरळच लागू होते. तेव्हा आजपर्यन्त गेलेल्या व पुढे येणाऱ्या उषा मिळून बराच दीर्घ काळ होतो असे कवीला म्हणायचे आहे. कित्येक पावसाळे म्हणजे कित्येक वर्षे असा अर्थ होतो, फक्त पावसाळ्यांचाच काळ द्योतित होत नाही. त्याचप्रमाणे अनेक उषा म्हणजे अनेक दिवस. गेलेले व येणारे दिवस मिळून जो अनन्त काल होतो त्यांचा निर्देश येथे कवी करीत आहे.

**ध्रुवपक्ष**

**अव्युष्टा इन्नु भूयसीरुषासः आ नो जीवान् वरुण तासु शाधि।**

पुष्कळशा उषा अजून पूर्णपणे प्रकाशित झाल्या नाहीत. हे वरुणा आम्ही त्या

उषा प्रकाशतील तेव्हा जिवन्त राहू असे कर.

उषा अजून प्रकाशल्या नाहीत म्हणजे दीर्घकाळ उषा राहिली तरी अजून सूर्योदय झाला नाही. हे ध्रुवप्रदेशाचे वर्णन आहे, कारण कटिबन्धातील प्रदेशात प्रत्येक उषेनंतर सूर्य उगवतोच. तेव्हा पुष्कळशा उषा प्रकाशल्याच नाहीत हे वर्णन लागू होत नाही. ध्रुवप्रदेशात मात्र पुष्कळशा उषा विराजत असताना लोटलेले अनेक दिवस म्हणजे चोवीस तासांची अनेक आवर्तने हे शब्दप्रयोग लागू होतात.

## खण्डन

उदयाची उषा अजून प्रकाशली नाही असे म्हणण्यास ध्रुवप्रदेश कशाला पाहिजे? उषा प्रकाशणे म्हणजे सूर्योदय हा अर्थ विचित्र आहे. उषा देखील प्रकाशमयच असते. उषा प्रकाशली पण सूर्योदय झाला नाही असे कवी कुठेच म्हणत नाही. भविष्यकाळतल्या उषा अजून प्रकाशल्या नाहीत असे हे साधे वाक्य आहे, व हे वरुणा, या भविष्यकाली आम्हाला जिवन्त राहू दे अशी कवी प्रार्थना करीत आहे. ध्रुवीय उषेचा काळ आपण या काळानंतर जिवंत राहू की नाही अशी शंका वाटण्याइतका लांब नाही. उलट रोज उगवणाऱ्या भविष्यकालीन उषा अनंत असल्यामुळे अशा किती उषा पाहणे आपल्या नशिबात आहे असा प्रश्न उपस्थित होणे साहजिकच आहे.

येथे उल्लेखिलेल्या उषा या रोज उगवणाऱ्या उषा नाहीत हे दाखविण्यासाठी टिळकांनी "व्युष्ट यातील वि या उपसर्गाचा आधार घेतला आहे. त्यांच्या मते वि म्हणजे पूर्णपणे. जी उषा व्युष्ट नाही म्हणजे पूर्णपणे प्रकाशली नाही ती प्रकट होऊन देखील तिच्या नंतर सूर्योदय झाला नाही असा अर्थ निघतो. उषा खूप वेळ राहून देखील सूर्योदय झाला नाही हे वर्णन रोजच्या उषेला लागू होत नाही."

वि या उपसर्गाच्या गवताच्या काडीच्या आधारावर उत्तरध्रुवाची आगगाडी जाईल इतका भक्कम पूल बांधण्याचा हा प्रयत्न आहे. एकतर वि या उपसर्गाची पूर्णपणे असाच अर्थ होतो असे नाही. विचा नेहमीचा अर्थ विशेषण असा आहे. शिवाय वि म्हणजे पूर्णपणे असा अर्थ केला तरी ज्या उषेनंतर सूर्योदय झाला त्या उषेलाच व्युष्ट म्हणजे पूर्णपणे प्रकाशलेली असे म्हणणे विचित्र आहे. सूर्योदयाचे वर्णन "आता उषा प्रकाशित झाली" या शब्दांनी कोणी करील काय? सूर्योदय झाल्यावर उषा, सूर्योदयानंतरच्या चन्द्रतारकाप्रमाणे दिसेनाशी होते. सूर्योदयानंतर चंद्र प्रकाशित झाला किंवा तारे प्रकाशित





झाले असे कुणी म्हणेल काय?

## ध्रुवपक्ष

**समान ऊर्ध्वे अधि संगतासः**
**सु जानते न यतन्ते मिथस्ते ।**
**ते देवानां न मिनन्ति व्रतान्यमर्धन्तो वसुभिर्यादमानाः ।।**

उषा एकाच ठिकाणी असून भांडत नाहीत असे या ऋचेत म्हटले आहे. चोवीस तासांच्या एकेका भागात विभागलेल्या एकाच उषेचा हा अनेकत्वाने उल्लेख आहे. निरनिराळ्या दिवशी उगवणाऱ्या उषा एकाच वेळी एकाच ठिकाणी कुठे असतात? तेव्हा उषा एकाच जागी असून भांडत नाहीत हे विधान रोज उगवणाऱ्या उषांना लागू होत नाही.

## खण्डन

चोवीस तासांच्या अनेक खण्डात विभागलेल्या ध्रुवप्रदेशातल्या उषा तरी एकाच वेळी एकाच ठिकाणी कुठे असतात? त्यादेखील निरनिराळ्या दिवशी उगवणाऱ्या उषाप्रमाणे एकामागून एकच येतात. उलट असे देखील म्हणता येईल की कटिबंधात उगवणारी उषा रोज साधारणपणे एकाच जागी उगवते, तिच्या उदयस्थानातील फरक रोज कळण्याइतका स्थूल नसतो. उलट उत्तरध्रुवावरची उषा चोवीस तासात साऱ्या क्षितिजाची प्रदक्षिणा करते. तेव्हा उषा एकाच जागी उगवतात हे विधान ध्रुवप्रदेशातील उषेपेक्षा कटिबन्धातील उषेलाच अधिक लागू आहे.

## ध्रुवपक्ष

खरोखरच एकच उषा आहे असे अनुवाकात म्हटले आहे यावरून अनेक उषा निरनिराळ्या दिवशींच्या नसून एकच सलग उषा विवक्षित आहे. अशी उषा ध्रुवप्रदेशातच असते.

## खण्डन

ध्रुवप्रदेशात तरी एकच व सलग उषा कुठे असते? दर वर्षीची उषा नवीन नसते काय? एका वर्षात एकच उषा असते असे म्हटले असते तर गोष्ट वेगळी होती. शिवाय "अग्निर्यथैको भुवनं प्रविष्टो रूपं रूपं प्रतिरूपो बभूव" एकच अग्नी अनेक रूपांचा

झाला या वाक्यावरून अग्नी निरनिराळ्या वेळी, निरनिराळ्या ठिकाणी पेटविलेला नसतो, एकच सलग अग्नी आहे असे म्हणता येईल काय?

### खण्डन

विभक्त नाहीत म्हणजे एकमेकाला टेकलेल्या आहेत असाच अर्थ केला पाहिजे काय? एका कळपात राहणारे प्राणी विभक्त नाहीत, एका कळपातला प्राणी दुसऱ्या कळपात गेला की तो कळपापासून विभक्त झाला असे म्हणता येईल. पण प्राणी विभक्त न होता एका कळपात असतात तेव्हा ते एकमेकाला चिकटलेले असतात काय?

शश्वद् म्हणजे नेहमी व अनंत या विशेषणांचा तर ध्रुवीय उषेशी काहीच संबंध नाही, कोणतीही उषा शेवटली म्हणता येत नाही, या अर्थी उषा अनंत आहेत व त्यांच्या उगवण्याला कधी खण्ड पडत नाही या अर्थी त्या शश्वद् आहेत.

### ध्रुवपक्ष

**सदृशीरद्य सदृशीरिदु श्वो दीर्घं सचन्ते वरुणस्य धाम।**
**अनवद्यास्त्रिंशतं योजनान्येकैका ऋतुं परियन्ति सद्यः॥**

आज वा उद्या सारख्याच अशा या निर्दोष उषा तीस योजने परिक्रमा करतात.

येथे योजन शब्दाचा अर्थ दैनिक मार्ग असा आहे. युज् म्हणजे जोडणे या धातूपासून योजन शब्द झाला आहे. एकदा रथ जोडला की एका दमात तो जितके अंतर जाऊ शकतो त्याला योजन म्हणतात. याच आधाराने पुढे योजन शब्दाचा अर्थ दिवसभराची मजल असा झाला. वरील ऋचेत उषांचे योजन म्हणजे त्यांची मजल तीस योजने आहे असे म्हटले आहे. दुसऱ्या शब्दात चोवीस तासांच्या तीस टप्प्यांनी म्हणजे तीस दिवसात आपल्या आकाशाच्या फेऱ्या पुऱ्या करणाऱ्या ध्रुवीय उषेचा हा उल्लेख आहे.

### खण्डन

योजन शब्दाचा योजन असाच अर्थ का घेऊ नये याचे टिळकांनी दिलेले कारण समर्थनीय नाही. सूर्य तीस योजनांच्या अंतरात उगवलेला दिसतो म्हणून उषेचा पल्ला तीस योजनांचा आहे असे सायण स्पष्टीकरण करतो. सूर्य क्षितिजाच्या सोळा अंश खाली असतानाच दिसू लागतो. एक अंश म्हणजे साठ मैल म्हटले तर १६० मैलाच्या





अंतरावर सूर्य उगवलेला दिसतो असे म्हणता येईल. पण तीस योजने म्हणजे फक्त २४० मैल होतात, तेव्हा हे स्पष्टीकरण टिळकांच्या मते चूक आहे. पण वैदिक ऋचांचा अर्थ करताना आधुनिक खगोलशास्त्राच्या दृष्टीने चूक असलेले विधान ऋचेत अभिप्रेत असू शकत नाही असे गृहीत धरणे चूक आहे. सायणाची समूजत जशी आधुनिक खगोलशास्त्राच्या दृष्टीने चूक होती तशीच ऋचाकाराची देखील असू शकेल.

शिवाय योजन याचा एका दिवसात काटता येण्याइतके अंतर असा अर्थ मान्य केला तरी उषेचा पल्ला तीस योजने आहे हे ऋचाकाराचे विधान आधुनिक खगोलशास्त्राच्या दृष्टीने देखील बरोबर ठरते. भारतीय अक्षांशात उषेचा सन्धिप्रकाश साधारण अर्धा तास दिसतो; म्हणजे उषा उगवायच्या अर्धा तास आधीच तिचा प्रकाश दिसू लागतो. एवढ्या वेळात पृथ्वी ४५० ते ५०० मैल वळते. म्हणून उषा एकाच वेळी साधारण ४५० मैल लांब पूर्व-पश्चिम रेषेवर दिसत असते. एकाच दिवसाची मजल आठ कोस म्हणजे सोळा मैल असे बाणभट्टाने हर्षचरितात सांगितले आहे.

"प्रयाणक्रोशसंख्यापका अष्टावदीयन्त प्रहाराः पटहे पटीयांसः।" प्रयाण किती कोसांचे आहे हे दर्शविण्यासाठी नगाऱ्यावर आठ जोरकस प्रहार केले गेले. तेव्हा योजन म्हणजे दिवसाचा पल्ला सोळा मैलाचा होतो व तीस योजने म्हणजे बरोबर ४८० मैल होतात. मोठ्या प्रयासाने योजन शब्दाचा जो अर्थ शोधून काढला तो घेतल्याने देखील ध्रुवसिद्धान्त सिद्ध होण्याऐवजी भारतीय अक्षांशांचाच काटेकोर वैदिक उल्लेख सिद्ध होतो.

## लांब दिवस आणि लांब रात्री

ध्रुवप्रदेशातील उषा लांब असतात त्याचप्रमाणे, दिवस व रात्री देखील त्याच प्रमाणात लांब असतात. वेदातील उषांची वर्णने फक्त उत्तर ध्रुवावरील उषांनाच लागू होत असतील तर दिवस व रात्र यांची वर्णने देखील ध्रुवप्रदेशीय दिवसरात्रींनाच लागू असली पाहिजेत. टिळकांच्या मते असेच आहे. टिळकांनी दाखविलेल्या या वर्णनांचा आता क्रमशः विचार करू.

### ध्रुवपक्ष

"मा नो दीर्घा अभिनशन्तमिस्राः।" दीर्घ रात्री आमचा नाश न करोत. "प्रपन्नोऽहं शिवां रात्रिं भद्र पारमशीमहि।" आम्हाला या रात्रीच्या पार होऊ दे, न यस्याः पारं

ददृशे न योयूवद्विश्वमस्या निविशते यदेजति। अरिष्टासस्त उर्वि तमस्वति रात्रि पारमशीमहि भद्रे पारमशीमहि॥'' जिचा पार दिसत नाही वा जिला पृथक् ठेवणारी सीमाही दिसत नाही त्या रात्रीत सर्व विश्राम पावतात. हे दीर्घ तमस्वति रात्री आम्हाला अक्षतपणे तुझा पार पाहू दे. ''रात्रिं रात्रिं अरिष्यन्तस्तरेम तन्वा वयम्।'' अक्षतपणे आम्हाला प्रत्येक रात्र तरून जाऊ दे.

तैत्तिरीय संहितेत लिहिले आहे की प्राचीन काळी रात्र संपणारच नाही अशी ब्राह्मणांना भीती वाटली.

हे सर्व अत्यंत दीर्घ अशा ध्रुवीय रात्रीला उद्देशूनच असले पाहिजे. कटिबन्धातील दहा-बारा तासांच्या रात्री तरून जाण्यासाठी कोणी असे उद्गार काढणार नाही.

### खण्डन

''यस्याः पारं न ददृशे'' याचा अर्थ रात्रीच्या अंधकाराला दृष्टी भेदू शकत नाही. न योयुवद् म्हणजे रात्री पदार्थांना एकमेकांपासून वेगळे करता येत नाही. कालिदासाने म्हटल्याप्रमाणे ''सर्वमेव तमसा समीकृतम्।'' अंधकाराने सर्वच सपाट होते, वस्तूवस्तूतला भेद कळत नाही. ''मा नो दीर्घा अभिनशन्तमिस्राः।'' येथे अलंकारिक भाषादेखील असू शकेल. तमिस्राः म्हणजे अंधकार, आपत्ती. तेव्हा या ओळीत उत्तरध्रुवावर उडी मारण्यासारखे काहीच नाही.

दुसरा मुद्दा असा की रात्रीच्या दीर्घत्वाला फक्त ब्राह्मणच का भ्याले? रात्री फक्त ब्राह्मणांसाठीच दीर्घ होत्या काय?

डॉ. अविनाशचंद्र दास यांनी याचे प्रत्ययकारक उत्तर दिले आहे. रात्रिसत्राच्या वेळी सतत स्तोत्रे म्हणत जागत बसणाऱ्या ब्राह्मणांना हे सत्र दीर्घ काळचे असल्यामुळे दीर्घ जागरण घडे व केव्हा एकदा ही रात्र संपते असे होऊन जाई. म्हणून त्यांनी रात्र लवकर संपण्यासाठी प्रार्थना केल्या आहेत.

शिवाय उत्तरध्रुवावरच्या रात्री अत्यंत रमणीय असत, त्यांच्यातून पार पडण्यासाठी प्रार्थना करण्याइतक्या भयदायी नसत असे स्वतः टिळकांनीच सांगितले आहे. या रात्रीत अरोरा बोरियालिस नावाचा प्रकाश अरुणोदयी व पूर्व सन्ध्येच्या समयी बराच वेळ मिळतो. तसेच सतत चौदा दिवस चन्द्र दिसत असतो. म्हणजे हे दोन्ही मिळून सतत नव्वद दिवस प्रकाश असतो. काहींच्या मते हा प्रकाशाचा काल चार महिने असतो.





ही परिस्थिती साक्षात् ध्रुवप्रदेशात आहे. थोडे दक्षिणेत आले तर हा काळ आणखी जास्त होतो.

उरलेला दोन महिन्याचा रात्रीचा काळ देखील फार वाटण्याचा संभव आहे, कारण प्राचीन काळी उपलब्ध असलेले दिवे बरेच गैरसोयीचे होते व शिवाय सतत दोन महिने अंधारामुळे थंडी अति कडक होत असली पाहिजे. पण या अंधाराचा व थंडीचा नाश अमुक एका वेळेस होणार हे नक्की माहीत असल्यामुळे त्यासाठी प्रार्थना करण्याचा प्रश्न उद्भवत नाही.

रात्रीची भीती वाटण्याचे दुसरे कारण चोर दरोडेखोरांचा उपद्रव रात्रीच होतो हे देखील आहे. या रात्री ध्रुवप्रदेशातल्या नसल्या तरी त्या काही आपत्ती न कोसळता जावोत असे वाटू शकते.

### ध्रुवपक्ष

पुरा ब्राह्मणा अभैषुः। यावरून रात्र संपणारच नाही ही ब्राह्मणांची भीती पुराकल्पातली होती, ध्रुवप्रदेशात वसती असतानाची होती, भारतात आल्यावर ती राहिली नाही असे अनुमान निघते.

### खण्डन

प्राचीन काली गौतम बुद्धाला बुद्ध, रोगी व मृत मनुष्य पाहून वैराग्य प्राप्त झाले असे म्हटले तर आज वृद्धत्व, रोग व मृत्यू ही अस्तित्वात नाहीत वा वैराग्य निर्माण करण्यासारखे त्यांचे स्वरूप नाही असे सिद्ध होईल काय?

### ध्रुवपक्ष

''उभे यथा नो अहनी निपात उषासानक्ता करतामदब्धे।'' अहनी व उषासानक्ता आमचे रक्षण करोत असे म्हणताना अहनी व उषासानक्ता असा वेगळा उल्लेख केला आहे. अहनी म्हणजे दिवसरात्र व उषासानक्ता म्हणजे उषा व रात्र. एकूण अर्थ एकच आहे. तेव्हा ही पुनरुक्ती का केली?

अधिक विचार करता ही पुनरुक्ती नसून दोन वेगळ्या देवतांचा उल्लेख आहे हे स्पष्ट होते. उषासानक्ता म्हणजे ध्रुवप्रदेशातील लांब दिवस व लांब रात्र मिळून होणारा अहोरात्र व अहनी म्हणजे उरलेल्या वर्षातील लहान रात्री व लहान दिवस मिळून होणारे

अहोरात्र. ध्रुवबिंदुवर सहा महिन्याची रात्र व सहा महिन्याचा दिवस असतो, यापेक्षा लहान दिवसरात्री तेथे नसतात. पण ध्रुवबिंदूच्या थोडे दक्षिणेस आल्यावर लांब रात्र व लांब दिवसाबरोबरच काही लहान रात्री व लहान दिवस देखील अनुभवास येतात.

**खण्डन**

सायणाने अहनी याचा अर्थ द्यावापृथिवी म्हणजे आकाश व पृथ्वी असा केला आहे. या अर्थाला त्याने निरुक्ताचा आधार दिला आहे. १०.७६.१ मध्ये अहनींना सचाभुवा म्हणजे सहोत्पन्न, एकदम उत्पन्न झालेले, असे म्हटले आहे. १.१८५.१ मध्ये "कतरा पूर्वा, कतरा परायोः कथा जाते कवयः को विवेद? विश्वं त्मना विभृतो यद्ध नाम विवर्तेते अहनी चक्रियेव ॥" अहनीपैकी आधी कोण व नंतर कोण? या कशा झाल्या हे कोणत्या विद्वानाला माहीत आहे? त्या सर्व जगत् धारण करतात. सचक्र असल्याप्रमाणे त्या फिरतात, असे म्हटले आहे. येथे दिवस व रात्र यापैकी कोण आधी झाले हा प्रश्न, अण्डे आधी की कोंबडी आधी या प्रश्नासारखा आहे. त्यामुळे आधी कोण हे कवींना माहीत नाही हे विधान तर्कसंगत आहे. तसेच द्यावापृथिवी चक्राप्रमाणे फिरतात असा सायणाच्या आधारे अर्थ केला तर पृथ्वी फिरते हे ज्ञान ऋचाकाराला होते असे मानावे लागते. द्यूची म्हणजे आकाशस्थ गोलांची गती प्रत्यक्ष दिसते तशी पृथ्वीची दिसत नाही. तरी सायण अनेक ठिकाणी पृथ्वी फिरते असा उल्लेख गृहीत धरतो.

अहनी म्हणजे अहोरात्र : दिवस व रात्र असा अर्थ केला तर वेदकाली भूभ्रमण माहीत होते ही कल्पना करावी लागत नाही. कारण दिवस व रात्र एकामागून एक चक्राप्रमाणे आवर्तित होतात हे कुणालाही दिसू शकते. शिवाय व्युत्पत्तीप्रमाणे अहनी याचा दिवसरात्र हा अर्थ अधिक पटण्यासारखा आहे.

पण १०.७८.१ मध्ये अहनींना सचाभुवा म्हणजे सहोत्पन्न म्हटले आहे. अहनी एकाच वेळी उत्पन्न झाल्या असे म्हणायचे तर अहनीचा अर्थ दिवसरात्र असा जमत नाही. दिवस व रात्र एकाच वेळी उत्पन्न झाली असे म्हणणे, अण्डे व कोंबडी एकाच वेळी उत्पन्न झाली असे म्हणण्यासारखे आहे. तेव्हा सचाभुवा हे वर्णन द्यावापृथ्वीला अधिक लागू होते व सायणाने दिलेला निरुक्ताचा प्राचीन आधार पाहता अहनीचा द्यावापृथ्वी असा अर्थ होऊ शकत नाही असा आग्रह धरणे दुराग्रहाचे ठरेल.





पण अहनीचा अहोरात्र असा अर्थ केला तरी उत्तरध्रुवाची काही जरूर पडत नाही. अहनी म्हणजे दोन प्रकाशयुक्त दिवस नव्हेत तर रात्रंदिवस हे स्पष्ट करण्यासाठी उषासानक्ता हे विशेषण अग्नीला दिले जाणे शक्य आहे. काटेकोरपणे पुनरुक्ती टाळणे ही ऋचाकाराची प्रतिज्ञा होती असे समजण्याचे कारण नाही. ते कविता लिहीत होते, नव्यन्याय लिहीत नव्हते. पुनरुक्तीमुळे एखाद्या कल्पनेवर भर दिला जाऊ शकतो. इच्छा-आकांक्षा, कामधंदा वगैरे उदाहरणावरून हे स्पष्ट आहे.

**ध्रुवपक्ष**

तैत्तिरीय आरण्यकात "शुक्लकृष्णे संवत्सरस्य दक्षिणवामयोः पार्श्वयोः।" काळे व पांढरे असे संवत्सराचे डावे व उजवे भाग आहेत असे म्हटले आहे. यावरून दिवस व रात्र आळीपाळीने अनेक वेळा येत नव्हते. एक दिवस व एक रात्र मिळून संवत्सर, म्हणजे वर्ष होत होते असे निष्पन्न होते व हे ध्रुवमंडळातच शक्य आहे.

**खण्डन**

जिथेतिथे ध्रुव पाहिल्यामुळे वैदिक कल्पनांची काव्यमयता कशी नष्ट होते याचे हे उत्तम उदाहरण आहे. एका बाजूने काळा व दुसऱ्या बाजूने पांढरा उंदीर आधाराच्या फांदीला कुरतडत होते म्हणजे दिवस व रात्र हळूहळू आयुष्याचा क्षय करीत होते असे महाभारतात वर्णन आहे. उंदीर आळीपाळीने हे काम करीत नव्हते यावरून हाही ध्रुवप्रदेशातील परिस्थितीचा उल्लेख समजावा काय? संवत्सर म्हणजे वर्ष, दिवस व रात्रिरूपी उजवा व डावा पाय क्रमाने टाकीत मार्गक्रमण करतो अशी सुंदर कल्पना वरील वाक्यात ग्रथित केली आहे. सैनिक उजवा डावा करीत बँडच्या तालावर संचलन करतात. तेव्हा डावा व उजवा भाग क्रमाने येऊ शकत नाही या म्हणण्यात अर्थ नाही.

**ध्रुवपक्ष**

**वि सूर्यो मध्ये असृजद्रथं दिवो विदद्दसाय प्रतिमानमार्यः ।**
**दृढानि विप्रोरसुरस्य मायिन इन्द्रो व्यास्यच्चकृवाँ ऋजिश्वना ॥**

सूर्याने आपला रथ अंतरिक्षाच्या मधेच सोडला. आर्याला दासाच्या तोडीस तोड सापडली. मायावी असुरांचे दुर्ग ऋजिश्वानाच्या सह इन्द्राने परास्त केले.

येथे आकाशाच्या मध्ये सूर्य आपल्या रथाचे घोडे सोडून बसला. यावरून

ध्रुवप्रदेशातील दीर्घ दिवसाचा उल्लेख द्योतित होतो.

**खण्डन**

येथे सहजच कुणाच्याही लक्षात येईल की ध्रुवप्रदेशात दिवस दीर्घ असला तरी सूर्य क्षितिजमार्गाने सारखा फिरत असतो, आपल्या रथाचे घोडे सोडून आराम करीत बसलेला नसतो. तेव्हा ध्रुवप्रदेशात दिवस कितीही लांब असला तरी सूर्य रथाचे घोडे सोडून बसला हे वर्णन त्याला लागू होत नाही.

ग्रिफिथने इन्द्राने आपल्या दैवी सामर्थ्याने आर्यांचा जय होईपर्यंत सूर्य थांबवून धरला असा अर्थ केला आहे. जोशुआने आपल्या जातीचा जय होण्यासाठी सूर्याला थांबण्याचा आदेश दिला असे बायबलात वर्णन आहे. संभाजीने बेड्या तोडून औरंगजेबावर हल्ला केला तेव्हा ''खाली हिसडा बसला शेषाला, वर सूर्यगोल हबकला'' असे पोवाड्यात वर्णन आहे. तेव्हा सूर्य थांबण्याच्या कल्पनेसाठी कवींना ध्रुवप्रदेशाची जरूर नाही. असे वर्णन इन्द्राच्या पराक्रमाच्या संबंधात दुसऱ्या ठिकाणी नाही म्हणूनच केवळ टिळक हा अर्थ अमान्य करतात. पण हाच युक्तिवाद त्यांच्या ध्रुवप्रदेशालाही मारक होतो. असा उल्लेख दुसऱ्या ठिकाणी नाही म्हणून येथेही ध्रुवप्रदेशाचा उल्लेख नाही.

सायणाने रथ सोडला म्हणजे चालवायला सुरवात केली असा अर्थ केला आहे. घोडे भरधाव सोडले या वाक्यप्रयोगावरून या अर्थाची समर्थनीयता स्पष्ट आहे. टिळकांचे यावर म्हणणे असे की इतर ठिकाणी सायणाने विमुच याचा अर्थ घोडे सोडले असा केला आहे. पण त्यांनी दाखविलेल्या अशा साऱ्या स्थळात विमुच्य, अश्वान्, विमुच्या हरी, असा घोड्यांचा स्पष्ट उल्लेख आहे. प्रस्तुत ऋचेत घोड्यांचा उल्लेख नाही, फक्त रथ सोडला असा उल्लेख आहे. रथाचे घोडे सोडण्याच्या क्रियेला रथ सोडणे असे कोणीही म्हणत नाही. रथापासून घोडे सोडतात, घोड्यापासून रथ सोडीत नाहीत.

**ध्रुवपक्ष**

''चक्रे दिवि प्रेंखां हिरण्मयम्'' वरुणाने-सूर्याला-आकाशात झोके घ्यायला लावले. झोके पुढे मागे होत असतात. कटिबन्धातील सूर्य फक्त पूर्व-पश्चिम या एकाच दिशेने जातो. त्याला झोके हा शब्द लागू होत नाही. अर्थात् ध्रुवप्रदेशातील गोल





फिरणाऱ्या सूर्याचे हे वर्णन आहे.

**खण्डन**

पश्चिमेकडे अस्ताला गेलेला सूर्य पुनः पूर्वेकडे उगवतो, अर्थात् झोक्यातल्याप्रमाणे मागे येतो, तेव्हा झोके या शब्दावरून उत्तरध्रुव निष्पन्न होत नाही. झोके पुढे मागे होत असतात. पंख्याच्या चक्राकार गतीला कुणीही झोके म्हणत नाही.

**ध्रुवपक्ष**

३.५८.१ मध्ये सूर्याला दक्षिणेचा पुत्र म्हटले आहे. यावरून सूर्य दक्षिणेला उगवतो ही ध्रुवप्रदेशातली घटना सूचित होते. सायणाने दक्षिणेचा पुत्र म्हणजे उषेचा पुत्र असा अर्थ केला आहे. पण असा अर्थ केला तरी उषा दक्षिणेला उगवत होती म्हणूनच तिला दक्षिणा म्हणत असत हे स्पष्ट होते. उत्तर दिशेला उत्तर म्हणजे वरची म्हणण्याचे करण ती वरची म्हणजे डोक्यावरची असे हे होय. उत्तरध्रुवावरील निरीक्षकाच्या डोक्यावरील खमध्य हीच उत्तर दिशा होय. याचप्रमाणे दक्षिणेला अधर म्हणतात. कालिदासाच्या खालील श्लोकावरून हे स्पष्ट आहे :-

**अध:प्रस्थापिताश्वेनसमावर्जितकेतुना।**
**सहस्त्ररश्मिणा साक्षात् सप्रणाममुदीरिताः ॥**

सप्तर्षींच्या खालून आपला रथ जात असताना रथाची ध्वजा खाली करून सूर्य त्यांना प्रणाम करीत होता.

सूर्य सप्तर्षींच्या दक्षिणेला आहे म्हणूनच त्यांचे घोडे सप्तर्षींच्या खाली होते असे कालिदास म्हणतो.

**खण्डन**

या युक्तिवादात दक्षिणेला दक्षिण का म्हणतात याच्या प्राथमिक कारणाचा विचार केला नाही. दक्षिण या शब्दाचा मूळ अर्थ कुशल, सशक्त असा आहे. डाव्या हातापेक्षा उजवा हात अधिक कुशल व सशक्त असतो म्हणून उजव्या हाताला दक्षिण म्हणू लागले. सूर्याकडे तोंड करून उभे राहिले असता जी दिशा उजव्या हाताकडे असते तिला उजव्या हाताकडची म्हणून दक्षिण म्हणू लागले. तसेच सूर्य जेथे आधी दिसतो ती दिशा आधीची म्हणून पूर्व. आकाशात मार्गक्रमण करून नन्तर जेथे जातो ती नंतरची म्हणून पश्चात्

वा पश्चिम. हे शब्दप्रयोग उत्तर ध्रुवावरचे असणे शक्य नाही, कारण तेथे उगवत्या सूर्याकडे तोंड करून उभे राहिलो असता दक्षिण उजव्या हातावर नसते. तेथल्या लोकांनी दक्षिणेला दक्षिण म्हणण्याचे कारण नाही. उत्तरध्रुवात दक्षिणेला उषा उगवते व उषा दक्षिण म्हणजे सुखद असते म्हणून तिला दक्षिण हे नाव पडले असे टिळकांनी सुचविले आहे. पण उत्तरध्रुवाखाली उषा क्षितिजावरच सर्व दिशांतून चक्राकार फिरते. कटिबन्धात आहे तसा उत्तर ध्रुवावर उषेचा दक्षिण दिशेशी अनन्य संबंध नाही. तसेच उषा सुखद म्हणजे दक्षिण असते म्हणून उषेच्या उदयदिशेला दक्षिण म्हणणे हा दूरान्वय होतो. दक्षिण हस्तावरून दक्षिण दिशेला नाव पडणे अधिक सरळ आहे.

खरी गोष्ट अशी की उत्तरध्रुवाच्या संबंधात पूर्व व पश्चिम ही दिशानामे देखील उपपन्न नाहीत. कारण तेथे सूर्य दक्षिणेला उगवतो व दक्षिणेलाच अस्त पावतो. तेव्हा दक्षिण हीच येथे पूर्वही आहे व पश्चिमही आहे.

सूर्य उत्तरध्रुवावर दक्षिणेला उगवतो म्हणून त्याला दक्षिणेचा पुत्र म्हटले तर तो दक्षिणेलाच अस्तही पावतो म्हणून त्याला दक्षिणेचे भक्ष्य का म्हणू नये?

वर व खाली हे शब्द उत्तर व दक्षिण या अर्थी का वापरतात, हे पाहण्यासारखे आहे. भिंतीवर नकाशा टांगताना नेहमी उत्तर दिशा वर व दक्षिण दिशा खाली अशा रीतीने टांगण्यात येतो. अर्थात् उत्तर म्हणजे वर व दक्षिण म्हणजे खाली हे यात गृहीत आहे. असे करण्याचे कारण हे असावे की पूर्व ही सूर्योदय व पश्चिम ही सूर्यास्त व पश्चिम ही सूर्यास्त व दक्षिण ही उजवीकडे क्षितिजापर्यंत वाढविलेली रेषा या क्षितिजाशी सम्बद्ध असलेल्या अन्वयाने निश्चित होते तशी उत्तर होत नाही. डाव्या हाताकडची ती उत्तर म्हणून उत्तरेला वाम म्हणता येईल, पण असा शब्दप्रयोग रूढ नाही. कारण उत्तर निश्चित करण्यासाठी एक स्वतंत्र गमक आहे व ते म्हणजे ध्रुव. हा ध्रुव क्षितिजावर नसतो. खलाशी व इतर प्रवासी रात्रीच्या वेळी ध्रुवाकडे पाहूनच उत्तर ओळखीत असत, व म्हणून क्षितिजापासून बऱ्याच उंचावर असलेल्या ध्रुवाच्या आधारे निश्चित होणाऱ्या दिशेला उत्तर म्हणू लागले. पूर्व, पश्चिम व उत्तर या दिशांना याप्रमाणे आकाशस्थ ज्योती निदर्शक आहेत म्हणून त्यांना मानवी शरीराच्या अवयवांच्या आधारे नाव देण्याची जरूर भासली आहे. इतर दिशांप्रमाणे स्पष्ट व सोपे खगोलीय गमक नाही म्हणून दक्षिण उजव्या हाताच्या नावेच ओळखली जाऊ लागली.

दक्षिण या अर्थाने अधर हा शब्द कुठे वापरला आहे हे टिळकांना दाखविता





आले नाही. सूर्याचा मार्ग सप्तर्षींच्या खाली आहे असे कालिदास म्हणतो तो दक्षिणेला आहे या अर्थाने नसून सूर्याचा मार्ग सप्तर्षींपेक्षा पृथ्वीच्या अधिक जवळ आहे या अर्थी. विमान पृथ्वीपासून दूर गेले की वर गेले म्हणतात व पृथ्वीच्या जवळ आले की खाली आले म्हणतात.

सूर्याचा मार्ग सप्तर्षींच्या खाली आहे असे कालिदासाने म्हटले आहे ते तो दक्षिणेला आहे या अर्थी नव्हे या श्लोकाचे स्पष्टीकरण करताना ''सूर्यमण्डलोपवर्तित्वात्सप्तर्षिमण्डलस्य'' म्हणजे सप्तर्षिमण्डल सूर्यमण्डलाच्याही वर आहे असे ज्योतिषिकांचे मत आहे असे मल्लिनाथाने म्हटले आहे. हे 'ज्योतिषिक' देखील उत्तर ध्रुवावर राहत होते असे समजायचे काय?

लांब उषा, लांब दिवस व लांब रात्र ही जी ध्रुवप्रदेशातील वैशिष्ट्ये आहेत त्यांच्या अनुषंगाने तेथे महिने व ऋतू यांचे स्वरूपदेखील कटिबंधापेक्षा अगदी वेगळे असते. ऋग्वेदात उपर्युक्त वैशिष्ट्यांचा उल्लेख सापडत असेल तर ध्रुवमंडळातच आढळणाऱ्या महिने व ऋतू यांच्या वैशिष्ट्याचा उल्लेख देखील आढळला पाहिजे. लो. टिळकांच्या मते असे उल्लेख आढळतात. त्यांचा आता क्रमशः विचार करू.

### ध्रुवपक्ष

संहिता व ब्राह्मणे यात १२ महिन्यांच्या सत्राचा उल्लेख आहे. पण ध्रुवप्रदेशात पुष्कळ दिवस व महिने सूर्य क्षितिजाखाली जात असल्यामुळे १२ महिन्यांचे सत्रांचा उल्लेख ध्रुवप्रदेशाचा निर्देशक आहे.

या युक्तिवादाप्रमाणे रात्रिसत्रे हा प्रकार ध्रुवनिवास सोडल्यानंतरचा आहे असे मानावे लागते. पण टिळकांनी अश्विनशस्त्राचा जो काळ सांगितला आहे, तो सूर्योदयापूर्वीचा आहे व ''ऊर्ध्वमर्धरात्राद्'' या शब्दावरून तो मध्यरात्रीनंतराचा म्हणजे मुख्यतः रात्रीचाच विधी ठरतो. हा विधी ध्रुवनिवासाच्या वेळचा आहे असेही टिळकांचे मत आहे. तेव्हा ध्रुवनिवासात रात्रिसत्रे शक्य नव्हती असे प्रतिपादन करून त्यांनी वदतो व्याघात केला आहे. यज्ञ करणारे प्राचीन आर्य कितीही अप्रगत मानले तरी त्यांना अग्नीचा उपयोग माहीत नव्हता असे मानण्याची सोय नाही. कारण, अग्नी पेटवूनच ते यज्ञ करीत. तेव्हा बारा महिन्यांपेक्षा कमी महिन्यांचे सत्र सांगितले असेल तर ते ध्रुवावरच्या रात्री सत्रे करणे शक्य नव्हते म्हणून हा युक्तिवाद दूरान्वित आहे. नवग्वा,

दशग्वा वगैरे नऊ महिन्यांचे व दहा महिन्यांचे यज्ञ करणारे होऊन गेले यावरून नऊ व दहा महिन्यांच्या ध्रुवप्रदेशातील दिवसांचा उल्लेख सिद्ध होतो या युक्तिवादाचा फारसा विचार करण्याची जरूरी नाही.

**ध्रुवपक्ष**

बारा आदित्य म्हणजे वर्षाचे बारा महिने असा शतपथ ब्राह्मणात उल्लेख आहे. याच अनुसार सात आदित्य हे वर्षाच्या सात महिन्यांचा उल्लेख करतात असे मानले पाहिजे. अदितीला आठ मुले होती पण त्यातला आठवा मुलगा अविकसित होता म्हणजे जीवन्मृत होता. याचा अर्थ आठव्या महिन्यापासून ध्रुवीय अंधकाराला सुरवात होत होती.

**खण्डन**

येथे असा प्रश्न उपस्थित होतो की सात महिन्याच्या सतत सूर्यप्रकाशाला एकच दिवस न मानता जे लोक सात महिने मानीत ते उरलेल्या अंधकाराच्या दिवसांना एकच सलग महिना मानीत असे मानण्यात विसंगती नाही काय? सूर्योदय व सूर्यास्त हे दिवसमान न घेता क्षितिजाभोवतीची खगोलांची एक प्रदक्षिणा हे दिवसमान घेऊन ध्रुवनिवाशांनी सतत सूर्यप्रकाश असणाऱ्या कालाचे देखील सात महिन्यात विभाजन केले असे मानले तर तोच न्याय रात्रीला लागू करता येत नाही काय? खगोलांच्या क्षितिजाभोवतीच्या एका प्रदक्षिणेवरून चोवीस तासांचा एक दिवस मानता येतो तशीच रात्र देखील मानता येईल.

काही लोकांची अशी समजूत आहे की ध्रुवप्रदेशातील लोक महिनोगणती लांब रात्र असली तरी रात्रभर म्हणजे महिनोगणती सतत झोपलेले असत व त्यामुळे झोपलेल्या माणसाच्या दृष्टीने रात्र कितीही लांब असली तरी ती एकच रात्र समजली जात असे. याच न्यायाने सतत सात महिने दिवस असला तर ते सतत सात महिने जागे असत. श्री. अ. ज. करन्दीकर यांची अशीच समजूत आहे हे त्यांनी कुंभकर्णाला ध्रुवनिवासी ठरविला आहे यावरून दिसते. मानवी शरीराला सतत सात महिने जागे राहणे शक्य आहे काय याचा त्यांनी विचार केला नाही. तसेच सतत दोन महिने अन्नपाण्याशिवाय मानवी शरीर जिवंत कसे राहील हीही शंका त्यांना शिवली नाही. शरीरशास्त्राप्रमाणे मानवाची झोप ही अनेक आवर्तनी म्हणजे थोडा वेळ झोप मग थोडा वेळ जाग व





मग पुनः झोप अशा क्रमाने थोडी थोडी करून पुरी होणारी आहे. संबंध रात्र एकाच झोपेत काढण्याची मानवाने सवय केली आहे; कारण ती अधिक सोईस्कर आहे. कटिबंधात देखील दिवे उपलब्ध असल्यामुळे सूर्यास्तापासून सूर्योदय ही झोपेची वेळ नाही. बहुतेक लोक सूर्यास्तानंतर चार पाच तास जागे असतात व सूर्योदयानंतर एकदोन तास निजून राहतात. तेव्हा ध्रुवप्रदेशात महिनोगणतीच्या अखण्ड झोपेमुळे रात्र एकच समजली जाते व तिचे महिने मोजले जात नाहीत ही पळवाट बंद आहे.

**ध्रुवपक्ष**

"परिवत्सरे बलम्" या शब्दावरून इन्द्राने बलाला वर्षाच्या अन्ती व अंधकारावृत्त अशा स्थळी मारले हे व्यक्त होते "सत्यं तदिन्द्रो दशभिर्दशग्वैः सूर्यं विवेद तमसि क्षियन्तं" यावरून इन्द्राला दहा महिन्यानंतर सूर्य अंधकारात गुरफटलेला आढळला असे दिसते. नवग्व व दशग्व ऋषींनी आपले यज्ञ नऊ व दहा महिने करून इन्द्राला भरपूर सोम पाजला व त्याचे शक्तिसंवर्धन केले. मग अंधकार पडल्यावर दोन व तीन महिने इन्द्राची व वृत्राची लढाई झाली. या दोन वा तीन महिन्याच्या रात्रीच्या अंती इंद्राने बलाला-वृत्राला-मारून सूर्याला मुक्त केले. हे सर्व स्पष्टपणे ध्रुवीय परिस्थितीचे वर्णन आहे.

**खण्डन**

वरील सर्व प्रतिपादनाचा अर्थ असा होतो की इंद्राची व वृत्राची लढाई सुरू होण्याच्या नऊ दहा महिने आधीच नवग्व व दशग्व यांचे इंद्राच्या जयाप्रीत्यर्थ यज्ञ सुरू होत व ती लढाई सुरू होण्याच्या पूर्वी संपून देखील जात. म्हणजे लढाई सुरू असताना इन्द्राला नवग्वांच्या व दशग्वांच्या मदतीची मुळीच जरूर नव्हती.

ही कल्पना फारच विचित्र आहे. यज्ञ हे जर इंद्राच्या विजयासाठी होते तर लढाई प्रत्यक्ष सुरू झाल्यावर त्यांची आवश्यकता जास्तच होती. लढाई जिंकण्यासाठी यज्ञ करणाऱ्याला रात्रीचा अंधार ही मोठी अडचण नाही. जो अंधार नाहीसा व्हावा म्हणून लढाई करायची तोच नेमका सुरू असताना आपला यज्ञरूपी युद्धप्रयत्न कोण बंद ठेवील?

दीर्घतमस दहाव्या युगात म्हातारा झाला याचा अर्थ सूर्य दहाव्या महिन्यात क्षीण होऊ लागला असा टिळकांनी केला आहे. युग याचा अर्थ महिना असा करायला जे लोक तयार होतील ते देखील सूर्याला दीर्घतमस म्हणायला तयार होतील असे वाटत

नाही.

**ध्रुवपक्ष**

"क्षपो मदेम शरदश्च पूर्वीः।" आम्ही अशी पुष्कळ वर्षे व रात्री आनंदात काढू असे म्हटले आहे. येथे वर्षात रात्रीचा समावेश होत असून देखील वर्षे व रात्री असा वेगळा उल्लेख केला आहे. उत्तरध्रुवावर फक्त सूर्यप्रकाशयुक्त दिवसांना वर्ष म्हणत व अंधकारमय काळाला रात्र म्हणत या कल्पनेच्या आधारेच या शब्दप्रयोगाचा अर्थ लागतो.

**खण्डन**

पूर्ण ओळ अशी आहे :- "द्यावो द्युम्नैरभिसन्तो अर्यः क्षपो मदेम शरदश्च पूर्वीः।" वैभवाने तळपणाऱ्या समृद्ध लोकांप्रमाणे शत्रूंचा पराभव करीत आम्ही पूर्वी-वर्षे व रात्री-उन्मादित झालो. येथे वर्षे व रात्री म्हटले आहे एवढ्यावरून रात्री हा वर्षाचा भाग नव्हता असे सिद्ध होत नाही. पूर्वीच्या वर्षांमध्ये रात्री उन्मादित झालो असा अर्थ करण्यास काहीच प्रत्यवाय नाही. रात्री उन्मादित झालो असे म्हणण्याचे कारण रात्र हाच आनंदोत्सव करण्याचा काळ समजला जातो. म्हणूनच रात्रीला क्षणदा, क्षण म्हणजे उत्सव देणारी असे म्हणतात. 'क्षपो शरदश्च मदेम' याचा पूर्वीच्या रात्री व वर्षानुवर्षे उन्मादित होत आहोत असा अर्थ केला तरच या शब्दाची देखील संगती लागते.

**ध्रुवपक्ष**

**पञ्चपादं पितरं द्वादशाकृतिं दिवि आहुः परे अर्धे पुरीषिणम्।**
**अथेमे अन्ये उपरे विचक्षणं सप्तचक्रे षळर आहुरर्पितम्॥**
**पंचारे चक्रे परिवर्तमाने तस्मिन्नातस्थुर्भुवनानि विश्वा॥**
**तस्य नाक्षस्तप्यते भूरिभारः सनादेव न शीर्यते सनाभिः॥**
**सनेमि चक्रमजरं वि वावृत उत्तानायां दश युक्ता वहन्ति ॥**
**सूर्यस्य चक्षू रजसेत्यावृतं तस्मिन्नार्पिता भुवनानि विश्वा ॥**

पंचपादं पितरं म्हणजे पाच ऋतू व दहा महिने आणि त्यानंतर दोन महिने जलयुक्त म्हणजे अंधकारयुक्त अशा आकाशाच्या दुसऱ्या अर्धात सूर्याचा निवास येथे वर्णिला





आहे. दुसऱ्या ओळीत आकाशाच्या जवळच्या भागात सहा अरांनी युक्त असा सप्तचक्र रथ वर्णिला आहे. हे वर्णन पहिल्या वर्णनाच्या स्थळाचे नाही. ते सात प्रकाशयुक्त महिने व सहा ऋतू यांचे आहे.

आदित्याच्या पाच अऱ्यांनी आणि एका नाभीने युक्त अशा भ्रमणशील रथचक्रावर समस्त भुवने स्थिरावली आहेत, या प्रचंड भाराने रथचक्राचा आस कधीही मोडत नाही की तापत नाही.

उताण्या धुरेला जोडलेल्या दहा रथाश्वांनी युक्त असे आदित्यांचे अविनाशी रथचक्र एकाच मार्गाने फिरत राहते. मेघोदकाने व्याप्त अशा सूर्याचा नेत्र या रथचक्रासमवेतच भ्रमण करीत असून सारे विश्व त्याच्यावर आधारित असते.

पंचार चक्र म्हणजे ध्रुवप्रदेशातील पाच ऋतू, आदित्याचे दहा रथाश्व म्हणजे ध्रुवप्रदेशातील दहा प्रकाशयुक्त महिने.

**खण्डन**

सायण, हेमंत व शिशिर मिळून एकच ऋतू मानला गेला आहे असे म्हणून पाच ऋतूंची उपपत्ती लावतो. आजकालही कधीकधी पावसाळा हा खरोखर उन्हाळ्याचाच भाग आहे असे मानून उन्हाळा व हिवाळा असे दोनच ऋतू मानतात. दिल्लीसारख्या ठिकाणी मे ते सप्टेंबर हे पाच महिने उन्हाळा व बाकीचा हिवाळा भासतो. पावसाची दिवसानुदिवस झड क्वचितच पडत असल्यामुळे त्याचे आगमन लवकर विसरले आहे, उलट त्याने हवेतील दमटपणा काढून उकाड्याचा म्हणजे उन्हाळ्याचाच त्रास अधिक होतो. तसेच हेमन्त व शिशिर मिळून चार महिन्याचा हिवाळा येथे अभिप्रेत असणे अशक्य नाही; कारण उत्तरभारतात कोठे कोठे हेमंत व शिशिर यात फारसा भेद नसतो.

सायणाचा अर्थ ओढाताणीचा आहे असे काही लोकांना वाटेल कारण पाच ऋतूंपैकी एक चार महिन्यांचा व बाकीचे दोन, दोन दोन महिन्यांचे हे विभाजन असम वाटते. पण टिळकांचा अर्थ यापेक्षाही जास्त ओढाताणीचा आहे. ऋचेच्या एकाच चरणात पाच ऋतू व दुसऱ्या चरणात सहा ऋतू, एकात बारा महिन्याचे वर्ष व दुसऱ्यात सात महिन्यांचे असा उल्लेख कोणी करील असे वाटत नाही. पैशाचा मूळ अर्थ पशू असा असला तरी आजही आपण पशू हे विनिमय उरले नसताना देखील पैसा हेच पशुवाचक नाव पैसा या अर्थी वापरतो, या उदाहरणावरून टिळक या प्रकाराचे समर्थन

करू जातात. पण पैसा हा शब्द उच्चारल्याबरोबर पशूची कल्पन भाषाशास्त्रज्ञाखेरीज आज कोणाच्याही डोक्यात येत नाही. उलट पाच ऋतू आणि सहा ऋतू, बारा महिने आणि सात महिने यातील विसंगती कुणाच्याही लक्षात येण्यासारखी आहे.

## गायींची चाल व बन्दिस्त पाणी

लांब उषा, दिवस व रात्री तसेच ध्रुवविशिष्ट महिने व ऋतू यांचे उल्लेख वेदात सापडत असले तर वैदिक विधीमध्येही अशा भौगोलिक परिस्थितीची चिन्हे दिसली पाहिजेत. टिळकांच्या मते अशी चिन्हे दिसतात. दहा महिन्यांचे गवामयन, दशरात्र यज्ञ, शतरात्र यज्ञ यांच्या उल्लेखांवरून चोवीस तासांच्या शंभर रात्रींच्या अंधारात केलेले, चोवीस तासांच्या दहा रात्रींच्या अंधारात केलेले असे ध्रुव प्रदेशातील यज्ञ सूचित होतात. शतरात्र तासांच्या पंचाण्णव रात्रींपेक्षा जास्त काल अंधकार पृथ्वीच्या पाठीवर कोठेच नसतो. असे असून देखील पंचाण्णव रात्रींच्या सत्राला शतरात्र म्हटले, कारण पंचाण्णव व शंभर यात फारस फरक नाही.

## खण्डन

गवामयनम् वगैरे सत्रे दहा महिन्यांची असत; कारण प्रकाश फक्त दहा महिनेच असे, उरलेल्या दोन महिन्यांच्या अंधकारात व जीवघेण्या थंडीत यज्ञ बंद असत असे पूर्वी प्रतिपादन केल्याचे रात्रिसत्रांचा युक्तिवाद करताना स्मरण राहिलेले दिसत नाही. शिवाय पंचाण्णव रात्रींच्या सत्राला शतरात्र का म्हटले याची उपपत्ति लावण्यासाठी पंचाण्णव व शंभर यात फारस फरक नाही हे कारण समाधानकारक मानले तर दहा महिने व बारा महिने यांच्यातही एकदम उत्तरध्रुवावर उडी मारण्याइतका फरक नाही असे मानायला काय हरकत आहे?

## ध्रुवमत

ताण्ड्य ब्राह्मणात लिहिले आहे की, प्रजापतीने जेव्हा प्रथम अतिरात्र यज्ञ पाहिला म्हणजे कल्पिला तेव्हा त्याने त्यामधून अहोरात्रांची जोडी निर्माण केली. यावरून हे स्पष्ट दिसते, की अतिरात्र यज्ञ हा अशा एका रात्रीच्या शेवटी केला जात असे, की जिच्या नंतर सर्वसाधारण दिवसरात्रींचे चक्र सुरू होत असे. अर्थात् ही उत्तर ध्रुवावरची लांब रात्र असली पाहिजे. शिवाय हा यज्ञ असुरांना घालवण्यासाठी केला जात असे.





पृथ्वीवरून वर जाणारे, आणि पर्जन्यरूपाने खाली येणारे उदक एकच आहे. त्यापैकी एका उदकाद्वारा पर्जन्य भूमीला प्रसन्न करतात, तर अन्य उदकाद्वारा सूर्याचे प्रखर किरण आकाशाला आहुतीच्या योगे प्रसन्न करतात.

विश्वव्यापी ईथरसारख्या पाण्याची कल्पना करून टिळकांनी वेदातले पाणी निकालात काढले. त्याचप्रमाणे अविवाद्यपणे भारताचा भूगोल दर्शविणाऱ्या सप्तसिन्धुदेखील आकाशातील नद्या ठरवून निकालात काढल्या. पंजाबातील सरस्वती अगदीच क्षुद्र आहे, वेदात वर्णिल्याप्रमाणे महानदी नाही, तसेच "आपप्रुषी पार्थिवान्युरु रजो अन्तरिक्षम्" यात ती भूमीप्रमाणे अन्तरिक्षदेखील व्यापते असे वर्णन आहे यावरून ती भूमीवरची भारतातली नदी नाही असे म्हटले आहे. अन्तरिक्ष व्यापते एवढ्यावरून सरस्वती भूलोकीची नदी नाही असे म्हटले तर ती पृथ्वीवरील विस्तीर्ण प्रदेश व्यापते असे म्हटले आहे यावरून ती अन्तरिक्षातली नदी नाही असे का म्हणू नये? आकाशात देखील आकाशगंगा मानलेली आहे एवढ्यावरून गंगा ही देखील भूलोकीची नदी नाही असे म्हणणे युक्त ठरेल काय?

हल्लीची सरस्वती वेदातील महान् सरस्वती नाही असे वाटते, कारण ती गेल्या पाच हजार वर्षांत आटली आहे. त्यापूर्वी ती फार मोठी नदी होती असे नुकतेच हवामान खात्याने जाहीर केले आहे. सरस्वती जेथे लुप्त झाली त्या ठिकाणाला विनशन तीर्थ म्हणतात. सरस्वती लुप्त झाल्याची परंपरा फार प्राचीन आहे व तिला आता हवामानखात्याने दुजोरा दिला आहे.

सप्त सिंधु या गंगादी सात नद्या आहेत असे सायण म्हणतो. टिळकांनी हे अमान्य करण्याची कारणे अशी दिली आहेत की, या सात नद्यांची यादी ऋग्वेदात दिलेली नाही. सायण सात नद्यांत गंगायमुनांचा अंतर्भाव करतो, तर मॅक्समूलर त्याऐवजी सिंधु व सरस्वती यांचा अंतर्भाव करतो. लॅसन आणि लडविग सरस्वतीच्या ऐवजी अफगाणिस्तानातील कुभेचा अंतर्भाव करतात. तेव्हा सप्त सिंधुबद्दल मतभेद असल्यामुळे या पृथ्वीवरच्या नद्या आहेत असे समजता येत नाही.

हे तर्कशास्त्र अगम्य आहे. सात नद्या कोणत्या याबद्दल मतभेद असला तरी त्या नद्या भूमीवरच्या आहेत याबद्दल मतभेद नाही. गंगा, सिंधु, सरस्वती, कुभा व यमुना यांपैकी कुणाचा अंतर्भाव करायचा एवढ्यापुरता मतभेद आहे.

अर्बुदाला हिमाने मारले याचा अर्थ इतका स्पष्ट आहे की, तो लागण्यासाठी

उत्तरध्रुवाच्या दूरान्वित कल्पनेची मुळीच जरूर नाही. अर्बुद म्हणजे मेघ, त्याला हिमाने मारले म्हणजे थंडीने त्यातील वाफेचे पाणी करून पाऊस पाडला व मेघ नष्ट केला. ध्रुवसिद्धांताने अर्बुदाचा अर्थ अंधार असा करूनही त्याला हिमाने नष्ट केल्याची उपपत्ती लागत नाही. हिम म्हणजे हिवाळा हे ध्रुवमंडळातील अर्बुदाचे म्हणजे अंधाराचे शक्तिस्थान आहे. त्याला मारणारे शस्त्र नव्हे. या अंधाराचा नाश उन्हाळ्याने होतो, हिमाने म्हणजे हिवाळ्याने नव्हे.

पाणी अडवणारा वृत्र, त्याला मारून पाणी मुक्त करणारा इंद्र वगैरे वर्णने ध्रुवप्रदेशातील रात्रीपेक्षा हिमालयीन प्रदेशातील शरदऋतूपासून गोठणारे पाणी व उन्हाळ्याच्या प्रारंभी ते वितळविणारा सूर्य यांना अधिक लागू आहेत. बर्फाच्छादित पर्वतशिखरे व गोठलेली सरोवरे यांना पुरे म्हणजे किल्ले म्हटले आहे. ही पुरे शारद म्हणजे पांढरी असल्यामुळे व शरदृतूत निर्माण होत असल्यामुळे दोन्ही दृष्टींनी शारद आहेत.

''यः शम्बर पर्वतेषुं क्षियन्तं, चत्वारिंश्यां शरदि अन्वविन्दित्।'' पर्वतात दडून बसलेल्या शम्बराला इंद्राने चाळिसाव्या वर्षी शोधून काढले या वाक्याने पुरे फोडणे म्हणजे गोठलेले पाणी वितळविणे या कल्पनेचे खण्डन होते व ध्रुवसिद्धान्ताला पुष्टी मिळते असे टिळक व त्यांचे समर्थक वेदव्याख्याते प्रा. घाटे म्हणतात. पण वस्तुतः ध्रुवसिद्धान्तानेदेखील चाळीस वर्षांची उपपत्ती लागत नाही, म्हणून चत्वारिंश्यां शरदि याचा अर्थ चाळिसाव्या वर्षी असा न करता शरदृतूच्या चाळिसाव्या दिवशी असा करावा असे टिळक सुचवतात. याच दिवशी ध्रुवप्रदेशातील सूर्य क्षितिजाखाली जायला सुरवात होते व अंधाराशी म्हणजे शंबराशी इंद्राचे म्हणजे सूर्याचे युद्ध सुरू होते.

पण चाळीस वर्षांची अडचण अशी टाळल्याने केवळ ध्रुवसिद्धांताची सोय होते असे नाही, त्यानेच गोठलेल्या पाण्याच्या कल्पनेलादेखील समर्थन मिळते. कारण याच दिवशी पाणी गोठण्याची क्रिया हिमालयीन प्रदेशात कोठेतरी सुरू वा पूर्ण होत असे असे मानता येते. शम्बर म्हणजे पाणी असा अर्थ आहे. ''यमुनाशम्बरमम्बरं व्यतानीत्'' म्हणजे यमुनेच्या पाण्यात आकाशाचे प्रतिबिंब पडले. पर्वतात दडून बसलेला शम्बर म्हणजे पर्वतात दुर्गम जागी गोठून राहिलेले पाणी.

वस्तुतः इंद्राने शम्बराला गाठले तेव्हा त्यांच्या युद्धाला नुसती सुरवात झाली. शम्बर मरायला महिनोगणती अवधी लागला ही कल्पना युद्धाच्या बाबतीत ठीक असली





असुरांना घालवणे ३६० पैकी एकाच रात्री जरूर होते असे म्हणता येत नाही. तेव्हा हा यज्ञ कटिबंधातल्या ३६० साधारण रात्रींपैकी एका रात्रीसंबंधी नसून ध्रुवप्रदेशातील लांब रात्रीसंबंधी आहे.

## खण्डन

एखाद्या रात्रीनंतर अहोरात्र निर्माण झाले असे म्हणणे विचित्र वाटत असले तर ते ध्रुवीय रात्रीनाही लागू आहे. त्या रात्री दोन महिन्याएवढ्या लांब असल्या तरी त्यांच्या पूर्वी देखील ध्रुवीय दिवसरात्री सारख्या आलेल्याच असतात. ३६० रात्रींपैकी एखाद्याच रात्री असुरांना घालवणे आवश्यक नव्हते हा आक्षेप कार्यारंभीच्या मंगलावर देखील घेता येईल. विघ्न फक्त कार्याच्या आरंभीच येते असे नाही, तरी कार्यारंभी मंगल करण्याची चाल आहे.

प्रजापतीने प्रथम अतिरात्र यज्ञ पाहिला व मग अहोरात्रांची जोडी निर्माण केली हे विधान उघडपणे विश्वनिर्मितीसंबंधीचे विधान आहे.

## ध्रुवमत

६.३०.५ मध्ये इंद्राने वृत्रावर जय मिळविला तेव्हा चार गोष्टी एकसमयावच्छेदेकरून झाल्या असे म्हटले आहे. या चार गोष्टी म्हणजे- १) गायींचे विमोचन, २) पाण्याचे विमोचन, ३) उषेचा उदय आणि ४) सूर्याचा उदय. या घटनेची उपपत्ती फक्त ध्रुवसिद्धांताने लागते. ऋग्वेदात दिव्य पाणी, सरस्वती इत्यादी नद्या यांचा उल्लेख आहे. दिव्य पाणी म्हणजे पावसाचे पाणी, नद्या म्हणजे खरोखरीच्या नद्या असे समजल्यामुळे आजपर्यंत ६.३०.०५ या ऋचेचा अर्थ लागत नव्हता. वैदिक विश्वकल्पनेप्रमाणे सर्व विश्वात एक प्रकारचे अपार्थिव पाणी भरून राहिलेले आहे. हे सर्वव्यापी पाणी काहीसे ईथरसारखे आहे. हे पाणी मोकळे असले म्हणजे त्यातून खगोल संचार करू शकतात. वृत्र या दिव्य पाण्याला अडवून खगोलांची गती रुद्ध करतो. हा वृत्र म्हणजे दुसरातिसरा कोणी नसून ध्रुव प्रदेशात सूर्याला महिनोगणती लुप्त करणारा असुर. इंद्र त्याला मारून दिव्य पाणी मुक्त करतो, त्याने सूर्य पुनः संचार करू लागून उदय पावतो, त्याचे आगमन सूचित करण्यास त्याच्या आघाडीवर उषा असते. गायी विमुक्त होतात म्हणजे प्रकाश विमुक्त होतो.

आता यावर कुणी म्हणेल की ''हे सर्व खरे मानले तरी ते रोजच्या सूर्योदयाला

देखील लागू आहे; त्यासाठी ध्रुवप्रदेशातला सूर्योदय कशाला पाहिजे?" यावर उत्तर असे, की इन्द्राने बलाला वर्षाच्या शेवटी मारले, पाणी अडवणाऱ्या अर्बुदाला हिमाने मारले इत्यादी उल्लेखांवरून हा सूर्योदय ही वार्षिक घटना होती व हिवाळ्याच्या म्हणजे हिमाच्या शेवटी येत होती हे स्पष्ट आहे. वृत्राचे किल्ले शारद म्हटले आहेत. यावरून वृत्र आपल्या पाणी अडवण्याच्या कार्याला शरदृतूत सुरवात करीत असे असेही दिसते.

## खण्डन

६.३०.०५ ही ऋचा अशी आहे :-

**त्वमपो विदूरो विषूचीरिन्द्र दृढमरुजः पर्वतस्य।**
**राजाभवो जगतश्चर्षणीनां साकं सूर्यं जनयन्द्यामुषासम्॥**

हे इंद्रा, तू वृत्राने अडविलेले पाणी अनेक मार्गांनी वाहायला लावले. तू पर्वतांचा दृढप्रदेश भग्न केलास. तू सूर्य, द्युलोक व उषा यांना एकदमच निर्माण केलेस.

वरील ऋचेत टिळक म्हणतात त्याप्रमाणे चार गोष्टी एकसमयावच्छेदेकरून निर्माण केल्याचा उल्लेख नाही. फक्त द्युलोक, उषा व सूर्य यांची उत्पत्ती एकदम केल्याचा उल्लेख आहे. गार्यींचा उल्लेखदेखील नाही व पाण्याचे विमोचन वरील तीन गोष्टींच्या उत्पत्तीशी समकालीन होते असे म्हटलेले नाही.

सृष्ट्युत्पत्तीच्या आरंभी सर्व पाणी होते असे म्हटलेले आहे एवढ्यावरून दिव्या आपः म्हणजे पावसाचे पाणी नव्हे असे सिद्ध होत नाही. "या आपो दिव्या उत वा स्रवन्ति खनित्रिमा उत वा याः स्वयंजाः। समुद्रार्था याः शुचयः पावकास्ता आपो देवरिह मामवन्तुः॥" या ऋचेत दिव्य पाणी, वाहणारे पाणी, खनिज म्हणजे विहिरीचे पाणी, समुद्राकडे वाहत जाणारे पाणी असे सर्व प्रकारचे पवित्र पाणी माझे रक्षण करो असे स्पष्ट म्हटले आहे. येथे दिव्या आपः याचा अर्थ पावसाचे पाणी याशिवाय दुसरा असू शकत नाही.

वृत्राने पाण्याचा वर जाण्याचा क्रम रोखला, इंद्राने वृत्राला मारून पाण्याची उर्ध्व गती पुनः सुरू केली यावरून हे पाणी लौकिक पाणी नाही, कारण ते वर जाते हा युक्तिवाद चूक आहे. वेदात उष्णतेने पाण्याची वाफ होऊन ती वर जाते ही कल्पना स्पष्टपणे मांडली आहे. पहाः-

**समानमेतदुदकमुच्चैत्यव चाहभिः।**
**भूमिं पर्जन्या जिन्वन्ति दिवं जिन्वन्ति अग्नयः॥**





अप्रत्यक्ष प्रमाणांचा आता क्रमशः विचार करू.

## ध्रुवपक्ष

वामनाने त्रिविक्रमाचे महान् रूप धारण केले व तीन पावलांत तीन जगे व्यापली. या तीन पावलांपैकी दोन दृश्य व एक अदृश्य होते. दोन दृश्य पावले म्हणजे ध्रुवीय रात्रीचे दोन महिने. विष्णू वर्षातून चार महिने शेषावर झोपतो अशी पौराणिक कल्पना आहे यावरूनही हेच सिद्ध होते. हे चार महिने म्हणजे चार महिन्यांची ध्रुवीय रात्र असली पाहिजे. रात्रीचाच निद्रा म्हणून उल्लेख केलेला आहे. विष्णूची शय्या समुद्रात आहे, म्हणजे दक्षिण आकाशार्धात आहे. दक्षिण आकाशार्धात सूर्य गेला की, उत्तरध्रुवावर रात्र होते.

यात एक अडचण अशी की, विष्णूची निद्रा हिवाळ्यात नसून वर्षा ऋतूत म्हणजे उन्हाळ्यात असते असे पौराणिक वर्णन आहे. पण ही नंतरची चुकीची कल्पना असली पाहिजे.

ऋग्वेदातील दाशराज्ञयुद्ध हे देखील ध्रुवसूचक रूपक आहे. एका बाजूला सुदास व दुसऱ्या बाजूला दहा राजांची युती यांच्यांत दाशराज्ञ युद्ध झाले. दहा राजे म्हणजे प्रकाशाचे दहा महिने व सुदास म्हणजे बाकीच्या महिन्यांची ध्रुवीय रात्र. या दिवसरात्रीचा संघर्ष म्हणजे दाशराज्ञ युद्ध,

रावणाची दहा तोंडे म्हणजे ध्रुवीय प्रदेशातील दहा प्रकाशयुक्त महिने, कुंभकर्णाची सहा महिने निद्रा म्हणजे सहा महिन्यांची ध्रुवीय रात्र. रावणाने साऱ्या देवांना बंदिवासात टाकले म्हणजे ध्रुवीय प्रदेशातील दहा महिन्यांच्या दिवसानंतर सर्व काही अंधकारमग्न झाले.

## खंडन

विष्णूची निद्रा ही पावसाळ्यातील चार महिन्यांची ही नंतरची चुकीची कल्पना आहे. याचे एकमात्र प्रमाण ती ध्रुवसिद्धांताशी जुळत नाही हेच समजायचे. दुसरे काहीही प्रमाण दिलेले नाही. आधाराच्या बळावर सिद्धांताचे मूल्यमापन करण्याऐवजी सिद्धांताच्या बळावरच आधाराचे मूल्यमापन केलेले आहे.

सुदास म्हणजे ध्रुवीय रात्र व दहा राजे म्हणजे दहा प्रकाशयुक्त ध्रुवीय महिने असे मानले तर दाशराज्ञ युद्धात रात्रीचा दिवसावर व अंधाराचा प्रकाशावर विजय झाला

असे म्हटले पाहिजे. इतर ठिकाणी टिळकांनी प्रकाशाचा अंधारावर विजय झाल्याचे ऋचांत वर्णन आहे असे म्हटले आहे. तेव्हा या ऋचांत व दाशराज्ञ युद्धाच्या ऋचांत शत्रुमित्रांची उलटापालट झालेली दिसते. दहा महिन्यांचा दिवस म्हणजे रावणाची दहा तोंडे असे म्हणणे म्हणजे ज्या प्रकाशयुक्त दिवसांची ध्रुवनिवासी आतुरतेने वाट पाहत होते त्या दिवसांनाच त्यांनी रावणाची तोंडे मानून नायकाचा खलनायक केला असे म्हणण्यासारखे आहे. शिवाय ज्या दहा महिन्यांच्या दिवसांनी सर्व काही प्रकाशित केले त्यांनीच सर्व काही अंधकारमय केले, म्हणजे सर्व देवांना बंदीत टाकले, असे म्हणणे विचित्र आहे. प्रकाशयुक्त दिवसांनी सर्व काही दिसेनासे झाले तरीही आकाशस्थ ज्योति म्हणजे देव दिसेनासे होतना म्हणून दहा प्रकाशयुक्त दिवसांनी देवांना बंदीत टाकले असे म्हणणे अयुक्त नाही, पण टिळकांनी अशी भूमिका घेतलेली नाही. प्लूटार्कचा आधार देऊन अंधाराचा प्रकाशावर विजय झाल्यामुळे देव बंदिस्त झाले असे म्हटले आहे.

टिळकांची भूमिका तशी नसली तरी दहा महिन्यांचा दिवस म्हणजे दहा तोंडी रावण, त्याने देव बंदिस्त केले म्हणजे खगोल दिसेनासे केले, या खगोलांना घनश्याम रामाने मुक्त केले व देव पुनः प्रकाशू लागले असे म्हणण्यास काय हरकत आहे असे ज्यांनी या वर्णनात रूपक पाहण्याची प्रतिज्ञाच केली आहे ते म्हणतील. मग हेच रूपक पुढे चालवून दहा महिन्यांचा दिवस म्हणजे दहा तोंडी रावण तर दोन महिन्यांची रात्र म्हणजे दोन तोंडाचा राम असे का म्हणू नये? रूपकाची कल्पना अशी आहे की, तिला मसाला फार थोडा लागतो. दहा महिने, दहा तोंडे व दहा राजे यांतले दहा एवढेच साम्य रूपकाला पुरते. व्याकरणात दहा गण आहेत, सरदशेमुखी हा कराचा दहावा हिस्सा होता, हाताची बोटे दहा आहेत या सर्व दहांचा उपयोग नवी नवी रूपके बनविण्यासाठी होऊ शकेल.

## ध्रुवपक्ष

आवेस्त्यामध्ये आर्यांच्या देशांतराला व ध्रुवसिद्धांताला प्रमाण मिळते. आवेस्त्यातले हे उल्लेख असे : अहुरमझ्दाने आधी ऐर्यणवाजो हा प्रदेश निर्माण केला तेव्हा अग्रमैन्यूने तेथे अति थंडी व बर्फ निर्माण केला. त्यानंतर अहुरमझ्दाने सुगद हा प्रदेश निर्माण केला तेव्हा अग्रमैन्यूने तेथे गुरांना चावणाऱ्या माशा निर्माण केल्या. याप्रमाणे अहुरमझ्दाने





तरी सूर्य वा अंधार यांना लागू होत नाही. कारण सूर्याने अंधाराला गाठले की अंधाराचा लगेच नाश होणार. त्यासाठी महिनाभर थांबायला नको. तेव्हा इंद्राने शम्बराला गाठले ही नुसती युद्धाची सुरवात न मानता, शम्बराचा निकालही त्याच दिवशी लागला असे मानले पाहिजे. म्हणजे शरद् ऋतूतल्या चाळिसाव्या दिवशी हा अर्थ नुसताच ओढाताणीचा आहे एवढेच नव्हे, त्याने ध्रुवसिद्धान्तालाही नीटशी पुष्टी मिळत नाही.

''चत्वारिंश्यां शरदि'' याचा चाळिसाव्या वर्षी असा सरळ अर्थ केल्याने सूर्याने बर्फ वितळण्याच्या क्रियेला शंबरवध असे म्हणणे उपपन्न होते. चाळीस वर्षांतून एकदाच उन्हाळा असा कडक पडला असेल की त्याने चाळीस वर्षांत न वितळलेले एखाद्या दुर्गम ठिकाणचे बर्फदेखील वितळले अशी कल्पना करण्यास काहीच हरकत नाही. ऐन उन्हाळ्यात देखील न वितळणारे बर्फ हिमालयात कुठे कुठे असते असे बिल्हणाच्या वर्णनावरून दिसते. हे वर्णन विक्रमांकदेवचरिताच्या खालील श्लोकात आहे :-

**वक्त्रन्यस्तैस्तुहिनशकलैर्दन्तुरा वारिकुम्भाः ।**
**काश्मीरीणां सरसकदलीकोमला गात्ररेखाः ॥**
**भीष्मग्रीष्मक्लमविरतये सर्वसाधारणत्वम्।**
**यस्मिन्नायान्त्यपि हिमशिलाशीतलानि स्थलानि ॥**

काश्मीरचे लोक कडक उन्हाळ्याचा ताप सह्य करण्यासाठी, तोंडावर ठेवलेल्या बर्फाच्या तुकड्यांनी दन्तुर झालेली पाण्याची मडकी, हिमशिलांनी शीतल झालेली स्थळे व काश्मीर युवतींची कदलीसारखी कोमल अंगे यांचा आश्रय करतात.

जेथे असह्य उन्हाळा आहे तेथेच बर्फ सापडत होते हे शक्य नाही. तेव्हा मडक्यावर ठेवण्याचे बर्फ दुसऱ्या ठिकाणाहून आणीत असले पाहिजेत. हे दुसरे ठिकाण आणता आणता बर्फ वितळून जाणार नाही इतके जवळ असले पाहिजे. तेव्हा काश्मीरात उन्हाळ्यात देखील बर्फ सापडेल अशी स्थळे केवळ शिखरावरच नव्हे तर लोकवसतीच्या अगदी जवळ आहेत हे स्पष्ट आहे. असे मानले नाही तर बिल्हणाच्या वेळी कृत्रिम बर्फ तयार करण्याचे तंत्र माहीत होते असे मानावे लागेल.

उन्हाळ्यातदेखील न वितळणारे हे बर्फ चाळीस वर्षात न पडलेल्या अशा एखाद्या वर्षीच्या कडक उन्हाळ्याने वितळले असे चत्वारिंश्यां शरदि शंबराला मारले या विधानात अभिप्रेत असणे शक्य आहे.

## ध्रुवपद

तैत्तिरीय संहितेत लिहिले आहे की, सूर्याच्या तीन शक्ती आहेत. वसंत म्हणजे सकाळ, ग्रीष्म म्हणजे मध्यान्ह व शरद् म्हणजे संध्याकाळ. यावरून शरद् ऋतूनंतर रात्र असे सिद्ध होते. शबराने आपल्या भाष्यातून उल्लेखिलेल्या एका वैदिक वाक्यात ''यदास्तमेति, अथ हेमन्तशिशिरौ।'' म्हणजे सूर्यास्ताच्या वेळेला हेमंतशिशिर म्हणतात असे म्हटले आहे. यावरून हेमंत व शिशिर हे ऋतू अंधकारमय असत असे दिसते. ही परिस्थिती उत्तरध्रुवावरची आहे.

## खंडन

दिवसाच्या भागाप्रमाणेच वर्षाचे भाग केले, तर उष्णतेच्या कमी जास्त प्रमाणावरून वसंताला सकाळ, ग्रीष्माला मध्यान्ह व शरदाला संध्याकाळ म्हटले हे स्पष्ट आहे. याच न्यायाने हेमंत व शिशिर यांना सगळ्यात थंड म्हणून रात्र म्हटले आहे. ऋग्वेदात रात्रीला हिम्या म्हटले आहे तेदेखील ती थंड असते म्हणून. रात्रभर हिवाळा हा ऋतू असतो म्हणून नव्हे.

## पुराणकथा व आवेस्ता

आतापर्यंत विचारात घेतलेल्या प्रमाणांना टिळक साक्षात् प्रमाणे म्हणतात. साक्षात् प्रमाणांखेरीज प्राचीन आर्यांच्या ध्रुवनिवासाबद्दल आवेस्ता व प्राचीन संस्कृत साहित्य यांत पुराणकथा व रूपकाच्या रूपाची अप्रत्यक्ष प्रमाणेदेखील आहेत असे टिळकांचे म्हणणे आहे.

पण मुळात साक्षात् पुरावाच जर खोटा ठरला तर अप्रत्यक्ष पुरावा आपोआपच निकालात निघतो. तेव्हा या अप्रत्यक्ष पुराव्याचा विचार करायची वस्तुतः गरज नाही.

पण टिळकांनी जरी साक्षात् पुराव्यांना पुष्टी देणारी म्हणून पुराणकथांची रूपकात्मक मीमांसा उपयुक्त मानली आहे, स्वतंत्र पुरावा म्हणून नव्हे, तरी पाश्चात्त्य पंडितांनी बोलूनचालून ऐतिहासिक म्हणून वर्णिलेल्या रामायण/महाभारतातील घटनांना अमानवीय घटनांवरील रूपके ठरविणे, व इंद्रसूक्तातील उघडपणे अमानवीय म्हणून वर्णिलेल्या घटनांना मानवी घटनांवरील रूपके ठरवून भरमसाट ऐतिहासिक अनुमाने काढणे हा प्रकार इतका पराकोटीस पोचविला आहे की या प्रकाराची निरर्थकता स्पष्ट करणे आवश्यक होऊन बसले आहे. म्हणून या प्रकारातच मोडणाऱ्या टिळकांचा





## ध्रुवसिद्धान्तामागची मनोभूमिका

आतापर्यंतचे विवेचन वाचून काही वाचक विचारतील की ''तुम्ही म्हणता त्याप्रमाणे वेदवाङ्मयात उत्तरध्रुविनिवासाबद्दल अवाक्षरही नाही, तर मग टिळकांसारख्या गणित, खगोल वगैरे वैज्ञानिक विद्यांत मुरलेल्या विद्वानाला आर्यांच्या ध्रुवनिवासाच्या कल्पनेने, सर्वस्वी निराधार सिद्धान्त मांडण्यास प्रवृत्त करण्याइतका मोह कसा घातला?''

या प्रश्नाची चर्चा वस्तुतः या लेखाच्या कक्षेबाहेरची आहे. कारण त्याचे उत्तर देण्यास टिळकांच्या ग्रन्थातील प्रतिपादनाव्यतिरिक्त त्यांच्या मानसिक भूमिकेची चर्चा करावी लागेल. पण या प्रश्नाच्या उत्तरादाखल काहीच लिहिले नाही तर माझ्या खंडनात काही तरी न्यून राहिले अशी काही वाचकांना रुखरुख लागून राहील.

यासंबंधी हे लक्षात ठेवले पाहिजे, की भौतिक संशोधनाप्रमाणे ऐतिहासिक संशोधन शुद्ध सत्यशोधनाच्या हेतूने क्वचितच केले जाते. संस्कृत व युरोपीय भाषा यांत हजार धातू समान सापडल्यापासून वेदांची प्राचीनता नाकारण्याकडे पाश्चात्त्य पंडितांचा कल होऊ लागला; कारण वेद पाच ते सहा हजार वर्षांइतके प्राचीन ठरले तर हे समान धातू मूळ भारतीय संस्कृतातून घेतले गेले असा निष्कर्ष निघू शकतो. या निष्कर्षानुसार आपल्या भाषा व संस्कृती यांचे मूळ भारतात आहे हे कबूल करायला युरोपीय मन तयार नाही.

याच्या उलट वेद अतिप्राचीन नाहीत असे सिद्ध झाले तर सनातन धर्माच्या सनातनत्वावर घाला येतो असे काही भारतीय पंडितांना वाटते. आपल्या ओरायन या ग्रन्थात काही ज्योतिर्विदांच्या युक्तिवादाप्रमाणे वेदकाल सुमारे पाच हजार वर्षाइतका प्राचीन ठरतो असे प्रस्तावनेदाखल म्हटल्यावर, टिळक विचारतात :- ''येथे आपण वेदांच्या प्राचीनत्वाच्या चरम सीमेस पोहोचलो काय? आर्य मनाचा पहिला उद्रेक याच्यापेक्षा प्राचीन नाही काय? पाणिनीने फक्त पाच हजार वर्षांपूर्वीच्या ऋचांचे वर्णन, 'ऋषींनी पाहिलेली वाणी' या शब्दांनी केले काय?'' दुसरीकडे ते म्हणतात, की ध्रुवसिद्धान्ताने वेद मानवी इतिहासाच्या आदिस्थानी आहेत असे सिद्ध होते. अर्थात वेद शक्य तितके प्राचीन आहेत असे शक्य तितक्या तर्ककर्कश रीतीने व उपलब्ध ज्ञानाचा उपयोग करून सिद्ध करणे हा टिळकांचा प्रधान उद्देश होता.

हा उद्देश मनात धरून वेदकालाचा विचार करताना टिळकांना वॉरनचे संशोधन उपलब्ध झाले. टिळकांना जसे वैदिक संस्कृतीचे प्राचीनत्व सिद्ध करायचे होते, तसे

वॉरनला मानवजात बायबलात लिहिल्याप्रमाणे ॲडम व ईव्हपासून निर्माण झाली हे सिद्ध करायचे होते. म्हणून ॲडम आणि ईव्ह ज्या नंदनवनात राहत होती ते नंदनवन कोठे आहे याचा शोध करण्याचा उद्योगास तो लागला. त्याने हे नंदनवन उत्तर ध्रुवात शोधले व पॅरडाइज फाऊण्ड म्हणून समाधानाचे निःश्वास टाकले.

मानवनिर्मितीचा आद्य म्हणून उत्तरध्रुवाचे आकर्षण वाटण्याचे कारण म्हणजे आज उत्तरध्रुव वसतियोग्य नाही. तो वसतियोग्य असण्याचा काळ निदान चौदा हजार वर्षांपूर्वीचा आहे. या काळी हा प्रदेश समुद्रमय नव्हता. हिमप्रलय, भूकंप वगैरे अनेक आपत्तींनी हा प्रदेश मानवशून्य केला, असा एक तर्क आहे. अर्थात् येथे मानववसती असलीच तर ती फार प्राचीन काळची गोष्ट आहे.

वेदात ध्रुवनिवासाची प्रमाणे मिळाली तर वेदवाङ्मय सर्व मानवजातीच्या आद्यस्थानी असल्याइतके प्राचीन ठरते. वेदांचे हे प्राचीनत्व टिळकांना फार आराध्य वाटत होते व म्हणून त्यांनी वेदात ध्रुवनिवासाची प्रमाणे शोधण्याचा हिरिरीने प्रयत्न केला.

पण टिळकांचा उद्देश सफल होण्यासाठी केवळ ध्रुवमंडळातील परिस्थितीचे उल्लेख दाखवल्याने काम भागत नाही. आज वसतियोग्य नसलेल्या ध्रुवप्रदेशातील परिस्थितीचे उल्लेख दाखवायला पाहिजेत. पण टिळकांनी तसा प्रयत्नही केला नाही. पुष्कळ ठिकाणी नुसत्या दहा महिन्यांच्या दिवसावर व दोन महिन्यांच्या रात्रीवर त्यांनी समाधान मानले आहे, व ध्रुवप्रदेश म्हणजे ध्रुवमंडळ, आर्क्टिक सर्कल, यातील प्रदेश एवढेच मला अभिप्रेत आहे असे म्हटले आहे. पण एवढ्याने त्यांचा मूळ उद्देश मुळीच सफल होत नाही. कारण ध्रुवमंडळ आजही वसतियोग्य आहे. ग्रीनलँड, आइसलँड, अलास्का, सैबेरिया व कॅनडा यांचा उत्तरभाग हे प्रदेश ध्रुवमंडळात आहेत व तेथे अजूनही मानववसती आहे. तेव्हा ध्रुवमंडळविशिष्ट परिस्थिती सूचित करणारे टिळकांनी दाखविलेले उल्लेख साधार मानले तरी त्यावरून वेदांचे प्राचीनत्व, हिमप्रलय पूर्वकालीनत्व वगैरे मुळीच सिद्ध होत नाही.

■ ■





सोळा प्रदेश निर्माण केले. त्या सोळाही प्रदेशांत अग्रमैन्यूने काहीतरी त्रासदायक गोष्टी निर्माण केल्या.

वरील वर्णनात सोळा लोक निर्माण केल्याचा फक्त उल्लेख आहे. एका लोकातील जनतेने दुसऱ्या लोकात देशांतर केल्याचा कोठेच उल्लेख नाही. सर्व आवेस्तिक विद्वानांचे याबाबतीत एकमत आहे. पण या विद्वानांना वेदातील ध्रुवप्रदेशाचे उल्लेख माहीत असते तर त्यांना आवेस्त्यातील वरील वर्णनात देशांतराचा इतिहास दिसला असता.

आवेस्त्यातील पंधरावा प्रदेश हप्तहिंदु म्हणजे सप्तसिंधु हा आहे. सप्तसिंधु म्हणजे साधारणपणे गंगा व सिंधु यांच्यामधला प्रदेश. यांच्या नंतरचा सोळावा प्रदेश रंधा असा आहे. आवेस्तिक विद्वानांच्या मते हा प्रदेश म्हणजे कास्पियन समुद्राच्या काठचा प्रदेश वा मेसापोटेमिया. पण ते बरोबर नाही. रंधा म्हणजे सिंधुची उपनदी रसा.

## खंडन

वरील युक्तिवादातील कच्चे दुवे उघड आहेत. आवेस्त्यात देशांतराचा उल्लेख नाही व अग्रमैन्यूने निर्माण केलेल्या आपत्ती कुणालाही तो प्रदेश सोडून जायला लावतील एवढ्या भयंकर नाहीत. सप्तसिंधु प्रदेशातदेखील अग्रमैन्यूने उष्णता निर्माण केली व या उष्णतेला भिऊन आर्य रंधा प्रदेशात गेले असे सांगण्यात आले आहे. पण तेथेदेखील अग्रमैन्यूने हिवाळा म्हणजे ऐरणवाजोत निर्माण केलेलीच आपत्ती व भूकंप निर्माण केला. सिंधुप्रदेशात, सप्तसिंधुप्रदेशासारखा अतिउन्हाळा नाही. अतिहिवाळा मात्र आहे व तेथे भूकंप होतात हे वर्णन वस्तुस्थितीशी जुळणारे नाही.

ऐरणवाजोमध्ये दहा महिने हिवाळा होता यावरून तो ध्रुवप्रदेश ठरत नाही. दहा महिने हिवाळा सिमल्यात देखील असतो.

हिमप्रलयातून सुटण्यासाठी अहुरमझ्दाने वर या नावाने एक आश्रयस्थान निर्माण करण्यास यिमाला सांगितले. या आश्रयस्थानात सूर्य, चंद्र व तारे वर्षातून एकदाच उगवत व तेथे एक वर्ष दिवसासारखे वाटे यावरून तो ध्रुवप्रदेश होता असे म्हटले तर हिमप्रलयामुळे तेथील रहिवासी ऐरणवाजो सोडून गेले नाहीत, तेथेच एक आश्रयस्थान बनवून राहिले असे कबूल करावे लागते व हिमप्रलयामुळे देशान्तर ही पायाभूत कल्पनाच ढासळून पडते.

वराच्या वर्णनावरून ते एक काल्पनिक व अद्भुत आश्रयस्थान होते हे स्पष्ट

आहे. सूर्य वर्षातून एकदाच उगवत होता तो वरामध्ये, ऐरणवाजोमध्ये नव्हे. अर्थात ऐरणवाजो हा ध्रुवीय प्रदेश होता या मताला आवेस्त्यात आधार सापडत नाही.

वेदवाङ्मयात जलप्रलयाचा उल्लेख आहे. हिमप्रलयाचा नाही ही ध्रुवसिद्धांताला एक अडचण आहे. ही अडचण टाळण्यासाठी संस्कृतमध्ये बर्फाला प्रालेय म्हणतात हा हिमप्रलयाच्या स्मृतीचा पुरावा मानण्यात आला आहे. वस्तुतः ली या धातूपासून लय व प्रलय या शब्दांची व्युत्पत्ती आहे. लीचा अर्थ द्रवीकरणे म्हणजे वितळणे असा आहे. बर्फ वितळते म्हणून त्याला प्रालेय म्हणतात, त्याचा हिमप्रलयाशी काही संबंध नाही.

### ध्रुवमत

भारतात स्थायिक होण्याच्या आधी आर्य लोक सारखे हिंत होते. हे हिंडणे आर्यजातीला माहीत असलेल्या सगळ्यांत प्राचीन काळी सुरू होते. हा प्राचीन काळ म्हणजे कृतयुग. म्हणून कृतं संपद्यते चरन् म्हणजे कृतयुग हा चालण्याचा काळ आहे असे म्हटले आहे.

### खंडन

वरील ओळ ज्या श्लोकातून घेतली आहे तो पूर्ण श्लोक असा आहे.

**कलिः शयानो भवति संजिहानस्तु द्वापरः।**
**उत्तिष्ठंस्त्रेता भवति कृतं संपद्यते चरन्॥**

उद्धृत ओळीवर आधारलेला युक्तिवाद पुढे चालवून असे म्हणता येईल की, "कलिः शयानो भवति" म्हणजे कलियुगात आर्य निजून राहिले. द्वापराला संजिहान म्हटले आहे कारण ते त्या युगात हळू हालचाल करीत होते व त्रेता युगाला उत्तिष्ठन् म्हटले आहे, कारण ते त्या युगात उठून बसले.

या श्लोकाचा अर्थ वस्तुतः अगदी स्पष्ट आहे. त्याचा आर्यांच्या देशांतराशी काही संबंध नाही. कृतयुग आपल्या परंपरेत सर्वोत्कृष्ट मानले आहे. या सर्वोत्कृष्टतेचे लक्षण म्हणजे कार्यरत असणे. तेच चरन् शब्दाने व्यक्त केले आहे. कार्यशील असण्याच्या उलटचे टोक म्हणजे निजून असणे. या परिस्थितीला कलियुग म्हटले आहे. निजून राहण्याच्या व कार्यशील असण्याच्या मधल्या, हालचाल करणे व उठून उभे राहणे या अवस्था त्रेता व द्वापर यांनी व्यक्त केल्या आहेत.





करीत तू सूर्याच्या उपकिरणांमध्ये म्हणजे ज्योत्स्नेमध्ये ये" (तिच्यातील अमृत आपल्यात भिनविण्यासाठी) (चन्द्राचा प्रकाश सूर्यकिरणांमुळे आहे याचे वैदिक काळी ज्ञान होते.)

### चन्द्राला उद्देशून

"हे दिव्य पक्षाप्रमाणे उडणाऱ्या सोमा, यज्ञादी कर्मात देवांच्या प्रीतीसाठी किरणांच्या धारा वर्षत तू खाली म्हणजे भूलोकांकडे पहा. हे इन्दो सोमाचे स्थान जे विश्वाचे कळसरूप आकाश त्यात प्रवेश कर. आमंत्रण करीत सूर्याच्या किरणात प्रवेश कर."

**एकः सुपर्णः स समुद्रमाविवेश स इदं विश्वं भुवनं विचष्टे।**
**तं पाकेन मनसापश्यमन्तितस्ते माता रेळिह स उ रेळिह मातरम्॥**

१०/११४/४

"हा चांगला पर्ण एक जरी समुद्रात म्हणजे कुढ्या माणसात शिरला तरी तो जणू सारे भुवन पाहतो. म्हणजे त्या माणसाला साऱ्या जगाचे ज्ञान झाल्यासारखे वाटते. याला मी आज परिणत झालेल्या मनाने जवळून जाणतो आहे. याला त्याची माता चाटते व हा आपल्या मातेला चाटतो. (सोम कुटण्याचा बत्ता त्याला चाटतो व तो त्या बत्त्याला चाटतो, दोघेही एकमेकाला चिकटतात.)

### चंद्राला उद्देशून

"हा पक्षासारखा चंद्र समुद्रात म्हणजे आकाशात शिरला. तो साऱ्या भुवनाला पाहतो. मी त्याला परिणत झालेल्या मनाने पाहत आहे. (म्हातारा होईपर्यंत पाहत आलो आहे.) त्याला त्याची माता जे आकाश ते चाटते व तो आकाशाला चाटतो."

### फुले

**स वह्निः सोम जागृविः पवस्व देववीरति ।**
**अभि कोशं मधुश्च्युतम् ॥९/३६/२**

"हे देवप्रिय वह्निरूप जागृत सोमा, मधुस्रावी अशा उत्कृष्ट कोशाला तू प्रवाहित कर."

येथे कोश म्हणजे अर्धोन्मीलित फूल. पूर्ण न उमललेल्या फुलापासून गांजा केला की तो अधिक रुचकर होणार. याबाबतीत वनस्पतिशास्त्रज्ञांशी चर्चा केली असता त्यांनी

सांगितले की भांगेच्या फुलाची कळी विशिष्ट प्रमाणात वाढली असता तिच्यापासून उत्कृष्ट गांजा तयार होतो, त्यापेक्षा कमी वाढली असल्यास तो अपरिपक्व असतो व जास्त वाढली असता तो रोपाच्या मुळासारख्या अवयवात उतरतो व कळीतील त्याची शक्ती क्षीण होते.

वह्निरूप सोम म्हणजेच धूम्रपानासाठी वापरण्यात येणारा सोम.

**चंद्राला उद्देशून**

"हे उत्कृष्ट मधुस्रावी खजिना धारण करणाऱ्या जागृत देवप्रिय सोमा, प्रवाहित हो." (वह्नि म्हणजे वहन करणारा)

**वृषेव यूथा परि कोशमर्षस्यपामुपस्थे वृषभः कनिक्रदत् ।**
**स इंद्राय पवसे मत्सरिन्तमो यथा जेषाम समिथे त्वोतयः ॥**

"हे सोमा गार्यींच्या कळपात डरकाळ्या फोडणाऱ्या वृषभाप्रमाणे पाण्याच्या अंतरंगातून तू कळीच्या भोवती घोंगावतोस, हे मदकारका, तुझ्या रक्षणाखाली असलेले आम्ही युद्धात जिंकावे म्हणून तू इन्द्रासाठी वाहतोस."

गुडगुडीमध्ये पेय धूम पाण्यातून गाळला जातो व गुडगुड आवाज करतो याचे हे वर्णन आहे. कोशाच्या भोवती सोम घोंगावतो म्हणजे कळीचे चूर्ण करून केलेल्या गांजाभोवती घोंगावतो.

**चंद्राला उद्देशून**

"गार्यींच्या कळपात डरकाळ्या फोडणाऱ्या सांडाप्रमाणे जलस्रावी अशा आकाशाच्या गोलात परिभ्रमण करणाऱ्या हे सोमा, मदकारक असा तू इन्द्रासाठी वाहतोस, जेणेकरून तुझ्या संरक्षणाखाली आम्ही युद्धात जिंकावे."

**अत्यो न हियानो अभि वाजमर्ष स्वर्वित्कोशं दिवो अद्रिमातरम् ।**
**वृषा पवित्रे अधि सानो अव्यये सोमः पुनानः इन्द्रियाय ध्यायसे।**

९/८६/३

"हे सोमा, प्रेरित केलेल्या अश्वाप्रमाणे स्वर्गाची रहस्ये जाणणारा तू दगडाने निर्मिलेला ज्योतीचा कोश यज्ञात आण. जेथून वारा फुंकता येतो अशा गाळण्याच्या टोकात वर्षक असा तू इन्द्रियांनी धारण करण्यासारखा आहेस."

अवि म्हणजे वारा (आपटे) + अय् म्हणजे जाणे, म्हणजे जेथून वारा जातो





# ...५...

# ऋग्वेदातील सोम

ऋग्वेदीय ऋषींना सोम नावाचे पेय फार प्रिय होते. यज्ञाच्या वेळी सोम पिण्याची प्रथा होती. सोमरसासारखे कोणतेच पेय भारतात नाही असे म्हणून कोणत्यातरी परकीय वनस्पतीला सोम म्हणून सोमपायी याज्ञिकांना अभारतीय ठरविण्यात आले आहे. या प्रकरणात सोमाच्या सर्व ऋचा तपासून ही सर्व वर्णने भांगेला लागू होतात हे सिद्ध केले आहे. सोमाबद्दल ऋग्वेदात भङ्ग असा शब्द वापरलेला आहे. आपट्यांच्या कोशात भङ्ग असा, दिलेला आहे. हिन्दीत अगदी मुळासारखाच व मराठीत भाङ्ग या स्वरूपात हा शब्द प्रचलित आहे.

रॅग्युझेन याने ऋग्वेदातील सोमाची वर्णने एका चित्रकाराला वाचून दाखविली व त्या अनुसार सोमाच्या रोपाचे चित्र काढायला सांगितले. या प्रकरणात हे चित्र व भाङ्गेच्या रोपाचे चित्र दिले आहे. या दोन चित्रातील साम्यावरून भाङ्ग म्हणजेच सोम या बद्दल संशय उरत नाही.

**या** प्रकरणात सोमाबद्दल खालील सिद्धान्त मांडले आहेत.

१) सोम म्हणजे भांग. भांगेचे रोप असते. या रोपाची पाने कुटून त्याचा रस काढतात व त्याचे पान करतात. या रसालाच उद्देशून भांग हा शब्द वापरतात. पण याच रोपाची फुले वाळवून त्याची भुकटी धूम्रपानासाठी वापरली की तिला गांजा म्हणतात व पानावर साचणारी राळ खरवडून काढून धूम्रपानासाठी वापरली की तिला चरस म्हणतात. हे तिन्ही प्रकार ऋग्वेदात सोमाचे म्हणून वर्णिलेले आहेत.

२) सोमविषयक साऱ्या ऋचा सोम वनस्पती व चंद्र या दोहोंनाही लागू होतात.

## सोमाबद्दल इतर कल्पना

सोमाबद्दल इतरांनी जे तर्क केलेले आहेत त्यांचे खंडन करणे आवश्यक वाटत नाही. कारण ऋग्वेदातील सारी वर्णने आपल्याला सोम म्हणून अभिप्रेत असलेल्या वनस्पतीला लागू आहेत हे दाखविण्याचा प्रयत्न देखील न करता या कल्पना केल्या आहेत. ही सारी वर्णने लागू होतील असे भांगेचे रोप हीच एकमात्र वनस्पती आहे. 'सोमाला पाने व फांद्या नव्हत्या त्या अर्थी ते एक ओळंबे होते', असे ठोकून देण्यात आले आहे. पण सोमाला फांद्या, पाने व फुलेदेखील असल्याची वर्णने ऋग्वेदात आहेत.

## सोमाच्या फांद्या, पाने व फुले

### फांद्या

**वनस्पतिं पवमान मध्वा समंग्धि धारया**
**सहस्रवल्शं हरितं भ्राजमानं हिरण्ययम् ॥९/५/१०**

"हे सोमाधिष्ठित देवते, हजार फांद्यांच्या हिरव्या व सोन्याप्रमाणे दीप्तिमान् या वनस्पतीला मधाच्या धारांनी युक्त कर."

### पाने

**दिव्यः सुपर्णोऽवचक्षि सोम पिन्वन्धाराः कर्मणा देववीतौ ।**
**ऐन्दो विश कलशं सोमधानं, क्रन्दन्निहि सूर्यस्योपरश्मिम्॥१/१७/३३**

"हे उत्कृष्ट पर्णवान् सोमा यज्ञादि कर्मात देवांचे प्रिय करण्यासाठी धारा वाहवीत तू दैवी भासतोस. हे बिन्दुरूपा, तू सोम साठविणाऱ्या कलशात प्रवेश कर. खळखळ





ते म्हणजे चिलीम.

'ज्योतीचा कोश' या शब्दप्रयोगाने धूम्रपानासाठी पेटविलेली पूड सूचित होते. ही पूड कोशाची म्हणजे कळीची केलेली असते. कळी वाळवून तिला दगडाने कुटतात म्हणून तिला अद्रिमातरम् म्हटलेले आहे.

### चंद्राला उद्देशून

"हे चंद्रा, युद्धाला प्रेरित अश्वाप्रमाणे तू ढगाचे जन्मस्थान असलेल्या या आकाशाच्या कोशात विहार कर. अनंत व पावन करणाऱ्या या आकाशरूपी खजिन्यात ये. या अनंताच्या शिखरावर वर्षक असा तू धारक इंद्रासाठी आरूढ हो."

**यज्ञस्यकेतुः पवते स्वध्वरः सोमो देवानामुपयाति निष्कृतम् ।**
**सहस्रधारः परि कोशमर्षति वृषा पवित्रमत्येति रोरुवत्॥९/८६/७**

"हा उपासनेचा ध्वज यज्ञाला पवित्र करीत आहे. तो ब्राह्मणांच्या निष्कृतास म्हणजे कृतकृत्यतेसाठी येत आहे. सहस्रधारांचा तो कळीच्या भोवती परिक्रमा करीत आहे. हा वर्षक गुडगुड करीत शोधकाला पार करीत आहे."

कळीच्या भोवती म्हणजे वाळल्या कळीच्या चूर्णाभोवती सहस्रधार गुडगुड करीत येतो, हे वर्णन सोमाच्या पानांच्या रसाला मुळीच लागू होत नाही व ते वारंवार येते हे लक्षात ठेवले पाहिजे. उलट धूम्रपानातील वायुरूप सोमाला ते चांगले लागू होते.

### चन्द्राला उद्देशून

"हा उपासनेचा केतू व यज्ञाला शुभ बनविणारा वाहत आहे. तो ज्योतींचे स्थान जे आकाश तेथे प्रकट होत आहे. सहस्रधारांचा तो पृथ्वीचे आवरण जे आकाश त्यात परिभ्रमण करीत आहे. साऱ्या शोधकावर मात करीत व आपल्या ज्योत्स्नेचे सूर पसरीत हा वर्षक येत आहे."

**प्र तु द्रव परि कोशं निषीद नृभिः पुनानो अभि वाजमर्ष ।**
**अश्वं न त्वा वाजिनं मर्जयन्तोऽच्छा बर्ही रशनाभिर्नयन्ति॥ ९/८७/१**

"हे सोमा वाहा व कळीच्या भोवती वास कर. नरांनी शुद्ध केलेला तू बलप्रदान कर. अश्वाप्रमाणे तुला धूत अंगुलींच्या साहाय्याने शुद्ध केलेल्या तुला मानव अग्नीप्रत नेतात."

दहा अंगुलींत धरून सोमाचे धूम्रपान करणे म्हणजे त्याला अग्नीप्रत नेणे. सोमाला

अंगुलींनी शुद्ध करणे हे वर्णन फक्त गुडगुडीतल्या सोमाला लागू होते. रसरूप सोम अंगुलींनी शुद्ध केला जात नाही.

**चंद्राला उद्देशून**

"हे चंद्रा, वाहा व आकाशरूपी आवरणात निवास कर. मानवांनी स्तुतीने पुनीत केलेला तू बलप्रदान कर. किरणांनी तुला घोड्याप्रमाणे धूत दीप्तीप्रत नेतात." (चंद्राची दीप्ती सूर्याच्या व इतर स्वयंप्रकाशी ताऱ्यांच्या किरणांनी सिद्ध होते.)

**परि कोशं मधुश्च्युतमव्यये वारे अर्षति।**
**अभि वाणीर्ऋषीणां सप्त नूषत ॥९/१०३/३**

"हा सोम ज्यात वारा फुंकला जातो त्या आवरणात म्हणजे गुडगुडीत मधुस्रावी कळीभोवती पिंगा घालतो. ऋषींच्या सात प्रकारच्या छंदातली वाणी त्याची स्तुती करते.

**चंद्राला उद्देशून**

"अनन्त आवरणातील (आकाशातील) मधुस्रावी खजिन्यात; (आकाशस्थ ज्योतींच्या किरणात) हा सोम विहार करतो. त्याला ऋषींची सात छन्दातली वाणी स्तविते."

**प्र सोम देववीतये सिन्धुर्न पिप्ये अर्णसा ।**
**अंशोः पयसा मदिरो न जागृविरच्छा कोशं मधुश्च्युतम् ।**
**९/१०७/१२**

"हे सोमा, पाण्याने पूर्ण केल्या जाणाऱ्या समुद्राप्रमाणे देवांच्या प्रीतीसाठी पाण्याने तुझे सामर्थ्य वाढविले जाते. ज्योतिर्मय पाण्याने तू मधुस्रावी कळीप्रत मदकारकतेने जागृत होतोस."

ज्योतिर्मय पाणी हा गुडगुडीचा उल्लेख आहे.

**चंद्राला उद्देशून**

"हे सोमा, आटलेली नदी जशी पाण्याने पुनः भरते तसा देवांच्या प्रीतीसाठी तू पुनः पुनः पूर्ण होतोस. आकाशाच्या मधुस्रावी खजिन्यात तू आपल्या दुधाळ कांतीने मदकारक व जागृत आहेस."

सोम हे रोप आहे, ते ओळम्बे व लतादेखील नाही, हे साऱ्या वर्णनावरून स्पष्ट असता सोमवल्ली असा शब्द कधी कधी वापरतात. हा शब्द ऋग्वेदात कुठेही नाही.





सोम ही ऋग्वेदातील एक महत्त्वाची देवता आहे. ऋग्वेदाचे नववे मंडल सोमविषयक सूक्तांनी भरलेले आहे व सोमाला वाहिलेली निदान अर्धा डझन सूक्ते इतर मंडलांतूनही विखुरलेली आढळतात. सोमाचा रस विधिपूर्वक प्राशन केला जात असे. इतर देवतांप्रमाणेच सोमावरही व्यक्तित्वारोप केलेला आहे. सोम हजार अग्रांचा दंड व धनुष्य ही शस्त्रे धारण करतो. तो इन्द्राबरोबर रथात बसतो. या रथाचे घोडे वायुरूप असतात. सोमाचे दिवसातून तीन वेळा सवन म्हणजे दोहन होत असे. सकाळी व दुपारी इंद्रासाठी व संध्याकाळी ऋभूसाठी.

सोम हा शब्द सू धातूपासून निघालेला आहे. सू म्हणजे पिळणे वा शिंपणे. सोमवनस्पतीचा रस काढण्याच्या क्रियेला पिळणे हा अर्थ लागू होतो व सोमाच्या म्हणजे चंद्राच्या प्रकाश वितरणाला शिंपणे हा अर्थ लागू होतो. ("चांदणे शिंपीत जाशी, चालता तू मंजुळे.")

सोम म्हणजे काय ते उत्तरकालीन आयुर्वेद ग्रंथांना माहीत नसल्यामुळे त्यांनी सोम ही चन्द्राच्या कलांबरोबर फुलणारी व क्षीण होणारी एक वनस्पती आहे, अशी जगात कुठेच अस्तित्वात नसलेल्या वनस्पतीची कल्पना केली. सोम ही भारतात मिळणारी वनस्पती नाही, असे म्हणण्यास यामुळे अवकाश सापडला. त्यातून ऋग्वेदातील पुढील ऋचा, ऋग्वेदात नेहमी अभारतीय गोष्टी शोधण्याची प्रतिज्ञा करून बसलेल्या आर्याक्रमणवाद्यांच्या मदतीस धावली :-

**सोमं मन्यते पपिवान्यत्संपिंशन्त्योषधिम्।**
**सोमं यं ब्रह्माणो विदुर्न तस्याश्नाति कश्चन ॥१०/८५/३**

"एखादी औषधी कुटणाऱ्यांना (व तिचा रस पिणाऱ्यांना) आपण सोम पितो आहोत असे वाटते. पण जो सोम ऋत्विज पितात त्याचा (अंशही) कुणाला प्यायला मिळत नाही."

येथे 'विदुः' याचा अर्थ 'जाणत होते' असा भूतकालवाचक करून आजकाल सोमाचे कुणाला ज्ञान नाही असा अर्थ करण्यात आला आहे. पण विदुः हा 'लटो विदो वा' या सूत्राप्रमाणे वर्तमानकाळ आहे, भूतकाळ नाही. तेव्हा ही ऋचा लिहिणाऱ्याच्या काळीदेखील ऋत्विज खरा सोम पीत होते. सोम लुप्त झालेला नव्हता.

या ऋचेचा रोख असा आहे :-

ज्याप्रमाणे समाजमान्य रीतीने विवाहात स्त्रीसमागम करणे हा धर्म आहे, त्या

बाहेर करणे हे पाप आहे, त्याचप्रमाणे सोम हा धार्मिक विधीतच प्यायला तर ती सोमोपासना होते नाहीतर ती नशा ठरते.

या ऋचेवर भाष्य करताना चंद्राच्या कला पिणारे देवच फक्त खरा सोम पितात (म्हणजे सोमयाग करणारे ऋत्विज सोम पिण्याचे नुसते नाटक करतात) असा सायण अर्थ करतो. पण 'ब्रह्माणः' म्हणजे देव हा अर्थ सरळ नाही.

'सोम मिळाला नाही तर पूतिक वापरावे' असे धर्मशास्त्रात सांगितले आहे. पूतिक म्हणजे रानशेर. यात सोमाच्या वर्णनात सांगितलेले कोणतेच गुणधर्म नाहीत. ते बेचव असते, त्यात कोणतीही मादकता नसते. तेव्हा 'सोमाच्या ऐवजी पूतिक वापरा' हे पूतिकात सोमाचे गुण आहेत म्हणून सांगितलेले नसून' बायको नसेल तर धार्मिक विधीत सुपारी ठेवावी' याप्रमाणे आपद्धर्म म्हणून सांगितलेले आहे.

''सोम मिळाला नाही तर'' याचा अर्थ सोम लुप्त झाला होता असा होत नाही. सोमाला फार मागणी असल्यामुळे व तो मुंजावत् पर्वतासारख्या दूरच्या ठिकाणाहून आणावा लागत असल्यामुळे कधीकधी तो मिळणे दुष्कर असे. तसे यज्ञमंडपात सोमाचे भारे ठेवलेले असत. त्यांची कधीकधी चोरी होत असे व ऐन यज्ञाचे वेळी सोम उपलब्ध नसे. पण मुहूर्त टळू नये म्हणून ठरल्या वेळेस पूतिकाच्या साहाय्याने यज्ञ सुरू करीत.

दुसऱ्या महायुद्धात साखर दुर्मिळ झाली होती व त्यामुळे काही लोक साखरेऐवजी गूळ वापरीत. यावरून ''दुसऱ्या महायुद्धाच्या काळी भारतीयांनी जेथे साखर उपलब्ध नव्हती अशा ठिकाणी स्थलांतर केले होते'' असे अनुमान निघत नाही.

''सोम म्हणजे काय याची आठवण लुप्त होण्याचे कारण काय?'' असा प्रश्न कधी कधी विचारण्यात येतो. याचे उत्तर फारसे अवघड नाही. सोमच नव्हे तर वैदिक ऋचांचा काय अर्थ होतो हे ज्ञानदेखील यास्काच्या काळी लुप्त झाले होते व वेदांचे अर्थ करणारे ऐतिहासिक, याज्ञिक, नैदान व नैरुत्तिक असे चार पंथ निर्माण झाले होते. कौत्सासारखे काही विद्वान् तर वेदांच्या ऋचांना काही अर्थच नाही असे म्हणत असत. वेदांबद्दल जर एवढे अज्ञान उत्तरकाली होते तर त्यातील सोम ही काय चीज आहे याचे ज्ञान लुप्त झाले होते, यात आश्चर्य करण्यासारखे काय आहे? सोमाच्या धूम्रपानाचे आणखी उल्लेख -

**तमीं हिन्वन्ति अग्रुवो धमन्ति बाकुरं दृतिम्, त्रिधातु वारणं मधु॥**

९/१/८





## वनस्पतीला उद्देशून

''या सोमाला बोटांनी प्रेरित करतात. (चिलीम ओढताना दहाही बोटांची फुंकणी करतात.) त्याची कांतिमान् त्वचा (बाकुर दृती ती हीच) फुंकतात. (धमन्ति) असा हा तीन प्रकारचे धातु (म्हणजे ज्या द्रव्यापासून पेय सोम तयार करतात त्या भांग, गांजा व चरस या तीन रूपातला (ग्लानी) निवारण करणारा वा संरक्षक कवचासारखा मधु म्हणजे गोड पदार्थ आहे.''

सायण बाकुर हे भासुरचे रूप मानतो. ग्रिसवल्ड[२] म्हणतो की, बाकुर या शब्दाला भासुराचे रूप मानणे भाषाशास्त्राला धरून नाही व म्हणून तो बाकुरची व्युत्पत्ती वच् पासून लावतो व त्याचा अर्थ 'आवाज करणारा' असा देतो. हे एक ठोकून दिलेले विधान आहे. ब चा भा व भ चा ब तसेच क चा स व स चा क होणे ही शब्दव्युत्पत्तीत नेहमीच सापडणारी गोष्ट आहे. उलट बाकुरची व्युत्पत्ती वच् पासून सांगणे हा द्राविडीप्राणायाम आहे.

सेंटर आणि केंद्र व सीझर आणि कैसर यात स व क ची अदलाबदल झाली आहे. भ-स-ब-ची अदलाबदल संस्कृत भंग म्हणजे भांग व आवेस्त्यातील बंह म्हणजे भांग तसे संस्कृत भरणी व मराठी बरणी यात झाली आहे.

यावरून सेंटर हे केन्द्राच्या व बंह हे भांगेच्या आधीचे आहे, असे अनुमान काढता येणार नाही. कारण समिती व कमिटी, बाहेर व भाइर. ही उलट उदाहरणे उपलब्ध आहेत. शब्दातील बदल एकाच दिशेने होत नसून चक्राकार असतात. कोट लांब लांब होता होता पुनः आखूड होत जातात. आधी जोडाक्षरांच्या जागी शुद्ध अक्षरे वापरण्याची प्रवृत्ती असते. पण नंतर साध्या अक्षराच्या जागी जोडाक्षरे वापरण्याची प्रवृत्ती होते. जसे संस्कृत व्रणचे मराठी वण व क्षीणचे शीर्ण होते. याच्या उलट शापचे श्राप व विमुखचे विन्मुख होते.

## चंद्राला उद्देशून

''किरणे या जणू चंद्राच्या अंगुली आहेत. (अग् हा धातू गतिवाचक आहे. त्यामुळे ही किरणे सर्वत्र संचार करतात हे द्योतित होते.) ही किरणे, अंगुली चिलमेला वेष्टितात त्याप्रमाणे चंद्राला वेष्टितात व फुंकर घालून घालून ते जणू चंद्राची बाकुर दृती म्हणते ज्योत्स्नेचा संचार, कांतिमान् करतात. असे हे त्रिधातू म्हणजे तीन स्थानी

राहणारे (सायण) संरक्षक मधु आहे.''

चंद्राची तीन स्थाने म्हणजे पूर्व क्षितिज, खमध्य व पश्चिम क्षितिज. अर्थात् हे पौर्णिमेच्या चंद्राचे वर्णन आहे.

हाच अर्थ पुढील ऋचेत व्यक्त झाला आहे :-

**एतमु त्यं दश क्षिपो मृजन्ति सप्त धीतयः । स्वायुधं मदिन्तमम्।।**

९/१५/८

**वनस्पतीला उद्देशून**

''या मादक व आयुधांनी म्हणजे साधनांनी सज्ज सोमाला सात ऋत्विज दहा अंगुलींनी (बंदिस्त करून) तीक्ष्ण करतात.'' (मृज् म्हणजे तीक्ष्ण करणे : आपटे). दहा अंगुलीत चिलमीतील सोमाला बंद करून फुंकर मारल्यानेच त्याची परिणामकारकता वाढते.)

**चंद्राला उद्देशून**

क्षिप् म्हणजे फेकणे वा शिंपणे. ''किरणरूप दहा अंगुली चंद्राला (प्रकाशाने) धुऊन काढतात. सात ऋत्विज मंत्रांनी त्याला तेजस्वी बनवितात.'' म्हणजे एका अर्थी धुऊन काढतात. (मृज् म्हणजे धुणे)

**याच कल्पनेचा विस्तार**

**यमत्यमिव वाजिनं मृजन्ति योषणो दश । वने क्रीडन्तमत्यविम् ।।**

९/६/५

**वनस्पतीला उद्देशून**

''पाण्यात खेळणाऱ्या व श्रेष्ठ वायुरूप असलेल्या; (अवि म्हणजे पाणी : आपटे) वा मेंढीच्या लोकरीचे कापड जिच्या तोंडावर गुंडाळलेले आहे अशा चिलमेतून गाळून निघालेल्या या सोमाला दहा अंगुली अतिगामी घोड्याप्रमाणे तीव्र करतात.''

'अवेवरिषु' म्हणजे ''मेंढीच्या लोकरीने केलेल्या कापडात'' असे उल्लेख ऋग्वेदात ठिकठिकाणी आहेत.

धूम्रपानाचा धूर पाण्यातून काढण्याची गुडगुडीची प्रक्रिया येथे विवक्षित दिसते. घोड्याची उपमा वेगासाठी नसून त्याच्या सामर्थ्यासाठी आहे.





**चंद्राला उद्देशून**

''वनात म्हणजे (आकाशस्थ ज्योतींच्या समूहात) अतिगामी घोड्याप्रमाणे वातावरणाच्या वर क्रीडा करणाऱ्या या चंद्राला त्याच्या दहा (दिशारूपी) योषिता न्हाऊ घालीत आहेत.''

चंद्र वातावरणाच्या वर आहे कारण द्यौ ही अन्तरिक्षाच्या वर आहे ही कल्पना ऋग्वेदात अनेक ठिकाणी आली आहे.

**समिद्धो विश्वतस्पतिः पवमानो विराजति प्रीणन् वृषा कनिक्रदत्।।**

९/५/१

पेटणारा, वाहणारा, वर्षणारा हा सर्वांचा पती गुडगुड करीत व सुखवीत विराजमान होत आहे.

समिद्ध म्हणजे पेटलेला, कनिक्रदत् म्हणजे गुडगुडणारा व पवमान म्हणजे वायूसारखा वाहणारा, ही विशेषणे धूम्रपानातील सोमालाच लागू होऊ शकतात. रसरूप सोम गुडगुड आवाज कसा करील?

**चंद्राला उद्देशून**

''हा प्रकाशणारा, आमंत्रिणारा, (क्रन्द आह्वाने) (प्रकाश) वर्षिणारा वाहणारा (आकाशात संथपणे मार्गक्रमण करणारा) विश्वाचा पती विराजत आहे.''

**असर्जि स्कम्भो दिव उद्यतो मदः परि त्रिधातुर्भुवनान्यर्षति ।**

**अंशु रिहन्ति मतयः पनिप्नतं गिरा यदि निर्णिजं ऋग्मिणो ययुः ।।**

९/८६/४६.

जर ऋचापाठकांना पठण करता करता राळ सापडली तर हा (आमचा) आधार निर्माण झाला. ज्योतीचा मद उसळला, हा तीन द्रव्यांचा सोम साऱ्या भुवनामध्ये संचार करू लागला व मने गुडगुडणाऱ्या ज्योतीचा स्वाद घेऊ लागली.

या ऋचेतील 'निर्णिजम्' हा शब्द महत्त्वाचा आहे. निर्णेज म्हणजे खरवडणे. अर्थात् निर्णिक् म्हणजे खरवड. सोमाची योग्य ती पाने खरवडल्याने त्या पानावर राळेसारखा जमलेला चरस मिळतो. हा फक्त काही पानावर व अत्यंत थोडा असतो त्यामुळे ऋचांचा पाठ करीत तासन् तास खरवडल्याने थोडा फार मिळतो.

**चंद्राला उद्देशून**

(सोमविषयक ऋचांच्या) ''पठणाने जर या रूपाची प्रतीती आली तर हा ज्योतीचा आधार निर्माण झाला (चंद्र हा रात्री चमकणाऱ्या ज्योतीत सगळ्यात मोठा दिसत असल्यामुळे तो त्यांचा पती वा आधार समजला जातो.) मद उसळू लागला. हा (पूर्वपश्चिम क्षितिजे व खमध्य या तीन स्थानी राहणारा (म्हणजे पौर्णिमेचा) चंद्र संचार करतो आहे. मने याच्या आवाहन करणाऱ्या ज्योत्स्नेचा आस्वाद घेतात.''

निर्णिज या शब्दाचा रूप व धातू या शब्दाचा स्थान व ''पनिप्नतम्'' चा बोलावणाऱ्या असे अर्थ सायणाने दिले आहेत.

**पवमान धिया हितो, अभि योनिं कनक्रिदत्, धर्मणा वायुमाविश**
**(९/२५/२)**

''हे वायुरूप सोमा, अंगुलींमध्ये धारण केलेला व गुडगुड करीत आपल्या स्थानाकडे (म्हणजे नळीकडे) जाणारा तू आपल्या गुणांनी श्वासात प्रवेश कर.''

**चंद्राला उद्देशून**

''हे तरंगणाऱ्या व आमच्या ध्यानाचा विषय असलेल्या व स्वतःचे उत्पत्तिस्थान जे आकाश त्यात आवाहन करीत हिंडणाऱ्या सोमा, वायुमंडलाला गुणांनी भरून टाक.''

खालील ऋचेत सोमाच्या पानातून चरसाची राळ काढण्याच्या क्रियेचे वर्णन आहे.

**अभि क्षिपः समग्मत मर्जयन्तीरिषस्पतिम्। पृष्ठा गृभ्णत वाजिनः।**

''इच्छानाथ व बलदायक अशा सोमाचा पृष्ठभाग धरीत तो पुसण्यासाठी अंगुली जुळल्या आहेत.''

**चंद्राला उद्देशून**

(सूर्याच्या किरणरूपी) ''अंगुली इच्छानाथ व बलदायी चंद्राला धुण्यासाठी त्याचे पृष्ठ धरून जुळल्या आहेत.''

**सोमाचे परिणाम**

गांजारूपातील भांग कामोत्तेजक असते. हेच पुढील ऋचेत सोमाबद्दल म्हटले आहेः-





**एष शृंगाणि दोधुवच्छिशीते यूथ्यो वृषा, नृम्णा दधान ओजसा ॥**
**९/१५/४**

''हरिणीच्या कळपातील काळवीटाप्रमाणे हा सोम आपल्या ओजस्वी पौरुषाने परजलेली शिंगे धारण करीत शिवशिवला आहे.''

''भांगेच्या सेवनाने संगीत अधिक भरघोस वाटते.''[१] याचे वर्णन असे केले आहे.

**उत्ते शुष्मास ईरते सिन्धोरुर्मेरिव स्वनः वाणस्य चोदया पविम् ॥**
**९/५०/१**

''हे सोमा, तुझ्या शक्ती समुद्राच्या लाटांप्रमाणे स्वरित होतात. तू वेताच्या पाव्याला स्फुरित कर.''

चंद्राला उद्देशून काही श्लेष न करता हेच वर्णन सरळ लागू पडते. समुद्राच्या घोषाप्रमाणे चंद्राचा प्रकाश वातावरणात घुमतो व ज्योत्स्नेने नहात असताना बासरीचे स्वर अधिक मधुर लागतात, हे रासक्रीडेच्या वर्णनावरून प्रसिद्ध आहे.

**स नो अद्य वसुत्तये क्रतुविद्गातुवित्तमः॥ वाजं जेषि श्रवो बृहत्॥**
**९/४४/६**

''कर्मज्ञात्या व गानकुशल सोमा तू आम्हाला धनलाभ व्हावा म्हणून महान् कीर्ती व बल यांच्यावर जय मिळव.''

सायण गातु याचा अर्थ मार्ग असा करतो. पण 'गा' या धातूचा अर्थ गाणे, असा देखील मैक्डोनलने दिला आहे. त्यामुळे व्याकरणदृष्ट्या 'गायन' हा अर्थ 'मार्ग' या अर्थाइतकाच समर्थनीय आहे. सोमऋचातील श्लेषप्रियता लक्षात घेता गाणे व मार्ग हे दोन्ही अर्थ विवक्षित दिसतात. गानकुशल सोम कर्माचा योग्य मार्ग जाणतो असा अर्थ निष्पन्न होतो.

**अपाम सोमममृता अभूम अगन्म ज्योतिरविदाम देवान् ॥ ८/४८/३**

''आम्ही सोम प्यालो. आता आम्ही अमर झालो. आम्हाला प्रकाश दिसला. आम्ही देवांना जाणले.''

कोलमनने[१] भांगेचा परिणाम पुढीलप्रमाणे वर्णिला आहे :-

''उंचावल्याची, उत्साह व सर्व कुशल असल्याची, ज्ञानेन्द्रियांची कार्यक्षमता वाढल्याची, सुखद स्वस्थतेची व कधी कधी तरंगण्याची व आपल्याला सृष्टीचे गूढ

उकलले असल्याची भावना पिणाऱ्याला अनुभवास येते.''

**चंद्राला उद्देशून**

चंद्र ही देवता मानल्यावर त्याला यासारख्या प्रार्थना करणे युक्तच आहे.

**तनूनपात्पवमानः शृङ्गे शिशानो अर्षति । अन्तरिक्षेण रारजत्॥**

९/५/२

''हा अग्निरूप, वाहणारा व अन्तश्चक्षूंनी विराजणारा सोम शिंगे तीक्ष्ण करीत येत आहे.''

सोमपान केल्यावर शिंगांची खाज शमविण्यासाठी खडकावर धडका मारणाऱ्या सांडाप्रमाणे अंगात उत्साह संचारतो, असे सूचित केले आहे. ही शिंगे सोमरसाची शिंगे नसून सोम पिऊन सांडाप्रमाणे माजलेल्या पुरुषाची शिंगे आहेत.

**चंद्राला उद्देशून**

''धावणारी अग्निरूप व शिंगे म्हणजे कोरीला तीक्ष्ण टोके असलेली चंद्रकला अंतरिक्षात विराजते आहे.''

भांगेच्या सेवनाने रंग अधिक कांतिमान दिसतात, असे कोलमन[१] सांगतो. सोमपानानेही तसेच होते असे खालील ऋचेत सांगितले आहे:-

**पवमानः असिष्यदद्रक्षांस्यपजंघनत्, प्रत्नवद्रोचयन्रुचः ।९/४९/५**

''नेहमीप्रमाणेच कांतींना अधिक कांतिमान् करीत व राक्षसांना मारीत सोम ओसंडला आहे.''

भांगेचा परिणाम हळूहळू वाढतो व पिणारा वाचाल होतो[२], असे वैद्यकीय वर्णन आहे. हेच वर्णन खालील ऋचेत आहे :-

**हिन्वानो वाचमिष्यसि, पवमान विधर्मणि, अक्रान्देवो न सूर्यः॥**

**(९/६४/९)**

''हे सोमा गाळण्यातून गाळला जाणारा तू सूर्याप्रमाणे आमच्या वाणीला उत्तेजित करतोस.'' (सूर्याची उपासना केल्याने वाणी प्रगल्भ होते.)

**चंद्राला उद्देशून**

''हे तरंगणाऱ्या चंद्रा, सूर्य तुझ्या विरुद्ध म्हणजे पश्चिम क्षितिजावर असताना





(म्हणजे पौर्णिमेला) तू संवर्धित केला जाऊन त्या सूर्याप्रमाणेच आमच्या वाणीला उत्तेजन देतोस.'' (चांदण्यात जमलेल्या लोकांच्या भाषणांना बहर येतो.)

भांग शंकराला अत्यंत प्रिय आहे या चालू समजुतीचे मूळ खुद्द ऋग्वेदात आहे :-

**अयं सोमः कपर्दिने, घृतं न पवते मधु, आभक्षत्कन्यासु नः॥ ९/६७/११**

''आहुतीत दिलेल्या घृताप्रमाणे हा सोम शिवाला मधुर (पेय) पुरवितो तो आम्हास कन्यामध्ये प्राप्तव्य बनवो.''

**चंद्राला उद्देशून**

आकाश हे शिवाचे केस आहेत व त्याच्या कपाळावर चंद्र आहे या कल्पनेला अनुसरून ही ऋचा म्हणते :-

''हा चंद्र (व्योमकेशरूपी) शिवासाठी पाण्याप्रमाणे म्हणजे वैपुल्याने किंवा तुपाप्रमाणे शुभ्र ज्योत्स्नारूपी मधूचा वर्षाव करीत आहे. तो आम्हाला कन्यामध्ये प्राप्तव्य बनवो.'' (चांदण्या रात्री कामोत्तेजन होत असल्यामुळे अशी प्रार्थना)

खालील ऋचेत 'भंग' हा भांग या अर्थाचाच शब्द वापरून सोम म्हणजे भांग याबद्दल काही शंकाच ठेवलेली नाही.

**उपो षु जातमप्तुरं, भंगं गोभिः परिष्कृतं, इन्दुं देवा अयासिषुः॥ ९/६१/१३**

''अप्ने म्हणजे पाण्याने जो वाहतो व गवाने म्हणजे दुधाने परिष्कृत केला जातो त्या भंग नामक सुजात सोमाला देव म्हणजे यज्ञकर्ते प्राप्त करते झाले.''

**चंद्राला उद्देशून**

'अप्ला म्हणजे कर्माला प्रवृत्त करणाऱ्या व गवांनी म्हणजे किरणांनी परिष्कृत केलेल्या भंग म्हणजे अपूर्ण इन्दूला म्हणजे चंद्राला (सूक्तांचा विषय असलेले आकाशातील) देव प्राप्त करते झाले.''

सोमाला शिंगे नसतात. सोम प्यालेल्या पुरुषाला आपण हरिणींच्या कळपातील काळवीट आहोत अशासारखा जो अनुभव येतो त्याचे 'शिंगे शिवशिवणे' या शब्दप्रयोगाने वर्णन केले आहे.

## चंद्राला उद्देशून

"हा तारकांच्या कळपातील चंद्र तेजस्वी पौरुषाने धारण केलेली किरणरूपी शिंगे मिरवीत शिवशिवला आहे."

**अव्ये वधूयुः पवते परि त्वचि श्नथ्नीते नप्तीरदितेर्ऋतं यते ।**
**हरितक्रान्यजतः संयतो मदो नृम्णा शिशानो महिषो न शोभते॥ ९/६९/३**

"हा स्त्रीलिप्सु म्हणजे कामोत्तेजक, बकऱ्याच्या चामड्यात वाहतो आहे. तो यज्ञात येणाऱ्यासाठी अदितीच्या नातींना मृदु करतो. यज्ञकर्त्यांचा हा हरित व संयत मद पौरुषाने तीक्ष्ण झालेल्या महिषाप्रमाणे शोभतो."

**स्रक्वे द्रप्सस्य धमतः समस्वरन्नृतस्य योना समरन्त नाभयः ।**
**त्रीन्स मूर्ध्नो असुरश्चक्र आरंभे, सत्यस्य नावः सुकृतमपीपरन्॥ ९/१३/१**

"सोम फुंकणाऱ्याच्या ओठ व हनवटीच्या मधल्या भागात स्वररूप होऊन सारी सारभूत तत्त्वे विश्वात विहार करीत आहेत. हा जीवनोत्फुल्ल आपल्या तिन्ही शिरांना संचरणासाठी तयार करतो आहे. आता सत्याच्या नावा सत्कृत्ये पार करत्या झाल्या."

यात सोम फुंकला जात असे म्हणजे त्याचे धूम्रपान होत असे. याचा स्पष्ट उल्लेख आहे. भांगेच्या सेवनाने येणाऱ्या आध्यात्मिक अनुभूतीचे हे वर्णन आहे. फुंकल्या गेलेल्या सोमाचा धूप हे जणू संगीताचे बासरीतून निघालेले स्वर आहेत व त्याने विश्वाच्या नियमबद्धतेची नाभी म्हणजे गूढ उकलल्याचा अनुभव येतो. सोमाची तीन शिरे म्हणजे भांग, गांजा व चरस सोमाच्या सेवनाने नैतिक अनुभवदेखील येतो. सत्याची कास न सोडता सत्कर्मे करीत राहणे फार कठीण आहे. पण हे कठीण काम साधल्याचाही सोमपानाने अनुभव येतो.

## चंद्राला उद्देशून

"ओसंडणाऱ्या या सोमाच्या सूत्रामध्ये (स्रग्वन् म्हणजे सूत्र. न् ने अन्त होणाऱ्या शब्दांच्या 'न्' चा लोप होण्याची प्रवृत्ती आहे, जसे धर्मन् चे धर्म) म्हणजे किरणजालामध्ये स्वररूप धारण करणारी विश्वाच्या नियमबद्धतेची गूढे संचार करीत आहेत. हा जीवनोत्फुल्ल तीन शिरांना म्हणजे खमध्य, पूर्व क्षितिज व पश्चिम क्षितिज





यांना चक्राकार करतो म्हणजे या तीन स्थानी पुनः पुनः येतो. सत्याच्या नावा सुकृते पार करत्या झाल्या."

**एष स्य सोमः पवते सहस्रजिद्धिन्वानो वाचमिषिरामुषर्बुधम्।**
**इन्दुः समुद्रमुदियर्ति वायुभिरेन्द्रस्य हार्दि कलशेषु सीदति ॥ ९/८४/४**

"हा सहस्रजित् सोम उषा ज्याप्रमाणे विश्वाला जाग आणते त्याप्रमाणे बुद्धीला जागविणाऱ्या अशा वाणीचे प्रबोधन करीत वाहतो आहे. हा समुद्रांना म्हणजे मुद्रितमनस्कांना वायूने उत्साहित करतो. हे इन्द्राचे हृदयच जणू कलशात विराजत आहे."

कलशात विराजणे हे फक्त द्रवरूप सोमालाच लागू आहे असे नाही. गांजाचे वा चरसाचे चूर्ण देखील कलशात ठेवता येते. वायूचा उल्लेख मात्र धूम्रपानास उपयोगी पडणाऱ्या सोमालाच लागू होतो.

## चंद्राला उद्देशून

"हा सहस्रजित् चन्द्र प्रातःकालीन कमनीय स्तोत्रांना प्रेरित करीत विहार करतो आहे. हा इन्दु वायूच्या साहाय्याने समुद्राला उंचबळायला लावतो. हे इंद्राचे हृदयच जणू (पृथ्वीच्या) कळसावर चढविले आहे."

**स सूर्यस्य रश्मिभिः परिव्यत, तन्तुं तन्वानस्त्रिवृतं यथा विदे।**
**नयन्नृतस्य प्रशिषो नवीयसीः, पतिर्जनीनामुपयाति निष्कृतम्॥ ९/८६/३२**

"सूर्यकिरणांनी न्हालेला हा सोम, जाणण्यासाठीच जणू, तीन प्रकारचे तंतू पसरतो. या व्यवस्थेतल्या नवनवीन टोचण्या (शिष् म्हणजे hurt : आपटे). दूर करीत निर्मितीचा हा पती (शरीरात) योग्य ठिकाणी भिनतो."

सोमपानाने नवनवीन कल्पना सुचतात म्हणून त्याला 'प्रकृतिर्जनीनाम्' म्हटले आहे. तीन प्रकारचे तंतू म्हणजे भांग, गांजा व चरस. किडे ज्याप्रमाणे चाचपडण्यासाठी स्वतःच्या मिशीसदृश केसांचा उपयोग करतात त्याप्रमाणे सोम आपल्या तीन तंतूंचा उपयोग करून सृष्टीचे नवीन प्रकारे दर्शन घडवितो.

## चंद्राला उद्देशून

"हा सूर्याच्या किरणांनी वेष्टीलेला आहे. तो सृष्टीचे ज्ञान करून घेण्यासाठी आपले त्रिपरिमाणात्मक किरणजाल पसरतो. (चंद्राच्या चारही बाजूंनी किरण निघताना दिसले की ते सपाट पृष्ठभागावरील सारखे दिसत नसून तीन परिमाणे असल्यासारखे

दिसतात.) ''सृष्टीच्या उरलेल्या म्हणजे न पाहिलेल्या भागाचा वेध घेत हा जीवसृष्टीचा पती (चंद्रामुळे वनस्पती फुलतात व वनस्पतीमुळे बाकी सारे जीव जगतात.) आपल्या निवासाप्रत चालला आहे.''

**साकमुक्षो मर्जयन्त स्वसारो दश धीरस्य धीतयो धनुत्रीः।**
**हरिः पर्यद्रवज्जाः सूर्यस्य द्रोणं ननक्षे अत्यो न वाजी॥ (९/९३/१)**

''दहा अंगुलीरूपी प्रेरक बहिणी एकमेकासह वर्षाव करायला लावून या सोमाला कुरवाळतात. त्यामुळे या पिवळ्या सोमाने सूर्याच्या साऱ्या निर्मितीचा वेध घेत अतिगामी घोड्याप्रमाणे सारे गतिमान् जग व्यापून टाकले आहे.'' (सोमाचा धूर जणू साऱ्या जगालाच वेष्टीत आहे.)

दहा अंगुलीत धरून चिलीम पिण्याच्या क्रियेचे हे वर्णन आहे. गतिमान् जग व्यापले आहे म्हणून गतिशील पदार्थही सोमाला मागे टाकू शकले नाहीत. असे सुचविले आहे. सोमाच्या प्रभावाने सारे जग सोममय दिसते.

**चंद्राला उद्देशून**

''दिशारूपी दहा प्रेरक बहिणी एकमेकासह वर्षाव करीत या चंद्राला कुरवाळतात. याने सूर्याच्या कन्या जे किरण त्यांच्यात स्नान केले आहे. वाहणाऱ्या पदार्थाला धारण करणाऱ्या द्रोणाप्रमाणे ज्योतींना धारण करणाऱ्या आकाशाला अतिगामी घोड्याप्रमाणे त्याने व्यापले आहे.''

अदितीच्या नाती-अदिती म्हणजे पृथ्वी. तिचा पुत्र म्हणजे वनस्पती, प्राणी इत्यादी जीव त्यांच्यापासून होणारे मध, दूध वगैरे पदार्थ या पृथ्वीच्या नाती. दुधात वा मधात सोम मिळसला की यांची उग्रता, उष्णता वगैरे नाहीशी होते. (भांगेला थंडाई म्हणतात.) दूध व मध हे पदार्थ उष्ण आहेत अशी समजूत आहे. त्यांना म्हणजे अदितीच्या नातींना सोम सौम्य करतो याचा हा अर्थ आहे.

**चंद्राला उद्देशून**

भांगेने समुद्राच्या लाटांवर झोके घेत असल्यासारखे वाटते. याचे वर्णन पुढील ऋचेत आहे :-

**परि प्रासिष्यदत्कविः सिन्धोरूर्मावधिश्रितः कारं बिभ्रत्पुरुस्पृहम् ॥ ९/१४/**





१

''स्पृहणीय अशी कर्मे धारण करणारा व कवित्व स्फुरविणारा हा सोम समुद्राच्या लाटांवर विराजमान झाल्यासारखा वाहतो आहे.''

**चंद्राला उद्देशून**

''हिमाचे कमनीय पुंज धारण केल्यासारखा व समुद्राच्या लाटांवर प्रतिबिंबिलेला हा चंद्र आसमंतात ओसंडतो आहे.''

सोमाने वाणी स्फुरते व कामोत्तेजन होते हे पुढील ऋचेत सांगितले आहे.

**अयं मे पीतः उदियर्ति वाचमयं मनीषामुशतीमजीगः ।**
**अयं षडुर्वीरमिमीत धीरो न याभ्यो भुवनं कच्चनारे ॥ ६/४७/३**

''प्याल्याने हा माझ्या वाणीला स्फुरण चढवितो व कामुक इच्छांना जागृत करतो. याने ज्याच्या प्रभावातून या जगात कोणीच सुटले नाही त्या काम, क्रोध, लोभ, मोह, मद, मत्सर या सहा महान् शक्तींना जन्म दिला आहे.''

सायण 'षडुर्वीः' याचा अर्थ 'षण्मोर्वीरंहसस्पान्तु' या वचनाच्या आधारे द्यौ, पृथ्वी, अहन्, रात्रि व औषधि असा करतो, पण यापैकी काहीही सोमवनस्पतीने वा चंद्राने निर्माण केलेल्या नाहीत. उलट चंद्र व सोम ही दोन्हीही षड्रिपु मानल्या गेलेल्या भावना निर्माण करण्यास समर्थ आहेत.

**चंद्राला उद्देशून**

चंद्रप्रकाशात ठेवलेल्या दुधात चंद्राचे अमृत उतरते, अशी आजही समजूत आहे. तिच्याच आधारे कवी म्हणतो :-

''या चंद्राचे पान केल्याने माझी वाणी स्फुरते व कामुक इच्छा जागृत होतात. यानेच ज्यांच्या प्रभावातून या भुवनात कोणीही मुक्त नाही, अशा सहा भावना निर्माण केल्या आहेत.''

**अयं स वो वरिमाणं पृथिव्या वर्ष्माणं दिवो अकृणोदयं सः ।**
**अयं पीयूषं तिसृषु प्रवत्सु, सोमो दाधारोर्वन्तरिक्षम्॥६/४७/४**

**चंद्राला उद्देशून**

''या सोमाने पृथ्वीचा विस्तार वाढविला व आकाशाला दृढ केले. तीन प्रवाही

तत्त्वात याने अमृत ओतले. सोमाने अंतरिक्ष धारण केले.''

रात्रीच्या अंधारात फक्त जवळचे दिसते व त्यामुळे पृथ्वीचा विस्तार आपल्या लेखी संकुचित होतो. चंद्राचा प्रकाश पसरला की तिचा विस्तार झाल्यासारखे वाटते. चंद्र हा तंबूचा कळस व त्याच्यापासून निघणारे किरण हे जणू दोर, यांनीच ज्योतिर्मय आकाश जणू धरून ठेवले आहे. म्हणून चंद्राने द्यौला दृढ केले असे म्हटले आहे. तीन वाहती तत्त्वे म्हणजे पाणी, प्रकाश व वायू. यात चंद्राने अमृत ओतले. चंद्रामुळे ही तिन्ही अत्यंत सुखद होतात. अंतरिक्ष म्हणजे वायुमंडळ. त्याला सूर्य हलवितो, कारण त्याच्या उष्णतेमुळेच वारे सुटतात. उलट चंद्राच्या शीतलतेमुळे ते स्थिर होतात.

सोमपानामुळे पृथ्वीचे श्रेष्ठत्व वाढते म्हणजे मन उत्साहित झाल्यामुळे सर्वच उत्साहप्रद दिसू लागते. द्यौला म्हणजे दीप्तीला याने सुंदर रूप : दिले; (वर्ष्म म्हणजे सुंदर रूप : आपटे) धूम्रपानासाठी पेटविलेले चूर्ण त्यातील सोमामुळेच सुखकारक होते. तीन वाहणाऱ्या तत्त्वात याने अमृत ओतले. ही तीन वाहणारी तत्त्वे म्हणजे भांग, गांजा व चरस. सोमानेच विशाल अशा अंतरिक्षाचे म्हणजे अन्तश्चक्षूचे धारण केले म्हणजे सोमपानामुळेच अंतरंगाच्या विशालतेचा अनुभव येतो.

सोमपानाचे वाईट परिणाम

**मा नः सोम संवीविजो मा वि बिभीषथा राजन् ।**

**मा नो हार्दि त्विषा वधीः ।।८/७९/८**

''सोमा तू आम्हास थरथरायला लावू नकोस; अशा रीतीने आम्हाला भिववू नकोस. तुझ्या दीप्तीने आमची हृदये आहत करू नकोस.''

गांजाच्या अति सेवनाने शरीराला कंप देणारा व्याधी होतो.[३] एक प्रकारचा अपस्मार होऊन बेशुद्धी व हृदय बंद पडून मृत्यू देखील होण्याचा संभव असतो. याच परिणामांचे हे वर्णन असल्यामुळे गांजा हा सोमाचाच प्रकार आहे याबद्दल शंका उरू नये.

## चंद्राला उद्देशून

निष्फल प्रेमात फसलेला पुरुष चंद्राला पाहून अधिकच व्याकूळ होतो व चंद्राला विनवितो,

''हे चंद्रा, तू माझ्या (विरहाग्नीवर) भाता चालवू नकोस. मला चिंतामग्न करू





नकोस. माझे हृदय आपल्या दीप्तीने आहत करू नकोस.''

## आवेस्त्यातील सोम

पारशी लोकांचा आवेस्ता हा ग्रंथ मॅक्डोनेलच्या मते ऋग्वेदाच्या ५०० वर्षे नंतर झालेला आहे. केवळ उच्चाराचे नियम लावून आवेस्त्याच्या व ऋग्वेदाच्या भाषेत अदलाबदल करता येऊ शकतो. एवढे दोहोंत साम्य आहे. म्हणजे संस्कृत/प्राकृतासारखे हे साम्य निकटचे आहे. आवेस्त्याची उपासनापद्धतीदेखील यज्ञप्रधान आहे. यामुळे आवेस्त्यात सोमाचा उल्लेख व त्याची वर्णने असल्यास त्यांचा ऋग्वेदातील सोमाचे स्वरूप समजण्यास उपयोग होऊ शकेल.


हौम शब्दाने आवेस्त्यात सोमाचा उल्लेख आहे. दोनदा हा शब्द वंहुश या शब्दाबरोबर वापरलेला आहे.

**वंहुश सोमो मज्धातो । यस्न १०/१७**


**नमो हौम वंहुश हौमो । यस्न ९/१६**

सेक्रेड बुक्समध्ये वंहुशचे भाषांतर good असे दिलेले आहे. पण वेन्दिदाद १५/१४, १९/४१ तील वंह व वंहुश हे सम्बद्ध शब्द आहेत. वंह ही गर्भपातासाठी वापरण्यात येणारी एक वनस्पती होती, असे तेथील वर्णनावरून दिसते. भांगेच्या बिया गर्भपातासाठी वापरतात, असे खेडोपाडी केलेल्या चौकशीवरून कळते.

शेवटी सोम म्हणजे भांगच याविषयी काहीच शंका राहू नये अशा एका निर्णायक पुराव्याचा उल्लेख केला पाहिजे. रॅग्युझेन[४] याने सोमाच्या ऋग्वेदातील वर्णनानुसार एक चित्र काढले. ते चित्र व भांगेच्या रोपाचे चित्र ही सोबत दिली आहेत. ही दोन चित्रे पाहून ती एकाच वनस्पतीची आहेत याबद्दल कोणाला शंका उरेल असे वाटत नाही.



भांगेच्या रोपाचे चित्र



ऋग्वेदातील वर्णनानुसार रॅग्युझेनने काढलेले चित्र

संदर्भ


१. Abnormal Psychology and Modern Life : James C. Coleman & William E. Boen,
२. Soma Hymns of the Regveda : S.S. Bhave
३. Materia Medical & Therapeutics : Rakaldas Gosh & B.H. Deare
४. Vedic India : Ranguzen


■ ■





...६...

# ऋग्वेदातील तथाकथित आर्य-अनार्य संघर्ष-१

There is no direct evidence for the Aryan invasion of India. In the text of the Rgveda where historical references are not rare, there is no mention anywhere of the fact of the migration nor any definite indication that it was even remembered.

Prof. T. Burrow (Sanskrit)

आर्य/अनार्यांच्या संघर्षांच्या वर्णनांनी ऋग्वेद भरलेला आहे अशी मिशनऱ्यांनी कंडी पिकवलेली आहे. वस्तुत: विशिष्ट जनसमूह या अर्थी ऋग्वेदात आर्य हा शब्द वापरलेलाच नाही. आर्य हे एक विशेषण आहे व त्याचा अर्थ मानवाला लावल्यास सभ्य असा आहे. पण तो नेहमी मानवालाच लावतात असे नाही. एका ऋचेत तो सोमाला लावला आहे.

वैदिक लोक गोरे व सरळ नाकाचे होते हे असे वेदात कुठेच वर्णन नाही. वैदिकांचे शत्रू त्यांच्या भाषेपेक्षा वेगळी भाषा बोलत होते असेही वर्णन आढळत नाही.

▶

**आर्य** नावाचा एक वंश भारतावर बाहेरून स्वारी करून आला व येथल्या आदिवासींचा उच्छेद करून त्याने आपली संस्कृती भारतावर लादली या 'इतिहासाला' खुद्द वेदवाङ्मयात पुरावा आहे असे नेहमी सांगण्यात येते. या पुराव्याचे मोल काय या प्रश्नाची येथे चर्चा करण्याचे योजले आहे.

अशी चर्चा करण्याआधी आर्य शब्दाने ऋग्वेदाला काय अभिप्रेत आहे याची चर्चा केली पाहिजे. कारण त्याशिवाय अनार्य म्हणजे कोण व त्यांच्याशी आर्यांचा संघर्ष झाला म्हणजे कुणाचा कुणाशी संघर्ष झाला याचा बोध होणार नाही.

## आर्य हे विशेषण व आर्य या देवता

आर्य हा शब्द ऋग्वेदात ३६ वेळा आला आहे. यात कुठेही आर्य म्हणजे कोण याचे स्पष्टीकरण नाही. एवढेच नव्हे तर ते नाम आहे की विशेषण आहे, नाम असल्यास एखाद्या लोकसमूहाचे नाव आहे की नाही याबद्दल निश्चित उल्लेख नाही.

१. **एते धामान्यार्या शुक्रा ऋतस्य धारया। वाजं गोमन्तमक्षरन्। ९.६३.१४.**
हे पांढरे व आर्य सोम ऋताच्या धारेने गोयुक्त धनाची पखरण करतात. सायणाने येथे आर्या म्हणजे आर्याणाम् अशी षष्ठी करून हे सोम आर्य यजमानांच्या धामाकडे म्हणजे गृहाकडे गोयुक्त धन नेतात असा अर्थ केला आहे. असा अर्थ केल्याने शुक्रा व एते या शब्दाशी आर्य हा शब्द मूळ वचनातल्याप्रमाणे समानाधिकरण राहत नाही. शिवाय यजमान हा शब्द पदरचा घालावा लागतो. तेव्हा आर्या हे सोमाचे विशेषण मानणेच सरळ आहे.

२. ऋजिश्व्याशी सख्य करून इंद्राने आपला रथ आकाशामध्ये सोडला व आर्य इन्द्राला दासाच्या तोडीस तोड सापडली. त्याने मायावी असुर पिप्रूची दृढ पुरे इतस्ततः विखरून दिली. १०.१३८.३.
येथे आर्य हे आकाशाच्या मध्ये आपला रथ सोडणाऱ्या इंद्र या देवाचे विशेषण आहे.

३. आर्य व्रते दानप्रद आहेत. ती साऱ्या जगभर पसरून सूर्याला आकाशात चढवितात व गायी, भूमी, अश्व, औषधी, वनस्पती, पर्वत व पाणी निर्माण करतात. १०.६५.११.





येथे आर्य हे व्रताचे विशेषण आहे.

पुष्कळ ठिकाणी आर्य हे विशेषण मानवांना उद्देशून न वापरता देवतांना उद्देशून वापरले आहे. उदा.-

अग्नी, वायू व सूर्य हे तीन भुवनामध्ये रेतसिंचन करतात. त्यातून ज्योती ज्यात पहिली आहे अशा तीन प्रकारच्या आर्य प्रजा उद्भवतात. हे तिघेही उषेशी संगत होतात. त्या सर्वांना वसिष्ठ जाणतात. ७.३३.७.

येथे उत्पन्न होणाऱ्या तीन आर्य प्रजांपैकी एक ज्योती म्हणजे सायणमते आदित्य आहे.

## वर्ण या शब्दाचा अर्थ

विशेषणरूप व देवतावाचक आर्य शब्द सोडून नामरूपाने वापरलेल्या आर्य शब्दाचा आता विचार करू. यापैकी आर्यवंशाचा ऋग्वेदात उल्लेख आबे हे सिद्ध करण्यासाठी नेहमी खालील ऋचेचा हवाला देण्यात येतो-

इंद्राने दस्यूंना मारून आर्य वर्णाचे रक्षण केले व घोडे, सूर्य, अनेक प्रकारचे भोग देणाऱ्या गायी व भूमी दिली. ३.३४.९.

येथे वर्ण या शब्दाचा वंश असा अर्थ करून या ऋचेत आर्य-अनार्य संघर्ष वर्णिलेला आहे असे प्रतिपादन करण्यात येते. पण वर्ण शब्दाचा अर्थ काहीही केला तरी इंद्राने सूर्य दिला या वचनावरून या ऋचेत कोणत्याही मानवसमूहांचा संघर्ष वर्णिलेला नाही हे स्पष्ट आहे. सूर्य ही अशी वस्तू आहे काय की एखादा समाज त्याचे हरण करू शकेल व दुसऱ्या समाजाला त्याच्याशी युद्ध करून तो परत मिळवावा लागेल?

वर्ण हा शब्द ऋग्वेदात इतरही ठिकाणी आला आहे व या शब्दाचा एक अर्थ रंग हा असल्यामुळे या शब्दात पाश्चात्त्य पण्डितांना घबाड सापडल्यासारखे वाटले आहे. वर्ण म्हणजे कातडीचा वर्ण असा अर्थ करून त्यांनी ऋग्वेदातील काळ्या-गोऱ्यांचा संघर्ष वर्णिला आहे. तेव्हा ऋग्वेदात हा शब्द कोणकोणत्या अर्थी वापरण्यात आला आहे हे पाहणे आवश्यक आहे.

सायणाच्या मते वर्ण हा शब्द वृ म्हणजे वरणे- निवडणे- या धातूपासून 'कृवृजृसिदृपन्यनिस्वपिभ्यो नित्' या उणादिसूत्रानुसार न प्रत्यय लावून झाला आहे. असेच अन्य शब्द वर्ण, जर्ण म्हणजे चंद्र वा जीर्ण झाड, सेना, द्रोण, पन्न, अन्न व

स्वप्न हे आहेत. कृ म्हणजे पसरविणे. कान पसरट असतो म्हणून त्याला कर्ण म्हणतात. जृ म्हणजे जीर्ण होणे. अर्थात जर्ण म्हणजे जराग्रस्त होणारा. चंद्राला क्षय होतो, व झाड जीर्ण होते म्हणून त्यांना जर्ण म्हटले आहे. सि म्हणजे बांधणे या धातूपासून सेना, कारण सेना सुबद्ध व सुसंघटित असते. सैनिकांना शिस्तीत बांधणारी असा देखील अर्थ असू शकेल. दृ म्हणजे वाहणे वा जाणे. अर्थात् द्रोण म्हणजे वाहविणारा. पत्न म्हणजे खाली पडणे. अन्न म्हणजे भात किंवा खाल्लेले व स्वप्न म्हणजे झोप किंवा स्वप्न.

यातील पुष्कळशा शब्दांत न प्रत्यय कर्तृवाचक आहे. वर्ण या शब्दात तो प्रयोजक कर्तृवाचक आहे असे सायण म्हणतो. अर्थात वर्ण म्हणजे निवड करविणारा. सायणाच्या मते १.१०४.२ या ऋचेत वर्ण हे विशेषण निवड करविणारा आहे. त्याचे गुण असे आहेत की स्तोते इतरांना सोडून त्यालाच भजतात.

वर्ण म्हणजे निवड करविणारा यावरून इतरापासून वेगळे करणारा व्यवच्छेदक गुणधर्म हा वर्ण शब्दाचा वास्तविक अर्थ स्पष्ट होतो. ब्राह्मणवर्ण, क्षत्रियवर्ण म्हणजे इतरांपेक्षा वेगळी असणारी कर्तव्ये करणारे विशिष्ट जातिसमूह. अर्थात आर्य-वर्ण म्हणजे आर्यांची कर्तव्ये करणारा जातिसमूह. ही कर्तव्ये म्हणजे यज्ञयागादी असे परंपरेनुसार ठरते.

व्याकरण सोडून कोशांचा आधार घेतला तरी वर्ण शब्दावरून वंशभेद सिद्ध होत नाही. अमरकोशाप्रमाणे ''वंशोऽन्ववायः सन्तानो, वर्णाः स्यूर्ब्राह्मणादयः'' माहेश्वरी टीकेत सन्तानपर्यन्त वंशवाचक शब्द व पुढे वर्णवाचक असे स्पष्ट करून वर्ण हा वंशवाचक शब्द नाही याबद्दल संशय ठेवला नाही. ''वर्णो द्विजादौ शुक्लादौ स्तुस्तौ वर्णं तू वाक्षरे'' या ओळीत वर्ण शब्दाचे रंग, स्तुती व अक्षर असे आणखी अर्थ दिले आहेत. वर्णाचा आणखी एक अर्थ आस्तरण असा देखील दिला आहे. हे आस्तरण नायकाला बसण्यासाठी हत्तीला सज्ज करताना घालतात असे माहेश्वरी टीका म्हणते. अर्थात निरनिराळे धनवान लोक आपाले वैशिष्ट्य दाखविण्यासाठी खास प्रकारची आस्तरणे करीत असले पाहिजेत. म्हणून वैशिष्ट्य दाखविणारे या अर्थी आस्तरणाला वर्ण म्हणत असतील.

मेदिनी कोशात वर्णाचे अर्थ ''वर्णो द्विजादिशुक्लादियशोगुणकथासु च। स्तुतौ वा न स्त्रियां भेदे रूपाक्षरविलेखने'' असे दिलेले आहेत. वर्ण म्हणजे ब्राह्मण, क्षत्रिय





वगैरे. पांढरा वगैरे रंग, यश, गुण, कथा व स्तुती, भेद, रूप, अक्षर व विलेखन. अर्थात् मेदिनी व अमर या कोशांप्रमाणे वर्ण या शब्दाचा वंश असा अर्थ होत नाही.

या दोन कोशांमध्ये दिलेल्या वर्ण या शब्दाच्या साऱ्या अर्थांची संगती त्याच्या पाणिनीय व्युत्पत्तीने सहज लागते. वर्ण म्हणजे व्यवच्छेदक असे व्युत्पत्तीने वर दाखविले आहे. शुक्लादिवर्ण इतर वर्णांहून, अक्षर इतर अक्षरांहून व स्तुती स्तुत्यर्ह व्यक्तीला इतर व्यक्तींहून वेगळे करते. मेदिनी कोशातील यश व गुण हे अर्थ याप्रमाणेच व्यवच्छेदक आहेत. कथा हा शब्द वर्ण शब्दाच्या वर्णन या रूपावरून आला आहे. कथावर्णन असा शब्दप्रयोग रूढ आहे. ''श्लेषे केचन शब्दगुम्फविषये केचिद्रसे, चापरेऽलंकारे, कतिचित्सदर्थविषये चान्ये कथावर्णने''- काही कवी श्लेषात, काही शब्दयोजनेत, काही रसपरिपोषात, काही अर्थगौरवात, तर काही कथावर्णनात निष्णात असतात असे हा श्लोकार्ध म्हणतो.

## वर्णाचा वंशाशी संबन्ध नाही

कोशात दिलेल्या वरील कोणत्याही अर्थी ब्राह्मणादी वर्णांना वर्ण हा शब्द लागू होतो. ज्ञान व पावित्र्य यांचे प्रतीक म्हणून ब्राह्मण वर्ण पांढरा, तेजस्विता व प्रहारशीलता यांचे प्रतीक म्हणून क्षत्रियवर्ण लाल असे संकेत प्रचलित आहेत. तेव्हा वर्ण या शब्दाचा रंग असा अर्थ केला तरी तो ब्राह्मणादी वर्णाच्या कातडीचा रंग होता असे त्यावरून ठरत नाही. वर्ण या शब्दाचा स्तुती असा अर्थ केला तरी ब्राह्मण ही ज्यांची स्तुती म्हणजे 'तारीफ' आहे तो, असा अर्थ लागतो. हिन्दीमध्ये 'आपण कोण?' असे विचारावयाचे असल्यास 'आपकी तारीफ?' असे विचारण्याची चाल आहे. येथे तारीफ म्हणजे नावगाव, धंदा वगैरे. वर्ण या शब्दाचा अक्षर असा अर्थ केला तरी ब्राह्मण ही ज्याची अक्षरे म्हणजे नाव आहे तो असा सरळ अर्थ निघतो. यश, गुण, कथा म्हणजे वर्णन, भेद व रूप या मेदिनीकोशात दिलेल्या इतर अर्थांची अशीच संगती लागते. तेव्हा साऱ्या संस्कृत वाङ्मयात वर्ण हा शब्द दूरान्वयानेसुद्धा वंश या अर्थी कुठेही वापरलेला नाही असे म्हणण्यास हरकत नाही.

आपट्यांच्या कोशात वर्ण या शब्दाचा रेस म्हणजे वंश असा अर्थ दिलेला आहे. पण या अर्थी संस्कृत साहित्यात तो कुठे वापरलेला आहे याचा संदर्भ दिलेला नाही. काइण्ड, स्पीसीज, असा अर्थ देऊन सवर्ण अक्षर हा शब्दप्रयोग त्याच्या समर्थनार्थ

दिला आहे. पण अक्षरांच्या सवर्णतेचा रेसशी म्हणजे वंशाशी काही संबंध नाही. एकूण आपट्यांच्या कोशात दिलेला वर्ण या शब्दाचा रेस हा अर्थ पाश्चात्त्य पण्डितांच्या प्रभावाचा द्योतक आहे. प्राचीन कोशात असा अर्थ दिलेला नाही, यावरून हे स्पष्ट आहे.

ब्राह्मणादि वर्ण मुळात निरनिराळ्या रंगांचे होते म्हणून त्यांना वर्ण म्हणतात असा पाश्चात्त्य पंडितांचा एक तर्क आहे. चार वर्ण हे भिन्न वंशाचे व एकमेकाशी विवाहसंबंध न करणारे होते असे मानले तर फक्त पुरोहितगिरी करणारा एक वंश होता. दुसरा वंश फक्त लढण्याचे काम करणारा होता. तिसरा फक्त व्यापार करणारा होता व चौथा फक्त सेवा करणारा होता असे मानावे लागेल. फक्त एकच धंदा करणारा कोणताही समाज असू शकत नाही, त्या अर्थी मुळात एकेकच धंदा करणारे वंश इतर धंदे करणाऱ्या इतर वंशांच्या सान्निध्यात आले व या क्रमाने चार वर्ण उद्भवले ही कल्पना हास्यास्पद आहे.

वर्ण हा शब्द ऋग्वेदात आणखी खालील ठिकाणी आला आहे.

१. प्रजा, अपत्य व बल याची इच्छा करणारा अगस्त्य, खणत्याने खणून दोन्ही वर्णाचे संवर्धन व आपले देवताविषयक आशीर्वाद सत्य करता आला. १.१७९.६.

येथे काम व तप हे दोन वर्ण आहेत असे सायण म्हणतो. पण त्याने याला प्राचीन आधार दिलेला नाही.

हे दोन वर्ण म्हणजे काळे व गोरे असे पाश्चात्त्य पंडितांच्या पावलावर पाऊल ठेवून चित्रावशास्त्री म्हणतात. पण याला ऋचेत काहीच आधार नाही. उलट अगस्त्याने दोन्ही वर्णांचे हित केले असे ऋचा म्हणते. पण पाश्चात्त्य पंडितांच्या मते काळे व गोरे हे दोन वर्ण परस्परांचे शत्रू होते.

येथे देखील वर्ण शब्द रूढ अर्थानेच घेतला पाहिजे. वर्ण म्हणजे विशिष्ट कर्म करणारे लोक.

आता चार वर्ण प्रसिद्ध असता येथे दोनच वर्णाचा उल्लेख कसा, असा प्रश्न उद्भवतो. शिवाय दोन वर्णांचा उल्लेख द्वौ या शब्दाने न करता उभौ शब्दाने केला आहे. उभ म्हणजे केवळ दोन नव्हे. इंग्रजीत बोथ म्हणजे दोघेही या शब्दाने व्यक्त होणारा अर्थ उभ शब्दाने व्यक्त होतो. दोघाहून तिसरा जिथे नाहीच तिथेच फक्त दोन या अर्थी उभ शब्दाचा तो उपयोग होतो. तेव्हा या ऋचाकाराला दोनपेक्षा जास्त वर्ण





माहीत नव्हते असे म्हटले पाहिजे.

मग हे दोन वर्ण कोणते? ऐहिक व पारलौकिक कर्मे करणारे असे पूर्वी वर्णाचे दोनच वर्णात विभाजन असावे. पारलौकिक कर्मे म्हणजे पौरोहित्य, अध्यात्मचिन्तन वगैरे करणारे ते ब्राह्मण व बाकी युद्धकर्मापासून तो झाडलोटीपर्यन्त सारी ऐहिक कामे करणारे. ऐहिक कामे करणाऱ्यांमध्ये क्षत्रिय, वैश्य, शूद्र वगैरे भेद पुढे पडले असावे.

ब्राह्मणाव्यतिरिक्त इतरांना एकाच वर्णात घालून दोन वर्ण मानण्याची प्रवृत्ती 'कलावाद्यन्तयोः स्थितिः' -कलियुगामध्ये फक्त दोनच वर्ण आहेत- या उत्तरकालीन वचनात देखील दिसून येते.

२. प्रजाना मारणाऱ्याप्रमाणे हा बलवान सोम आवाज करत स्वतःचा असुर्य वर्ण प्रकट करतो. स्वतःचे रूप गाळण्याने स्वच्छ करून पिणाऱ्याची जरा घालवतो. ९.७१.२

येथे सोमाच्या वर्णाला असुर्य वर्ण म्हटले आहे. सायण याचा अर्थ असुरांना बाधक असा करतो. पण या अर्थाला प्रमाण देत नाही. ऋग्वेदात पुष्कळ ठिकाणी असुर हा शब्द चांगल्या अर्थी येतो. सोमसेवनाने मनाला येणाऱ्या उत्साहाची वर्णने वाचून असे म्हणता येईल की, येथील असुर हा शब्द असु म्हणजे जीवन या शब्दापासून मधुपासून मधुर या शब्दाप्रमाणे जीवनशील या अर्थी आला आहे. अर्थात् सोमाचा असुरवर्ण म्हणजे जीवनदायक वर्ण. येथे वर्ण या शब्दाचा रंग असा अर्थ केला तरी सोमरसाचा केवळ रंग पाहून जीवनवृत्ती उचंबळून येतात असे कवीला म्हणावयाचे आहे, असे निष्पन्न होईल. एकूण येथे वर्ण शब्दाचा मानवी कातडीचा वर्ण व वंश यांच्याशी काही सम्बन्ध नाही.

## दासांचा वर्ण

वर्ण या शब्दाचा वंश असा अर्थ ऋग्वेदात व एकंदरच संस्कृत वाङ्मयात कुठेच नाही. पण त्याचा रंग असा अर्थ होऊ शकतो व असा अर्थ करून आर्यवर्ण म्हणजे विशिष्ट रंगाचा म्हणजे गोऱ्या रंगाचा वंश असा पाश्चात्त्य पंडित अर्थ करतात. आता आर्यांचा वर्ण गोरा होता असे ऋग्वेदात वा कोणत्याच प्राचीन वाङ्मयात लिहिलेले नाही. या अडचणीतून निसटण्यासाठी आर्यांचे शत्रू जे दास त्यांचा वर्ण काळा होता व त्यांच्या विरोधाने आर्यांचा रंग गोरा होता असे गर्भित आहे असा त्यांचा युक्तिवाद

आहे.

दासांचा वर्ण काळा होता याला खालील ऋचांचा आधार देण्यात येतो-

**इन्द्रः समत्सु यजमानमार्यं प्रावद्विश्वेषु शतमूतिराजिषु ।**
**मनवे शासदव्रतान्त्वचं कृष्णामरन्धयत्।**
**दक्षन्न विश्वं ततृषाणमोषति ।१.१३०.८**

इन्द्र आर्य यजमानाचे युद्धामध्ये रक्षण करतो. शतशः रक्षणशील असा तो स्वर्मीढ अशा युद्धामध्ये रक्षण करतो- मानवाप्रीत्यर्थ अव्रतांना दंड देतो. कृष्ण कातडीची हिंसा करतो. हिंसक अशा सर्वांना जाळून टाकतो.

या ऋचेतला स्वर्मीढ हा शब्द महत्त्वाचा आहे. मीढ म्हणजे सिक्त. स्वर्मीढ म्हणजे स्वर्गात सिक्त झालेले संग्राम. सिक्त झालेले म्हणजे सांडलेले वा सड्याप्रमाणे प्रचुर. अर्थात् हे संग्राम पृथ्वीवर झालेले नसून स्वर्गात झालेले आहेत. सायण स्वर्गाचे सेचक असा दुसरा अर्थ देखील सुचवितो. पण मीढ हे भूतकालवाचक असल्यामुळे त्याचा मेहक म्हणजे सेचक असा अर्थ करणे सरळ नाही. स्वर्गासाठी सांडलेले असा चतुर्थी तपुरुष करून स्वर्गात जाण्यासाठी केलेली युद्धे असा अर्थ करता येईल. पण असा विग्रह दूरान्वयाचा आहे. युद्ध जिंकण्यासाठी करतात, स्वर्गात जाण्यासाठी करीत नाहीत. संग्रामात मरण आल्यास स्वर्ग मिळतो अशी कल्पना आहे म्हणून स्वर्गासाठी संग्राम हा विग्रह चूक नाही असे या ऋचेच्या संदर्भात म्हणता येत नाही; कारण येथे निर्देशिलेले संग्राम हे जेत्यांचे संग्राम आहेत, हरणाऱ्या हुतात्म्यांचे संग्राम नाहीत.

पुढील संदर्भावरून देखील स्वर्मीढ संग्राम म्हणजे स्वर्गात झालेले संग्राम हा अर्थ स्पष्ट आहे.

कृष्ण नावाच्या काळ्या असुराला मारले म्हणून काळ्या कातडीला मारले असा अर्थ सायण सांगतो. पण यावरून कृष्ण नावाचा कोणी अनार्य मानव होता असे समजणे चुकीचे आहे, हे पुढील कृष्णाच्या उल्लेखावरून सिद्ध होते-

**अव द्रप्सो अंशुमतीमतिष्ठदियानः कृष्णो दशभिः सहस्रैः।**
**आवत्तमिन्द्रः शच्या धमन्तमप स्नेहितीर्नृमणा अधत्त॥ ८.९६.१३**

दश सहस्रांसह कृष्ण अंशुमती नदीमध्ये लपून बसला. नृमणा इन्द्राने पाण्यात श्वास घेणाऱ्या त्याला गाठून अपस्नेहिती केले.

हा कृष्ण पाण्याच्या आत लपून श्वास घेत होता. त्याला द्रप्स असे म्हटले आहे.





द्रप्स म्हणजे द्रुत जाणारा किंवा इंग्रजीतील ड्रॉप्स म्हणजे थेम्ब असा अर्थ होतो. दहा सहस्रासकट अंशुमती नदीच्या आत श्वास घेत बसलेला हा कृष्ण मानव असणे शक्य नाही.

वरील ऋचांत मानवी इतिहास विवक्षित नाही हे याप्रमाणे संशयातीत असले तरी कोणत्या घटनेला उद्देशून ही ऋचा लिहिली गेली आहे हा प्रश्न उरतोच. इन्द्र हा पर्जन्याचा देव व ही घटना स्वर्गात घडलेली आहे या दोन गोष्टी लक्षात घेता अंशुमती नदीत लपून बसलेला कृष्ण म्हणजे रूपेरी कडा असलेला काळा मेघ असे सहजच सूचित होते. तो अंशु म्हणजे किरणाच्या नदीत दडून बसलेला असतो. त्याने सहस्रावधी द्रप्स म्हणजे जलबिन्दू बन्दिस्त करून ठेवले होते. इन्द्राने ते त्याच्यापासून अपस्नेहिती केले म्हणजे तो जो त्यांना चिकटून बसला होता त्या बन्धनापासून मुक्त केले व पाऊस पडला.

**ही मानवाची त्वचा नव्हे**

कृष्ण हा शब्द ऋग्वेदात पुष्कळ वेळा मेघ, रात्र, वगैरेंच्या संदर्भात येतो, कृष्णवर्ण मानवाच्या संदर्भात येत नाही हे आणखी अनेक उल्लेखांवरून दाखविता येईल-

**पितुर्मातुरध्या ये समस्वरन्नृचा शोचन्तः सन्दहन्तो अव्रतान्।**
**इन्द्रद्विष्टामप धमन्ति मायया त्वचमसिक्नीं भूमनो दिवस्परि॥ ९.७३.५**

अव्रतांना जाळणारे, कान्तीने शुचि असे सोमाचे किरण मातृपितृरूप द्यावापृथ्वीमध्ये एखाद्या स्वराप्रमाणे घुमून इन्द्र जिचा द्वेष करतो त्या 'असिक्नीची' म्हणजे रात्रीची काळी कातडी आपल्या मायेने साऱ्या आकाशातून निपटून काढतात.

या ऋचेत काळी कातडी निपटून काढणारा कोणी आर्य नाही व ज्याची काळी कातडी निपटली जाते असा कोणी अनार्य नाही. एखाद्या जांभळाची साल काढावी त्याप्रमाणे चंद्रकिरण रात्रीची काळी साल म्हणजे अंधकार सोलून काढतात अशी ही कल्पना आहे.

ऋग्वेदातील त्वचेचा उल्लेख हा नेहमी मानवी त्वचेचाच उल्लेख नसतो हे खालील ऋचेवरून देखील दिसून येईल-

**प्र ये गावो न भूर्णयस्त्वेषा अयासो अक्रमुः।**
**घ्नन्तः कृष्णामप त्वचम्॥ ९.४१.१**

हे तेजस्वी सोम गाईप्रमाणे किंवा वाणीप्रमाणे शीघ्रतेने कृष्ण त्वचेला अपहृत करीत जात आहेत.

हे सोमाचे वर्णन आहे. तेव्हा येथे कोणा काळ्या मानवाच्या संहाराचा उल्लेख आहे असे मानणे दुराग्रहाशिवाय शक्य नाही. सायण येथे कृष्णां त्वचं चा अर्थ कृष्णा त्वग्रक्षाः असा करतो. म्हणजे काळ्या कातडीचे रक्षाकर आवरण निपटून सोम जात आहेत असे निष्पन्न झाले. सोमवल्लीची साल काळी असते असे वर्णन नाही. त्यामुळे काळी याचा अर्थ सावळी, हिरवी, निळी वगैरे संस्कृत साहित्यातील संकेताप्रमाणे होऊ शकेल.

पण सोम पिळल्यामुळे गळणाऱ्या रसाला हे वर्णन फारच कष्टाने लागू होते. सोमवल्ली कुटल्यामुळे बाहेर पडणाऱ्या रसाला धावणाऱ्या गाईचा वेग व त्यापेक्षाही वाणीचा वेग यांची उपमा देणे अगदीच गैरलागू आहे.

ऋचाकार सोमाचे वर्णन करताना घटकेत सोमरस व घटकेत चंद्र यांच्याबद्दल बोलू लागतात हे लक्षात घेतले तर वरील ओळींचा अर्थ लागतो. हे वर्णन सोमाच्या रोपाचे नसून चंद्राचे आहे. गाव : म्हणजे किरण. किरणाप्रमाणे वेगवान् किंवा वाणीप्रमाणे म्हणजे ध्वनीप्रमाणे वेगवान् असे हे सोम म्हणजे ज्योत्स्ना कृष्णत्वचेच्या म्हणजे रात्रीच्या अंधाराचा नाश करीत जात आहेत, असा याचा अर्थ आहे. 'त्वचमसिक्नीम्' या मागे उल्लेखिलेल्या शब्दप्रयोगाप्रमाणेच येथेही कृष्ण त्वचा हे रात्रीचे वर्णन आहे, काळ्या कातडीचे नाही.

## काळा इन्द्र व काळे आर्य

कृष्णां त्वचं हे शब्द मानवी कातडीला उद्देशून नाहीत यावरून ज्याप्रमाणे ऋग्वेदात काळ्या जमातीशी संघर्ष वर्णिलेला आहे ही कल्पना निराधार ठरते, त्याचप्रमाणे आर्यांचा प्रमुख देव जो इन्द्र त्याला एका ऋचेत कृष्ण म्हटले आहे यावरून देखील आर्य हे कृष्णवर्णीयांचे गोरे शत्रू होते या कल्पनेला सुरुंग बसतो. ही ऋचा अशी-

**अयं चक्रं इषणत्सूर्यस्य न्येतशं रीरमत्ससृमाणम्।**
**आ कृष्ण ई जुहुराणो जिघर्ति त्वचो बुध्ने रजसो अस्य योनौ॥** ४.१७.१४

सायण या मागची एक आख्यायिका सांगतो. "स्वष्व नावाचा एक राजा होता. त्याने पुत्रप्राप्तीसाठी सूर्याची उपासना केली. तेव्हा सूर्यच स्वतः त्याच्या पोटी आला





व त्याने एतश ऋषीशी युद्ध आरंभले. तेव्हा एतश ऋषीने इंद्राचे स्तवन केले. मग इन्द्राने एतशाचे त्या संग्रामात रक्षण केले."

या आख्यायिकेच्या आधारे सायण या ऋचेचा अर्थ असा करतो-

या इंद्राने सूर्याचे चक्र म्हणजे आयुध प्रेरित केले. युद्धास सरसावलेल्या एतश नावाच्या ऋषीचे त्याने निवारण केले. कुटिल रीतीने संचार करणाऱ्या कृष्णवर्ण मेघाने त्वचेच्या म्हणजे तेजाच्या मूलभूत अशा रजाच्या म्हणजे उदकाच्या स्थानामध्ये म्हणजे अन्तरिक्षात इंद्राचे रक्षण केले.

सायणाने ऋचेच्या अर्थाचा संदर्भ म्हणून जी आख्यायिका सांगितली आहे तिच्याशी त्याने केलेला अर्थ अगदी विसंगत आहे. ज्या एतश ऋषीने आत्मरक्षणासाठी इंद्राचे स्तवन केले त्याचेच इंद्राने निवारण केले. एतशाचे निवारण केल्यावर मेघाने इंद्राचे कुणापासून रक्षण केले? जो इंद्र स्वतःच सर्वबलशाली म्हणून ज्याच्याकडे सर्व ऋचाकार धाव घेतात त्याच इंद्राला मेघाकडून रक्षण करवून घ्यावे लागले व तेही कोणतेच संकट आले नसताना. शिवाय हा इंद्राचे रक्षण करणारा मेघ सायणाने आणला कोठून? ऋचेत तर मेघाचा उल्लेखही नाही. तेव्हा सायणाचा अर्थ स्वीकारता येत नाही.

## ऋचेचा सरळ अर्थ असा-

या इंद्राने सूर्याचे चक्र प्रेरित केले. चालून येणाऱ्या एतशाला रोकले. हा कृष्ण आपल्या त्वचेच्या मूलभूत अशा रजसांच्या मध्ये संचरमाण होत्साता वृष्टी करतो.

यातील त्वक् शब्द महत्त्वाचा आहे. सायण त्याचा अर्थ तेज असा करतो. पण त्याने या अर्थाला आधार दिला नाही. बुध्न म्हणजे मूल. रजस् म्हणजे ज्याला इंग्रजीत रीजन म्हणतात ते. म्हणजे स्वर्गलोक, इहलोक इत्यादी लोक. योनि म्हणजे स्थान. अर्थात् त्वचेचे मूल हे लोकांचे स्थान आहे अशी कल्पना झाली. स्वर्गलोक, इहलोक वगैरे सर्व लोकांचे स्थान हे ज्या त्वचेचे मूल आहे ती त्वचा म्हणजे अवकाश वा स्पेस असा अर्थ निघतो. लोकांच्या स्थानामध्ये कृष्णाने एतशाला रीरमत् म्हणजे शान्त केले आहे. एतश हा सूर्याचा घोडा, त्याला उधळू दिले नाही असा अर्थ. हा कृष्ण म्हणजे मेघरूपी इंद्र. मेघाने इंद्राचे रक्षण केले नसून मेघरूपी इंद्रानेच उधळणाऱ्या सूर्याच्या घोड्याला शांत केले व लोकांच्या स्थानामध्ये सिंचन केले म्हणजे पाऊस पाडला.

त्वक् या शब्दाचा ऋग्वेदातील हा अर्थ अत्यंत महत्त्वाचा आहे. त्वक् शब्द

आला की, मानवी कातडी व तिचा रंग याचा विचार करण्याची पाश्चात्य पंडितांना सवय लागली आहे. त्यात या त्वक्‌बरोबर कृष्ण शब्द आला की, त्यांना तर अगदी घबाड सापडल्यासारखे वाटते. पण वरील ऋचेतील निर्विवाद वैश्विक घटनांचा विषय व त्यात इंद्राचे जे पराक्रम वर्णिलेले आहेत त्या पराक्रमांचा कर्ता म्हणून कृष्ण शब्द वापरला आहे. यावरून कृष्ण हे इंद्राचे विशेषण आहे व त्वचेचे मूलस्थान म्हणजे साऱ्या अवकाशाचे आलम्बन हे अर्थ स्पष्ट आहेत.

हे अर्थ कुणाला पटले नाहीत तरी या ऋचेत काळ्या मानवांच्या कातडीचा उल्लेख नाही हे निर्विवाद आहे एवढे तरी त्यांना मानावेच लागेल. कृष्ण हा शब्द गौरवार्थी वापरलेला आहे याबद्दलही शंका असू नये.

इंद्र हा ईश्वर, म्हणून त्याने सूर्याचे चक्र प्रेरित केले असे म्हटले आहे. सूर्याच्या घोड्याला उधळू दिले नाही म्हणजे उन्हाळ्यात सूर्याचा ताप सारखा वाढत असता त्याला आवर घालून वृष्टी केली. हे ग्रीष्माच्या अयनान्ताचे वर्णन आहे.

## काळे आर्य

**कृष्ण शब्दाचा गौरवपूर्ण उल्लेख ऋग्वेदात अन्यत्रही आहे. उदा.,**

**भद्रो भद्रया सचमान आगात्स्वसारं जारो अभ्येति पश्चात्।**

**सप्रकेतैर्द्युभिरग्निर्वितिष्ठन् रुशद्भिर्वर्णैरभिराममस्थात् ॥ १०.३.३**

हा भद्र अग्नी भद्र उषेसह आला आहे. बहिणीच्या मागून तिचा प्रिय भाऊ वा पुढे सरणाऱ्या उषेमागून तिचा प्रियकर येत आहे. सुस्पष्ट अशा तेजांनी संपन्न असा हा ठाकला आहे. तेजस्वी वर्णांनी रामाचा-रात्रीच्या काळ्या अंधाराचा नाश करीत आहे.

येथे सायणाच्या मते रात्रीच्या काळ्या रंगाला राम शब्द लावला आहे. राम म्हणजे रमणीय. वेदोत्तर काळी रामकृष्णांच्या काळ्या सौंदर्याचे वर्णन रामायण-महाभारतादिकांत केले गेले, त्यातील ही सौंदर्यदृष्टी आहे. काळ्या कातडीचा द्वेष करणाऱ्या वंशवादी मनोवृत्तीचा आरोप पाश्चात्य पंडित ऋग्वेदावर करतात. या आरोपाच्या अगदी दक्षिणोत्तर विरुद्ध असा हा उल्लेख आहे.

ऋचेत रात्रिवाचक शब्द नसताना राम शब्दाने रात्रीचा अंधार असा अर्थ घेणे ही ओढाताण आहे असे काही वाचकांना वाटेल. पण असे वाटण्याचे कारण नाही.





शेवटच्या ऋचेत 'दिवस्पृथिव्योररतिर्युवत्योः' म्हणजे द्यावापृथ्वींच्या मध्ये संचार करणारा म्हणून अग्नीचे वर्णन आहे. अर्थात् येथे सूर्यस्वरूपी अग्नी विवक्षित आहे. भद्र उषेशी संगत होऊन सूर्य आला. नंतर जार म्हणजे काळाने मानवांना जीर्ण करणारा त्या सरणाऱ्या उषेचा अभिभव करता झाला, व तेजस्वी रंगाने रात्रीच्या अंधाराला पराभूत करता झाला, असा अर्थ निघतो. या ऋचेत राम शब्दाने रात्रीच्या काळोखाचा उल्लेख नाही असे मानले तर या ऋचेचा काही अर्थ लागत नाही. तेव्हा सायणाच्या अर्थावर अविश्वास दाखविण्याचे कारण नाही.

ऋचाकार काळ्या मानवी कातडीचा द्वेष करणारे गौरवर्णीय नव्हते याला आणखी एक प्रमाण म्हणजे त्यांच्यापैकी पुष्कळसे स्वतःच काळे होते. उदा. १.११७.७ मध्ये कार्ष्णिय म्हणजे कृष्णपुत्र विश्वकाला अश्विनींनी विष्णाप्व नावाचा हरवलेला पुत्र मिळवून दिला असे म्हटले आहे. म्हणजे वैदिक देवतांची प्रार्थना करणाऱ्यांचे बाप कृष्ण नावाचे असत. इतर ठिकाणी या नावावरून काळ्या कातडीचे अनुमान करणाऱ्यांनी येथेदेखील हा वैदिक कृष्ण काळा होता असे अनुमान काढले पाहिजे.

१०.३३.११ म्हणते, "कण्वाला नृषदाचा पुत्र म्हणतात. वाजी म्हणजे ऐश्वर्यशाली असा तो श्यामवर्ण-अग्नीपासून-धन प्राप्त करता झाला. अग्नीचे दूध म्हणजे स्तन त्या कृष्ण कण्वाला कान्तिमान् असे ऋत देते झाले. त्याच्यापेक्षा अधिक कोण वाढणार?"

या ऋचेत श्याव म्हणजे श्याम ब कृष्ण ही दोन विशेषणे कण्वाला गौरवार्थी लावली आहेत.

सूक्तकर्त्या ऋषींमध्ये एक कृष्ण अंगिरस आहे. ८.८५.८७, १०.४२.४३ ही सूक्ते त्याची आहेत. कृष्णासुराच्या नावावरून तो काळा होता असे म्हणायचे तर कृष्ण अंगिरस हा सूक्तकर्ताच स्वतः काळा होता असे म्हटले पाहिजे. ऐतरेय ब्राह्मण ३.३४ मध्ये अंगिरस कोळशापासून झाले असे म्हटले आहे.

वसिष्ठांचे वर्णन करताना त्यांना श्वित्यंच म्हणजे गोरे म्हटले आहे. सूक्तकर्ते आर्य सारेच गोरे असते तर वसिष्ठांना गोरे असे मुद्दाम म्हणण्याची जरूर नव्हती. त्यांना गोरे म्हटले यावरूनही सूक्तकर्ते हे गोऱ्या वंशाचे लोक नसून मिश्रवर्णाचे होते असे सिद्ध होते.

सूक्तकर्ते गोऱ्या वर्णाचे नव्हते एवढेच नव्हे तर त्यांना गोऱ्या वर्णाबद्दल विशेष आकर्षणही नव्हते. २.३.९ मध्ये म्हटले आहेः- "त्वष्ट्याच्या अनुग्रहाने आम्हाला

पिशंग वर्णाचा, अन्नपूरक, शीघ्रगुणी व देवकाम असा पुत्र होवो. त्वष्टा आम्हाला आमची नाभिरूप अशी प्रजा देवो व देवांचे नैवेद्य त्यांना पोचोत.''

येथे आमच्या प्रजा पिशंग वर्णाच्या होवोत अशी प्रार्थना आहे. पिशंग याचे इंग्रजी भाषान्तर टॉनी या शब्दाने करतात. मराठीत याला पिंगट असा शब्द आहे. कोकणस्थ लोकांचे डोळे पिंगट म्हणविले जातात. कोणत्याही अर्थी पिशंग हा शब्द गौर वर्णाचा वाचक नाही. सायण त्याचा अर्थ सुवर्णवर्णा नानारूपा वा असा करतो. येथे सुवर्ण म्हणजे तापलेले सोने अभिप्रेत असावे कारण पिशंग याचा अर्थ सोन्यासारखा पिवळा असा कोशात दिलेला नाही. अमराच्या माहेश्वरी टीकेत पिशंग शब्दाचा अर्थ कृष्णमिश्रलोहित असा दिलेला आहे. हे वर्णन साध्या सोन्याच्या रंगाला लागू होत नाही.

एकूण पिशंग वर्ण म्हणजे तपकिरीचा वा बदामाचा वर्ण. हा वर्ण गोरा नाही. असा वर्ण अत्यंत सुंदर दिसतो व जगात गोऱ्या जमातींचे शेकडो वर्षे सर्व क्षेत्रात प्रभुत्व नसते तर आजही तो वर्ण सौंदर्याचा आदर्श समजला गेला असता. वैदिक सूक्तकारांच्या वर्णसौंदर्यदृष्टीचा हाच आदर्श होता. यावरून ते गोऱ्या वर्णाचे अभिमानी वंशीय होते ही कल्पना निर्मूल ठरते.

## आर्यांचे नाक

रंग हे वंशाचे एक व्यवच्छेदक समजले होते. दुसरे व्यवच्छेदक नाकाचा आकार हे आहे. आर्यांच्या शत्रूचे नाक चपटे होते व गर्भितार्थाने आर्यांचे नाक सरळ होते असा ऋग्वेदात उल्लेख असल्याचा पाश्चात्त्य पंडित दावा करतात. याला आधार म्हणून खालील ऋचा देण्यात येते :-

**प्रान्यच्चक्रमवृहः सूर्यस्य कुत्सायान्यद् वरिवो यातवे कः।**
**अनासो दस्यूंरमृणो वधेन नि दुर्योण आवृणङ् मृध्रवाचः ॥५.२९.१०**

हे इंद्रा, तू पूर्वी सूर्याचे एक चक्र वेगळे केले. दुसरे कुत्साला धन देण्यासाठी ठेवले. अनास दस्यूंना मारले. मृध्रवाक् अशा त्यांना संग्रामात छिन्न केले.

येथे अनास हा शब्द चपट्या नाकाचे या अर्थी योजला आहे, असे म्हणून आर्यशत्रू दस्यू हे चप्पटनाकी वंशाचे होते असे प्रतिपादन केले जाते.

सायणाने अनास या शब्दाचा आस्यरहित म्हणजे मुखरहित असा अर्थ केला





आहे. मुखरहित म्हणजे ज्यांना बोलण्याची शक्ती नाही ते-हिंसितवागिन्द्रियाः- खाण्यासाठी उपयोगात येणारे तोंडदेखील दस्यूंना नव्हते असे सायण म्हणत नाही. अर्थात् त्याच्या मते दस्यू या बोलण्याची शक्ती नसलेल्या शक्ती होत्या. बोलण्याची शक्ती नसलेल्या या विशेषणावरून या शक्ती अमानवी होत्या हे स्पष्ट झाले आहे. अवर्षण वगैरे मानवाला सतावणाऱ्या आपत्ती न बोलता आपली दुष्ट कृत्ये करतात. दस्यूही यांपैकीच होते हा त्यांना आस्यरहित म्हणण्यातला आशय आहे.

दस्यू हे मानव मानले तर मुखरहित या अर्थापेक्षा चापट नाकाचे हा अर्थ अधिक जुळतो; म्हणून दस्यूंच्या अमानवत्वाची बाब सोडली तरी अनास शब्दाचा जास्त संभवनीय अर्थ कोणता याची चर्चा केली पाहिजे.

गिरीशचंद्र अवस्थींच्या मते आस् म्हणजे बसणे या धातूपासून अनास् म्हणजे एके ठिकाणी घर करून न राहणारे म्हणजे भटके असा अर्थ होतो. बिननाकाचे या अर्थापेक्षा हा अर्थ अधिक संभवनीय आहे. कारण नते नासिकायां टीटच् नाटच् भ्रटचः। या पाणिनिसूत्राप्रमाणे चपटे नाक या अर्थी अवटीट, अवनाट व अवभ्रट असे शब्द होतात. तेव्हा अवटीटी, अवनाटी व अवभ्रटी असे तीन रूढ शब्द सोडून चप्पट नाकाचे या अर्थी अनास हा शब्द वापरणे म्हणजे संस्कृत भाषेबद्दल अज्ञान दाखविणे आहे. मराठीत बहिरा हा शब्द असताना ऐकू न येणाऱ्याला कोणी बिनकानाचा म्हटले तर त्याला मराठी येत नाही असे आपण समजू.

पाणिनिकाळचे हे शब्द वेदकाळी अस्तित्वात नव्हते अशी पळवाट काढणे शक्य आहे. पण पाणिनीय संस्कृतात व वैदिक संस्कृतात मुख्य फरक हा आहे की, वैदिक संस्कृतातले पुष्कळसे प्रयोग पाणिनीय संस्कृतात नाहीत. पाणिनीय संस्कृतातले शब्दप्रयोग वैदिक संस्कृतात वर्ज्य आहेत असे कोणी मानीत नाही. सिद्धान्तकौमुदीवरील सुबोधिनी टीकेत लौकिक म्हणजे पाणिनीय शब्दांहून वैदिक शब्द भिन्न नाहीत असे एक मत मांडून त्याच्या विरुद्ध लौकिक शब्दांच्या जोडीला काही त्यांच्याहून वेगळे असेही शब्द वेदात आहेत असे स्वतःचे मत दिलेले आहे. म्हणजे पाणिनीय शब्दांचा अंतर्भाव वैदिक शब्दातच होतो. तेव्हा अवटीटादि शब्द वैदिक काळी अस्तित्वात नव्हते या मताला काही स्वतंत्र आधार मिळाल्याशिवाय ती नुसती पळवाटच ठरेल.

ऋचाकाराने दस्यूंची अतिशयोक्तिपूर्ण हेटाळणी करण्यासाठी त्यांना बिननाकाचे म्हटले आहे, त्यांच्या नाकाचे यथार्थ वर्णन करणे हा त्याचा हेतू नव्हता अशी दुसरी

एक पळवाट शक्य आहे. पण हेटाळणी करणे हा ऋचाकाराचा हेतू असेल, तर तो सफल झाला नाही असे स्पष्ट दिसते. कारण अनुदरा दारा या शब्दातील अनुदरा या शब्दाचा अर्थ बिनपोटाची असा न होता कृश पोटाची असा होतो त्याचप्रमाणे अनास या शब्दाचा बिननाकाचे असा अर्थ न होता लहान नाकाचे असा अर्थ होईल व हा अर्थ हेटाळणीपरच आहे असे नाही. कुणाच्या नाकाची हेटाळणी करायची असेल तर आपण त्याला चप्पटनाक्याच म्हणू. बिननाक्या म्हणणार नाही.

तेव्हा चापट नाकाचे या अर्थी भाषेत आयते असलेले तीन शब्द सोडून बिननाकाचे असा शब्द वापरण्याचे ऋचाकाराला काही प्रयोजन दिसत नाही.

ऋग्वेदात वंशसंघर्ष पाहणाऱ्यांची नाकाच्या बाबतीत दुसरी अडचण अशी की, चापट नाकाचे हे 'आदिवासी' द्रविड होते असे ते म्हणतात. उलटपक्षी तामिलादी भाषा बोलणारे ते द्रविड असेही त्यांचे मत आहे. पण तामिलादी भाषा बोलणारे लोक चापट नाकाचे नसतात. नेपाळी व उत्तर पूर्वसीमेवरील बंगाली यांना हे वर्णन अधिक लागू आहे.

दस्यूंना अनास म्हणजे एके ठिकाणी न ठरणारे हा अर्थ, दस्यू या अमानवी शक्ती मानल्या तर यथार्थतेने लागू होतो. दस्यू हे मुख्यतः अवर्षण, जलरोधन वगैरे आपत्ती आणीत असे वर्णन आहे. या आपत्ती केव्हा व कोणत्या प्रमाणात येतील हे सांगता येत नसल्यामुळे दस्यू या अज्ञेयरूपाने संचार करणाऱ्या शक्ती होत्या असे मानले गेले.

ऋग्वेदातील आर्य शब्द वंशाचा द्योतक नाही याबद्दल निर्विवाद पुरावा ऋग्वेदात आणखी पुष्कळच आहे.

**१. आ संयतमिंद्र णः स्वस्तिं शत्रुतूर्याय बृहतीममृध्राम्।**
**यया दासानि आर्याणि वृत्रा करो वज्रिन् सुतुका नाहुषाणि॥ ६.२२.१०**

**सायणाच्या मते या ऋचेचा अर्थ असा-**

हे इंद्रा, शत्रूपासून तारण्यासाठी आम्हाला तू अहिंसित अशी स्वस्ति दे; ज्या स्वस्तीने दास आर्य होतात व हे वज्रवन् मानवांचे शत्रू हिंसित होतात.

या अर्थापेक्षा यया स्वस्त्या नाहुषाणि सुतुकानि दासानि वृत्रांणि आर्याणि करो असा अन्वय करून ज्या स्वस्तीने मानवाचे हिंसक शत्रू जे दास ते आर्य होतील असे





कर असा अर्थ केल्यास अधिक योग्य. दास हा जर वंश असता तर त्याला आर्यवंशात परिवर्तित कर असे वंशगर्वित आर्यांनी म्हणणे फारच विचित्र दिसते. दास या उपद्रवकारी शक्ती होत्या. त्यांना तुझ्या शक्तीने आर्य कर म्हणजे कल्याणकारी कर अशी प्रार्थना सरळ आहे. अवृष्टी, जाळ वगैरे त्रासदायक शक्ती अशा आहेत की, त्या योग्य वेळी योग्य प्रमाणात मिळाल्या तर अकल्याण न करता कल्याणच करतात.

२. हे इन्द्रा, आर्य कोण व दस्यू कोण हे तू जाण. अव्रतांचे शासन करीत यज्ञकर्त्यांसाठी त्या दस्यूंना मार. सामर्थ्यशाली असा तू यजमानाचा प्रेरक हो. अशी तुझी सर्व कर्मे सोन्माद सहवासामध्ये आम्ही इच्छितो. १.५१.८

आर्य कोण व दस्यू कोण हे ओळखायला इन्द्रासारख्या शक्तिशाली देवाची प्रार्थना करावी लागत होती यावरून आर्य व दस्यु हे गोरे व नीग्रो यांसारखे सहज ओळखता येण्यासारखे वंश नव्हते हे स्पष्ट आहे.

८.२२.१० च्या संदर्भाप्रमाणे याचा अर्थ लावायचा तर दस्यूंप्रमाणेच यात उल्लेखिलेले आर्य हे देखील मानव नव्हते असे मानले पाहिजे. ज्योतिप्रभृति तीन आर्य प्रजा आहेत या ऋचेमध्ये आर्य हे नेहमी मानवच असतात असे नाही हे स्पष्ट आहे. मानवांना त्रास देणाऱ्या दुष्ट शक्तींना आर्य कर म्हणजे पाणी, अग्नी वगैरे शक्तींना पूर व जाळपोळ या कामी न लागू देता शेती, सैपाक वगैरे चांगल्या कामासाठी लागू दे असे म्हटल्याप्रमाणेच इथेही हे इन्द्रा, अग्निजलादी नैसर्गिक शक्ती कधी कल्याणकर तर कधी अल्याणकर होतात. त्या नेहमी कल्याणकर कशा होतील हे तूच जाणतोस असे येथेही म्हटले आहे.

३. अदात्यांचा नाश करीत उदकप्रेरक असे हे सोम इंद्राला वाढवीत विश्वाला आर्य करतात. ९.६३.५

विश्वाला आर्य करणे याचा अर्थ विश्वातील अनार्यांचा वंश बदलून त्यांना आर्य करणे असा होऊ शकत नाही. यज्ञाच्या संबंधातच या ऋचेचा सरळ अर्थ लागतो. यज्ञात यथेच्छ सोम पाजल्यामुळे इंद्र प्रसन्न होऊन अदात्या मेघांचा फडशा पाडीत पाणी वर्षतो व साऱ्या विश्वाला आर्य म्हणजे कल्याणमय करतो.

४. मी इंद्र, दास व आर्य यांना पारखून व निवडून येत आहे. धीर अशा यजमानाकडे लक्ष ठेवतो व त्याने पिळलेला सोम पितो. १०.८६.१९

येथील दास व आर्य यांना वेगळे निवडून काढायला इंद्राची गरज आहे.

अग्निजलादी अमानवी शक्ती उपयोगी असतात तेव्हा त्या आर्य व उपद्रवकारी ठरतात तेव्हा दास. कारण दास म्हणजे उपद्रवकारी. यज्ञात इंद्राला सोम पाजल्याने तो मानवाला त्रास देणाऱ्या अग्निजलादी शक्तींची निवड करून त्यांना दूर सारतो व मानवोपयोगी अशा आर्य स्वरूपात त्यांना कामी आणतो.

## आर्यांचा भाषिक वंश

आर्य/अनार्य हे शरीरभेदाने कळणारे वंश होते या मताला आधार सापडणे अशक्य आहे हे जाणून काही वंशवादी असे म्हणतात की, हे वंश शरीररचनेवरून ओळखले जात नसून भाषाभेदावरून ओळखले जात होते. आर्यभाषा बोलणारे ते आर्य व अनार्य भाषा बोलणारे ते अनार्य. दस्यु हे अनार्य भाषा बोलणारे लोक होते म्हणून त्यांना मृध्रवाच;, रानटी-बारबॅरिक भाषा बोलणारे असे म्हटले आहे.

मृध्रवाक् या शब्दाच्या अशा अर्थाला आधार नाही. मृध्र आणि मृध् हिंसायाम् असा धातू आहे. त्याचा हिंसितवागिन्द्रियान् असा सायणाने अर्थ केला आहे. ज्यांचे वागिन्द्रिय हिंसित आहे, म्हणजे ज्यांना बोलण्याची शक्ती नाही ते अनास म्हणजे आस्यरहित म्हणजे मुखहीन अमानव असा पूर्वीच्या अनास् या शब्दाच्या अर्थाशी जुळणारा अर्थ सायणाने केला आहे तोच सयुक्तिक आहे.

कुणी म्हणेल हिंसित याचा अर्थ अशुद्ध बोलणारे असा होतो, मुळीच न बोलणारे अमानव असा होत नाही. पण असे मानले तर दस्यु हे आर्यांचीच भाषा बोलणारे होते, फक्त ती आर्यांनी प्रमाणभूत मानलेल्या भाषेपेक्षा वेगळी असल्यामुळे तिला ते अशुद्ध समजत असे ठरते. पुण्याचे लोक नागपूरच्या भाषेला अशुद्ध म्हणतील. पण तामिल भाषेला ते अशुद्ध म्हणतील असा संभव नाही. कारण तामिल हा मराठीचा प्रकार म्हणून मानला गेला नसून स्वतंत्र भाषा मानलेली आहे.

आर्यांचे शत्रू असुर हे आर्यांचीच भाषा बोलत पण ती आर्यांच्या मते अशुद्ध असे, असे पुढील वाङ्मयात देखील उल्लेख आहेत. हे अरयः असे म्हणण्याऐवजी, असुर, हेलयः असे म्हणाले म्हणून त्यांचा पराभव झाला असे महाभाष्यात म्हटले आहे. शतपथब्राह्मणात हीच कथा अलयः याच्या जागी अलवः असे रूप घालून सांगितली आहे. केवळ असुरच नव्हे तर यद्वानस्तद्वानः या ऐवजी यर्वाणस्तर्वाणः असे म्हणणारे काही ऋषीही होते. पण यज्ञ करताना ते शुद्ध बोलत. असुर मात्र यज्ञ करतानाही शुद्ध





बोलण्याची दक्षता बाळगीत नसत. इंद्रशत्रुर्वर्धस्व अशी एका असुराने प्रार्थना केली. त्याचा अभिप्राय इंद्राचा शत्रू म्हणजे शातयिता मी समृद्धी पावो, असा होता. पण असा तत्पुरुष होण्यासाठी शत्रू या उत्तरपदावर स्वर यायला पाहिजे. तसे न करता त्याने इंद्र या पूर्वपदावर स्वर केला. तेव्हा इंद्र ज्याचा शत्रू म्हणजे शातयिता वा कापणारा आहे असा बहुव्रीहि समास होऊन तो असुरच मारला गेला. ही अशुद्धता त्याने यज्ञात केली म्हणून त्याच्यावर हा प्रसंग ओढवला. या सर्व आख्यायिकांवरून आर्यांचे शत्रू म्हणून ज्यांचा उल्लेख आहे ते सर्व आर्यांचीच भाषा बोलणारे होते हे स्पष्ट होते व आर्य/अनार्य हा भेद भाषाभेदाने सिद्ध करण्यास ऋग्वेदात काही प्रमाण सापडत नाही.

■ ■

कपोलकल्पित आर्य आणि त्यांच्या स्वाऱ्या

# ...७...

# ऋग्वेदातील तथाकथित आर्य-अनार्य संघर्ष-२

**वैदिकांना त्रास देणारे दास, दस्यू व प्राणी हे मानवी अनार्य नसून प्रार्थनेनेच ज्यांच्यापासून रक्षण होऊ शकते अशा अति मानवी शक्ती होत्या.**



## दस्यू, दास व पणि

ऋग्वेदात आर्य हा शब्द ३६ वेळा आला असूनही आर्य म्हणजे मानव की अमानव, विशेषण की नाम हे कळण्याइतकेदेखील त्या शब्दाचे स्पष्टीकरण नाही. आता आर्यांचाच जेथे पत्ता नाही तेथे आर्य-अनार्य संघर्षाचा पत्ता कुठून असणार?

यावर नेहमी असे उत्तर देण्यात येते की, आर्य नेहमी दस्यू, दास व पणि यांना मारण्याची अभिलाषा धरतात व तशी आपल्या देवांना प्रार्थना करतात. हाच आर्य-अनार्य संघर्षाचा पुरावा होय. या मुद्याचा विचार करण्यासाठी दस्यू, दास व पणि यांचे उल्लेख तपासून पाहिले पाहिजेत.

ऋग्वेदात दस्यू हा शब्द ८६ वेळा आला आहे. ८.७०.११ मध्ये दस्यूंना अन्यव्रत, अमानुष, अयज्वे व अदेवयु अशी विशेषणे लावली आहेत. अमानुष या विशेषणावरून दस्यू हे मानव नव्हते हे मान्य व्हायला हरकत नसावी. पण अमानुष म्हणजे मानवांना न शोभणारी क्रूरतेची वगैरे कृत्ये करणाऱ्यांना अलंकारिक अर्थाने अमानुष म्हणत असल्यामुळे असाच अलंकारिक अर्थ येथे विवक्षित आहे असे काही लोक म्हणतील. त्यांचे समाधान करण्यासाठी दस्यूंच्या अमानवत्याचे पुरावे ऋग्वेदात डझनवारी आहेत हे पुढे दाखवून देण्यात येईल.

अन्यव्रत म्हणजे वैदिक देवता सोडून इतरांची व्रते करणारे वा कोणतीच देवताविषयक व्रते न करता दुसरीच कर्मे करणारे असा होऊ शकेल. अदेवयु म्हणजे वैदिक देवांना वा कोणत्याच देवांना न मानणारे. अयज्वे म्हणजे यज्ञ न करणारे. १०.२२.८ मध्ये वरील विशेषणांव्यतिरिक्त अकर्मा व अमन्तु ही विशेषणे दस्यूंना लावली आहेत. अकर्मा म्हणजे वैदिक कर्मे न करणारा व अमन्तु म्हणजे न मानणारा नास्तिक. ४.१६.९ मध्ये अब्रह्मा हे विशेषणदेखील वापरले आहे. अब्रह्मा म्हणजे वैदिक मन्त्र न जाणणारा वा वापरणारा.

"नास्तिक, अयज्वे वगैरे विशेषणे मानवांनाच लागू होतात. तेव्हा दस्यूंना अमानव कसे म्हणावे?" असा काही वाचकांना प्रश्न पडेल. दस्यूंची केवळ अमानवालाच लागू पडणारी प्रचुर वर्णने ऋग्वेदात नसती तर या युक्तिवादात तथ्य होते. पण या इतर वर्णनांच्या संगतीने वरील विशेषणेदेखील मानवाची नसून देवाच्या बरोबरीचे सामर्थ्य असणारा सैतान ज्याअर्थी नास्तिक व अपूजक असतो त्याअर्थी दस्यू हे नास्तिक व अकर्म होते, असाच अर्थ करावा लागतो.

## दस्यू मानव नव्हते

**दस्यूंच्या अमानवत्वाचे उल्लेख असे :-**

१.३३.७ मध्ये इंद्राचे व दस्यूंचे युद्ध रजसः पारे म्हणजे लोकांच्या पार झाले व त्याने दस्यूंना स्वर्गात जाळले असे म्हटले आहे. १.१००.१८ मध्ये दस्युवधाबरोबर सूर्य व पाणी मुक्त केले असे म्हटले आहे. दस्यू मानव असते तर त्यांना मारून सूर्य मुक्त केला असे म्हणण्यात काहीच अर्थ नव्हता. २.११.१८ मध्ये दस्युहत्येने आर्यांसाठी ज्योति अनावृत झाली असे म्हटले आहे. ९.९२.५ मध्ये तसाच उल्लेख आहे. १०.१७०.७ मध्ये दस्यूला मारणारा वा मारल्यामुळे प्रकाश उत्पन्न झाला असे म्हटले आहे. तेव्हा दस्यु ही एक प्रकाशरोधक अमानवी शक्ती मानली गेली होती हे स्पष्ट आहे.

४.१६.१२ मध्ये दस्यूंना मारल्याबरोबर इंद्राने सूर्याचे चक्र मोडले असे म्हटले आहे. तेव्हा सूर्याचे चक्र मोडण्यासारखीच दस्युहत्या ही अमानवी घटना होती.

दस्यूला मारणे हा पराक्रम एवढा अचाट होता की, त्या उत्पाताने सूर्याचे चक्र मोडले हा अतिशयोक्ती अलंकार आहे असे कुणी म्हणेल; पण इंद्राची सर्वच कृत्ये अचाट व अमानवी आहेत. स्तोत्रकर्ते इंद्र हा देव व त्याची अमानवी कृत्ये खरी मानीत होते. तेव्हा इंद्राच्या कृत्यांत अतिशयोक्ती अलंकार शोधू जाणे, बायबलातील देवाने सात दिवसांत पृथ्वी निर्माण केली हे वर्णन हा अतिशयोक्ती अलंकार आहे असे म्हणण्यासारखे आहे.

८.५०.८ मध्ये "हे इंद्रा, तुझे अवध्य अश्व वायूला बल पुरवितात. त्यांच्या साहाय्याने तू मानवांचे दस्यू रडविले. त्यांच्या साहाय्यानेच तू स्वर्गात फेरफटका करतोस" असे म्हटले आहे. येथे मानवांचे दस्यू हा शब्द विशेषण म्हणून वापरला आहे व दस्यू हे आर्य नावाच्या एखाद्या विशिष्ट लोकसमूहाचे द्योतक नसून साऱ्या मानवजातीचेच घातक होते असे स्पष्ट म्हटले आहे.

८.७६.११ मध्ये "हे इंद्रा, तू दस्युहर झाल्यामुळे आकाश व पृथ्वी विलिखन करणाऱ्या तुझे अनुकल्पन करोत" असे म्हटले आहे. येथे विलिखन म्हणजे शत्रूला ओरखडणे, अनुकल्पन म्हणजे अनुसरण. दस्युहन्त्या इंद्राचे आकाश व पृथ्वी अनुसरण करतात यावरून दस्युहनन ही प्राकृतिक घटना आहे हे सिद्ध होते.

१०.७३.५ मध्ये इंद्र मरुताबरोबर दस्यूंच्या जवळ आला. त्याने तम्र म्हणजे म्लान





करून टाकणाऱ्या वृष्टीचा व तमाचा नाश केला असे म्हटले आहे. हेही वर्णन कुणा मानवाच्या हत्येचे नसून प्राकृतिक घटनेचे आहे.

५.१४.४ मध्ये अग्नीने पेटल्याबरोबर दस्यू व तम नाहीसे केले व गायी, पाणी आणि स्वः प्राप्त केले असे म्हटले आहे. सायणाच्या मते स्वः म्हणजे सूर्य. या सर्व अमानवी घटनांत दस्यू हेच तेवढे मानव होते असे मानणे हा दुराग्रह आहे. ५.३१.५ मध्ये मरुतांनी दस्यूंवर चाल केली असे म्हटले आहे. मरुत् म्हणजे वादळी वारे. दस्यू या आदिवासी जमातीवर वादळी वाऱ्यांनी चाल केली असा याचा अर्थ ज्यांना दिसत असेल त्यांच्याशी चर्चा करणे कठीण आहे.

आतापर्यंत उल्लेखिलेल्या स्थळांमध्ये बहुधा सर्वमान्य अर्थच स्वीकारले आहेत. पण १.१०४.५ या ऋचेमध्ये, माझ्या मते, दस्यूंच्या अमानवत्वाचा जो उल्लेख आहे तो महत्त्वाचा आहे. मात्र असा उल्लेख दाखविण्यास सायणाचा अर्थ वा आजपर्यंत दाखविण्यात आलेले अर्थ अमान्य करणे जरूर आहे. तेव्हा ती ऋचा उद्धृत करून तिच्या अर्थाची चर्चा करतो.

**प्रति यत्स्या नीथादर्शि दस्योरोको नाच्छा सदनं जानती गात्।**
**अध स्मा नो मघवन् चर्कृतादिन्मा नो मघेव निःषपी परा दाः ॥**

घर कुठे आहे हे जाणणारांप्रमाणे दस्यूच्या गृहाकडे जाणारा मार्ग आम्ही पाहिला. हे मघवन्, एखादा लम्पट आपले धन गमावतो त्याप्रमाणे तू आम्हाला आमच्या कर्माखातर सोडून देऊ नकोस.

सायण येथे चर्कृताद् याचा अर्थ असुरांच्या कर्मापासून असा करतो. असुरांच्या कर्मापासून आमचे रक्षण कर असे येथे म्हटलेले नाही. अर्थात् येथले कर्म हे असुरांचे कर्म नसून स्तोत्याचे स्वतःचेच कर्म आहे. या कर्मामुळे इन्द्राने त्याची कास सोडली तर तो सरळ दस्यूच्या मार्गाने जाणार आहे. नः चर्कृताद् म्हणजे आमच्या कर्मापासून असे स्पष्टच म्हटले आहे. दुसऱ्या नःचा अन्वय आम्हाला सोडू नकोस असा लागतो. पहिल्या नःचा अन्वय चर्कृताकडे घेऊन आमच्या कर्मापासून असा अर्थ केला नाही तर हा दुसरा नः व्यर्थ ठरतो.

आमच्या कृत्यावर रागावून हे इंद्रा, तू आमचा पक्ष सोडलास तर आम्ही सरळ दस्यूच्या मार्गाने जाऊ याचा अर्थ अधःपाताच्या मार्गाने जाऊ असा आता स्पष्टच लागतो. अर्थात् येथे दस्यू हा शब्द अधःपात या अर्थी वापरलेला आहे.

दस्यू हे मानव नव्हते असे मॅक्डोनेलप्रभृती बहुधा सारेच वेदाभ्यासक कबूल करतात. पण पुढे हा शब्द आदिवासींना लावण्यात येऊ लागला असे लगेच म्हणून हरदासाची कथा मूळपदावर आणतात. उत्तरकालीन संस्कृत वाङ्मयात दस्यू हा शब्द मानवांना लावलेला आढळून येतो हे खरे आहे. विश्वमित्राच्या सन्ततीत ५० जाति दस्यू होत्या असे ऐतरेय ब्राह्मणात म्हटले आहे. दस्यू म्हणजे चोर या अर्थी कालिदासाने हा शब्द वापरला आहे. म्हणून खुद्द ऋग्वेदात दस्यू हा शब्द मानवांना कुठे लावलेला आहे काय, हे पाहणे आवश्यक आहे.

## गजेन्द्रमोक्ष व दस्युवध

जेथे साक्षात् इंद्राने दस्यूंना मारले नाही तर अमक्यासाठी मारले, म्हणजे अमुक मानवावर कृपा करण्यासाठी मारले असा उल्लेख आहे, तेथे दस्यूला इंद्राने मारले नसून त्या मानवाने इंद्राच्या कृपेने मारले असा अर्थ करावा व अशा ठिकाणी दस्यू या मानवशत्रूशी झालेल्या युद्धाचे वर्णन आहे असे काही सुचवितात. पण या युक्तिवादात अर्थ नाही. गजेन्द्राच्या प्रार्थनेने प्रसन्न होऊन विष्णूने नक्राचे निवारण केले नसून गजेन्द्रानेच ते केले व नक्र हा मानव होता असे अनुमान कोणी काढीत नाही. भक्ताच्या प्रार्थनेने प्रसन्न होऊन इंद्राने त्याला त्रास देणाऱ्या अमानवी दुष्ट शक्तींचा नाश केला असा सरळ अर्थ करण्यास काहीच प्रत्यवाय नाही.

१.३३.४ मध्ये दस्यूला धनी म्हटले आहे. यावरून दस्यू हे धनवान् लोक होते व त्यांचे धन आर्यांनी लुटले असे म्हटले जाते. पण येथे देखील दस्यूंवर इंद्राने मात केली ती मरुतांना साहाय्याला घेऊन. म्हणजे येथेही इंद्राचे कृत्य अमानवी आहे. सायणाच्या मते येथे दस्यू हे वृत्राचे विशेषण आहे. दस्यूचा विशेषणरूपाने वापर इतर ठिकाणीही दाखविलेला आहे. दस्यू, चोरं, वृत्रं असे सायण म्हणतो. वृत्राला धनी म्हटले आहे कारण ''वृत्रामध्ये सर्व देव, सर्व विद्या व सर्व हवि दडविले होते'' अशी परंपरा सायण सांगतो. वृत्र हा पाणी अडवणारा, दस्यु हा प्रकाश अडवणारा; पाणी व प्रकाश नसेल तर हवि कुठले, विद्या कुठल्या व देव कुठले? अन्न, विद्या व देव ही मानवाच्या समृद्धीची रूपे ज्यांच्या ताब्यात आहेत त्या वृत्राला व दस्यूंना धनी म्हटले आहे. यावरून ते मानव ठरत नाहीत.

१.५१.८ मध्ये विजानीहि आर्यान्ये च दस्यवः। असे म्हटले आहे. दस्यू ही





जर अमानवी शक्ती होती तर हे आर्य व हे दस्यू असे तू ओळख असे म्हणण्यात काय तात्पर्य आहे? ही विजेची शक्ती व हे महाराष्ट्रीय असे तू ओळख असे आपल्या देवाला कुणी महाराष्ट्रीय म्हणेल काय?

या प्रश्नाचे उत्तर मिळण्यास हे लक्षात ठेवले पाहिजे की, अमानवी प्राकृतिक शक्ती या नैतिक दृष्ट्या तटस्थ व प्राकृतिक नियमाप्रमाणे काम करणाऱ्या आहेत हे आधुनिक विज्ञानाचे गृहीतकृत्य वेदातील आधिदैविक कल्पनांना चिकटविणे योग्य नाही. अमानवी प्राकृतिक शक्तींना देखील दुष्टपणा वगैरे गुण असतात असे या आधिदैविक कल्पनांचे गृहीत आहे. या पार्श्वभूमीवर ''हे इंद्रा, आम्ही आर्य म्हणजे यज्ञयाग करणारे व दस्यु हे तुझ्या प्रिय कर्माचे शत्रू हे लक्षात ठेवून आमच्यावर अनुग्रह कर'' अशी प्रार्थना केली आहे ती अयुक्तिक वाटत नाही. ''हे देवा, आम्ही कष्टाळू शेतकरी आहोत हे तू जाण व आमच्या कष्टांवर पाणी फेरणाऱ्या अवर्षण, पूर वगैरे आपत्ती दुष्ट आहेत हे जाणून तू त्यांचे निवारण कर.'' अशी प्रार्थना साहाजिक आहे. मानवी व अमानवी आपत्ती यांचा उल्लेख एकत्र आल्यानेच केवळ अमानवी आपत्ती मानवी ठरत नाहीत.

१.३३.४ मध्ये ''हे अश्विनींनो सोमबिंदूंच्या साहाय्याने इंद्राकरवी दस्यूला मारीत आम्ही आमची ईप्सिते तृप्त करू''असे म्हटले आहे. येथे दस्यूंना स्तोत्यांनी मारले आहे, इंद्राने नव्हे. पण एवढ्यावरून स्तोत्यांच्या व मानवी दस्यूंच्या युद्धातील दस्युवध सूचित होत नाही. ''इंद्राची प्रार्थना करून त्याच्या कृपेने आम्ही दस्युरूपी अमानवी उपद्रवकारी शत्रूंचा नाश केला'' असे स्तोता म्हणत आहे असे मानण्यास काहीच प्रत्यवाय नाही. यज्ञ केल्यामुळे पाऊस पडतो अशी श्रद्धा असल्यामुळे आम्ही यज्ञात इंद्राला सोम पाजून दुष्काळाचा नाश केला असे स्तोत्रकर्त्याने म्हटले तर तेवढ्यावरून दुष्काळ हा मानवी शत्रू आहे असे सिद्ध होणार नाही.

५.३०.९ मध्ये दासाने इंद्रावर स्त्रीसेना पाठवली तेव्हा इंद्र म्हणाला ''या अबला सेना माझे काय करणार आहेत?'' त्याने त्या सेनेतील दोन प्रमुख स्त्रियांना आपल्या अंतःपुरात घातले व तो दस्यूंशी युद्ध करण्यास पुढे आला. येथे स्त्रीसेना पाठवणारा दास मानव असला पाहिजे अशी काहींना शंका येईल. पण केवळ स्त्रीसेना पाठवल्यामुळे दस्यू मानव ठरला तर आपले पद बळकावण्यासाठी तपश्चर्या करणाऱ्यांचा तपोभंग करणाऱ्यावर अप्सरा पाठवणारा इंद्रदेखील मानव ठरेल. वैदिक देवतांचे वर्णन व्यक्तित्वारोपाने केलेले आहे. या वर्णनावरून या देवता कोणी मानवी व्यक्ती होत्या

अशी हजारो वर्षे कोणालाही शंका आली नव्हती व आजदेखील वैदिक स्तोत्रांमध्ये इतिहास कोंबण्याची प्रतिज्ञा केल्याशिवाय अशी शंका कोणाला येणार नाही.

दस्यूंप्रमाणेच आर्यांचे शत्रू म्हणून ऋग्वेदात दासांचा उल्लेख आहे. पण पुष्कळ वेळा दस्यु व दास यांत फरक केला जात नाही. ५.३०.९ मध्ये दासाने आपली सेना इंद्रावर पाठवली असे म्हटले आहे, तर लगेच दुसऱ्या ओळीत इंद्र दस्यूंवर चालून गेल्याचा उल्लेख आहे. १०.२२.८ मध्ये पहिल्या ओळीत दस्यूंची विशेषणे असून दुसऱ्या ओळीत ''तस्य दासस्य'' म्हणून दस्यू व दास एकच असे सुचविले आहे. तेव्हा दस्यू अमानव होते तसेच दासही अमानव होते हे ओघाने आलेच.

## दासांची जातकुळी

कुठेकुठे वृत्र व अहि यांना दास म्हटले आहे. १.१३२.११ मध्ये दास व अहि यांनी अडविलेले पाणि वृत्राला मारून सोडविले असे म्हटले आहे. वृत्र म्हणजे झाकणारा ही व्युत्पत्ती प्रसिद्ध आहे. अहि हा शब्द गोठवणे या अर्थाच्या धातूपासून निघाला आहे असे मॅक्समूलर म्हणतो. तेव्हा वृत्र व अहि या दोन्ही पाणी, प्रकाश वगैरे रोखणाऱ्या शक्ती होत्या. यावरूनच दस्यूंप्रमाणेच दासही अमानव होते हे स्पष्ट होते. ४.३०.१४ मध्ये शम्बराला दास म्हटले आहे. शम्बर हा अमानव म्हणूनच ऋग्वेदात येतो हे मॅक्डोनेललादेखील मान्य आहे. ५.३०.७ मध्ये नमुचि या असुराला दास म्हटले आहे. १०.४९.६ मध्ये वृत्रेव दासम्। असे शब्द आहेत. वृत्रासारख्या दासाला असे म्हणणे, वृत्र हाच दास होता असे म्हणण्यासारखे आहे. किंवा वृत्रासारखा दास म्हणजे उपद्रव करणारा या प्रकारे दास हे विशेषण म्हणून वापरलेले आहे. कसाही अर्थ केला तरी दास शब्दाचा कुठे कुठे वृत्र या अर्थी उपयोग केला आहे हे स्पष्ट आहे. वृत्र व अहि यांना मॅक्डोनेल ॲटमॉस्फेरिक डीमनस् म्हणतो.

दास हा मानव नसल्याबद्दल दुसरा पुरावा म्हणजे त्यांचा अमानुष असा स्पष्ट उल्लेख आहे. १०.२२.८ अमानुष म्हणजे मानवसुलभ भावभावना नसलेला क्रूर व अचाटकर्मी मानव असा अलंकारिक अर्थ घेण्याची सोय नाही, कारण १०.९९.६ मध्ये सहा डोळ्यांचा व तीन डोक्यांचा दास उल्लिखित आहे.

दासांच्या अमानवत्वाचे तिसरे प्रमाण असे की दासांना मानवासाठी मारले असे उल्लेख आहेत. नमुचि दासाला मारून मानवासाठी देवाप्रत जाणारा मार्ग केला





१०.७३.७. २.२०.६ मध्ये मनुषे दस्मतमः म्हणजे मानवासाठी दर्शनीय असे इंद्राचे दस्युवधाच्या संबंधात वर्णन केले आहे. २.२०.७ मध्ये मानवासाठी दासवध उल्लेखिलेला आहे.

हिटलरशी लढताना आम्ही मानवजातीच्या कल्याणासाठी लढतो आहोत असे इंग्रज व रशियन दोघेही म्हणत होते; तेवढ्यावरून हिटलर हा अमानव ठरत नाही असे कुणाला म्हणायचे असल्यास दासवधाने काय साधले हे पाहिले पाहिजे. दासवधाने साधलेल्या गोष्टी मानवाला मारून साधण्यासारख्या नाहीत. दासांना मारून पाणी व पृथ्वी निर्माण केली- २.२०.७ पाणी मोकळे केले १.३२.११, ५.३०.५, ८.९८.१८, ८.३२.२.

दासवधाच्या घटना ही मानवी युद्धे नाहीत हे त्यांच्या इतर वर्णनांवरूनही स्पष्ट आहे. २.११.४ मध्ये दासांची स्थाने वा प्रजा आम्हाला सूर्याने साह्य कर असे म्हटले आहे. तेव्हा दासावर सूर्य हा उपाय होता. म्हणजे दासदेखील दस्यूंप्रमाणे प्रकाशाचा रोध करणाऱ्या शक्ती होत्या. ५.१३.४ मध्ये सुपीक भूमिप्रीत्यर्थ वृष्टी व्हावी म्हणून सूर्याच्या घरात दासाचे नाव नाहीसे केले असे म्हटले आहे. सूर्याच्या घरात म्हणजे आकाशात ज्या वृष्टिरोधक शक्ती होत्या त्या नष्ट केल्या हा अर्थ स्पष्ट आहे.

६.२६.५ मध्ये गिरीच्या खाली लोटून शम्बराला मारले असे म्हटले आहे. हिमशिखरावरील बर्फ वितळून ती शिखरे खाली कोसळण्याच्या क्रियेचे हे वर्णन आहे. शम्बर म्हणजे पाणी. हा शम्बर पर्वतात दडून बसतो म्हणजे बर्फरूपाने गोठून राहतो असे इतर ठिकाणीही वर्णन आहे- २.१२.११.

१०.३४.१ मध्ये द्यावापृथ्वी भयभीत होऊन इंद्राला बोलावतात व तो दासाला मारून देवांचे रक्षण करतो असे म्हटले आहे. ज्या दासांना द्यावापृथ्वी भीत होत्या ते मानवी उपद्रवकारी नव्हते हे स्पष्ट आहे. १०.१३८.३ मध्ये आर्य इंद्राला जेव्हा दासाचा प्रतिकार जमला तेव्हा सूर्याने आकाशामध्ये आपला रथ सोडला असे म्हटले आहे. येथला दास म्हणजे सूर्यावर पडणारे खळे व त्याला झाकणारा ढग, वा ग्रहण असू शकेल. पण पाणी अडवणे हे दासाचे नेहमीचे काम आहे हे लक्षात घेता नुसतीच आशा दाखवून वर्षा न करणारा ढग हाच येथे विवक्षित दिसतो. इंद्राने अशा नाठाळ ढगांना पाणी पाडायला लावून रिकामे केले.

८.४०.६ मध्ये आपण इंद्रासह दासाचे साठवलेले धन वाटून घेऊ असे म्हटले

आहे. येथील दास हा आर्यांनी लुटलेला एखादा धनाढ्य आहे असे वाटण्याचा संभव आहे. पण दासाने अडवलेले पाणी इंद्राने सोडवले म्हणजे धनधान्यसमृद्धी होते, व हवीरूपाने त्याचा काही भाग इंद्रालाच अर्पण केला जातो. दासाने संभृत केलेले धन म्हणजे दासाने अडवून ठेवलेले धन. इंग्रजीत ज्याला कॉर्नीरिंग म्हणतात ती हीच क्रिया होय. दास धनराशीवर बसलेल्या नागाप्रमाणे धान्यकारक वृष्टिरूपी धन अडवून ठेवतो. हे इंद्राने मुक्त केले की, इंद्रालाच हवि अर्पण करून आम्ही ते त्याच्याशी वाटून घेऊ असे या ऋचेत म्हटले आहे.

१०.३८.३ मध्ये दास वा आर्य, जो आमच्यासमोर युद्धाला उभा ठाकेल त्याला प्रतिकार करण्याचे सामर्थ्य आम्हास दे असे म्हटले आहे. येथील प्रतिकार इंद्र करीत नसून इंद्राच्या कृपेने स्तोता करीत आहे. तेव्हा येथला दास हा मानवी शत्रू आहे असे वाटेल. पण मानवी व अमानवी अशा दोन्ही प्रकारच्या शत्रूशी झगडण्यास इंद्राची कृपा साहाय्यभूत होते. तेव्हा इथला दास हाही निश्चितपणे मानवी शत्रू आहे असे म्हणता येत नाही.

७.१९.२ मध्ये शुष्ण व कुयव नावाचे दोन दास उल्लेखले आहेत. दास हे जर विशेषतः जलरोधक उपद्रवकारी शक्तीचे नाव असते तर अशा शक्तीचा व्यक्तिनामांनी उल्लेख कसा झाला असता असा प्रश्न पडेल. पण मलेरियाची निरनिराळी नावे निरनिराळ्या प्रकारच्या मलेरियावरून पडलेली आहेत तशीच दासांची निरनिराळी नावे असू शकतात. शुष्ण म्हणजे शोषणारा व कुयव हा यु मिश्रणे वा बंधने या धातूपासून प्रदूषक वा बंधक या त्या दासांच्या कर्मावरून ही नावे दिली असावी. व्यक्तींच्या गुणधर्माशी मुळीच संबंध नसणारी ही व्यक्तिनामे दिसत नाहीत. तशी ती मानली तरी नैसर्गिक घटनावर व्यक्तित्वारोप करून त्यांचे वर्णन करण्याची सूक्तांची पद्धत लक्षात घेता केवळ व्यक्तिनामे वापरली म्हणून दास हे मानव ठरत नाहीत.

इलीबिश हे दासाचे नाव अनार्य मानवाचे असावे असे मॅक्डोनेल म्हणतो. पण इलीबिश याचा इलाया भूमोर्बिले शयानस्य म्हणजे पृथ्वीच्या बिळात राहणारा असा सायण अर्थ करतो. हिमालयीन प्रदेशात भूमीच्या खोल भागात गोठलेले पाणी पुष्कळ वेळा कडक उन्हाळ्यात देखील वितळत नाही. बिह्लणाने आपल्या विक्रमांकदेवचरितात म्हटले आहे की, उन्हाळ्याचा त्रास दूर करण्यासाठी काश्मीरी लोक बर्फ वापरतात. बिह्लणाच्या काळी कृत्रिम बर्फ तयार करण्याची कला अवगत असण्याचा संभव नाही.





तसे असते तर फक्त काश्मिरातलेच लोक उन्हाळ्यात बर्फाचा वापर करू शकत होते असे वर्णन करण्यात तात्पर्य नव्हते. तेव्हा काश्मीरचे लोक उन्हाळ्यात ज्या बर्फाचा वापर करीत ते भूमीच्या बिळात राहून न वितळणारे बर्फ असले पाहिजे. याचाच उल्लेख इलीबिश म्हणून केला आहे. इंद्राने इलीबिशाचा वेध घेतला म्हणजे आपल्या सूर्यस्वरूपाने ते देखील वितळविले. तेव्हा इलीबिश हा शब्द संस्कृतसारखा वाटत नाही या केवळ रुचिवश मतावरून त्याला अनार्य दासाचे नाव समजणे युक्त नाही. शिवाय मॅक्डोनेलच्या सूचनेवर मूले कुठारः असा आक्षेप म्हणजे इलीबिश हा दास होता असे कुठेच म्हटलेले नाही.

पाश्चात्त्य पंडितांच्या आधारे दांडेकर म्हणतात :''दास वा दाहे हे मूलतः आर्यांना विरोधी असणाऱ्या पश्चिम एशियातील एका टोळीचे नाव होते. कालांतराने त्याचा शत्रू असा अर्थ झाला. दास शब्दाच्या अर्थातील या परिवर्तनावरून आर्यांचा पश्चिमेकडून पूर्वेकडे विजयी मोर्चा सिद्ध होतो.'' ठासून विधाने केल्याने ती आपोआप सिद्ध होतात असे ज्यांना वाटते, त्यांनाच वरील वृत्तान्तात काही अर्थ दिसेल. दाहे व दास यातील ध्वनिसादृश्याव्यतिरिक्त ऋग्वेदातील दास हा शब्द दाहे या टोळीला लागू होता याला काही पुरावा दिलेला नाही. तसेच दाहे हे नाव ऋग्वेदातील दास या शब्दापेक्षा अधिक प्राचीन आहे यालाही काही पुरावा दिलेला नाही. उलट मॅक्डोनेलच्या मते दास याचा अमानवी अर्थ आधीचा व मानवी अर्थ मागूनचा आहे. तेव्हा ऋग्वेदात दास हा शब्द वापरणाऱ्या आर्यांनी जर दाहे या टोळीचे नाव या शब्दाच्या अनुरोधे ठेवले असेल तर त्यावरून ऋग्वेदाच्या सप्तसिंधू या भूमीतून म्हणजे भारतातून पश्चिम एशियाकडे आर्यांचा मोर्चा सिद्ध होतो असे का म्हणू नये?

दांडेकरांच्या उलट अनुमान अधिक सयुक्तिक रीतीने गिरीशचंद्र अवस्थींनी काढले आहे. दाव म्हणजे वणवा या संस्कृत शब्दापासून दाहे हा शब्द झाला आहे असे त्यांचे म्हणणे आहे. इराणीय भाषेत व चा ह होतो. जसे नव चे नह होते. त्याप्रमाणेच दाव चे दाह झाले. तेव्हा तर्कच करायचे तर आर्यांचा पश्चिमेकडून पूर्वेकडे मोर्चा सिद्ध करणाऱ्या तर्कापेक्षा, पूर्वेकडून पश्चिमेकडे मोर्चा सिद्ध करणारे तर्क अधिक अनायासे करता येतात.

## मानवपर वाटणारे उल्लेख

दासांचा मानवरूपाने उल्लेख कुठेच नाही असे नाही. ८.५६.३ मध्ये पौतक्रताने

शम्भर दास दान दिले असे म्हटले आहे. १.९२.८ मध्ये, हे उषे आम्हाला दासप्रवर्ग धन मिळो, असे म्हटले आहे. दासप्रवर्ग म्हणजे दासदासींचे समूह त्यात आहेत असे. येथे दास म्हणजे नोकरचाकर वा गुलाम असा अर्थ आहे. पण गुलामगिरीची प्रथा साऱ्याच प्राचीन देशात होती. गुलामांच्या उल्लेखावरून आर्य/अनार्य संघर्षाचे अनुमान काढायचे तर जगातल्या सर्वच देशात आर्य/अनार्य संघर्ष झाले असे म्हणावे लागेल.

८.४६.३२ मध्ये गवाश्वादींचा तारक बल्बूथ दास असताना विप्राने शत दक्षिणा घेतली असे म्हटले आहे. चित्राव, तरुक्ष व बल्बूथ ही यजमानांची नावे मानतात. पण पुढे "हे वायो, तुझ्या दस्युभक्तांनी मला शतावधि धेनुवृषभ दिले" असे भाषान्तर करतात. तेव्हा येथला दास हा उपक्षयिता वा उपद्रवेकारी नसून उलटा दाता आहे. दाञ् दाने या धातूपासून इथला दास शब्द आलेला दिसतो. दास शब्दाचा पुढील वाङ्मयात नोकर वा गुलाम असा अर्थ कसा झाला यावर यावरून प्रकाश पडतो. दास सेवा करतो, सेवा करणे हा अर्थ काम देणे या शब्दप्रयोगाने देखील व्यक्त करतात. जसे माझ्या सायकलने मला चांगले काम दिले. तेव्हा सेवा हा अर्थ दानार्थक धातूने व्यक्त होऊ शकतो.

पण दस्यू हा शब्द दसु उपक्षये या धातूपासून झाला आहे. या धातूचा सेवा असा अर्थ होण्यास वाव नाही. त्यामुळे उपद्रवकारी हाच दस्यू शब्दाचा अर्थ कायम राहून पुढील वाङ्मयात तो चोराला लावू लागले.

दास शब्दाची व्युत्पत्तीदेखील दसु उपक्षये या धातूपासून होऊ शकते. तेव्हा उपक्षय वा उपद्रव आणि सेवा यांची सांगड घालण्यासाठी १.९२.८ मध्ये शत्रूंना उपद्रव देणारे असा सायणाने दास शब्दाचा अर्थ केला आहे. या अनुरोधे दास म्हणजे मूलतः सैनिकाची नोकरी करणारे व नंतर साधारणपणे कोणतीही सेवा करणारे असा अर्थ झाला असे दिसते.

असे परिवर्तन दस्यूंच्या बाबतीत होऊ शकले नाही कारण त्याच्या मूळ धातूत अशा परिवर्तनाला सोय नव्हती.

## पणी, व्यापार आणि गायी

दस्यू व दास यांच्यासारखेच आर्यांचे शत्रू म्हणून ज्यांचा उल्लेख येतो असे तिसरे पणि आहेत. या पणींबद्दल ऋग्वेदात काय माहिती मिळते, पणि हे अनार्य मानव होते या मताला पुष्टी देणारे तीत काही आहे काय हे आता पाहू.





पणींचा निर्देश करणारे मुख्य सूक्त १०.१०.८ हे आहे. यात सरमा ही इंद्राची दूती बनून गोधनाच्या शोधात पणींकडे आलेली आहे. ते तिला लालूच दाखवून वश करू पाहतात. पण ती बधत नाही.

सरमा ज्या प्रदेशात गोधनाचा शोध घेत आली तो रसा नदीच्या पलीकडे होता. रसा ही सिन्धुची उपनदी मानलेली आहे.

पणी म्हणजे कवडीचुम्बक व्यापारी असे सायण म्हणतो. यात पण् धातूचा अर्थ सौदा करणे किंवा जुव्वा खेळणे असा आहे. व्यापार व जुव्वा यांत पुष्कळ वेळा फारसा फरक नसतो. व्यापार जुव्व्यासारखाच भाग्यावर अवलंबून असतो. व्यापारी वर्गावर कवडीचुम्बकपणाचा आरोप नेहमीच करण्यात येतो.

पणींचे दुसरे विशेषण बेकनाट असे आहे. सायण याची व्युत्पत्ती द्वि, एक, नाट म्हणजे दोन एक असे भ्रामक हिशेब करून नाचविणारे सावकार असा करतो.

तिसरे विशेषण ग्रथिन् असे आहे. सायण याचा अर्थ जल्पकान् असा करतो. पण मृध्रवाचः या पणींच्या एका विशेषणाचा अर्थ त्याने हिंसितवाचः असा केला आहे. ज्यांची वाणी हिंसित म्हणजे अधू आहे अशा पणींना जल्पक म्हणणे विचित्र आहे. तेव्हा ग्रंथी हा शब्द ग्रन्थ् कौटिल्ये किंवा ग्रन्थ् बंधने या धातूपासून असावा. या धातूचे कृदन्त ग्रंथित असे होते. त्याचप्रमाणे न् गाळून ग्रंथी असे रूप झाले असावे. ग्रंथी म्हणजे बांधून ठेवणारे वा कुटिल.

पणींचे चौथे विशेषण वैरदेय असे आहे. सायण याचा अर्थ दानवीरांनी देण्याचे धन असा करतो.

पणींची अऋत, अश्रद्ध, अयज्ञ वगैरे विशेषणे दास/दस्यूंच्या विशेषणांसारखीच आहेत.

वरील सर्व विशेषणे मानवांना लागू होत असल्यामुळे पणी हे मानवी व्यापारी होते असे वाटेल. पण ते अमानव होते याबद्दल काहीच शंका राहू नये अशी वचने अनेक आहेत. १.१५१.९ मध्ये हे मित्रावरुणांनो, पणींना तुमचे देवत्व लाभले नाही असे म्हटले आहे. कुणा कंजूष व्यापाऱ्यांना उद्देशून असे म्हणणे शक्य नाही, कारण त्यांना देवत्व लाभेल अशी अपेक्षा कुणी करीत नाही. पणींचे सामर्थ्य अतिमानवी होते म्हणून त्यांना देवत्व लाभणे शक्य होते; पण त्यांची कृत्ये दुष्टतेची होती म्हणून त्यांना देवत्व लाभले नाही. १.१८२.३ मध्ये पणींना मारून विप्रासाठी ज्योति कर

असे अश्विनीकुमारांना म्हटले आहे. कंजूष व्यापाऱ्यांना मारून आमच्यासाठी ज्योति कर ही भाषा फार ओढाताणीची आहे. दस्यूंप्रमाणेच प्रकाश अडवणे हेही पणींचे काम होते ही कल्पना यात व्यक्त झाली आहे. ४.५८.४ मध्ये म्हटले आहे : "पणींनी गायींमध्ये तीन प्रकारचें घृत लपवून ठेवले. हेतु हा की ते मानवाला मिळू नये. पण मग इंद्राने दूध, सूर्याने दही व अग्नीने घृत मिळवून दिले. पर्जन्यदेव इंद्राने पाऊस पाडून गायींना चारापाणी मुबलक मिळवून दिल्यामुळे त्या दुभत्या झाल्या, उन्हामुळे दूध आम्बून त्याचे दही होते व अग्नीवर उकळल्या मुळे तूप मिळते. तेव्हा सूर्याने दही व अग्नीने घृत मिळवून दिले याचा अर्थ स्पष्टच आहे. गायीमध्ये घृत दडवून ठेवणारा पणी हा कुणी मानवी व्यापारी होता असे म्हणण्याचे धाष्टर्य कोणी करील असे वाटत नाही."

६.१३.३ मध्ये हे अग्ने, वैद्युताग्नीने संगत होऊन तू ज्याला पाठवतोस तो शक्तीने वृत्राला मारतो व पणींचे धन वा शक्ती अपहृत करतो असे म्हटले आहे. येथला अग्नी हा ऋतजात म्हणजे यज्ञात पेटलेला अग्नी आहे. यज्ञ केल्याने पाऊस पडतो अशी समजूत आहे. यज्ञीय अग्नीच्या प्रभावाने पाणी अडवणारा वृत्र मरतो व पाऊस पडून पणींचे धनाची कमतरता निर्माण करण्याचे सामर्थ्य नष्ट होते, व सर्वत्र समृद्धी होते.

१०.६७.६ मध्ये गायींना कोंडून ठेवणाऱ्या बलाला इंद्राने केवळ आवाजाने मारले, मरुतांशी सख्य करून त्याने पणींना रडविले व गायी हिसकल्या असे म्हटले आहे. बल हा मानव होता असे कुणी समजत नाही. तसेच मरुत् हेही मानव नव्हते. या घटनेतले इंद्र, बल व मरुत् हे सर्व अमानव आहेत. तेव्हा पणीच तेवढे मानव कसे मानावे?

कंजूषपणाचा आरोप फक्त मानवावरच होऊ शकतो असे नाही. १.८३.३ मध्ये हे इंद्रा, तू आमच्या बाबतीत पणि म्हणजे कंजूष होऊ नकोस असे म्हटले आहे. ८.४५.१४ मध्ये इंद्रालाच पणि म्हटले आहे. नामदेवाने देवालाच कृपण म्हटले त्यातलाच हा प्रकार असावा.

## गायी हडप करणे

पणी हे मानव नव्हते याबद्दल आता कुणाला शंका उरली असेल असे वाटत नाही. पणींचे मुख्य दुष्कृत्य म्हणजे गायी हडप करणे. या गायी म्हणजे खरेखरीच्या





गायी असा अर्थ विवक्षित नाही हे अनेक ऋचांवरून स्पष्ट आहे. ९.१०८.६ मध्ये दगडाच्या आतून गायी बाहेर काढल्या असे म्हटले आहे. १०.६८.१० मध्येही अशीच भाषा आहे. दगड फोडून ज्यांना बाहेर काढावे लागते त्या गायी म्हणजे दूध देणारे चार पायाचे पशु नव्हेत हे स्पष्ट आहे. या गायींचे अप्या म्हणजे जलसंबंधी असे विशेषण आहे. तेव्हा गायी म्हणजे खडकासारख्या मेघातून बाहेर पडणारे पावसाचे पाणी वा मोठा कातळ फोडून खणून काढलेले पाणी हा अर्थ स्पष्ट आहे.

पण पणींच्या संबंधात सर्वत्रच गायी याचा अर्थ पाणी असा करता येत नाही. कारण १.३२.११ मध्ये पणींनी गायी अडवून ठेवल्या त्याप्रमाणे दास व अहि यांनी पाणी अडवून ठेवले असे म्हटले आहे. पाणी अडवण्याला गायी अडवण्याची उपमा दिली आहे त्या अर्थी सर्वत्रच गायी म्हणजे पाणी नव्हे, नाही तर उपमान आणि उपमेय असा भेदच उरणार नाही.

एकंदरीत वर्णनावरून गायी म्हणजे सर्वच प्रकारचे धन असा अर्थ आहे असे वाटते. वेदकाली गायी हे विनिमय वापरले जात होते. ४.२४.१० मध्ये माझी इंद्राची मूर्ती दहा गायींना कोण विकत घेईल असे विचारले आहे. तेव्हा गायी म्हणजे पैसा वा समृद्धी. वैदिक समाज हा मुख्यतः शेतीवर जगणारा समाज होता. प्रजांचा म्हणजे जनतेचा कृष्टीः म्हणजे कसणारे म्हणून नेहमी उल्लेख येतो. या जनतेचा प्रमुख देव इंद्र हा पावसाचा देव आहे. अतिवृष्टी व अवृष्टी हे शेतकऱ्याचे दोन मोठे शत्रू आहेत. म्हणून त्यांचा नाश करण्यासाठी इंद्राची सतत प्रार्थना केलेली आहे. पणींसारखे शत्रू हे वरील आपत्ती निर्माण करून कमतरता निर्माण करतात. ते गायी हरण करतात वा दडवून ठेवतात व आपल्याला लाभू देत नाहीत. चांगले पीक येतेसे वाटले की, आयत्या वेळी पाऊस पडू नये, वा पिकांना कीडच लागावी; गायींची चांगली जोपासना करून दूधदुभत्याची रेलचेल होईल म्हणून आनंद मानावा तोच एखादा रोग त्यांच्यात पसरून बऱ्याचशा आटाव्या व मराव्या हे कार्य पणींचे आहे. ते गायी हरण करतात म्हणजे एकंदरच धनाची कमतरता निर्माण करतात. एखाद्या कंजुष सावकाराने नेहमी आपल्याला मिळावयाच्या रकमेचा असा हिशेब करावा की, आपल्याला जे वाटते त्यापेक्षा कमी हाती लागावे तसे पणी करतात अशी कल्पना आहे.

पणींनी चोरलेल्या गायी या खरोखरीच्या गायी नव्हत्या व पणी हे मानव नव्हते हे पणींवरील प्रमुख सूक्तातच स्पष्ट आहे. ज्या निगूढ गायींना बृहस्पति, सोम, सोम

कुटणारे दगड, विप्र व ऋषी प्राप्त करते झाले त्या गायी निसर्गक्रमानेच वर येवोत असे १०.१०८.२ मध्ये म्हटले आहे. बृहस्पती वगैरे सर्व यज्ञकर्मात सहभागी असणारे आहेत. यज्ञ केल्याने समृद्धी होते, समृद्धीच्या आड येणाऱ्या बद्धमुष्टी पणिरूपी शक्ती नाहीशा होतात अशा श्रद्धा होती. यज्ञ करून आम्हाला दैवी कृपा लाभली व म्हणून आम्ही पणिरूपी मानवी शक्तींचा नाश करून त्यांनी चोरून नेलेल्या गायी परत मिळविल्या असे म्हणायचे असते तर सोमाला व सोम कुटणाऱ्या दगडाला गायी मिळाल्या असे म्हणण्यात काहीच अर्थ नव्हता.

पहिल्या ओळीतील गायी ऋताने म्हणजे निसर्गक्रमानुसार किंवा यज्ञाच्या सामर्थ्याने वर येवोत हे विधान महत्त्वाचे आहे. योग्य वेळी पाऊस पडला, व पिकांना व गुरांना होणाऱ्या रोगादी पीडा झाल्या नाहीत म्हणजे निसर्गक्रमानुसारच समृद्धी होते. निसर्गक्रमाच्या आड येणाऱ्या दुष्ट शक्ती यज्ञाने नष्ट वा हतबल होतात म्हणून यज्ञाला ऋत म्हटले आहे. मानवी चोरावर बलप्रयोग करून चोरलेल्या गायी हस्तगत करण्याच्या क्रियेचे वर्णन गायी निसर्गक्रमाने वा ऋताने वर आल्या या शब्दांनी कोणी करणार नाही.

पणी हे वायुमंडलातील राक्षस होते असे मॅक्डोनेलने कबूल केले आहे. पण नेहमीप्रमाणे मूळचा अर्थ असा असला, तरी पुढे तो शब्द अनार्यांना लावू लागले असे आपले पालुपाद त्याने कायम ठेवले आहे. तेव्हा पणींचा मानवरूपाने कोठे उल्लेख आहे काय हे पाहिले पाहिजे.

## पणींचे मानवपर वाटणारे उल्लेख

१०.६०.६ मध्ये म्हटले आहे : ''हे असमाति राजा, अगस्त्यांच्या नातलगासाठी तू रथाला रोहितवर्ण अश्व जोड व साऱ्या अदानशील पणींवर आक्रमण कर.'' येथे दान न देणाऱ्या म्हणजे यज्ञात आहुती न देणाऱ्या असा अर्थ करून यज्ञ न करणाऱ्या एखाद्या पणि नावाच्या अनार्य जातींवर चढाई करण्याची भाषा आहे असे वाटण्याचा संभव आहे. पण बृहद्देवतेत दिलेल्या आख्यायिकेप्रमाणे ही ऋचा अगस्त्यांची भगिनी व सुबंधूची माता हिने म्हटली आहे. ही ऋचा म्हटल्यानंतर सातपासून अकरापर्यंत ज्या ऋचा आहेत त्यांच्यात अग्नीने सुबंधूला जिवंत केल्याचे वर्णन आहे. हा अग्नि असमाति राजाच्या प्रार्थनेने अवतीर्ण झाला. अर्थात् पणींवर आक्रमण कर अशी सहाव्या





ऋचेतली विनवणी एकूण असमाति राजाने एखाद्या अनार्य मानवावर चाल केली नाही, तर अग्नीची प्रार्थना करून सुबंधूला जिवंत केले. तेव्हा विनंती ऐकून त्याने जे केले त्या अनुसारच विनंतीचा अर्थ लावला पाहिजे. ज्या पणींवर असमातीने आक्रमण केले तो एखादा मानव नसून मानवाचे पूर्ण जीवन त्याला जगू न देता मध्येच ओढून नेणारा मृत्यु होता. सहाव्या ऋचेचा पुढील ऋचांशी काहीच संबंध नाही असे मानल्याशिवाय त्या ऋचेचा मानवपर अर्थ करता येत नाही.

१०.५७ च्या टीकेत सायण म्हणतो- ''असमाति नावाचा इक्ष्वाकु राजा होता. बंधू, सुबंधू, श्रुतबंधू व विप्रबंधू असे त्याचे चार पुरोहित होते. ते गोपायन होते. असमाति राजाने त्या पुरोहितांचा त्याग करून दुसरे मायावी पुरोहित नेमले. तेव्हा हे चार पुरोहित क्रुद्ध झाले व त्यांनी राजावर अभिचार केला. मायावी असुरांना हे कळताच त्यांनी सुबंधूला मारले. तेव्हा त्याच्या तीन बंधूंनी अविनाशप्राप्तिहेतुभूत असे ५७ वे सूक्त म्हटले.''

५७च्या टीकेत चित्रावशास्त्री म्हणतात- ''बृहद्देवतामते किरात व आकुलि नामक दोन असुरांनी इक्ष्वाकु राजा असमाति रायप्रौष्ठ याचे मन कलुषित करून सुबंधू नामक पुरोहिताचा वध करविला आणि त्या पुरोहिताच्या श्रुतबंधु आदि तीन कनिष्ठ बंधूंना हद्दपार केले. त्या प्रसंगी 'मा प्र गाम पथो वयम्' या मंत्राने प्रारंभ होणाऱ्या ५७व्या अभिचार सूक्ताचे पठन करून कनिष्ठ बंधूंनी मृत सुबंधूला पुनरुज्जीवित केले.''

साऱ्या कथेचा रोख पाहता असमाति सुबन्धूच्या विरुद्ध होता असे दिसते. तेव्हा त्याने अग्नीकरवी सुबंधूला जिवंत करविले, व ६०.६ मध्ये अगस्त्यभगिनी सुबंधूमातेने असमातीचा धावा केला हे विचित्र वाटते.

एकूण संदर्भ पाहता पाचवीप्रमाणे सहावी ऋचा देखील इंद्रालाच उद्देशून असावी. ती असमातीलाच उद्देशून आहे असे मानले तर सुबंधुमातेने असमातीचीच करुणा भाकल्यामुळे त्याला दया आली व त्याने सुबंधूला जिवंत करविले असे मानावे. असे मानले तर असमातीला पणींचा पराभव कर ''असे म्हणताना अकाल मृत्यूचा पराभव कर असेच विवक्षित दिसते.'' एकूण पणींचा येथला उल्लेख देखील निर्विवादपणे मानवाचा उल्लेख नाही. कारण अशा उल्लेखाने काहीच संगती लागत नाही एवढे पटायला हरकत नसावी. मग संगती लावण्याचा वरचा प्रत्यय कोणास पटो वा न पटो.

पणी या शब्दाच्या बाबतीत दुसरी महत्त्वाची गोष्ट अशी की दास व दस्यू हे

शब्द उत्तरकालीन संस्कृतात मानवांचे द्योतक म्हणून वापरले आहेत तसा पणि हा शब्द वापरलेला नाही. शुक्ल यजुर्वेद ३५.११ मध्ये पणींना देवपीयु म्हटले आहे. महीधर व उव्वट हे दोघेही त्याचा अर्थ देवहिंसक वा देवद्वेष्टे असा करतात. मॉनियर विल्यम्सच्या इंग्रजी संस्कृत कोशात मायझर वा ट्रेडर यांना प्रतिशब्द म्हणून पणि शब्दाचा उल्लेख नाही. आपट्यांच्या कोशात पणि याचा अर्थ मायझर असा दिलेला आहे; पण उत्तरकारलीन संस्कृतात या अर्थी तो कोठे वापरलेला आहे याचा उल्लेख केला नाही.

आधुनिक संशोधकी कल्पनांनी दासांना पश्चिमेशियातील दाहे ठरविले त्याचप्रमाणे पणींना फोनोशियन ठरविले आहे. पणि व फोनीशियन यांत ध्वनिसाम्य आहे व फोनीशियन हे व्यापारी होते या व्यतिरिक्त या मताला काही आधार नाही.

## युद्ध म्हणजे यज्ञ

दास, दस्यू व पणि आणि त्यांच्याशी झालेली आर्यांची युद्धे हा काय प्रकार आहे याचे सम्यक् ज्ञान होण्यासाठी वेदा हि यज्ञार्थमभिप्रवृत्ताः। वेद यज्ञासाठी प्रवृत्त झाले ही प्राचीन परंपरा लक्षात ठेवली पाहिजे. वेदातील ऋचा यज्ञात म्हणण्यासाठी रचल्या गेलेल्या आहेत असे या परंपरेप्रमाणे ठरते. यज्ञ हीच वैदिकांची प्रमुख उपासनापद्धती होती. यज्ञ करून आपल्या मानवी व अमानवी शत्रूंवर विजय मिळविता येतो अशी त्यांची श्रद्धा होती. किंबहुना हे यज्ञ म्हणजेच अशा शत्रूंवर विजय मिळविण्यासाठी केलेली युद्धे होती. ३.२९.९ या ऋचेवर टीका करताना सायण म्हणतो की, वेदात पुष्कळ वेळा यज्ञ व युद्ध हे शब्द समानार्थी वापरले आहेत. १०.२७.२४ ही ऋचा या बाबतीत निर्णायक आहे.

''आदित्यदेवता हे तुमचे जीवन आहे. तिला जाणा. समर्यामध्ये एवढे लपवून ठेवू नका. आदित्य स्वर्गाला प्रकट करतो व पणि झाकून ठेवतो. त्या शुद्ध कर्त्याचे गमन कधी सुटत नाही.'' येथे समर्य हा शब्द समर या अर्थी वापरला आहे असे मानण्यास फारच ओढाताण करावी लागेल आदित्यदेवता समरामध्ये म्हणजे युद्धामध्ये झाकून ठेवणे हा शब्दप्रयोग सरळ नाही. सैन्यसंचलनाच्या धुळीमुळे सूर्य झाकला जातो हे येथे विवक्षित नाही. कारण अशी वर्णने सैन्यशक्तीचा गौरव करण्यासाठी केली जातात. उलट या ऋचेमध्ये आदित्यदेवतेला समर्यामध्ये झाकून ठेवू नका अशी विनंती आहे. समर्यामध्ये झाकून ठेवल्यामुळे तिचे ज्ञान होण्यास अडथळा होतो. लक्षावधि सैनिकांच्या





हालचालीमुळे धुळीचे लोट उडून सूर्य झाकण्याची घटना ही सूर्याचे ज्ञान होण्यास बाधक आहे म्हणून हे सैनिकांनो लढू नका अशी विनंती येथे अभिप्रेत आहे असे समजणे हास्यास्पद आहे. देवतेला यज्ञामध्ये ठेवणे हा शब्दप्रयोग सार्थ आहे. यज्ञ ही उपासनापद्धती आहे. उपासनापद्धतीचे बाह्य आचार नुसते यांत्रिकपणे पाळल्याने उपास्य देवतेची नीट ओळख पटत नाही. केवळ स्नानसंध्याटिळेमाळा करून देव पावत नाही. त्यासाठी अंतःकरणाला देवाची ओळख पटली पाहिजे असे जे साधुसंत म्हणतात त्यातलाच भाव येथे प्रकट झाला आहे.

सायणाची स्पष्टीकरणे फार महत्त्वाची आहेत. यज्ञ म्हणजे मानवी व अमानवी शत्रूंवर विजय मिळविण्यासाठी केलेले युद्ध ही ऋचाकारांची भूमिका आर्यांच्या स्वारीच्या कल्पनेने डोक्यात ठाण मांडल्यामुळे पुष्कळशा वेदवाचकांना आर्यांची अनार्यांशी झालेली शतशः युद्धे ऋग्वेदात वर्णिली आहेत असे वाटू लागते. अशा गैरसमजापासून बचावण्यासाठी ऋग्वेदाचे यज्ञप्रधानत्व लक्षात ठेवणे जरूर आहे.

मानवी व अमानवी शत्रूंवर विजय मिळविणे हे यज्ञाचे कार्य इतर अनेक ऋचांत स्पष्ट आहे. एकट-दुकट ऋचातील उल्लेखाची ती बाब नाही. १०.८७.४ म्हणते-

**यज्ञैरिषूः संनममानो अग्ने**
**वाचा शल्यां अशनिभिर्दिहानः ।**
**ताभिर्विध्य हृदये यातुधानान्**
**प्रतीचो बाहून् प्रतिभङ्ध्येषाम्।।**

हे अग्ने, आमची स्तोत्रे व यज्ञ यांनी आपल्या बाणांची अग्रे तीक्ष्ण करीत तू यातुधानांच्या हृदयावर प्रहार कर.

एकूण दास, दस्यू व पणि हे आर्यांचे शत्रू मानव असल्याबद्दल ऋग्वेदात एका अक्षरानेही उल्लेख नाही व या अमानवी शत्रूंशी झालेले युद्ध म्हणजे यज्ञ हे दोन परंपरापूत मुद्दे लक्षात घेतले की, ऋग्वेदात आर्य/अनार्य संघर्ष आहे ही कल्पना सर्वस्वी निराधार आहे हे स्पष्ट होते.

## इंद्राची जातकुळी

दास, दस्यू व पणी यांच्या संहाराच्या वर्णनावरून आर्य/अनार्य संघर्षाचे अनुमान काढता येत नाही यासाठी दुसरे एक प्रमाण म्हणजे हे संहाराचे काम बहुधा इंद्र करतो.

कधी कधी अग्नि, अश्विनीकुमार वगैरे देखील हे काम करतात. अर्थात् ही देवतांची कामे असल्यामुळे साहजिकच ऐतिहासिक नाहीत. अग्नि व अश्विनीकुमार हे मानव होते असे कुणा संशोधकाचे मत असल्याचे वाचनात आले नाही. इंद्राला देखील पेरी व दांडेकर याशिवाय कोणी मानव मानीत नाहीत. मॅक्डोनेल इंद्राचा समावेश वायुमंडलामधील देवतांमध्ये करतो.

इंद्र हा मुख्यतः मेघगर्जना व पर्जन्य यांचा देव आहे. इंद्राचे वज्र म्हणजे वीज असे उल्लेख आहेत. तसेच पावसाळ्यात दिसणाऱ्या पृथक्कृत रंगीबेरंगी सूर्यकिरणांना इंद्रधनुष्य म्हणतात. अग्नि हा इन्द्राचा जुळा भाऊ मानला आहे. मरुत् म्हणजे वादळी वारे हे त्याचे सहकारी होते. पृथ्वी दहापट झाली तरी इंद्र तीत मावणार नाही एवढा तो महान् होता. त्याने आकाशात सूर्याची स्थापना केली. उडणाऱ्या पर्वतांना त्याने स्थिर केले. आकाश व पृथ्वी पूर्वी एकमेकांना चिकटून होती. एकमेकाला चिकटलेले रबराचे तुकडे वेगळे करावे त्याप्रमाणे इंद्राने त्यांना वेगळे केले व ते पुनः एकमेकांवर आदळू नयेत म्हणून आस जसा रथाच्या चाकांना धरून ठेवतो तसे धरून ठेवले. तो उषेचा रथ मोडतो.

इंद्राचे वर्णन हे कोणा मानवाचे वर्णन नाही याबद्दल कोणाच परंपरागत वेदाभ्यासकाला शंका नव्हती. पण पेरी व दांडेकर यांनी, वरील सर्व वर्णने जमेस धरूनही इंद्र हा मुळात मानवच होता असे मत मांडले आहे. इंद्राच्या जन्माचे वर्णन आहे म्हणून तो मानव मानावा असा त्यांचा एक युक्तिवाद आहे. ३.४८ व ४.१८ हीं सूक्ते इंद्राच्या जन्माचा उल्लेख करतात. यांपैकी पहिल्या सूक्तामध्ये इंद्राने जन्मल्याबरोबर त्वष्ट्याला मारले, तो दूध न पिता सोमच प्याला, यावरून हे कुणा मानवाच्या जन्माचे वर्णन नाही हे स्पष्ट आहे. दुसरीच्या चौथ्या ऋचेमध्ये अदितीने इंद्राला हजार महिने गर्भात धारण केले असे म्हटले आहे. अदिती ही देवता होती, कोणी मानवी नव्हती. पाचवीमध्ये जन्मल्याबरोबर तेज धारण करीत इंद्राने द्यावापृथ्वी भरून काढल्या असे वर्णन आहे. दहावीच्या अनुसार इंद्राला जन्म दिला तोच मुळी स्थविर अवस्थेत. तो कधी तान्हा नव्हताच.

८.४५.४ मध्ये इंद्राने जन्मल्याबरोबर हातात बाण घेऊन उग्र म्हणून कुणाकुणाची कीर्ती आहे असे विचारले, १०.११३.४ मध्ये इंद्राने जन्मल्याबरोबर स्वर्गाचे स्तंभन केले असे म्हटले आहे. ८.७९.१५ मध्ये अर्भक असतानाच इंद्राने नव्या रथावर आरोहण





करून पिता व माता यांच्यासाठी विभुक्रतु अशा महिष मृगाला पक्षिले म्हणजे पचविले असे वर्णन आहे. सायणाच्या मते हा महिषमृग म्हणजे मेघ. त्याला इंद्राने शिजविले म्हणजे वृष्टी करायला लावले. ही सर्व वर्णने एखाद्या मानवाच्या जन्माची आहेत असे समजणे हास्यास्पद आहे.

इंद्राचे सोमप्रेम हे त्याच्या मानवत्वाचे सगळ्यात प्रबल प्रमाण आहे असे दांडेकर म्हणतात. पेरी म्हणतो की, १०.११९ मध्ये वर्णिलेली इंद्राची अवस्था इतकी वास्तव आहे की, ती मानवाची नाही असे मानणे कठीण आहे. या सूक्तात द्यावा व पृथ्वी माझ्या एका बाजूइतक्याही नाहीत, मी स्वर्ग व पृथ्वी यांचा अभिभव करीन, माझा एक पक्ष स्वर्गात व एक पृथ्वीवर आहे. मी देवांना हवि वाहून नेणारा अग्नी आहे वगैरे मानवाला लागू न होणारी वर्णने आहेत. ४.२९.७ मध्ये इंद्र सोमाची तीन सरोवरे प्याला असे म्हटले आहे. इंद्र हा मानव असता तर तीन सरोवरे पिऊ शकला नसता म्हणून दांडेकर याला अतिशयोक्ती म्हणतात. एकूण सोमपानाचे वर्णन अमानवी वाटले तर ते अलंकारिक म्हणून निकालात काढायचे व वास्तविक वाटले तर त्यावरून इंद्राला मानव म्हणायचे. वस्तुतः इंद्र सोमाची तीन सरोवरे प्याला हे वर्णन अतिशयोक्तीचे नसून तो एकाच वेळी हजारो ठिकाणी चाललेल्या यज्ञातला सोम पितो म्हणून अगदी वास्तविक आहे. इंद्राला मानव म्हणून मग या साध्या वर्णनाला अतिशयोक्ती मानून निकालात काढणे, आधी पायावर कुऱ्हाड मारून मग त्यावर मलमपट्टी करीत बसण्यासारखे आहे. इंद्राच्या सोमपानाच्या अमानवी वर्णनांना अतिशयोक्ति अलंकार म्हणायचे तर त्यांच्या वास्तववादी वर्णनांना स्वभावोक्ति अलंकार म्हणून ते देवतेच्या सोमपानाचे वर्णन का मानू नये?

"बृहद्देवतामते लवऋषीच्या रूपाने सोम प्राशिणाऱ्या इंद्राला अन्य ऋषींनी पाहिले. तेव्हा सोममदोत्पन्न स्वशरीरस्थितीचे आणि पराक्रमांचे वर्णन त्याने या सूक्तद्वारा केले." चित्राव-या माहितीवरून सोममदाच्या वर्णनाचा सगळाच उलगडा होतो. लवऋषीच्या अंगात इंद्र संचारला होता किंवा तो तशी बतावणी करीत होता. सोमपानाच्या वर्णनात जी वास्तवता असेल ती सोम पिऊन मत्त झालेल्या एका मानवाचे म्हणजे लवऋषीचे तीत वर्णन आहे म्हणून आली आहे. अवास्तवता व दैवी वर्णने जी आहेत ती इंद्राबद्दल लवऋषीच्या ज्या कल्पना होत्या त्याच त्याच्या तोंडून सोमाच्या तारेत बाहेर पडल्यामुळे आहेत. एखाद्या बाईच्या अंगात काली संचरली की, ती

कालीच्या लौकिक कल्पनेप्रमाणे भाषणे करू लागते. तिच्या वर्तनात जो वास्तव अंश असतो तो ती खरोखरीची स्त्री असल्यामुळे असतो. अशा वर्णनावरून काली ही खरोखरीच एक मानवी स्त्री आहे असे कुणी म्हणू लागल्यास त्याला काय म्हणावे?

दांडेकरांची विचारपद्धती अवलंबिली तर इंद्रच काय, शिवाच्या विवाहाचे व मुलाबाळांचे वास्तववादी वर्णन केले आहे, सरस्वती, लक्ष्मी वगैरेंच्या स्त्रीसौंदर्याचे व सवतिमत्सराचे देखील वर्णन आहे, म्हणून शिव, लक्ष्मी, सरस्वती वगैरे देखील मानव आहेत, शिव हा देव नसून त्या नावाचा एक मानव खरोखरच पार्वती नावाच्या आपल्या पत्नीबरोबर हिमालयात राहत आहे, लक्ष्मी व सरस्वती या खरोखरीच्या स्त्रिया आहेत असे म्हणायला काय हरकत आहे?

यावर कोणी म्हणतील की, राम व कृष्ण हे देखील मानव होते; पण त्यांना समुद्राला बाणाने भिववून शरण आणणे, मेलेला द्विजपुत्र जिवन्त करणे, गोवर्धन पर्वत उचलून धरणे वगैरे अमानवी कृत्ये चिकटविली आहेत. तसेच मूळच्या मानवी इंद्राला दैवी सामर्थ्य चिकटविले नसेल कशावरून?

यावर उत्तर असे की, रामायण व महाभारत वाचताना आपण एखाद्या मानवाचे जन्मापासून मृत्यूपर्यंतचे चरित्र वाचत आहोत याबद्दल शंका येत नाही. हे मानव ऐतिहासिक होते की काल्पनिक हा प्रश्न येथे असंबद्ध आहे. कादंबरीतला नायक काल्पनिक असला तरी मानवच असतो. रामकृष्णांना चिकटविलेली अमानवी कृत्ये फार थोडी आहेत व ती देखील मानवी व्यवहार करतानाच केलेली आहेत.

दुसरे असे की, राम व कृष्ण हे मानव होते एवढेच नव्हे तर ऐतिहासिक मानव होते अशी या देशात हजारो वर्षांची परंपरा आहे. त्यांच्या चरित्राशी संबद्ध अशी स्थळे देशभर दाखविली जातात व या स्थळांची ही परंपरा लिखित इतिहासाचे हात जेथपर्यंत पोचतात त्यापेक्षा देखील प्राचीन व अक्षुण्ण आहे. रामायण व महाभारत हे ग्रंथ रामकृष्णांना देव मानीत नसून अवतार मानतात. अवतार हा देवाचा असला तरी तो मानवी असतो.

याउलट, इंद्र हा मानव नव्हता, मानवरूपाने कधीही न येणारा देव होता, त्याची कृत्ये ऐतिहासिक नसून अतिमानवी व प्राकृतिक होती अशीच हजारो वर्षांची परंपरा आहे. इंद्राचे जन्मापासून मृत्यूपर्यंतचे इहलोकीचे चरित्र सांगण्याचा कोठेच प्रयत्न नाही. तेव्हा ऋग्वेदातील स्पष्ट वर्णने व हजारो वर्षांची परंपरा खोटी मानून इंद्राच्या कृत्यांत





मानवी इतिहास शोधण्यासाठी पाश्चात्त्य पंडितांच्या निरंकुश कल्पनाजालापेक्षा फारच बलवत्तर प्रमाण पाहिजे.

मोठा आटापिटा करून इंद्राला मानव ठरविल्यावरही या पंडितांनी जे निष्कर्ष काढलेले आहेत ते त्यांच्याच अंगलट येणारे आहेत. ई सेग म्हणतो की व्यंस हा दास इंद्राचा बाप होता. ज्या वृत्राला इंद्र नेहमी मारतो तो या त्वष्ट्याचा मुलगा होता. इंद्र हा बापाच्या बाजूने दासांचा व आईच्या बाजूने देवांचा वंशज होता. आर्योत्तम इंद्र व अनार्योत्तम वृत्र हेच याप्रमाणे भाचे-मामे ठरल्यावर आर्य/अनार्य संघर्ष हा कंस-कृष्ण संघर्षाप्रमाणे यादवी युद्धाच्या स्वरूपाचा ठरतो. आणि तीही यादवी मानवांची नव्हे तर देवयोनितल्या लोकांची.

कारण इंद्र हा जसा देव होता तसाच त्याचा मुख्य शत्रू जो वृत्र त्याचा बाप हा देखील एक वैदिक देव होता. १.१४२.१० मध्ये त्वष्टा आमचे पोषण करो असे म्हटले आहे. यास्काच्या मते त्वष्टा म्हणजे तूर्णमश्नुते, वाढवितो वा व्यापतो तो. सायणाच्या मते वृष्टी वगैरे क्रियांचा कर्ता असा त्वष्टा शब्दाचा अर्थ आहे. १.१८६.६ मध्ये त्वष्टा आमच्या यज्ञात येवो अशी प्रार्थना केली आहे. १.१८८.९ मध्ये त्वष्टा हा रूपांचा प्रभू व सर्व पशूंना व्यक्त करणारा असे म्हटले आहे. २.३.९ मध्ये त्वष्टा आम्हाला प्रजा देवो असे म्हटले आहे. २.२३.१७ मध्ये ब्रह्मणस्पतीला त्वष्ट्याने निर्मिले असे म्हटले आहे. म्हणूनच वृत्र हा ब्राह्मण होता व वृत्रवधाने इंद्राला ब्रह्महत्येचे पातक लागले ही कल्पना निघाली असावी. २.३१.४ मध्ये त्वष्टा आमच्या रथाला प्रेरणा देवो असे म्हटले आहे. ३.५५.१९ मध्ये त्वष्टा हा देव विश्वरूप सविता आहे, त्याने प्रजांचे पोषण व बहुप्रकारे जतन केले असे म्हटले आहे. ५.४६.४ मध्ये विष्णू, वायू, सोम, ऋभू व अश्विनीकुमार या देवांमध्ये त्वष्ट्याचे नाव गोवले आहे.

एकूण त्वष्टा हा वैदिक देव होता यात संशय नाही. त्याची व इंद्राची स्पर्धा होती असे दिसते. १०.४९.१० मध्ये त्वष्ट्याला न साधलेला पराक्रम मी केला असे इंद्र म्हणतो. पुराणांतरी जशी शिवविष्णूच्या स्पर्धेची कथानके आहेत त्याचप्रमाणे वृत्राला त्वष्ट्याचा पुत्र कल्पून इंद्र-त्वष्टृस्पर्धेचा विस्तार केलेला दिसतो. ३.४८.४ मध्ये इंद्र त्वष्ट्याला जन्मानेच पराभूत करून त्याच्या चमसातले सोम प्याला असे म्हटले आहे.

इंद्राचे शत्रू हे केवळ अमानवच नव्हे तर देवयोनीतले होते. ज्या शक्ती मानवापेक्षा अधिक शक्तिशाली आहेत त्या अपकारी असल्या तरी देवयोनीतल्याच. त्यांच्यापासून

बचाव करायचा असेल तर एक तर त्यांचीच प्रार्थना करावी किंवा त्यांच्यापेक्षा अधिक शक्तिमान् देव कल्पून त्याची प्रार्थना करावी. सुर व असुर शब्दांतील घोटाळा निर्माण होण्याचे कारण दैवी पण अहितकारी शक्ती या देखील प्रार्थनेचा विषय होतात व हितकारी दैवी शक्ती हा तर प्रार्थनेचा मुख्य विषय असतोच.

सारांशतः ऋग्वेदातील तथाकथित आर्य/अनार्य संघर्ष या दैवी व प्राकृतिक घटना आहेत. कुठेकुठे व्यक्तित्वारोप करून त्यांचे वर्णन केले आहे. या वर्णनावरून मानवी इतिहास शोधू जाण्यास दुराग्रहाशिवाय दुसरा आधार नाही.

■ ■





...८...

# ऋग्वेदातील तथाकथित आर्य-अनार्य संघर्ष-३

**लिंगपूजा व मूर्तिपूजा या वैदिकांच्या एतद्देशीय शत्रूच्या उपासना नसून वैदिकांच्याच उपासना होत्या. इन्द्राने उतद्देशीय अनार्यांची पुरे फोडली असे ऋग्वेदात वर्णन नाही.**

## लिंगपूजा, पुरन्दर इन्द्र व दाशराज्ञ युद्ध

शारीरिक व भाषिक, कोणत्याही अर्थी आर्य/अनार्य अशा वंशांचा उल्लेख ऋग्वेदात नाही. तेव्हा या दोन अर्थी आर्य/अनार्य संघर्षाचा उल्लेख ऋग्वेदात असणे शक्य नाही हे आतापर्यंत पाहिले. आता उपासनाभेद वा स्वकीय/परकीय वगैरे कारणांमुळे दोन मानवसमूहांत होणाऱ्या संघर्षाच्या स्वरूपाचा आर्य/अनार्य संघर्ष ऋग्वेदात आहे काय ते पाहू.

काही लोकांच्या मते आर्य हे यज्ञ करणारे असल्यामुळे मूर्तिपूजेचे विरोधक होते, त्याचप्रमाणे लिंगरूपाने मूर्तिपूजा करण्याच्या प्रघाताचा ते अनिवार तिरस्कार करीत होते. हे लिंगपूजक व मूर्तिपूजक आदिवासी होते व आर्य हे परकीय आक्रमक होते.

पण या मताला ऋग्वेदाच्या एका अक्षराचाही आधार नाही. ऋग्वेदात मूर्तिपूजेचा कुठेच निषेध नसून ४.२४.१० मध्ये ती सर्रास प्रचलित असल्याचा उल्लेख आहे. ''माझा इन्द्र दहा गायींना कोण विकत घेईल? जेव्हा तो वृत्राला मारील तेव्हा तो मला कोण परत करील?'' असे या ऋचेचा कर्ता विचारीत आहे. इन्द्र म्हणजे इन्द्राची मूर्तीच फक्त विकली जाऊ शकते, इन्द्र विकला जाऊ शकत नाही यावरून मूर्तिपूजेचा उल्लेख निर्विवाद आहे. दुसऱ्या ओळीवरूनही देवाला साकडे घालून दमदाटीने त्याच्याकडून आपली कामे करवून घेण्याची जी एक पद्धत आहे तिचा निर्देश दिसतो. इन्द्राची प्रार्थना करून या ऋचाकाराचे काम होत नाही म्हणून ज्याने तो विकत घेतला त्याच्याकडे गेल्यावर इन्द्राला आपला रुसवा जाणवून तो आपले काम करील अशी त्याला खंत वाटते आहे. म्हणून इन्द्राने जर वृत्राला मारले तर तो त्याला परतही पाहिजे आहे.

मूर्तिपूजेच्या विरुद्ध ऋग्वेदात काहीच नसले तरी लिंगपूजेचा विरोध आहे असे दाखविण्यासाठी ७.२१.५ चा आधार घेण्यात येतो. आमच्या यज्ञात शिस्नदेव न येवोत अशी या ऋचेत प्रार्थना आहे. तसेच १०.९९.३ मध्ये इन्द्र शतद्वार शत्रुपुरात लपवून ठेवलेले धन बलाने हरण करतो व शिस्नदेवांना मारतो असे म्हटले आहे ही वरील गोष्टीचीच पुष्टी समजण्यात येते.

या दोन्ही ठिकाणी शिस्नदेव याचा लिंगपूजक असा अर्थ करण्यात आला आहे. पण सायण त्याचा अर्थ शिस्नाशी क्रीडा करणारे म्हणजे विकृत कामुक असा करतो. असा अर्थ का होऊ शकत नाही याचे समाधानकारक उत्तर लिंगपूजक असा अर्थ करणाऱ्यांजवळ नाही.





पण ''लिंगपूजक असा अर्थ होऊ शकत नाही याला तरी प्रमाण काय?'' असे यावर विचारण्यात येईल. यावर अनेक उत्तरे आहेत. लिंगपूजक यज्ञात कशासाठी येत होते? लिंगपूजेप्रमाणे ते यज्ञातही भाग घेत होते काय? की यज्ञाचा बीमोड करायला मारीच, सुबाहूप्रमाणे येत होते? बीमोड करायला येत असतील तर नुसते ते न येवोत ही प्रार्थना, चाळीस चाळीस वर्षे भीतीने दडून बसलेल्या शम्बरासारख्यांना हुडकून काढून ठार मारणाऱ्या इंद्राला करणे विचित्र वाटते. वरील दुसऱ्याच ऋचेत इन्द्राने शतद्वार पुरात शिरून शिस्नदेवांचा फडशा पाडल्याचे वर्णन आहे. तेव्हा यज्ञाचा विध्वंस करायला येणाऱ्या शत्रूंना इन्द्राने केवळ यज्ञात येण्याची मनाई करावी एवढ्यावरच यज्ञकर्त्याचे समाधान होणे शक्य नव्हते. सयुक्तिक अनुमान हेच दिसते की, शिस्नदेव यज्ञातदेखील भाग घेत असत. पण शिस्नाशी क्रीडा करणारे म्हणजे एकप्रकारच्या कामुक विकृतीच्या आहारी गेलेले कोण हे त्यांच्याकडे पाहून कळत नसल्यामुळे असे विकृत लोक आमच्या यज्ञात येऊन त्याचे पावित्र्य नष्ट न करोत अशी प्रार्थना केलेली आहे.

दुसऱ्या ऋचेत इन्द्राने शिस्नदेवांना मारले असे वर्णन आहे. शिस्नदेव म्हणजे शिस्नाशी क्रीडा करणारे विशिष्ट विकृतकामी असा अर्थ न करता सायणाप्रमाणे नुसता अब्रह्मचर्याः असा अर्थ केला तर इन्द्र साऱ्या विवाहितांना मारीत सुटला असा भलताच अर्थ निघतो. तेव्हा केवळ अब्रह्मचर्याः असा अर्थ घेऊन चालणार नाही. शिस्नाशी क्रीडा करून विकृत रीतीने कामपूर्ती करणारे काही लोकसमूह अस्तित्वात होते व त्यांना इन्द्राने मारले, असे समजले पाहिजे.

''शिस्नदेवा याचा अर्थ विकृत कामी असा होऊ शकला तरी शिस्न हा ज्यांचा देव आहे ते म्हणजे लिंगपूजक असा अर्थ होऊच शकत नाही कशावरून?'' हा प्रश्न उरतोच. या प्रश्नाचे उत्तर देताना विधुशेखर भट्टाचार्य म्हणतात की मातृदेव, पितृदेव, स्त्रीदेव इत्यादी शब्दांत मातेला देव मानणारे पित्याला देव मानणारे वा स्त्रीला देव मानणारे असा अर्थ होत नाही, तर या सर्वांना देवासमान पूज्य मानणारे म्हणजे तत्परायण असा अर्थ होतो. त्याचप्रमाणे शिस्नाला देव न मानता देवासमान पूज्य मानणारे म्हणजे तत्परायण असाच शिस्नदेव याचा अर्थ केला पाहिजे. पण हे उत्तर समाधानकारक नाही. शिस्नदेव याचा अर्थ शिस्नपरायण असा होऊ शकतो एवढेच फक्त विधुशेखर भट्टाचार्यांनी दाखवून दिले आहे. लिंगपूजक असा अर्थ होऊच शकत नाही असे त्यांनी दाखवून दिलेले नाही.

शिस्नदेव या शब्दाचा लिंगपूजक असा अर्थ करण्यावर मुख्य आक्षेप कसा आहे की, लिंगाची पूजा करणाऱ्यांना लिंगदेव असे कुणीच म्हणत नाही. कारण ते लिंगाला देव मानत नसून फक्त त्याचे प्रतीक मानतात. मूर्तिपूजकाला कुणीही मूर्तिदेव म्हणत नाही, कारण मूर्तिपूजक हा मुळी मूर्तीला देव समजतच नाही.

## लिंगपूजा आणि विष्णू

लिंगपूजा ही यज्ञकर्माच्या विरोधी होती व यज्ञकर्मी आर्यांचे लिंगपूजक अनार्य हे शत्रू होते हे म्हणणे याप्रमाणे गळून पडते. लिंगपूजा ही वेदविरोधी नाही याला वेदातच दुसरीही प्रमाणे आहेत. उदाहरणार्थ, ७.१००.६ मध्ये ऋषी म्हणतो, "हे विष्णो, मी शिपिविष्ट आहे असे तू म्हणतोस, हे काय सांगण्यासारखे झाले? तू संग्रामामध्ये अन्य रूप धारण करता झालास. हे तुझे वर्ण म्हणजे रूप तू आमच्यापासून लपवून ठेवू नकोस."

पूर्वी विष्णू आपले रूप टाकून व दुसरे कृत्रिम रूप धारण करून संग्रामात वसिष्ठाचे साहाय्य करता झाला या घटनेला उद्देशून ही ऋचा आहे. निरुक्त म्हणते की, शिपिविष्ट व विष्णू ही विष्णूची दोन नावे आहेत. औपमन्यव म्हणतात की, पूर्वीचे म्हणजे शिपिविष्ट हे नाव कुत्सार्थी आहे हा कुत्सार्थ म्हणजे शेपाप्रमाणे प्रकाशाचे दर्शन न घेणारा. हे अश्लीलार्थक असल्यामुळे प्रशस्त नाही असे सायण म्हणतो. तेव्हा शिवाप्रमाणेच विष्णूची देखील लिंगरूपाने कल्पना व बहुधा उपासना केली जात होती असे दिसते.

विष्णू स्वतःला शिपिविष्ट म्हणवितो हे ऋचाकाराला आवडत नाही. तेव्हा विष्णूला जे रूप न लपविण्यासाठी तो विनवीत आहे ते शिपिविष्टाहून वेगळे संग्रामातले रूप आहे. संग्रामात विष्णू शिपिविष्ट नव्हता, अन्यरूप होता.

हर हर महादेव अशी रणगर्जना करताना जे महादेवाचे रूप मनात असते ते लिंगरूप नसते. लिंगरूपाने ज्याची पूजा होते तो महादेव हा संग्रामाचाही देव आहे. पण संग्रामात स्फूर्ती देणारे त्याचे रूप वेगळे.

तेव्हा महादेवाची पौराणिक काळी लिंगरूप व संग्रामदेवतारूप अशी जी दोन रूपे होती तीच वैदिक काळी विष्णूची होती. वैदिक आर्य हे स्वतःच लिंगपूजक होते. ते लिंगपूजकांचा शत्रू म्हणून उल्लेख करतील हे संभवत नाही.

शतरुद्रियामध्ये रुद्राला चोरांचा पती म्हटले आहे. पुढील वाङ्मयात रुद्राला उच्छिष्टभाक् म्हटले आहे, कारण देवतांना हवि देऊन झाल्यानंतर उरलेला भाग रुद्राला





द्यायचा असतो. लौकिक विधीमध्ये रुद्राला पिंड मात्र दिले जातात. अग्निहोत्र यज्ञामध्ये प्रजापतीला दिलेल्या दुसऱ्या हवनानंतर अध्वर्यूने पळीच्या विशिष्ट हालचालीने रुद्राला स्वतःच्या घरी परत पाठवावे अशी पद्धत होती, यावरून रुद्र वा शिव हा मुळात आर्यांचा देव नव्हता असे दांडेकर अनुमान काढतात.

पण असे अनुमान काढण्यास जागा नाही. २.३३.५ मध्ये हवीमभिर्हवते यो हविर्भिः। रुद्राचे हवींच्या साहाय्याने आवाहन केले जाते, असे स्पष्ट म्हटले आहे. १.११४.३ मध्ये अश्याम ते सुमति देवयज्यया-आम्ही देवयज्ञाने तुझी सुमति प्राप्त करतो-जुहवाम ते हविः। -तुला आम्ही हवि अर्पण करतो वगैरे वचने आहेत. त्यावरून रुद्र हा इतर वैदिक देवतांप्रमाणेच यज्ञीय देव होता हे स्पष्ट होते. खुद्द ऋग्वेदात रुद्राचे स्वरूप असल्यावर पुढील वाङ्मयाच्या आधारावर त्याला अवैदिक ठरविणे विचित्र आहे.

शिवाय पुढील वाङ्मयावरूनही असे काही ठरत नाही. वैदिक रुद्र देखील कोपिष्ट देव आहे. आमच्या नमस्कारात काही चूक झाल्यामुळे रुद्रा तुला क्रोध न येवो अशी २.३३ मध्ये प्रार्थना केली आहे. तुझ्या सेना आमच्या ऐवजी दुसऱ्या कुणाचा निःपात करोत असे म्हटले आहे. क्रुद्ध देवता रोग, चोऱ्या आदि सेनांच्या साहाय्याने त्रास देते म्हणून रुद्राला चोरांचा पती म्हटले आहे. रुद्राला परत आपल्या घरी पाठवणे हा रुद्राचा अधीक्षेप नसून त्याची सन्मानपूर्वक बोळवण आहे. गणपतिविसर्जनाच्या चालीवरून गणपतीचा अधीक्षेप सिद्ध होत नाही. लौकिक विधीत रुद्राला पिण्ड दिले जातात यावरून तो वैदिक देव नसून लौकिक आहे असे सूचित केले गेले आहे. लौकिक विधी अवैदिक होते असे यात गृहीत धरले गेले आहे. हे आपल्या परंपरेच्या सर्वथैव विरुद्ध आहे. सर्व वेद उपलब्ध नाहीत म्हणून लोकाचारांवरून वेदांचे अनुमान करावे अशी परंपरा आहे. वेद हे लोकाचारांच्याच एका लहानशा अंशाचे लिखित रूप आहे. म्हणून लौकिक परंपरा उपलब्ध वेदात सापडत नसल्या तरी अनुपलब्ध वेदात असल्याच पाहिजेत असा परंपरामान्य सिद्धांत आहे.

लिंगपूजा अवैदिक होती या म्हणण्याला ऋग्वेदात आधार सापडत नाही, पण ऋचाकाराला विष्णूचे शिपिविष्ट हे रूप आवडत नाही यावरून ऋग्वेदकाली देखील लिंगपूजेला विरोध होत होता असे अनुमान काढणे अयुक्तिक होणार नाही. लिंगपूजा सर्वांना आवडणे शक्य नाही कारण जननेन्द्रियांच्या बाबतीत गोपनीयता राखावी अशी परंपरा फार प्राचीन आहे. यात आर्य आणि अनार्य हा वाद घुसडण्याची जरूर नाही.

लेडी चॅटरलीज लव्हर ही डी. एच्. लॉरेन्सची कादंबरी अश्लील आहे म्हणून तिच्यावर कात्री फिरविण्यात आली होती. टपालाने असल्या अश्लील मजकुराची ने-आण करण्याचे नाकारले होते. ही कादंबरी वाचताना मला शिमग्यातील कवित्वात व तिच्यात काही फरक वाटला नाही. असे असून न्यायाधीशाने तिच्यात साहित्यिक गुण आहेत, ती अश्लील नाही व तिचे समाजात चलन होऊ देण्यास काही हरकत नसावी असे मत दिले. एकाच कादंबरीची पंकस्नान व उच्च साहित्य म्हणून एकाच इंग्रज समाजात सम्भावना झाली. पण लॉरेन्सला अश्लील ठरविणाऱ्यांनी तो आंग्ल संस्कृतीच्या बाहेरचा कोणी अनांग्ल होता असे अनुमान काढले नाही. तेव्हा लिंगपूजा व तिचा विरोध यावरून आर्य/अनार्यसंघर्ष सिद्ध होत नाही. आजही लिंगपूजेला नावे ठेवणारे आर्यसमाजी व सनातनी देखील आढळतात. लिंगपूजा ही मुळी लिंगपूजा नाहीच, ती अग्निपूजा आहे असे महाभारताचा आधार देखील डावलून घुलेशास्त्रींनी प्रतिपादन केले आहे. एवढ्यावरून घुलेशास्त्री ज्या समाजाचे घटक होते त्यात लिंगपूजा प्रचलित नव्हती, असे अनुमान निघू शकेल काय?

लिंगपूजेला विरोध होणे स्वाभाविक आहे, त्याचप्रमाणे यज्ञाला देखील विरोध होणे स्वाभाविक आहे. उपनिषदांत यज्ञ हे फुटक्या नावेसारखे आहेत असे म्हटले आहे. एवढ्यावरून उपनिषदे अनार्यांची होती असे कुणी म्हणत नाही. पुढील काळात ज्याने यज्ञाला विरोध केला तो गौतमबुद्ध स्वतःच्या मूलभूत सिद्धान्तांना आर्यसत्ये म्हणतो. वैदिकांनी देखील त्याला कधी अनार्य म्हटले नाही. तीच गोष्ट महावीराची आहे. तो देखील वैदिक उपासनापद्धती मानीत नव्हता. पण त्याला अनार्य म्हटलेले नाही. दास, दस्यू, पणि वगैरे अनार्य मानले गेले ते केवळ यज्ञ करीत नव्हते. एवढेच केवळ नव्हे तर कोणतीच उपासना करीत नव्हते. त्या अतिमानवी शक्ती होत्या व आर्यांच्या देवांशी लढू शकत होत्या. केवळ यज्ञावर विश्वास नसणाऱ्या मानवांना अनार्य म्हटल्याबद्दल ऋग्वेदात पुरावा नाही.

शिश्नदेवा वगैरे शब्दांवरून वेदात शिवोपासनेच्या विरुद्ध प्रचार आहे असे म्हणणाऱ्यांच्या तर्कपद्धतीचे अनुकरण करायचे तर त्यांच्या अंगलट येणारी अनुमाने काढता येतात. उदा.,

**यो वाचा विवाचो मृध्रवाचः पुरू सहस्राशिवा जघान ।**
**तत्तदिदस्य पौंस्यं गृणीमसि पितेव यस्तविषी वावृधे शवः॥ १०.२३.५**





जो इन्द्र केवळ वाणीने विवाक् व मृधवाक् अशा सहस्रावधी अशिवांना मारतो, पिता ज्याप्रमाणे पुत्राची तविषी म्हणजे शक्ती वाढवितो त्याप्रमाणे शक्ती वाढविणाऱ्या त्या इन्द्राचे ते ते पौरुष आम्ही स्तवितो.

येथे विवाचः म्हणजे विकृतवाचः, व मृध्रवाचः म्हणजे परभाषा बोलणारे असे पाश्चात्त्य पंडितांप्रमाणे अर्थ करून अशा अनार्य भाषा बोलणाऱ्या अशिवांचा म्हणजे शिवोपासना न करणाऱ्यांचा इन्द्र निःपात करतो असा अर्थ केल्यास वैदिक आर्य शिवोपासनेच्या विरुद्ध होते असा ओढून ताणून इतर ऋचांतून अर्थ निष्कर्ष काढणारे काय उत्तर देतील?

## पुरन्दर इन्द्र व आर्य/अनार्य संघर्ष

ऋग्वेदात उपासनाभेदाने देखील आर्य/अनार्य संघर्ष दाखविणे शक्य नाही असे आतापर्यंत प्रतिपादन केले. आता आर्यांचा प्रमुख देव जो इंद्र त्याने शत्रूंची म्हणजे अनार्यांची पुरे शतशः फोडून त्यांचा निःपात केला अशी शतशः वर्णने आहेत असे नेहमी म्हणण्यात येते त्यात किती तथ्य आहे हे पाहू.

खालील उल्लेख पहा :-

**१) त्वं पुरं चरिष्ण्वं वधैः शुष्णस्य सं पिणक्।**
**त्वं भा अनु चरो अध द्विता यदिन्द्र हव्यो भुवः॥ ८.१.२८**

हे इन्द्रा, जेव्हा तू दोन प्रकाराने हव्य म्हणजे आह्वानाचा विषय झालास तेव्हा तू शुष्णाची चल पुरे फोडलीस व तेजस्वी असा तू शुष्णाच्या पाठलागास लागलास.

येथे शुष्णाचे पुर चरिष्णु म्हणजे चालणारे आहे. तेव्हा हा अनार्यांचा किल्ला असू शकत नाही.

इन्द्राने शुष्णाची म्हणजे वर्षाव होऊ न देता शोषं निर्माण करणाऱ्या शक्तींची चरिष्णु पुरे म्हणजे संचार करणारे मेघ फोडले व भाः म्हणजे संदीप्त अशा विजेचे रूप धारण करून तो त्याच्या पाठीस लागला हे स्पष्टपणे पर्जन्यदेव इन्द्राने बऱ्याच काळ आकाशात दिसणाऱ्या पण वृष्टी न करणाऱ्या मेघाला वृष्टी करायला लावल्याचे वर्णन आहे.

**२) विदुष्टे अस्य वीर्यस्य पुरवः पुरो यदिन्द्र शारदीरवातिरः सासहानो अवातिरः।**

**शासस्तमिन्द्र मर्त्यमयज्युं शवसस्पते।**
**महीममुष्णाः पृथिवीमिमा अपो मन्दसान इमा अपः ॥ १.१३१.४**

हे इन्द्रा, मानव तुझे ते वीर्य जाणतात ज्याने तू शारद पुरे बलपूर्वक फोडलीस व हे शवसस्पते अयज्यु मर्त्यांना शासिलेस व महान् पृथ्वी आणि हे पाणी मदपूर्वक हिरावून घेतलेस.

येथे सायण शारद पुरे म्हणजे वर्षभर टिकणाऱ्या तटबन्दींची पुरे असे म्हणतो. पण किल्ल्याची तटबन्दी कोणी वर्षभरच टिकणारी करील असे वाटत नाही. शत्रू सांगून हल्ला करीत नाही. तटबन्दी मोडायला आली असताना त्याने हल्ला केला तर? शिवाय अशी वर्षभर टिकणारी तटबन्दी फोडून पाणी हिरावून घेतले म्हणजे काय? तेव्हा मॅक्डोनेलने म्हटल्याप्रमाणे येथे शारदचा अर्थ शरद ऋतूतील असा केला पाहिजे. हिमालयीन प्रदेशात पाणी गोठायला शरद ऋतूत सुरवात होते. हे गोठलेले पाणी म्हणजेच शारद पुरे. शारद म्हणजे पांढरी या अर्थी देखील ही पुरे शारद आहेत. सूर्यरूपी इन्द्र हे पाणी वितळवून बर्फाच्छादित भूमी व गोठलेले पाणी मुक्त करतो याचे हे वर्णन दिसते.

इन्द्र हा काळ्या अनार्यांचा शत्रू होता असे म्हणणाऱ्यांवर बाजू उलटविण्यास शारदीः पुरः या शब्दात बराच मसाला आहे. इन्द्राने शारद म्हणजे पांढरी पुरे फोडली म्हणजे गोऱ्या लोकांची पुरे फोडली असे कुणी म्हटले तर ऋग्वेदात गोऱ्यांचा पराभव युद्ध पाहणाऱ्याजवळ त्याला काय उत्तर आहे?

३) १.१७४.२ मध्ये "हे इन्द्रा, जी सात शारद पुरे तू फोडलीस त्यामुळे मृध्रवाच् विशांचे दमन झाले. तरुण पुरुकुत्सासाठी तू वृत्राला मारून निर्दोष असे पाणी वाहते केले," असे म्हटले आहे.

येथे विश् म्हणजे निवासस्थान असा मॅक्डोनेल अर्थ करतो. मृध्रवाचः म्हणजे बोलण्याची शक्ती नसलेले-हिंसितवागिन्द्रिय. पाणी अडवून ठेवणाऱ्या अशा न बोलता विपत्ती आणणाऱ्या वृत्रांचे स्थान म्हणजे गोठलेले हिमनग. ते शारद म्हणजे पांढरे असतात. ते वितळवून सूर्यरूपी इन्द्राने पाणी वाहते केले असा सरळ अर्थ लागतो.

४) ६.२०.३ म्हणते : "इन्द्राचे स्तोत्र केले तेव्हा तो मारक, ओजस्वी, बलवन्तांमध्ये बलवान् व वर्धिष्णू तेजाचा झाला. त्याला पुरे फोडणारे वज्र मिळाले म्हणून तो सोममय मधूचा राजा झाला."





याचेही अर्थ इंद्र हा पर्जन्यदेव होता या कल्पनेने सरळ लागतात. एक तर पावसाळ्यातले काळे ढग फोडणारे वज्र म्हणजे वीज वा ढगांना वर्षाव करायला लावणारे इतर साधन मिळाल्यामुळे काळे ढग नाहीसे होऊन शरद् ऋतूतले निरभ्र चांदणे पडले. चांदणे म्हणजे चंद्राचा-सोमाचा-प्रकाश. या रीतीने इंद्र सोममय मधूचा म्हणजे मधुर अशा जोत्स्नेचा राजा झाला. काळे ढग वितळून पावसाळा सुरू झाल्यावर सोमादी वनस्पती बहरल्या व अशा रीतीने इंद्र सोममय मधूचा राजा झाला असाही अर्थ होऊ शकतो.

५) ६.२०.७ मध्ये म्हटले आहे- "हे शक्तिमान् इंद्रा, अहिमाय अशा पिप्रूची दृढ पुरे तू फोडलीस. हे दानशूरा, ऋजिश्वानाला तू अप्रमृष्य म्हणजे कुणालाही बाध्य न करता येण्यासारखे धन दिलेस."

येथे ज्याची पुरे फोडली तो पिप्रु अहिमाय म्हणजे घातक मायाशील आहे. मायाशील हे विशेषण मानवाला लावीत नाहीत. दुसरे म्हणजे इन्द्राने ऋजिश्वानाला जे धन दिले ते अप्रमृष्य म्हणजे हिरावून न घेता येण्यासारखे होते. कोणत्याही भौतिक धनाचा उल्लेख हिरावून न घेता येण्यासारखे धन या शब्दांनी करता येणार नाही. तेव्हा येथे इंद्राने दिलेले धन भौतिक नाही व ज्याची पुरे फोडून धन दिले तो मानव नाही, येथले पुरभेदन ही भौतिक घटना नाही व त्यावरून आर्यांनी अनार्यांचे किल्ले फोडून धन लुटल्याचे अनुमान निघू शकत नाही.

६) ६.२०.१० मध्ये म्हटले आहे- "हे इंद्रा, तुझ्या रक्षणाने आम्ही नवीन धन प्राप्त करतो. म्हणूनच मानव यज्ञरूपाने तुझी स्तुती करतात. पुरुकुत्साला देण्यासाठी तू दासांची सप्त शारद पुरे शर्म म्हणजे सुखाने फोडलीस."

येथे शारदीः म्हणजे शरद् नावाच्या असुराची असा सायण अर्थ करतो. पण नेहमीप्रमाणेच शारद म्हणजे शरद् ऋतूतील हा अर्थ येथे लागू होतो. शिवाय सप्त या शब्दाचा सात असा अर्थ करण्याची जरूर नाही. सप्त म्हणजे पुष्कळ किंवा सप्त म्हणजे सरपटणारी. सप्त या शब्दाचा असा अर्थ सायणाने इतर ठिकाणी केला आहे. शरद् ऋतूतले गोठलेले हिमनग मधूनच कोसळतात व प्राणहानीस कारण होतात. त्यांना ॲव्हलाँच म्हणतात. इंद्राने असले हिमनग वितळवून रहदारी सुरक्षित केली व पुरुकुत्सावर उपकार केले. अनार्यांचे किल्ले फोडण्याचा येथे काही संबंध नाही.

७) २.२०.८ मध्ये म्हटले आहे- "देवांनी उदकलाभासाठी इंद्राचे बलवर्धन

करणारे हवि सतत दिले. त्यांनी त्याच्या हातात वज्र दिले तेव्हा शत्रूशी आयस पुरे त्याने फोडली.''

येथे संग्राम उदकलाभासाठी झालेला आहे. स्वतः देवांनीच इंद्राला बलवर्धक हवि व वज्र दिले आहे. त्या वज्राच्या साहाय्याने इंद्राने आयसी म्हणजे लोखंडासारखी मजबूत पुरे फोडली व पाणी वाहते केले.

हे वर्णन लोखंडासारखे कठीण हिमनग वितळवून पाणी मुक्त करण्याच्या क्रियेला किंवा लोखंडासारखे काळेकुट्ट ढग वज्राने म्हणजे विजेच्या प्रहाराने फोडून पाऊस पाडण्याच्या क्रियेला देखील लागू आहे.

८) ४.३०.१३ मध्ये म्हटले आहे- ''हे धर्षका, जेव्हा तू शुष्णाची पुरे फोडलीस तेव्हा त्याचे सर्व वेदन म्हणजे वित्त प्रमृक्षित केलेस.''

येथे सायण पुराणि म्हणजे नगराणि व प्रमृक्षो म्हणजे बाधित केलेस असा अर्थ करतो. पण असा अर्थ करण्याची जरूर नाही. शुष्ण म्हणजे शोषण करणारा म्हणजे अवृष्टिकारी दुष्ट शक्ती असा अर्थ बसतो. अवृष्टीला कारण होणाऱ्या या शक्ती ज्या अभेद्य ठिकाणी वास करतात ती इंद्राने फोडली व त्यांनी रुद्ध केलेले सर्व धन गोळा केले असाही अर्थ निघतो. मृक्ष् धातूचा गोळा करणे असा देखील अर्थ आहे. तेव्हा सायणाप्रमाणे धन बाधित केले असे न म्हणता गोळा केले म्हणजे प्राप्त केले हे अधिक जुळते. पुष्कळ वेळा ढग येतात पण पाऊस पडत नाही. ढगातला पाऊस पडू न देणारा शुष्ण हा ढगरूपी पुरातच म्हणजे अभेद्य किल्ल्यात ठाण मांडून बसलेला असतो अशी कल्पना असावी.

९.४.३०.२० मध्ये पुरांना अश्मन्मय म्हटले आहे. व्यासत् म्हणजे उधळून लावली. ढग काळ्या खडकासारखे दिसतात म्हणून ढगरूपी पुरांना अश्मन्मय म्हटले असेल किंवा अश्मन्मय पुरे म्हणजे हिमाच्छादित पहाड. हिमालयीन प्रदेशात हिमामुळे वाहतूक, पाणी वगैरे रुद्ध होते. इंद्राने दिवोदासासाठी ही दगडी पुरे फोडली व वाहतूक व पाणी मोकळे केले.

## हरियूपियायाम्

ऋग्वेदामध्ये हरियूपिया नावाच्या नगरीत झालेल्या युद्धाचे वर्णन आहे. हरप्पा या ठिकाणी पाच हजार वर्षांपूर्वीचे काही अवशेष सापडले. उत्खननात नष्टावशेष वस्तूच सापडणार. हरियूपिया व हरप्पा या शब्दांतील साम्यावरून काही संशोधकांनी हरप्पालाच





हरियूपिया ठरविले व हरप्पातील अवशेषांचा हरियूपियातील युद्धाशी संबंध जोडायला सुरवात केली. हरियूपिया हे नाव ६.२७.५ मध्ये आले आहे. तिच्याच पुढच्या ऋचेमध्ये यव्यावती नगरीचे नाव आहे. ते हरियूपियाचेच दुसरे नाव आहे, असे सायण म्हणतो. हरप्पाला यव्यावती देखील म्हणत होते असे हरियूपियाला हरप्पा म्हणणाऱ्यांनी दाखवून दिलेले नाही. तेव्हा केवळ शब्दसाम्याच्या आधारावर एखाद्याने हॅरी टुमन म्हणजे हरि टुमणे असे म्हणावे यातला हा प्रकार आहे.

आता हरियूपियात काय झाले व त्यावरून आर्य/अनार्य संघर्ष सिद्ध होतो काय हे पाहू.

६.२७.५ मध्ये म्हटले आहे- ''वरशिखांच्या शेषांना म्हणजे सायणमते पुत्रांना अभ्यावर्ती चायमानाखातर इंद्राने मारले. हरियूपियाच्या पूर्व अर्धामध्ये त्याने वृचीवतांना जो मारले तो दुसरा भीतीने विदीर्ण झाला.

येथे मारण्याचे काम इन्द्राने केले आहे, अभ्यावर्ती चायमानाने नव्हे. तसेच अभ्यावर्ती चायमान हा आर्य होता व वरशिख आणि वृचीवान् हे अनार्य होते असा उल्लेख नाही.

अभ्यावर्ती चायमान हा पार्थव होता असे ६.२७.८ मध्ये म्हटले आहे, यावरून तो पर्शियाचा सम्राट होता असे चित्राव म्हणतात- ६.२७.८ मधली संबंधित ओळ अशी :

**अभ्यावर्ती चायमानो ददाति दूणाशेयं दक्षिणा पार्थवानाम्।**

पार्थवांची अविनाशी अशी दक्षिणा अभ्यावर्ती चायमान देतो. येथे पार्थव हे अभ्यावर्ती चायमानाचे विशेषण मानण्यास स्पष्ट आधार नाही. तो पार्थवांची अविनाशी दक्षिणा देतो हा अन्वय सरळ आहे. अभ्यावर्ती चायमान हा पृथूंच्या वंशात झाला होता म्हणून त्याने दिलेली दक्षिणा ही पार्थवांची म्हणजे पार्थवांनी दिलेली असा सायण अर्थ करतो. पृथु नावाचा राजा पुराणात आहे. तेव्हा पार्थव हा अभ्यावर्ती चायमानाचा वंश मानला तरी तो पर्शियन कसा ठरतो?

ओळीच्या एकंदर संदर्भावरून पार्थव हे अभ्यावर्ती चायमानाचे विशेषण दिसत नाही. पार्थवांची ही अभ्यावर्ती चायमानाने दिलेली दक्षिणा अविनाश्य आहे असा अन्वय आहे. द्रव्याच्या रूपाने दिलेली दक्षिणा अविनाशी नसते. तेव्हा येथे ज्या दक्षिणेचा उल्लेख आहे ती द्रव्यरूपी दक्षिणा नसावी. पृथु म्हणजे मोठी भूमी वगैरे स्थावर

स्वरूपाची दक्षिणा असा आशय असावा. कारण भूमी द्रव्याप्रमाणे नाश पावत नाही.

अभ्यावर्ती चायमानाला अन्यत्र पर्शु म्हटले आहे, यावरूनही तो पर्शियन होता असे चित्राव अनुमान काढतात. अभ्यावर्ती चायमान हा देववात वंशात उत्पन्न झाला होता असे सायण म्हणतो. एखादा पर्शियन राजा देववात वंशात उत्पन्न झाल्याचा पुरावा आहे काय?

पर्शू शब्दाच्या अर्थाबद्दल खालील संदर्भ लक्षात घ्यावा. १.१०५ च्या अनुसार एकत, द्वित व त्रित असे तीन ऋषी होते. ते एकदा मरुभूमीत प्रवास करीत असता एका कूपाजवळ आले. त्रित कूपात शिरला, स्वतः पाणी प्याला व इतरांनाही त्याने पाणी आणून दिले. पण त्या कृतघ्न भावांनी त्रिताने दिलेले पाणी पिऊनच्या पिऊन उलट त्याला विहिरीत ढकलले व तो बाहेर येऊ नये म्हणून रथचक्राने त्या विहिरीचे तोंड बंद केले. तेव्हा त्रिताने कूपातून बाहेर येण्यासाठी देवाची प्रार्थना केली. ती प्रार्थना सूक्तात ग्रंथित केली आहे. आठव्या ऋचेत तो म्हणतो- ''सवतींप्रमाणे माझ्या पाठीची हाडे म्हणजे पर्शु मला त्रास देत आहेत.''

१०.३३.२ मध्ये पुनः मला सवतीप्रमाणे त्रास देत आहेत असे कवष म्हणतो. दारिद्र्यामुळे नीट अन्न व झोपायला सुखशय्या मिळत नाही म्हणून पाठीची हाडे दुखतात असा सायण सयुक्तिक अर्थ देतो.

चित्राव पर्शूचा अर्थ पर्शुलोक असा का करतात समजत नाही. पहिल्या ऋचेत कवष दान मिळविण्यासाठी कुरुश्रवण राजाजवळ दूरचा प्रवास करून आल्याचे वर्णन आहे. ''जनांना प्रयुक्त करणाऱ्यांनी मला प्रयुक्त केले. पूषन् देवाला अन्तर्यामी धरतो. सर्व देवांनी माझे रक्षण केले. दुःशासु असा हा आला आहे, असा घोष होत होता.'' या सर्व संदर्भात पशू लोकांचा काहीच आगापिच्छा नाही.

पर्शू हा शब्द १०.८६.२३ मध्ये देखील आला आहे. इंद्राचा निरोप घेताना वृषाकपि म्हणतो, ''पर्शू नावाच्या मानवीने एकदम विसांना जन्म दिला. हे इंद्रा, तिचे भले झाले, जिच्या उदरात एवढे मावले. इंद्र सगळ्यांत श्रेष्ठ आहे.'' सायण म्हणतो की पर्शू हे एका मृगीचे नाव होते. तिला मानवी म्हटले आहे कारण ती मनुची दुहिता होती. पण मानवी याचा असा अर्थ न करता मानवपर अर्थ केला तरी पर्शू नावाची एक स्त्री होती एवढाच अर्थ निघतो. ही स्त्री पर्शियन होती असे ध्वनिसाम्यावरून वाटेल ते अनुमान काढण्यास तयार असलेले लोक म्हणायला तयार होतील तर आश्चर्य





नाही.

८.६.४६ म्हणते, ''तिरिन्दर राजामध्ये असलेली शत व पर्शूमध्ये असलेली सहस्र अशी यादूवांची धने मी घेतो.'' चित्रावांच्या मते तिरिन्दर पार्शव्य राजाने यादव कुलोत्पन्न स्तोत्याला शतावधि धन दिले. ७.८३.१ मध्ये प्राचा गव्यन्तः पृथुपर्शवो ययुः। असे वाक्य आहे. दांडेकर येथे पर्शु शब्द लोकवाचक घेऊन आर्यांची पश्चिमेकडून पूर्वेकडे स्वारी येथे विवक्षित आहे असे म्हणतात.

घुलेशास्त्री पृथुपर्शवो याचा अर्थ मोठाले परशू घेऊन असा करतात. तसा तो का करू नये याचे कारण दांडेकर-चित्रवप्रभृति जनविशेषपर अर्थ करणाऱ्यांनी सांगितले नाही.

पर्शू हा शब्द जनविशेषवाचक घेतला तरी पर्शू म्हणजे पर्शियनसारखे कोणी अभारतीय लोक असे समजण्यास काहीच आधार नाही. पर्शू व परशु असे दोन्ही शब्द संस्कृतात आहेत. काही लोक केवळ शब्दसाम्यावरून परशुरामाला पर्शियन मानतात. अशासारखे तर्क खोडून काढणे फारच सोपे असते. पर्शिया या देशावरून परशुरामाचे नाव पडले नसून भारतीय परशुरामाने इराण जिंकल्यामुळे त्याला पर्शिया म्हणू लागले असे म्हणून बाजू उलटविता येते.

सायणाने ७.८३.१ मध्ये पर्शू म्हणजे पाठीचे हाड असा अर्थ करून या अर्थाला तैत्तिरीय ब्राह्मणाचा आधार दिला आहे. घोड्याच्या पाठीची हाडे गवत कापण्यासाठी वापरीत असे तैत्तिरीय ब्राह्मणात लिहिले आहे. ही हाडे तरवारीसारखी बाकदार असतात. त्यांना धार केली की, ती गवत कापण्यासाठी उपयोगी पडू शकतात. पूर्व दिशेकडे जाऊन वैदिक कर्मासाठी दर्भ तोडावे अशी धर्मशास्त्राची आज्ञा दिसते. वेदात अयस् म्हणजे ताम्बे या धातूचा उल्लेख आहे. तेव्हा हाडाने गवत कापणे हे धातूच्या अज्ञानाचे लक्षण नसून धार्मिक विधीचा एक भाग आहे. विजेचे दिवे आले तरी देवापुढे समईच लावतात, त्यातलाच हा भाग दिसतो. केवळ ध्वनिसाम्यावरून केलेल्या काल्पनिक अर्थापेक्षा सायणाने केलेला परंपरागत अर्थच स्वीकरणीय आहे.

अभ्यावर्ती चायमान अभारतीय होता याला याप्रमाणे काही प्रमाण नाही. आता त्याचे शत्रू हे कोणत्यातरी अर्थी अनार्य होते काय हे पाहू. ६.२७.६ मध्ये वृचीवन्तः वरशिखस्य पुत्राः असा सायण अर्थ करतो. पुनः ७ मध्ये वृचीवतो म्हणजे वारशिखाः असा अर्थ करतो. वृच् वर्चने म्हणजे निवडणे असा धातू आहे. त्यापासून वृचीवान्

हे नाव व्युत्पन्न होऊ शकते. शिवाय वृचीवान् हे वरशिखाचे पुत्र होते व वरशिख हे स्पष्टपणेच संस्कृत नाव आहे. तेव्हा अभ्यावर्ती चायमानाच्या अभारतीयत्वाबद्दल जसा पुरावा नाही तसाच त्याचे शत्रू जे वारशिख ते संस्कृत संस्कृतीच्या बाहेरचे लोक होते असे मानण्यास आधार नाही.

सहाव्या ऋचेमध्ये वृचीवन्तः शरवे पत्यमाना पात्रा भिन्दाना न्यर्थान्यासन्। असे म्हटले आहे. पात्रा भिन्दाना याचा यज्ञपात्रे फोडणारे असा सायण अर्थ करतो. यज्ञपात्रे म्हणजे यज्ञसाधने फोडणारे वृचीवान् हे यज्ञविरोधी व म्हणून अनार्थ होते असे म्हणण्याचा काही लोकांना मोह होईल. पण पात्रे याचा साधने हा अर्थ ओढाताणीचा आहे. पात्रे याचा भांडी असा सरळ अर्थ केला तर वृचीवान् हे फक्त यज्ञाची भांडी फोडीत होते हे म्हणणे विचित्र वाटते. तेव्हा पात्रा भिन्दाना न्यर्थान्यासन् याचा फुटलेल्या पात्राप्रमाणे निरुपयोगी झाले असा चित्रावांचा अर्थ अधिक स्वीकारणीय आहे. भांडी फोडावी तसे वृचीवानांना इंद्राने लीलेने फोडले.

वृचीवानांना इंद्राने फोडले व इंद्र हा आर्यांचा देव होता त्याअर्थी वृचीवान् अनार्य होते असे अनुमान निघू शकत नाही. औरंगजेब आपल्या भावांशी अल्लाचे नाव घेऊनच लढत होता व आपल्या विजयाचे श्रेय अल्लालच देत होता. याचा अर्थ त्याचे भाऊ मुसलमान नव्हते असा होत नाही.

या सूक्ताबद्दल दुसरी एक अडचण अशी की, शेवटच्या ऋचेत अभ्यावर्ती चायमानाने मला दक्षिणा दिली असे भरद्वाज म्हणतो. म्हणजे भरद्वाज हा अभ्यावर्ती चायमानाचा समकालीन होता असे ठरते. पण या ऋचेत अभ्यावर्ती चायमानाच्या पराक्रमाचे वर्णन नाही. फक्त पाचव्या व सातव्या ऋचेत अभ्यावर्ती चायमानासाठी इंद्राने वरशिखाच्या पुत्रांना मारले असे म्हटले आहे. बाकीच्या ऋचांत वर्णिलेले इंद्राचे पराक्रम अभ्यावर्ती चायमानासाठी केले असे देखील वर्णन नाही. अज्ञानदासाने पोवाडा रचल्याबद्दल शेरभर सोन्याचा कडा दिला म्हणून शिवाजीची स्तुती करावी पण पोवाड्यात मात्र शिवाजीप्रीत्यर्थ देवी भवानीने अफजलखानास मारले असे एखाद्या वेळेस म्हणून, देवी भवानीने शुंभनिशुंभ राक्षसास मारले, देवी भवानीने महिषासुरास मारले वगैरे वर्णन करावे, अशासारखे हे विचित्र वाटते. असा पोवाडा शिवाजीचा नसून देवी भवानीचा होईल. त्याचप्रमाणे अभ्यावर्ती चायमानाच्या पराक्रमाचे वर्णन हा या सूक्ताचा विषयच नाही. इंद्राच्या पराक्रमाचे वर्णन हा विषय आहे. भरद्वाजाला दक्षिणा मिळाली ती इंद्राचे





सूक्त रचून अभ्यावर्ती चायमान या यजमानासाठी यज्ञ केल्याबद्दल. वरशिखाचे जे पुत्र मारले ते देखील अभ्यावर्ती चायमानाने मारलेले मानवी शत्रू नसून भरद्वाजाच्या यज्ञामुळे निष्प्रभ झालेल्या कोणत्यातरी अमानवी शक्ती असाव्या. अलेक्झांडर, तैमूरलंग वगैरे विजेत्यांच्या पराक्रमाचे वर्णन करणारे स्तुतिपाठक त्यांच्या खातर जूपिटरने वा अल्लाने त्यांच्या शत्रूंना मारले अशी भाषा वापरताना आढळत नाहीत. उलट ईश्वराच्या कृपेने अमुक वीराने अमुक पराक्रम केला असेच म्हणण्याची चाल आहे. त्या वीरावर अनुग्रह म्हणून ईश्वरानेच पराक्रम केला असे म्हणण्याची चाल नाही. तेव्हा अशी भाषा जेथे असेल तेथे मानवी वीरांचे पराक्रम विवक्षित नाहीत असेच समजले पाहिजे.

## दाशराज्ञ युद्ध व आर्य/अनार्य संघर्ष

ऋग्वेदात दाशराज्ञ युद्धाचा म्हणजे दहा राजांशी झालेल्या युद्धाचा उल्लेख आहे तो असा-

"हे इंद्रावरुणांनो, एकत्र झालेले दहा अयज्ञ राजे सुदासाशी युद्ध करू शकले नाहीत. ऋषींचे यज्ञातील स्तोत्र सफल झाले. त्यांनी केलेल्या देवांच्या आवाहनाने देव आले." ७.८३.७.

या ऋचेत सुदासाने दहा अयज्ञ राजांचा म्हणजे यज्ञ न करणाऱ्या राजांचा पराभव केला असे म्हटले आहे व हा ऋग्वेदातील आर्य/अनार्य संघर्षाचा उल्लेख आहे असे समजण्यात येते.

हे दहा राजे कोणते?

७.८३.४ मध्ये म्हटले आहे : हे इन्द्रावरुणांनो, शस्त्र घेऊन जवळ येण्याच्या आधीच तुम्ही भेदाला मारून सुदासाचे रक्षण केले. हवीमनि म्हणजे सायणमते युद्धामध्ये तुम्ही तृत्सूची स्तोत्रे ऐकलीत व त्यामुळे त्यांचे पौरोहित्य सत्य झाले.

येथे हवीमनि म्हणजे एकमेकाला ज्यात आह्वान देतात त्या युद्धात असा सायणाने अर्थ केला आहे, पण जेथे देवांना आवाहन केले जाते अशा यज्ञात असाही याचा अर्थ होऊ शकेल. एकूण या ऋचेत उल्लेखिलेला पहिला सुदासशत्रू भेद हा आहे, पण तो मानवच मानावा याचा ऋचेत पुरावा नाही. उलट हवीमनि याचा यज्ञात असा अर्थ असेल तर अमानवच विवक्षित असण्याचा संभव जास्त आहे.

दाशराज्ञ युद्धाचा उल्लेख असलेले दुसरे सूक्त ७.१८ हे समजले जाते. त्यात

आणखी कोणती नावे मिळतात ते पाहू.

"वाढणारे पाणी इंद्राने सुदामासाठी उथळ व सहज पार करण्यासारखे केले. त्या स्तोत्यांच्या नव्य इन्द्राने उत्साहित होणाऱ्या शिम्यूला सिन्धूचा शाप अशस्त केला."

चित्राव व घुले यांनी दुसऱ्या ओळीचा अर्थ शिम्यूला नदीत बुडविले असा करून शिम्यूला सुदासशत्रू मानले आहे. पण त्या ओळीतून असा अर्थ निघत नाही. शस् या धातूचा अर्थ हिंसा करणे असा होतो. तेव्हा अशस्तीचा अर्थ अहिंसक असा होईल. म्हणजे शिम्यूला नद्यांनी बुडविले नसून उलट वाचविले असा अर्थ होईल. सायण अशस्तीः याचा अर्थ अभिशस्तीः असा करतो. अशस्तीमधील अचा नकारात्मक अर्थ न घेता अभि असा अर्थ का घ्यावा याबद्दल मात्र सायणानं काही प्रमाण दिले नाही.

७.१८.९ मध्ये सुदासाच्या शत्रूंचा उल्लेख आहे पण त्यांचे नावे लिहिले नाही. ते सुतुक म्हणजे सायणाच्या मते सुपुत्र व वध्रिवाक् म्हणजे वाचाल होते. अशा शत्रूंना इन्द्राने मानुषे म्हणजे मनुष्यलोकात मारले असा सायण अर्थ करतो. मनुष्यलोकात मारले म्हणजे मनुष्यलोकाच्या बाहेरही हे शत्रू होते काय?

अन्यत्र सायणाने सुतुक याचा अर्थ अतिहिंसक व वध्रिवाक् याचा अर्थ हिंसितवाक् म्हणजे वाचाशक्ती नाहीशी झालेले असा केला आहे. हेच अर्थ येथे देखील अधिक जुळतात. सुदासाचे हे शत्रू म्हणजे बोलण्याची शक्ती नसलेल्या हिंसक शक्ती होत्या. त्यांना इंद्राने मानुषे लोके मारले म्हणजे साऱ्या मानवजातीच्या कल्याणासाठी मारले. सप्तमीचा अर्थ साठी असा देखील होतो. उदाहरणार्थ :-

**चर्मणि द्वीपिनं हन्ति दन्तयोर्हन्ति कुंजरम्।**
**केशेषु चमरीं हन्ति सीम्नि पुष्कलको हतः॥**

चामड्यासाठी वाघाला, दातासाठी हत्तीला, केसासाठी चमरीमृगाला व कस्तूरीसाठी पुष्कलकाला मारतात.

७.१८.१५ हे सूक्त सुदासशत्रू म्हणून तृत्सूंचा उल्लेख करते असे काही लोकांचे म्हणणे आहे. हे सूक्त असे :-

**इन्द्रेणैते तृत्सवो वेविषाणा आपो न सृष्टा अधवन्त नीचीः ।**
**दुर्मित्रासः प्रकलविन्मिमानाः जहुर्विश्वानि भोजना सुदासे॥**

इन्द्राशी युद्धासाठी एकत्र आलेले तृत्सू सखल भागाकडे धावणाऱ्या पाण्याप्रमाणे पळू लागले. ते दुर्मित्र, अजाणते व बाध्यमान होत्साते सुदासासाठी विविध भोज्य





पदार्थ टाकून देते झाले.

नेहमी करण्यात येणारा अर्थ वर दिला आहे. पण घुलेशास्त्री यांनी इन्द्रेण वेविषाणा याचा अर्थ इन्द्राचे पाठबळ लाभलेले तृत्सू असा करून तृत्सू खाली वाहणाऱ्या पाण्यासारखे धावले ते युद्धातून पळण्यासाठी नसून शत्रूवर तुटून पडण्यासाठी अशी संगती लावली आहे. दुसऱ्या ओळीतील दुर्मित्र वगैरे विशेषणे तृत्सूची नसून तृत्सूंनी हरविलेल्या दुसऱ्या सुदासशत्रूंची आहेत असे त्यांचे म्हणणे आहे.

हे म्हणणे इतरही ऋचांवरून समर्थनीय दिसते. ७.८३.४ मध्ये तृत्सूंचे पौरोहित्य धन्य झाले असे म्हटले आहे. ७.१८.१९ मध्ये तृत्सू आणि यमुना यांनी इन्द्राला आवत् म्हणजे सायणाच्या मते संतोष दिला असे म्हटले आहे. ७.८३.८ मध्ये तृत्सूसह सुदासाचे रक्षण इन्द्रावरुणांनी केले असे म्हटले आहे. येथे तृत्सूसह सुदास असा अर्थ नसून दहा राजांसह तृत्सू असा अर्थ करून दहा राजांना सामील होऊन तृत्सूने बाधित केलेल्या सुदासाला असा अर्थ कुणाला करावासा वाटला तर त्याला ७.८३.८ चा विरोध आहे. या सूक्तात म्हटले आहे :-

"दाशराज्ञयुद्धात वेढलेल्या सुदासाला हे इन्द्रावरुणांनो तुम्ही बल दिलेत. या युद्धात गोऱ्या, जटाधारी व बुद्धिमान अशा तृत्सूंनी प्रार्थनांनी सेवा केली."

यावरून हे स्पष्ट आहे की, हे तृत्सु इन्द्राच्या अवकृपेने हारलेले कोणी अनार्य नसून इन्द्राच्या कृपेने जिंकलेले सूक्तकर्ते होते.

७.३३.६ मध्ये वसिष्ठाच्या पौरोहित्याने तृत्सूची प्रजा भरभराटली असे म्हटले आहे.

इतक्या सर्व ठिकाणी तृत्सूंचा इन्द्रकृपाप्राप्त जेते म्हणून उल्लेख असल्यामुळे ७.१८.१५ मध्ये देखील तो तसाच आहे असे घुलेशास्त्री यांनी केलेल्या अर्थानुसार मानणे सयुक्तिक आहे.

३.५३.११ म्हणते : "हे कुशिकांनो, जवळ या. धनलाभासाठी सुदासाच्या अश्वाला पेरित करून सोडा. पूर्व, पश्चिम, उत्तर वगैरे दिशांमध्ये वृत्राला मारीत पृथ्वीच्या श्रेष्ठ स्थानी तो राजा यज्ञ करो."

येथे उल्लेखिलेला सुदासशत्रू वृत्र हा मानव नसून पाणी अडवणारा असुर आहे याची चर्चा पूर्वी केलीच आहे.

तेव्हा स्पष्टपणे ज्याचा सुदासशत्रू म्हणून उल्लेख आहे व तो मानव नव्हता असा

निःसन्दिग्ध उल्लेख नाही असा भेदच फक्त उरतो. हा भेद अनार्य होता असे म्हणण्यास त्याला इन्द्राने मारले याव्यतिरिक्त दुसरा पुरावा नाही. पण इन्द्र, आर्य व दास या दोघांनाही मारतो असे उल्लेख मागे दाखविले आहेत. तेव्हा दाशराज्ञ युद्ध आर्य व अनार्य यांच्यात झाले असे मानण्यास ऋग्वेदात काडीचाही आधार नाही.

७.१८.७ मध्ये उल्लेखिलेले पक्थ, भलानस, अलिन, विषाणी व शिव हे अनार्य होते असे दाण्डेकरांचे म्हणणे आहे. पण हे इंद्रशत्रू होते असा उल्लेख नाही. उलट, सायणाच्या मते आभनन्त म्हणजे त्यांनी इंद्राची स्तुती केली. याचा परिणाम म्हणून इंद्राने हिंसक अशा तृत्सूंपासून आर्यांचे गोसंघ आणून त्यांना दिले. या अर्थाप्रमाणे मागील प्रतिपादनाविरुद्ध येथे तृत्सूंचा इंद्रशत्रू म्हणून उल्लेख आहे असे वाचकांना वाटेल. पण तृत्सुभ्यः याचा अर्थ तृत्सूपासून असा न करता तृत्सूसाठी असा केला तर तृत्सूपासून गोसंघ हिरावून घेतले नसून तृत्सूंसाठी हिरावून आणले असा अर्थ करता येतो व तोच इतर उल्लेखाशी जुळतो. हा अर्थ न मानता येथला तृत्सूंचा उल्ले इंद्रशत्रुत्वाबद्दल संदिग्ध मानला तरी पक्थ, भलानस वगैरे इतर उल्लिखित लोक इंद्राचे शत्रू होते असे म्हणण्यास काहीच आधार नाही. या लोकांची नावे देखील संस्कृत आहेत. त्यामुळे त्यांना अनार्य म्हणायला वाव नाही. सायणमते पक्थ म्हणजे हवींचे पाचक. भलानस म्हणजे भद्रमुख. शिवाचे एक नाव भल्ल असे आहे. यावरून भला म्हणजे चांगला हा आधुनिक, तपोभिरप्रवृद्धाः तपश्चर्येत नवशिके असलेले, विषाणिनः म्हणजे खाजवण्यासाठी हातात काळे शिंग धरणारे म्हणजे दीक्षित असे सायणकृत अर्थ आहेत.

पक्थ म्हणजे पख्तून अशी पठाणात परंपरा असल्याचे अब्दुल गफारखान यांनी म्हटले आहे. वंशवादी, पख्तूनांचा अन्तर्भाव अनार्यात करीत नाहीत.

सुदासाचे शत्रू अनार्य होते याला तर काहीच पुरावा नाही तर त्यांना अनार्य का म्हटले?

खोमेनीसारख्या कट्टर मुसलमानाला देखील इराणचा पदच्युत प्रधान काफिर म्हणतो. त्याप्रमाणे आपले शत्रू यज्ञ करणारे असले तरी त्यांना अयज्ञ अशी शिवी देण्याचा प्रघात असावा.

## कीकटाचा उल्लेख

ऋग्वेदात कीकट या अनार्यदेशाचा उल्लेख आहे यावरून आर्य/अनार्य संघर्ष सिद्ध होतो असे एक मत प्रचलित आहे. ३.५३.१४ म्हणते : ''कीकटामध्ये गार्यींचा





काय उपयोग आहे? त्या सोमरसात मिसळणारे दुध देत नाहीत वा ते कीकट यज्ञपात्र तापवीत नाहीत. प्रमगन्दाचे धन आम्हास दे. तसेच नैचाशाखांचेही दे.'' येथे कीकट म्हणजे अनार्य लोकांचा म्हणजे यज्ञयाग न करणाऱ्या नास्तिकांचा देश असे सायण व यास्क म्हणतात. प्रमगन्द म्हणजे पणि व नैचाशाख म्हणजे नीच जातीत संतती उत्पन्न करणारे.

येथे कीकट म्हणजे मगध असा अर्थ करून ऋचेच्या काळी मगधात यज्ञकर्त्या आर्यांची वसती झाली नव्हती व नंतर आर्यांनी मगध जिंकून ती केली असे पाश्चात्त्य पंडितांच्या आधारे चित्रावशास्त्री सुचवितात. पण ऋग्वेदातील भूगोल अफगाणिस्तानातील कुभा नदीपासून गंगेपर्यंत म्हणजे बंगालपर्यंत विस्तृत आहे. तेव्हा ऋग्वेदकाळी मगधात आर्यांची वसती झाली नव्हती असे म्हणण्याची सोय नाही. मगधदेशाचा-कीकटाचा-अनार्यदेश म्हणून उल्लेख करणाऱ्या ऋचेपेक्षा जास्त प्राचीन आहे असे म्हणून सुटका करून घेण्यास ऋचांच्या कालाबद्दल स्वतंत्र पुरावा पाहिजे. केवळ सुटका करून घेण्यास सोईस्कर म्हणून तशी कल्पना करणे तर्कशुद्ध नाही.

कीकट म्हणजे मगध हा अर्थ खरा मानला तरी मगधात बौद्ध व जैन या यज्ञविरोधी संप्रदायाचा प्रादुर्भाव झाल्यावर त्याला कीकट म्हणू लागले असतील असे समजल्याने यज्ञविरोधी कीकट/मगधाची उपपत्ती लागते. या ऋचेच्या काली मगधाला कीकट म्हणत होते याला पुरावा नाही.

पण म्हणत नव्हते असाही पुरावा नाही. शिवाय कीकट म्हणजे मगध असे न मानले तरी ऋग्वेदकाळी कीकट नावाचा यज्ञविरोधी लोकांचा देश होता हे नाकबूल करता येत नाही व एवढ्यावरून यज्ञ व अयज्ञ संस्कृतींचा संघर्ष सिद्ध होतो असे म्हणण्यात येईल. पण यज्ञ व अयज्ञ उपासनापद्धतींचा संघर्ष हा आर्य/अनार्यांचा संघर्ष ठरत नाही. हा संघर्ष भाषिक वा वांशिक होता असे पाश्चात्त्य पंडित मानतात. उपासनाभेद हे त्याचे स्वरूप मानीत नाहीत. शिवाय बौद्ध व जैन या यज्ञविरोधी संप्रदायांना कोणी अनार्य म्हणत नाही.

तात्पर्य ऋग्वेदात आर्य/अनार्य संघर्षाबद्दल अवाक्षरही सापडत नाही.

■ ■

# कपोलकल्पित आर्य आणि त्यांच्या स्वाऱ्या

## ...९...

# सिंधुसंस्कृती व वेदवाङ्मय

**सिन्धुसंस्कृतीचा आर्यांनी नाश केला याला काडीचाही पुरावा नाही. उत्खननात सापडलेले सांगाडे आजच्या भारतीयांसारखेच आहेत. या संस्कृतीतील वेशभूषा, उपासनापद्धती, भोज्य पदार्थ वगैरे सर्व गोष्टी ऋग्वेदात वर्णिल्याप्रमाणेच आहेत.**



**सिंधुसंस्कृतीच्या** उत्खननाच्या पार्श्वभूमीवर वेदवाङ्मय वाचले असता 'आर्यांच्या' भारतावरील स्वारीचा पुरावा सापडतो असे काही पाश्चात्त्य संशोधक म्हणतात. ते म्हणणे कितपत खरे आहे याची येथे चर्चा करावयाची आहे.

सिंधुसंस्कृती म्हणून ज्या संस्कृतीचा उल्लेख होतो ती संस्कृती वस्तुतः सिंधु नदीच्या आसपासच्या प्रदेशांतच सीमित नाही. सिंधुसंस्कृतीची म्हणून म्हटली जाणारी उत्खनने, वायव्येस ऑक्झस नदीचे खोरे, पूर्वेस यमुनेचे खोरे व दक्षिणेस नर्मदेचा त्रिभुजप्रदेश एवढ्या विस्तृत प्रदेशावर पसरली आहेत. या उत्खननात काही शहरे सापडली आहेत. याव्यतिरिक्त या प्रदेशातील खेड्यांतदेखील ही संस्कृती पसरली होती. पण सुरुवातीची उत्खनने सिंधू नदीच्या खोऱ्यात झाल्यामुळे या संस्कृतीला सिंधुसंस्कृती असे म्हणण्यात आले व हे नाव आता रूढ झाले आहे. 'सिंधुसंस्कृती' या वर्णनात सिंधू हे उपलक्षण आहे हे लक्षात घेतले तर हे नाव वापरल्यामुळे घोटाळा होऊ नये. शिवाय हिंदुस्थान हे प्रथम उत्तर हिंदुस्थानचे व नंतर साऱ्या भारताचे नाव सिंधु नदीवरून पडले असल्यामुळे उत्खननात सापडलेल्या प्राचीनतम भारतीय संस्कृतीला सिंधुसंस्कृती म्हणण्यात एक प्रकारचे औचित्यदेखील आहे.

या संस्कृतीचे पहिले वैशिष्ट्य म्हणजे योजनाबद्ध शहरे. मोहेंजोदरोमध्ये पाच किलोमीटर परिघाचे एक शहर सापडले आहे. या शहराला कोट आहे. हा कोट मातीच्या विटांच्या चौथऱ्यावर बांधलेला आहे. शहराच्या रक्षणासाठी जागोजागी भाजलेल्या पक्क्या विटांचे बुरूज बांधलेले होते. उन्हात भाजलेल्या कच्च्या विटादेखील सापडलेल्या आहेत. ९ मीटर रुंदीचे रस्ते, जलनिःसारणासाठी भूमिगत नाल्या, सार्वजनिक स्नानगृहे, धान्याची गुदामे, विद्यार्थ्यांसाठी इमारती, स्तंभयुक्त सभामंडप, मजुरांच्या चाळी, वगैरेंचे अवशेष सापडले आहेत.

### पुरंदर इंद्र

या सर्वांत पाश्चात्त्य पंडितांना 'आर्यांच्या' स्वरीचे जे 'प्रमाण' सापडले ते हे की, ही शहरे म्हणजे पुरे-नष्ट झालेली आहेत व 'आर्यांच्या' वेदात त्यांनी आपला देव जो इंद्र त्याला पुरे फोडणारा पुरंदर-असे म्हटले आहे. यावरून आर्यांनीच ही पुरे फोडली असे 'सिद्ध' होते.

यावर साहजिकच असा प्रश्न उपस्थित होतो की सिंधुसंस्कृतीतच फक्त नष्ट झालेली पुरे आढळतात काय? जगात ज्या ज्या नष्ट झालेल्या प्राचीन पुरांचे अवशेष सापडतात ती सर्व इंद्रानेच फोडली, अभारतीय आर्यांनी साऱ्या जगावरच स्वारी केली व त्यांचा इंद्र साऱ्या जगातली पुरे फोडीत बसला असे का म्हणू नये?

अधिक खोलात शिरून इंद्राला पुरंदर का म्हटले आहे याचा विचार केला तर काय दिसते?

पुरे फोडण्याचा उल्लेख खालील ऋचांत आहे-

**पुरं न धृष्णवा रुज कृष्णया बाधितो विशा।**

**अंति षद्‌भूतु वामवः ।। ८.७३.१८**

या ऋचेत पुरं व कृष्ण हे शब्द आल्यामुळे 'आर्यांच्या' स्वारीने भारावलेल्यांना 'तो एकच प्यारा बोल' ऐकल्यासारखे वाटण्याचा संभव आहे. पण या शब्दांचा काळ्या लोकांची पुरे फोडण्याशी काही संबंध नाही. असुरांनी आत्रेय सप्तवध्री ऋषीला पेटीत बंद केले तेव्हा अश्विनीकुमारांनी त्याची मुक्तता केली या कथेच्या संदर्भात ही ऋचा आहे. ही पेटी अजगरासारखी आपल्या भक्ष्याला पोटात ओढून बंद होत असे. 'कृष्णया विशा' म्हणजे आकर्षून प्रवेशविणारी असा अर्थ सायणाने केला आहे. एकूण ऋचेचा अर्थ असा आहे :-

"हे सप्तवध्रे, आकर्षून स्वतःत प्रवेशविणाऱ्या पेटीने बाधित झालेल्या तू, जणू धर्षक तटबन्दिला- म्हणजे त्या पेटीला-फोडलेस. हे अश्विनीकुमारांनो, तुमचे संरक्षण सतत आमच्या सन्निध असो."

येथे पुर म्हणजे तटबन्दी हे उपमान आहे, त्यात अनार्यांची पुरे फोडण्याचा काही सम्बन्ध नाही.

-२-

**विभिद्या पुरं शयथेमपाचीं निस्त्रीणि साकमुदधेरकृन्तत्।**

**बृहस्पतिरुषसं सूर्यं गामर्कं विवेद स्तनयन्निव द्यौः ।। १०.६७.५**

"बृहस्पतीने पराङ्मुख अशा पुराच्या जवळ सरून, उदधीतून उषा, सूर्य व पाणी हे तीन ओढून काढले. त्याला आकाशाला निनादित करण्यास मन्त्र सापडला."





येथे ऋचाकाराला काय अभिप्रेत आहे हे सांगणे कठीण असले तरी आपल्या प्रस्तुत विषयासाठी त्याची जरूर नाही, कारण समुद्रातून उषा, सूर्य वगैरे ओढून काढणे या घटना अमानवी आहेत हे निर्विवाद आहे. त्यामुळे या ऋचेत अनार्यांची पुरे फोडण्याच्या घटनेचा उल्लेख शोधणे तेलासाठी वाळू रगडण्यासारखे आहे.

-३-

**युधा युधमुप घेदेषि धृष्णुया पुरा परं समिदं हंस्योजसा ।**

**नम्या यदिन्द्र सख्या परावति निबर्हयो नमुचिं नाम मायिनम्।। १.५३.७**

"हे इन्द्रा, युद्धामागून येणाऱ्या धर्षक युद्धांनी पूर्वी आपल्या बलाने तू पुरांचा नाश केलास. आपल्या नमनीय सहकाऱ्यांबरोबर तू दूरदेशात नमुचि नावाच्या मायावी राक्षसाचे निबर्हण केलेस."

येथे नमुचि हा मानव नाही, असुर वा राक्षस आहे हे मायावी या शब्दाने सूचित केले आहे व त्याला मारण्याची घटना परावति म्हणजे दूरदेशात झालेली आहे, सप्तसिन्धुप्रदेशात नव्हे. तसेच पहिल्या ओळीतील पुर नष्ट करण्याची घटना पुरा म्हणजे इन्द्राच्या प्राचीन कृत्यांपैकी एक आहे. दुसऱ्या ओळीच्या अनुरोधाने हीही घटना मानवी इतिहासातील घटना मानता येत नाही.

-४-

**त्वं करंजमुत पर्णयं वधीस्तेजिष्ठयातिथिग्वस्य वर्तनी**

**त्वं शता वंगुदस्याभिनत्पुरोऽनानुदः परिषूता ऋजिश्वना।। १.५३.७**

"हे इन्द्रा, तू अतिथिग्वाच्या तेजोमय शक्तीने करंजाला व पर्णयाला मारलेस. ऋजिश्व्याने वेढलेली वंगुदाची शम्भार पुरे तू फोडलीस."

इन्द्र हा पर्जन्याचा देव आहे व त्याची सारी कृत्ये अमानवी आहेत. त्यांपैकीच ही कृत्ये होत. इन्द्राच्या कृपेने स्वतः इन्द्राने नव्हे, अतिथिग्वाने करंज व पर्णय यांना मारले व ऋजिश्व्याने वंगुदाची शम्भर पुरे फोडली या ऐतिहासिक घटनांचा येथे उल्लेख आहे असे मानले तरी त्यावरून 'आर्यांच्या' स्वारीचा उल्लेख सूचितदेखील होत नाही कारण करंज, पर्णय व वंगुद हे भारतवासी होते व ऋजिश्वा आणि अतिथिग्व हे भारताच्या बाहेरून आलेले होते असे कोठेच म्हटलेले नाही. वैदिकांचीच ही आपसातली युद्धे

असू शकतात. मुसलमानांत जेव्हा आपसात युद्धे होतात तेव्हा दोन्ही पक्ष अल्लाचेच नाव घेतात. विजयी पक्ष अल्लाला दुवा देतो यावरून हरलेला पक्ष अल्लाचा उपासक नव्हता असे ठरत नाही.

-५-

**त्वं पुरं चरिष्ण्वं वधैः शुष्णस्य संपिणक्।**
**त्वं भा अनुचरो अध द्विता यदिन्द्र हव्यो भुवः॥ ८.१.२८**

''हे इन्द्रा, तू आपल्या प्रहारांनी शुष्णाचे चालते पुर छिन्नविच्छिन्न केलेस. त्यामुळे तुला दीप्ति प्राप्त झाली. तू दुप्पट हव्य म्हणजे ज्याला हाक मारावी असा झालास.''

येथे इन्द्राने फोडलेले पुर चालते आहे. तेव्हा तो किल्ला असू शकत नाही. शुष्ण म्हणजे शोषण करणाऱ्या असुराचे चालते पुर म्हणजे वर्षाव न करणारा मेघ. त्याला फोडून इन्द्राने पाऊस पाडला.

## पुरे वैदिकांचीच; 'अनार्यांची' नव्हेत!

ऋग्वेदात उल्लेखिलेली पुरे ही वैदिकांच्या शत्रूंची पुरे नसून वैदिकांनीच स्वतःच्या रक्षणासाठी ती बांधलेली होती असे दाखविणारे उल्लेख डझनावारी आहेत. ''हा अग्नि नार्मिणी पुराला- म्हणजे सुखसमृद्धीचे निधान असणाऱ्या पुराला- प्रकाशित करतो. आकाशातील वायूप्रमाणे हा क्रान्तदर्शी व संचारी आहे. तो सूर्याप्रमाणे तेजस्वी व शतावधि रूपे धारण करणारा आहे.'' (१.१४९.३) यातील नार्मिणीपुर म्हणजे उत्तरवेदी कुरुक्षेत्र असे सायण म्हणतो. कुरुक्षेत्र ही वैदिक संस्कृतीची प्रधान भूमी. तेव्हा अग्नीने नार्मिणीपुराला प्रकाशित केले म्हणजे नार्मिणीपुरात अनेक यज्ञांत तो प्रकाशित झाला. 'नार्मिणीमदीदेत्' म्हणजे अग्नीने नार्मिणीपुराला जाळले असा जे अर्थ करतात ते दीपावलीने भारत प्रकाशित केला याचा अर्थ दिवाळीने भारत देश जाळला असा करतील!

नार्मिणीपुरात शतावधि ठिकाणी यज्ञाग्नी पेटत होता यावरून नार्मिणीपुर हे वैदिकांचेच पुर होते, त्यांच्या शत्रूंचे नव्हेत हे उघड आहे.

''हे अग्ने, तुला जाणणारे लोक तुला आहुति देऊन आपल्या पौरुषाचे रक्षण करतात. ते दृढ अशा पुरात प्रवेश करतात.'' (८.६.२३) येथे पान्ति या शब्दाने स्वतःच्या रक्षणासाठी पुरात शिरण्याचे वर्णन आहे, पुरातील लोकांचा नाश करण्यासाठी नव्हे.





या संबन्धात सायणाने ७.३७.७ मधील 'शतं पूर्भिरायसीभिर्निपाहि।' म्हणजे शम्भर मजबूत पुरांनी आमचे रक्षण कर या प्रार्थनेचा उल्लेख केला आहे. तेव्हा वैदिकांनी ही पुरे स्वतःच्या रक्षणासाठी बांधलेली होती.

''हे इन्द्रा, रक्षक तटाप्रमाणे असलेले गोधन व पुत्र प्राप्त करण्याच्या आमच्या महान् इच्छा पूर्ण कर.'' (८.६.२३) ''सोमाने आनन्दित होऊन तू एखाद्या तटबन्दीप्रमाणे रक्षक असलेले गायींचे व अश्वांचे कळप आम्हाला देतोस.'' (८.३२.५) ''हे यज्ञप्रियांनो, व मुलांनो, करा, पूजा करा, एखाद्या तटबन्दीप्रमाणे रक्षण करणाऱ्या आत्मविश्वासी व शूर इन्द्राची पूजा करा.'' (८.६९.८) ''मनाच्या वेगाने धावणाऱ्या गरुडाने मजबूत तटबन्दी (पुर) उल्लंघून स्वर्ग गाठला व इन्द्राला सोम प्रदान केला.'' (८.१००.८) सोम स्वर्गात होत नाही, तो पृथ्वीवर होतो. हा पृथ्वीवरचा सोम, गरुडाने मजबूत तटबन्द्या-म्हणजे स्वर्गाच्या मार्गातील दुर्लघ्य अडचणी-पार करून इन्द्राला नेऊन दिला. ''हे, पुररूप म्हणजे रक्षक अग्ने, आम्ही वारंवार तुझे ध्यान करतो.'' (१०.८७.२२) ''हे अपां नपात्, आमच्या उन्हात सुकविलेल्या कच्च्या विटांच्या तटबन्दीत परका, अदाता व असत्य प्रवेश न करोत.'' (२.३५.६) येथे स्पष्टपणे तटबन्दी या अर्थाचा पुर हा शब्द आलंकारिक अर्थाने शत्रू, कुसंग व दुर्गुण यांपासून बचाव करणाऱ्या शक्ती या अर्थी वापरला आहे.

एकंदर सर्व उल्लेखांचा विचार करता ऋग्वेदात उल्लेखिलेली पुरे ही मुख्यतः वैदिकांनीच आपल्या रक्षणासाठी बांधलेली होती हे स्पष्ट होते. पुरे फोडण्याचे बहुतेक उल्लेख अमानवी घटनांच्या संबंधी असून तेथे पुर हा शब्द उपमान म्हणून वापरलेला आहे. पुरे फोडणारे अभारतीय होते असा एका अक्षरानेही उल्लेख नाही.

## सिन्धुसंस्कृतीच्या विध्वंसाचे आणखी दोन 'पुरावे'

सिन्धुसंस्कृतीचा आक्रमकांनी विध्वंस केला हे दाखविण्यासाठी खालीलप्रमाणे उत्यननविषयक 'पुरावे' देण्यात येतातः-

''१. कुठे कुठे जळलेला गहू आढळला आहे. तसेच एवढ्या मोठ्या शहरात दारे कुठेच आढळत नाहीत. ही दारे लाकडाची असतील व गव्हाप्रमाणेच आक्रमकांनी लावलेल्या आगीत ती नष्ट झाली असतील.''

नागपुरातदेखील दरवर्षी आगी लागतात व यांपैकी एखाद्या आगीत जळलेला

गहू नागपुरातदेखील सापडू शकेल. आग्र्याच्या व दिल्लीच्या लाल किल्यातदेखील दारे सापडत नाहीत, पण या किल्ल्यांचा कोणी बुद्धिपुरःसर नाश केला असे इतिहास सांगत नाही. जेथून वसती उठून गेली आहे अशा प्रदेशातील लाकडाची दारे हजारो वर्षे कायम राहतील असा संभव नाही. विशेषतः पुराने नष्ट झालेल्या शहरांतील लाकडी दारे हजारो वर्षांनी सापडतील अशी अपेक्षा करणे वेडेपणाचे आहे. सिन्धुसंस्कृतीची काही शहरे पुराने नष्ट झाली हे स्पष्ट आहे. सिन्धूसारख्या मोठ्या नदीचे पात्र वारंवार बदलते व पुरेच्या पुरे गिळंकृत करू शकते असे भूवेत्ते सांगतात. सिंधुसंस्कृतीच्या काही शहरांचा नाश होण्याचे दुसरे कारण सरस्वती नदीचे लुप्त होणे. सिंधुसंस्कृतीचे काही अवशेष शुष्क झालेल्या सरस्वतीच्या तीरावर सापडले आहेत. सरस्वती आटू लागली तसतसे पाण्याच्या अभावी लोक या वसत्या सोडून गेले. निर्मनुष्य झालेली शहरे किती दिवस टिकणार? ती ऐतिहासिक अवशेषांच्या स्वरूपातच सापडणार.

२. सिंधुसंस्कृतीचा नाश युद्धात झाला याला प्रमाण म्हणून जिन्यावरून पळून जाताना कापल्या गेलेल्या स्त्रीचा व पृष्ठीय स्तरावर दागिने घातलेल्या स्त्रियांचे व बालकांचे सांगाडे सापडलेले आहेत ही गोष्ट युद्धोत्तर कत्तलीची निदर्शक म्हणून नमूद करण्यात येते. दागिने चोरलेले नाहीत यावरून ही कत्तल दरोडेखोरांनी केलेली नाही असाही युक्तिवाद करण्यात आलेला आहे.

दरोडेखोरच फक्त दागिने लुबाडतात, सैनिक दागिने लुबाडीत नाहीत ही अत्यंत भोळसट कल्पना आहे. टिपू सुलतानाशी झालेल्या युद्धात एक ब्रिटिश शिपाई त्याचा मोत्याचा कंठा हिसकून घेत आहे असे दाखविणारे चित्र इतिहासाच्या पुस्तकात दिलेले असते.

दुसरे असे की जे सांगाडे सापडले आहेत ते शस्त्राने मेलेल्या लोकांचे आहेत असे मानण्यास काहीच आधार नाही. पूर्णांग नसलेल्या एकाच सांगाड्याचा उल्लेख करण्यात आला आहे. पण हे सांगाडे शवपेटिकेत काळजीपूर्वक ठेवलेल्या प्रेतांचे नाहीत. धावपळ करताना मेलेल्या लोकांचे आहेत, ते हजारो वर्षे पूर्णांग राहू शकतील असा संभव फार कमी आहे.

हे सांगाडे अचानक आलेल्या पुरापासून बचावण्यासाठी पळणाऱ्या लोकांचे आहेत हेच अनुमान सयुक्तिक दिसते. युद्धात मारल्या गेलेल्या लोकांचे काही सांगाडे आहेत असे मानले तरी तेवढ्यावरून हे युद्ध अभारतीय 'आर्यांच्या' स्वारीमुळे





उद्भवलेले युद्ध होते असे सूचित करणारे या उत्खननात काहीच नाही. सिंधुसंस्कृतीचा विस्तार हजारो मैलांच्या परिसरात आहे. एवढ्या सर्व प्रदेशात एकच राज्य नांदत होते व सिंधुसंस्कृतीच्या लोकांची आपसात कधीच युद्धे झाली नाहीत असे मानण्यास असंभव गोष्टी गृहीत धराव्या लागतात.

## सिन्धुसंस्कृतींचा नाश झालाच नाही

वस्तुतः सिन्धुसंस्कृतीचा नाश झाला हे म्हणणेच मुळात खरे नाही. आज अस्तित्वात असलेली हिंदु संस्कृती हीच सिंधुसंस्कृती आहे. आजच्या हिंदू संस्कृती व सिन्धुसंस्कृतीत जो फरक आहे तो ५००० वर्षांच्या कालावधीत कोणत्याही संस्कृतीत पडण्यासारखा आहे. आजच्या हिंदू संस्कृतीत वैदिक संस्कृती समाविष्ट आहे तशीच ती सिन्धुसंस्कृतीतही होती, हे पुढील विवेचनावरून स्पष्ट होईल. ५००० वर्षांत भारतात झालेली वैज्ञानिक प्रगती, प्रभावशाली वैचारिक चळवळी व इतर संस्कृतींशी आलेला संबंध यामुळे असा फरक पडू शकतो. या फरकाची उपपत्ती लावण्यासाठी सिन्धुसंस्कृती नष्ट होऊन तिच्या जागी दुसरीच संस्कृती नान्दू लागली अशी कल्पना करण्याचे कारण नाही.

नगररचना हे सिन्धुसंस्कृतीचे वैशिष्ट्य हिन्दूंच्या मनात एवढे रुजले आहे की तुर्क/अफगाण/मुघल आक्रमणानन्तर देखील ते कायम राहिले. मुघलादी आक्रमकांनी ताजमहाल बांधले पण त्यांची नगररचना ही गल्लीबोळांचीच राहिली. नगररचनेच्या दृष्टीने दिल्ली/आग्रा यांचे महत्त्व नसून जयपूर व विजयनगर यांनाच अग्रस्थान द्यावे लागते.

आजचे भारतीय हेच सिन्धुसंस्कृतीतील लोकांचे वंशज आहेत हे आणखी एका तथ्यावरून सिद्ध होते. उत्खननात सापडलेल्या ३२५ मानवी सांगाड्यांची वंशज्ञांनी पाहणी केली. त्यावरून असे मत सर्वमान्य होत चालले आहे की सिन्धुसंस्कृतीचे लोक आज वंशवाद्यांनी कल्पिलेल्या कोणत्याही वंशात समाविष्ट होऊ शकत नाहीत. ए.घोष म्हणतात, ''शीर्षाङ्काच्या (सेफालिक इण्डेक्स)'' दृष्टीने पाहता असे दिसून येते की मोहेंजोदरो येथे सापडलेली शरीरे आजच्या सिंधी लोकांच्या शरीरासारखी आहेत व लोथल येथे सापडलेली आजच्या गुजराथी लोकांसारखी आहेत. सारांश, गेल्या पाच हजार वर्षांत सिन्धुसंस्कृतीच्या लोकांतल्या वंशलक्षणांत काहीच फरक पडलेला नाही.

'आर्य' नावाच्या एखाद्या वेगळ्याच वंशाच्या लोकांनी सिन्धुसंस्कृतीवर आक्रमण, वसाहती व मोठ्या प्रमाणावर तेथील स्त्रियांशी विवाह केले असते तर आजच्या सिन्धुप्रदेशातील लोकांची वंशलक्षणे हुबेहूब सिन्धुसंस्कृतीतील लोकांसारखीच राहिली नसती.

## उत्खनने व सिन्धुसंस्कृतीची वेदोत्तरता

वेदवाङ्मयात सिन्धुसंस्कृतीवरील 'आर्यांच्या' आक्रमणाचा पुरावा सापडतो असे मानण्यास सिन्धुसंस्कृती वेदपूर्व आहे असे सिद्ध होणे आवश्यक आहे. उत्खननात घोड्याचा सांगाडा सापडत नाही व घोड्याशिवाय वैदिक संस्कृतीची कल्पना सम्भवत नाही. यावरून सिन्धुसंस्कृतीची वेदोत्तरता सिद्ध होते असा युक्तिवाद सुरुवातीला करण्यात आला. पण अधिक उत्खनने झाल्यावर घोड्याचा सांगाडादेखील सापडला व सिन्धुसंस्कृती वेदपूर्व आहे असे मानण्यास देण्यात येणारा एकमेव उत्खननीय 'पुरावा' नाहीसा झाला.

तो नाहीसा झाला एवढेच नाही तर वेदवाङ्मय निदान ऋग्वेद- सिन्धुसंस्कृतीपेक्षा प्राचीन आहे असे दर्शविणारा उत्खननात्मक पुरावा सापडला. उत्खननात कापूस सापडला आहे पण वेदवाङ्मयाला तो माहीत असलेला दिसत नाही. सोम गाळण्यासाठी लोकरीचे कापड वापरीत हे 'अवेवरिषु' म्हणजे 'मेण्ढीच्या केसांतून' या उल्लेखावरून स्पष्ट आहे. वेदवाङ्मयाला माहीत असलेले दुसरे कापड म्हणजे इंग्रजीत ज्याला फ्लॅक्स म्हणतात ते अळशीचे कापड. मैत्रायणीसंहिता १११, ६, ६ मध्ये क्षौमी या नावाने या कापडाचा उल्लेख आहे. क्षौमी हा शब्द क्षुमा म्हणजे अळशी या शब्दापासून झाला आहे. अळशीचे कापड जसे धूत जावे तसे जास्त चमकत जाते म्हणून पुढे रेशमालाही क्षौम म्हणू लागले व अळशीच्या कापडाचा वापर विरळा होऊ लागल्यावर त्याचा रेशीम हाच अर्थ अधिक प्रचारात आला. लोकर व अळशी यांचा उल्लेख असताना कापसाचाच तेवढा नसावा यावरून वेदकाली कापसाचा शोध लागलेला नव्हता असे अनुमान काढता येते. गोल्डस्टकर व एगेलिंग यांच्या मते, "अथर्ववेद २५.२३ मध्ये तार्प्य या नावाने रेशमाचा उल्लेख आहे. रेशमाचा शोध प्रथम चीनमध्ये ख्रिस्तपूर्व २६४० मध्ये लागला. अर्थात वेदवाङ्मय यापूर्वीचे असू शकत नाही. प्राङ्गारगणनेप्रमाणे सिंधुसंस्कृतीचा प्राचीनतम काल ख्रिस्तपूर्व २८०० हा ठरतो. तेव्हा





ऋग्वेदाचा काल सिंधुसंस्कृतीच्या प्राचीनतम कालापेक्षा प्राचीन नाही."

तसेच "ऋग्वेदात अयस् या नावाने लोखंडाचा उल्लेख आहे. सिंधुसंस्कृतीत तांब्याची व काशाची उपकरणे सापडली आहेत. पण लोखंडाच्या अस्तित्वाचा काहीच पुरावा सापडला नाही. यावरून ऋग्वेद सिन्धुसंस्कृतीपेक्षा अर्वाचीन ठरतो" असा युक्तिवाद करता येण्यासारखा आहे.

पण हा युक्तिवाद चुकीचा आहे. एक तर अथर्ववेदाच्या आधारे साऱ्या वेदवाङ्मयाचे अर्वाचीनत्व ठरू शकत नाही. तसेच तार्प्य म्हणजे तृपा वा त्रिपर्ण नावाच्या रोपापासून झालेले वस्त्र असे सांगतात. आपट्यांच्या कोशात त्रिपर्ण याचा अर्थ किंशुक असा दिलेला आहे. अर्थात तार्प्य हे वनस्पतिजन्य असल्यामुळे कृमिजन्य रेशमाशी त्याचा काही सम्बन्ध नाही. तृण, त्रिपर्ण वा किंशुक हे रोप असले तरी ते कापसाचे रोप नव्हे याबद्दलही शंका नाही. तातपर्य हे अळशीच्या रोपाचे वस्त्र असावे असे देखील उपर्युक्त टीकाकार सुचवितात.

ऋग्वेद १.८८.५ मध्ये अग्नीला अयोदंष्ट्र म्हटले आहे. ५.६२.७ मध्ये मित्र व वरुण यांच्या रथनीडाला अयःस्थूण म्हटले आहे. या उपमा रंगावरून असतील तर अयस् या शब्दाचा लोखण्ड असा अर्थ न करता कासे असा अर्थ केला तर त्या अधिक समर्पक ठरतात, कारण कासे हे ताम्ब्यासारख्या लाल धातूच्या मिश्रणाने होते. रथासारखी साधने शुद्ध ताम्ब्याची न करता काशाची करणे अधिक उपयुक्त होते.

वाजसनेयी संहितेमध्ये अयस्चा उल्लेख सहा धातूंबरोबर आहे. १. हिरण्य, २. अयस्, ३. श्याम, ४. लोह, ५. शीस आणि ६. त्रपु. इथे श्याम म्हणजे काळे. हे अर्थात लोखण्ड असावे. लोह, लोहित इत्यादी शब्दांचा अर्थ लाल असा असल्यामुळे लोह म्हणजे ताम्बे असावे. तेव्हा उरलेले अयस् हे कासे असावे. अथर्ववेद ११.३.७.१ मध्ये श्याम आणि लोहित असे अयस्चे दोन प्रकार सांगितले आहेत. येथे श्याम म्हणजे लोखण्ड व लोहित म्हणजे ताम्ब्याचे प्रमाण जास्त असलेले कासे असावे. शतपथब्राह्मण ५.४.१.२ मध्ये अयस् व लोहितायस् असा भेद केला आहे. येथे अयस् म्हणजे ताम्ब्याचा अंश कमी असलेले कासे.

तेव्हा ऋग्वेद सिन्धुसंस्कृतीप्रमाणेच लोखण्डपूर्व आहे.

ऋग्वेदकारांना लिपी माहीत नव्हती असे काही पाश्चात्त्य पण्डितांचे मत आहे. ऋग्वेदात स्पष्टपणे लिपी व लेखन यांचा उल्लेख नाही हे खरेच आहे. उलट

सिन्धुसंस्कृतीत लिपी सापडली आहे. अर्थात् ऋग्वेदकाली लिपी नव्हती असे जे मानतात त्यांना ऋग्वेदकाल सिन्धुसंस्कृतीपेक्षा प्राचीन आहे असे म्हणणे प्राप्त आहे; कारण लेखनकला माहीत नसण्याचा काळ ती माहीत असण्याच्या काळापेक्षा सम्भाव्यतः प्राचीन मानला पाहिजे.

असे असता बरो म्हणतो की सिन्धुसंस्कृतीच्या काळी अवगत असलेली लेखनकला ऋग्वेदकालापर्यन्त भारतीय लोक विसरून गेले.

## सरस्वतीसंस्कृती

ऋग्वेद सिन्धुसंस्कृतीपेक्षा प्राचीन आहे हे आणखी एका पुरातत्त्वीय पुराव्यातून सिद्ध होते तो म्हणजे सरस्वती नदीच्या प्राचीन पात्रांचा शोध. सरस्वती हल्ली कोरडी पडली आहे, व ती गुप्त आहे वा विनशत तीर्थात लुप्त झाली आहे अशी हजारो वर्षांपासून परंपरा आहे. पण Central Arid Zone Research Institute च्या घोष व हुसेन या शास्त्रज्ञांनी हजारो वर्षांत बदललेली तिची पात्रे परिश्रमपूर्वक शोधून काढली आहेत. या पात्रांपैकी काही पात्रांच्या काठी हरप्पाचे अवशेष सापडले आहेत. ख्रि.पू. १८०० च्या पूर्वी या पात्रात जोरकस प्रवाह वाहात होते असे या शास्त्रज्ञांनी भूशास्त्राच्या आधारे म्हटले आहे. सरस्वती ही ऋग्वेदातील सर्वात महत्त्वाची नदी आहे. अर्थात ऋग्वेदाची रचना ख्रि. पू. १८०० च्या अलीकडे ओढणे उत्खननांच्या पुराव्याने अशक्य केले आहे.

घोष व हुसेन यांच्या संशोधनाने सरस्वती समुद्राला जाऊन मिळते हा ऋग्वेदातील उल्लेख (७.९५.२) ख्रिस्तपूर्व १८०० च्याही हजारो वर्षे पूर्वीचा आहे असे म्हणण्यास आधार मिळवून दिला आहे. त्यांनी शोधलेली सरस्वतीची काही पात्रे समुद्राला जाऊन मिळतात व ही पात्रे निदान ख्रिस्तपूर्व ४/५ हजार वर्षे पूर्वीची आहेत असे त्यांचे म्हणणे आहे. तेव्हा ऋग्वेदाचा काल ख्रिस्तपूर्व ४००० च्या सुमाराचा आहे या मताला या भौमिक संशोधनाने आधार उपलब्ध करून दिला आहे.

तेव्हा सिन्धुसंस्कृतीच्या उत्खननाने वेदवाङ्मय ख्रि.पू. १७०० च्या म्हणजे सिन्धुसंस्कृतीच्या सर्वांत अलीकडच्या कालाच्या नंतरचे आहे असे सिद्ध केले आहे हे म्हणणे साफ खोटे असून उलट वेदवाङ्मय सिन्धुसंस्कृतीपेक्षा हजारो वर्षे प्राचीन आहे व वैदिकांनी सिन्धुसंस्कृतीचा नाश केल्याचे उल्लेख ऋग्वेदात असणेच शक्य





नाही याची सबळ प्रमाणे प्रकाशात आणली आहेत.

काही लोक वैदिकांना अभारतीय ठरविण्यासाठी ऋग्वेदात स्पष्टपणे असलेला भारतीय भूगोल नाकारून वेदातील नद्यांना परदेशीय ठरवितात. वैदिक सरस्वती ही लुप्त झालेली भारतीय सरस्वती नसून आकाशातील वा भारताबाहेरील वा अफगाणिस्तानातील सरस्वती होय असे या लोकांचे म्हणणे आहे. पण नदीसूक्तातील नद्यांचा क्रम असा आहे-

गंगा, यमुना, सरस्वती, शुतुद्री-म्हणजे सतलजपरुष्णी म्हणजे रावी, असिक्नी म्हणजे चिनाब, मरुद्‌वृधा म्हणजे चिनाबची मुख्य नदी, वितस्ता म्हणजे झेलम आणि आर्जिकीया म्हणजे झेलमची मुख्य नदी आणि सुषोमा म्हणजे आर्जिकीया नदीची उपनदी. (१०.७५.५)

या नद्या पूर्वेकडून पश्चिमेकडे अशा क्रमाने उल्लेखिलेल्या आहेत. तेव्हा ऋग्वेदातील सरस्वती ही यमुना व सतलज यांच्या मधील नदी होय यात शंका नाही.

## सिन्धुसंस्कृती व वैदिक संस्कृती

सिन्धुसंस्कृतीच्या, उत्खननात 'आर्यांच्या' स्वारीचा पुरावा सापडत नाही व सापडणेही शक्य नाही हे आतापर्यंत दाखविले. आता उत्खननात सापडलेली संस्कृती व वेदवाङ्मयात जिचे दर्शन होते ती संस्कृती या भिन्न आहेत असे म्हणण्यास काही आधार आहे काय याचा विचार करू.

## उपासनापद्धती

उत्खननात काही कोरीव आकृती सापडलेल्या आहेत त्यांवरून या संस्कृतीतील देवतांबद्दल काही अंदाज बांधता येतो. पक्क्या मातीच्या मुद्रांवर काही देवतांच्या आकृती/मूर्ती आहेत. या देवता नग्न आहेत व त्यांच्या डोक्यावर शिंगे आहेत. एका सशृंग देवतेला तीन शिरे आहेत. एक आकृती एका शिंगाच्या प्राण्याची आहे. बैल, नद्या, पिंपळाचे झाड व हत्ती वगैरे पूजनीय मानल्या गेलेल्या वस्तूंच्याही प्रतिकृती आहेत. लिंगाकृती व कंकणाकृती वस्तू सापडलेल्या आहेत.

एक आकृती शिराच्या आधारावर उभ्या असलेल्या स्त्रीची आहे तिच्या योनीतून झाड उगवत आहे. एक स्त्री हात जोडून उभी आहे व तिच्या शेजारी एक माणूस विळीसारखी तरवार घेऊन उभा आहे. एक माकडाची आकृती सापडली आहे. एक

आकृती वल्कले नेसलेल्या एका धनुर्धराची आहे. त्याच्या डोक्यावर शिंगे आहेत व चेहऱ्याच्या रक्षणासाठी आच्छादन आहे. एका मुद्रेवर दुर्गेसारखी आकृती आहे. बैलांच्या आकृतीत त्यांची जननेन्द्रिये स्पष्ट दाखविलेली आहेत.

यज्ञकुण्डासारखे काही चौकोन सापडलेले आहेत. दोन मुद्रांवर स्वस्तिक आणि चक्र आहे.

वरील जवळजवळ सर्वच उपास्ये व उपासनापद्धती वेदवाङ्मयात आढळतात. ''हे दक्षिणशृंग ब्रह्मणस्पते, गर्भनाशक व असमृद्धिकर अशा सर्व शक्तींचा नाश करीत तू ये-'' ऋ. १०.१५५.२. ''हा इन्द्र तीक्ष्णशृंग वृषभाप्रमाणे (गायींच्या) कळपात डरकाळ्या फोडतो-'' ऋ. १०.८६.१५. ''तीक्ष्णशृंग भीम वृषभा प्रमाणे हा इन्द्र एकटाच सर्व शत्रूंचा पाडाव करतो-'' ७.१९.१. ''हा वृषभ तीन आचळांचा व तीन मुखांचा - त्र्यनीक- आहे'' ३.५६.३. ''हा कोळे असलेला वृषभ आनन्दित होतो आहे. हा प्रशस्त व कर्मशील वत्स डरकाळ्या फोडतो आहे. यज्ञामध्ये हा उत्साहपूर्ण कर्मे करीत स्वतःच्या स्थानी प्रथम असलेला जात आहे-'' १०.८.२.

एकशृंग प्राण्याचे चित्र हे एकशृंग वराहाचा अवतार घेतलेल्या विष्णूचे असावे.

ऋग्वेदात माकडाला पूज्य मानलेले आहे हे वृषाकपि सूक्तावरून स्पष्ट आहे. ''सोम सेवन करणारे इन्द्राला देव न मानता वृषाकपीलाच देव मानतात. वृषाकपि सोम पिऊन मदयुक्त होतो-'' १०.८६.१. ''हे इन्द्रा, या तपकिरी रंगाच्या माकडाने तुझ्यावर अशी काय जादू केली आहे की तू त्याला मोठ्या औदार्याने पुष्टिकारी धन देतोस?''- १०.८६.३.

लिंगपूजेचे उल्लेख ऋग्वेदात सापडतात ते वैदिकांच्या शत्रूंचे नसून वैदिकांतच प्रचलित असलेल्या पूजापद्धतीचे आहेत. ७.१००.६ मध्ये विष्णूच्या शिपिविष्ट या नावाचा उल्लेख आहे. शिपिविष्ट म्हणजे लिंगरूप. यावरून विष्णूची लिंगरूपाने पूजा होत होती असे दिसते. वृषभ व त्याची जननशक्ती यांचा अनेकवार उल्लेख आहे. वृषाकपि हा कपिरूप देवदेखील वृषा म्हणजे जननसमर्थ म्हणून वर्णिलेला आहे. जननेन्द्रियाबद्दल आज प्रचलित असलेली जुगुप्सा ऋग्वेदकाली मुळीच नव्हती हे अनेक स्थळांवरून स्पष्ट आहे. वानगीदाखल १०.८६.१६,१७ या ऋचा पहाव्या. लिंगपूजा वैदिकांत प्रचलित होती असे समजण्यास काहीच हरकत नाही.

ऋग्वेदात सिन्धु व सरस्वतीला पूजनीय मानले आहे, सरस्वतीवर तर दोन स्वतन्त्र





सूक्ते आहेत. तेव्हा सिन्धुसंस्कृतीतील पूजनीय वस्तूंच्या आकृतीत नद्या आहेत हे अपेक्षितच आहे. अथर्ववेद ८.१०.२९ व पंचविंशति ब्राह्मण २५.१५.३ मध्ये ऐरावताचा उल्लेख आहे. हा ऐरावत नाग म्हणजे हत्ती वा नाग सर्प असू शकतो, पण पुढील वाङ्मयात इन्द्राचा हत्ती म्हणून हा शब्द रूढ झाला व इन्द्राचे वाहन म्हणून हत्ती पूज्य ठरला.

ऋ. १०.९७.५ मध्ये औषधीचे व धनाचे निधान म्हणून अश्वत्थाचा म्हणजे पिंपळाचा गौरवपूर्ण उल्लेख आहे.

योनीतून झाड निघाल्याची आकृती उघडच पृथ्वी व तिची जननक्षमता दाखविणारी आहे. वर पाय आणि खाली डोके अशी आकृती काढल्याशिवाय झाड योनीतून निघाले आहे असे दाखविणे शक्यच नाही. ''पवित्र बलाचा स्तुत्य वरुण ऊर्ध्वभागी तेजाचा संघ धारण करतो. याचा तळाचा भाग व शाखा खाली आहेत. या शाखांचे ध्वज आमच्या अंतःकरणात सदैव राहोत.'' १.२४.७ यात वरुणाचे वर्णन आहे. वरुण हा शब्द मुळात वृ म्हणजे व्यापणे या धातूपासून आला आहे व व्यापणारे आकाश हे त्याचे भौतिक रूप आहे. आकाशाला द्यौ असादेखील शब्द आहे. द्यावापृथिवी ही एक महत्त्वाची वैदिक देवता आहे. परस्परांना पूरक अशा आकाश व पृथ्वी या दोन देवतांची ही जोडदेवता आहे. त्यांपैकी आकाशाचे वर मूळ व खाली शाखा असे वरील ऋचेत वर्णन आहे. यालाच पूरक अशी पृथ्वी. तिचे खाली मूळ व वर शाखा असे स्वरूप आहे. हेच स्वरूप खाली डोके व वर पाय असलेल्या व जिच्या योनीतून वृक्ष निघाला आहे अशा स्त्रीच्या रूपाने या मूर्तीत दाखविले आहे.

स्त्रीला बळी देण्याचे जे चित्र आहे तेदेखील मानवबलीच्या वेदवाङ्मयात उल्लेखिलेल्या प्रथेला उद्देशून असावे. शतपथब्राह्मणात शुनःशेपाला बळी देण्यासाठी यूपाला बांधल्याचे वर्णन आहे. वाजसनेयी संहिता ३०.१६ मध्ये पुरुषमेधात कुणाकुणाला बळी द्यायचे याची यादी दिली आहे. पृथ्वीदेवतेला बळी दिले जात- विशेषतः जननविधी म्हणून जननक्षम स्त्रीचा बळी दिला जाई. म्हणून कदाचित पृथ्वीदेवतेच्या चित्रामागे या स्त्रीबलीचे चित्र रेखाटले असेल.

वल्कले नेसलेल्या व डोक्यावर शिंगे असलेल्या धनुर्धराची आकृती ही किरातरूपी शंकराची आकृती असावी. वंशाची कल्पना ज्यात लोकप्रिय आहे ते जर्मन लोक सिन्धुसंस्कृतीतील स्वस्तिकाला खास 'आर्य' चिन्ह समजतात. चक्राची पूजा

ऋग्वेदाइतकी प्राचीन आहे. संवत्सराला द्वादशारचक्र म्हटले आहे. विष्णूचे चक्र तर आबालवृद्धांना परिचित आहे.

यज्ञकुंडाचे अवशेष सापडल्यामुळे तर सिन्धुसंस्कृती अवैदिक होती असे म्हणणाऱ्यांना बोलायला जागाच उरली नाही.

दुर्गा, वराहावतार, विष्णूचे चक्र वगैरे गोष्टी वैदिक नसून पौराणिक आहेत, वैदिकांनी सिन्धुसंस्कृतीचा नाश केला पण सिन्धुसंस्कृतीतील काही गोष्टी उचलून पुराणे रचली असेएक मत प्रचलित आहे. पण या मतासाठी सिन्धुसंस्कृतीचे उत्खनन व प्राचीन वाङ्मय यांच्या बाहेरचा पुरावा आवश्यक आहे. असा पुरावा आहे की नाही याची चर्चा प्रस्तुत लेखाच्या कक्षेत येत नाही. असा पुरावा मुळीच नाही असे मी इतरत्र दाखविले आहे. परंपरेप्रमाणे पुराणे हे वेदाचे उपबृंहण आहे. ती अवैदिक नाहीत.

उत्खनने व प्राचीन वाङ्मय यांचा विचार करता दोहोत प्रतिबिंबित झालेली उपासनापद्धती एकच आहे. हा निष्कर्ष अटळ आहे.

### अन्त्यसंस्कार

हरप्पा येथे अन्त्यसंस्काराच्या बाबतीत पुढील पुरावा मिळतो- १) मेलेल्या माणसाचे संबंध शरीर पुरणे. २) शरीराची हाडे एका भांड्यात घालून ते भांडे पुरणे. ३) प्रेत दहन करून त्यातील अवशिष्ट भाग एकत्र ठेवून त्यावर समाधी बांधणे.

पहिल्या पद्धतीप्रमाणे पुष्कळ हाडांचे तीन सापळे सापडले आहेत. त्याबरोबर भांडी, खुर्च्या, टेबले ठेवलेली आढळून आली. दुसऱ्या प्रकारात मेलेल्या माणसाचे शरीर पशुपक्ष्यांना खावयास देऊन उरलेल्या हाडांपैकी काही हाडे मोठ्या मडक्यात घालून पुरीत असत. अशा तऱ्हेची भांडी घराच्या आवारातच पुरलेली आढळतात. तिसऱ्या प्रकारात मृत शरीराला अग्निसंस्कार करून मग उरलेली रक्षा व अस्थींचे अवशेष एका मोठ्या तोंडाच्या भांड्यात घालून त्याबरोबर मणी, बांगड्या वगैरे तऱ्हेतऱ्हेचे पदार्थ ठेवून दाराजवळ पुरीत असत.

'दम्बसुथी' येथे पाच दालनांची लहानशी श्मशानभूमी सापडली आहे. प्रत्येक दालनात दगडांचा चौकोन करून त्यामध्ये पुरलेले मानवी शरीराचे अवशेष सापडले आहेत.

मानवी शरीराचे पुरलेले सापळे, किंवा मातीच्या भाण्ड्यात हाडे ठेवून तशी





पुरलेली भाण्डी इतकी थोडी सापडली आहेत की, मृत शरीर जाळणे हा नेहमीचा नियम असून, पुरणे हा एक अपवाद असावा.

वेदवाङ्मयात वर्णिलेले अन्त्यसंस्कार वरीलसारखेच आहेत. ऋ. १०.११.१४. मध्ये अग्निदग्ध आणि अनग्निदग्ध या दोन प्रकारांच्या अन्त्यसंस्कारांचा उल्लेख आढळतो. अथर्ववेद १८.२.३८ मध्ये आणखी दोन पद्धती दिल्या आहेत. त्या म्हणजे परोप्त-फेकून दिलेली- व उद्धित-अनावृत ठेवलेली-प्रेते. झिमरच्या मते पहिली पद्धत ही पारशांच्या प्रेते पशुपक्ष्यांना खायला देण्याच्या, पद्धतीसारखी आहे, तर दुसरी मरायला टेकलेल्या म्हाताऱ्यांना उघड्यावर टाकण्यासारखी आहे. ऋ. ८.५१.२. व्हिटनेच्या मते जिवन्त माणसाला उघड्यावर टाकण्याची ही रीत नसून प्रेताला एका ओट्यावर ठेवून प्रदर्शित करण्याची आहे.

ऋ. १०.१८ मध्ये पुरण्याच्या विधीचे वर्णन आहे. हातात धनुष्य घेतलेला व पूर्ण वेषभूषा केलेला मृतदेह पुरला जात होता असे दिसते. अथर्ववेद १७.२.२५, ३, ७ मध्ये शवपेटीचा उल्लेख आहे. सायणाच्या मते पुरण्याचे वर्णन, मृताच्या अस्थी ज्यात ठेवल्या आहेत अशा कुम्भाला उद्देशून आहे.

छान्दोग्य उपनिषदात मृतदेहावर अलंकार घालण्याचा उल्लेख आहे. ८.८.५

वेदवाङ्मयात दहन व पुरणे या दोन्ही पद्धतींचा उल्लेख आहे. ग्रीकांतदेखील या दोन्ही पद्धती प्रचलित होत्या.

तात्पर्य, सिन्धुसंस्कृतीतील अन्त्यसंस्कार वैदिक होते.

### भाषा

उत्खननात ३००० लेख सापडलेले आहेत. हे लेख बहुधा मातीच्या मुद्रांवर आहेत. काही भाण्ड्यांवर व काही ताम्रपटांवर देखील आहेत. काही लेखांत एकच अक्षर आहे, तर सर्वांत लांब लेखात २६ अक्षरे व तीन ओळी आहेत. एका वृषभाच्या आकृतीवर ६ अक्षरांचा लेख आहे.

या लेखांतील लिपी व भाषा कोणती याबद्दल संशोधकांत एकमत नाही. पण रॉय व गिडवानी यांनी सिन्धु-उत्खननावर जो साधनग्रन्थ लिहिला आहे; त्यात उल्लेखिलेल्या बारा मतांपैकी सहा मते या लेखातील भाषा इण्डोयुरोपीय वा 'आर्य' म्हणजे संस्कृतसदृश आहे असे म्हणतात. या सहा मतांत बी.ऱ्हॉझनी यांच्या मताचे

विशेष महत्त्व आहे, कारण ऱ्हॉझनींनी बोगाझकोह येथील हिटाइट शिलालेखाचे वाचन, कोणताही द्विलिपिक लेख उपलब्ध नसताना केले व ते सर्वमान्य झाले. सिन्धुसंस्कृतीची भाषा इण्डोयुरोपीय होती व या लेखात इण्डोयुरोपीय लोकांच्या- म्हणजेच युरोपीय पण्डितांनी कल्पिलेल्या 'आर्य' लोकांच्या देवतांचे उल्लेख आहेत याबद्दल ऱ्हॉझनी निःशंक होते. १९३१ मध्ये गॅड या संशोधकाने देखील असेच मत मांडले व सिन्धुलिपी ही ब्राह्मी लिपीची जननी होती असे दाखवणारी प्रमाणे दिली. मोहेंजोदरो खण्ड तीनमध्ये सिन्धुलिपीची छायाचित्रे आहेत. त्यांतली काही अक्षरे ब्राह्मी आहेत असे तज्ज्ञांचे मत आहे. १९७३ मध्ये नेहरू स्कॉलर एस्. आर्. राव यांनी या लेखात 'आर्य' देवतांची नावे आहेत असे प्रतिपादले. १९७८ मध्ये मिट्रिचिनेव्ह याने या भाषेला इण्डोआर्यन् असे नाव दिले. रॉय व गिडवानी यांनी न उल्लेखिलेले पण वाटूमल फाउण्डेशनने पारितोषकाने गौरविलेले सुधांशकुमार रे यांचे संशोधन देखील सिन्धुलिपी संस्कृतसदृश आहे व या लेखात दशरथादिकांची नावे आहेत असे मानते.

सारांश, सिन्धुसंस्कृतीची भाषा संस्कृतसदृश होती या मताचे जितके समर्थक आहेत तितके दुसऱ्या कोणत्याही एका मताचे नाहीत.

### वेशभूषा

सिन्धुसंस्कृतीतील लोक सोने, रुपे, तांबे, कासे वगैरे सर्व धातूंचे दागिने व निरनिराळ्या प्रकारची रत्ने वापरीत असत. स्त्रिया आपल्या मस्तकावर पंख्याच्या आकाराचा एक दागिना घालीत. कपाळाभोवती सोन्याचा किंवा रुप्याचा पट्टा बांधलेला दिसतो. सोन्यारुप्याच्या व तांब्यांच्या तारांची कर्णभूषणे, गळ्यामध्ये सोने, रुपे व रत्ने यांच्या माळा, बोटांत अंगठ्या, हातात रत्नखचित बांगड्यांची रेलचेल व पायात वाळे घालण्याची प्रथा असल्याचे दिसून येते.

स्त्रियांच्या पाठीवर वेणीची धनुष्याकृती गाठ-बो-बांधलेली दिसते. पुरुषांच्या मस्तकावरील केस लांब असून मधोमध भांग पाडलेला व केस मागे व्यवस्थित बांधलेले असत. दाढी ठेवण्याचा प्रघात होता.

सौंदर्यप्रसाधनांत काजळ, चेहऱ्याला लावण्याचे चूर्ण, गालांना व ओठांना लावण्याचे लाल रंग, आणि हिरव्या रंगाचे मातीचे गोळे मिळाले.

फक्त दोन वस्त्रे वापरली जात. एक धोतरासारखे व दुसरे शालजोडीप्रमाणे डाव्या





खांद्यावरून, उजव्या काखेखालून अंगावर घेतलेले असे. सुया सापडलेल्या आहेत, त्यावरून शिवण्याची कला माहीत असावीसे दिसते.

बऱ्याच घरांत हातमागाचे अवशेष सापडलेले आहेत.

एक धातूचा आरसा सापडला आहे. त्यावरून काचेचा आरसा बनविण्याचे तंत्र माहीत नव्हते असे दिसते. हे तंत्र माहीत असल्यास कोणी धातूचा आरसा बनवील असे वाटत नाही.

ऋ. १.१७३.६ मध्ये इंद्र स्वतःच्या ओपशाप्रमाणे म्हणजे केशभूषेप्रमाणे आकाशाला धारण करतो असे म्हटले आहे. आपले ओपश आकाशाला भिडवून इंद्राने भूमीला चालते केले- चक्राण औपशं दिवि- ऋ. ८.२४.५. शंकराला व्योमकेश म्हणतात. तसाच 'चक्राण ओपशं दिवि' याचा अर्थ असावा. यजुर्वेद संहितेमध्ये सिनीवाली या देवतेचे वर्णन वस्वापेश-समृद्धकेशी या शब्दाने केले आहे. स्त्री व पुरुष या दोहोंच्याही केशबंधाला ओपश हा शब्द लावला आहे.

"हे अग्ने, तू आपल्या दिव्य स्तूपाने म्हणजे जटाबंधाने दिव्य शिखराला आतून भीड. ऋ. ७.२.१ शुद्धबल व स्तुत्य असा वरुण या मूलरहित अन्तरिक्षामध्ये आपला जटाबन्ध धारण करतो." ऋ. १.२४.७. या साऱ्या वर्णनावरून स्त्री व पुरुष दोघेही लांब केस ठेवीत असे दिसते.

दाढी ठेवण्याच्या प्रघाताचे उल्लेख असेः- "हे इंद्रा, सोम पिताना आपल्या हलणाऱ्या दाढीने संतोष पावण्यासाठी तू पुनःपुन्हा ये. ऋ. २.११.१७. केशभूषा न केल्यामुळे इन्द्र आपल्या दाढीमिशा व डोक्यावरील केस यांच्या जंजाळात राहिलेला दिसतो. ८.३३.६ आपली दाढी हलवीत इन्द्र उच्च स्थानी विराजमान झाला आहे. १०.२३.१. इन्द्र स्वतःच्या व मरुदादी गणांच्या दाढ्या सोमरसाने ओल्या करतो तेव्हा वृष्टी होते. ऋ. १०.२३.४. हा इन्द्र आपली श्मश्रू अहिंसनीय रीतीने हलवितो." १०.२६.५.

इन्द्राच्या दाढीचा अनेकवार उल्लेख आहे. दाढी असलेली जी आकृती मोहेंजोदरोत सापडली आहे ती इन्द्राची प्रतिकृती असू शकेल.

सर्वच वैदिक दाढी ठेवीत अग्ने नाही हे पुढील उल्लेखावरून दिसते. "हे अग्ने, न्हावी जसे श्मश्रूंचे वपन करतो तसा तू वनांचे वपन करीत जातोस." १०.१४.४.

अलंकारांचे उल्लेख पुढीलप्रमाणे आहेत. १७.७२.२ व ८.७८.३ मध्ये

कर्णशोभनाचा उल्लेख आहे. अथर्ववेद ६.१३८.३ मध्ये कुम्ब व यजुर्वेद-तैतिरीय संहिता ४.१.५.३ मध्ये कुरीर या स्त्रियांच्या शिरावरील अलंकाराचा उल्लेख आहे. ऋ. ५.५४.११ मध्ये मरुत् पायात साखळ्या व वक्षःस्थलावर हार घालतात असे म्हटले आहे.

ऋ. १.१२५.१३, ११६.१०-४. ५३.२-९.८६.१४, १००, ९ इत्यादींमध्ये द्रापि हा शब्द आला आहे. सायण याचा अर्थ कवच असा करतो पण १.२५.१३ मधील वरुण व ४.५३.२ मधील सविता युद्धास निघालेला नाही, तेव्हा त्यांनी कवच का घालावे? ११६ मधील जीर्ण परिधान हे कवच असू शकत नाही कारण कवच धातूचे असते. ९.१००.९ मधील पवमान सोमाला कवच घालण्याचे कारण नाही. द्रापि या शब्दाचा बहुतेक ठिकाणी झगा हा अर्थ बरोबर लागू पडतो. तसेच १०.८५.२९ मध्ये आलेल्या शामुल्य या शब्दाचा अर्थ जैमिनीय ब्राह्मणादी ग्रंथातील संदर्भावरून कीथ व मॅकडोने 'वूलन शर्ट.' असा अर्थ करतात. यावरून वस्त्रे शिवण्याचीही प्रथा होती असे दिसते.

अथर्ववेद ८.२.१६ मध्ये नीवि व ८.३.१६ मध्ये परिधान हा शब्द आला आहे. या दोन शब्दांच्या एकत्र उल्लेखावरून धोतरासारखे अधोवस्त्र असा अर्थ निष्पन्न होतो.

काठकसंहिता २३.१, तैत्तिरीय ब्राह्मण १.५.६.६ व शतपथब्राह्मण २.६.४.५ मध्ये शलली या शब्दाने भांग पाडण्यासाठी व डोळ्यांना सौन्दर्यद्रव्ये लावण्यासाठी वापरण्यात येणाऱ्या साळी वा साळिन्दर या पक्ष्याच्या पिसाचा वा पराचा उल्लेख आहे.

शतपथब्राह्मण ५.४.५.२२, तैत्तिरीय ब्राह्मण १-८.३ मध्ये प्रकाश हा शब्द धातूचा आरसा या अर्थी आला आहे.

## अन्न

सिन्धुसंस्कृतीच्या उकरून काढलेल्या घरातील स्वयंपाकघराच्या खोलीत जे अन्नाचे अवशेष सापडले आहेत त्यांवरून पाहता बकरे, मेंढे, बैल, डुक्कर, कोंबडी, बदके वगैरेंचे मांस, नद्या-समुद्रातील मासे वगैरे खाल्ले जात असे दिसते. गहू, तांदूळ, जव, खजूर व दूध हा आहाराचा मुख्य भाग होता असेही अनुमान काढता येते.

वाजसनेयी संहिता १८.१२ मध्ये ओदन म्हणजे तांदळाचा उल्लेख आहे. नंतरच्या





संहितांत 'नीवारांचा' म्हणजे जंगली तांदळाचा उल्लेख आहे. ऋग्वेदात यव व धान १.६६.२, १३५.८, २.५.८-१.१६.२-३.३४.३ इत्यादी हे शब्द आहेत. यव म्हणजे जव, बार्ली वा मका यांना तळले की धान म्हणतात. धान शब्दाचा अर्थ कोणतेही धान्य असादेखील आहे. यजुर्वेदसंहितात गोधूम म्हणजे गहू उल्लेखिला आहे- मैत्रायणी संहिता १.२.८ क्षीर, गो व पयस् या दुग्धवाचक शब्दांचा उल्लेख ऋ. १.१०९.३, १६४.७ वगैरेत सापडतो.

अतिथीसाठी मोठा बकरा मारावा असे शतपथब्राह्मण ३.४, १, २ मध्ये सांगितले आहे. देवतांना ज्यांचे बळी देत ते सर्व प्राणी म्हणजे मेंढ्या, बकरे, बैल इत्यादी खाल्ले जात. मानव जे स्वतः खाद्य समजत नाही ते देवतांना देण्यास योग्य आहे असे तो समजणार नाही.

अथर्ववेद ३.५.६ मध्ये धीवराचा व १०.४.१९ मध्ये पोंजिष्ठ नावाच्या मासेमाऱ्याने पकडलेल्या कर्वर नावाच्या माशाचा उल्लेख आहे. यजुर्वेद, वाजसनेयी संहिता ३०.१६ व तैत्तिरीय ब्राह्मण ३.८ मध्ये पुरुषमेधात बळी देण्यास योग्य म्हणून दाश, कैवर्त, पोंजिष्ठ व मैनाल या शब्दांनी मासेमाऱ्यांचा उल्लेख आहे.

## नौकानयन

मोहेंजोदरो येथे डोलकाठी असलेल्या जहाजाची प्रतिमा सापडली आहे. एका जहाजाच्या प्रतिमेवर दोन पक्षी आहेत. लोथल येथे जहाजे नांगरण्यास योग्य असा धक्का सापडला आहे, असे विख्यात पुरातत्त्वज्ञ एस. आर. राव यांचे म्हणणे आहे. हरप्पा येथील भांड्यांवर जहाजाची आकृती आहे. एका मुद्रेवर बोरूंची नौका आहे. तिची दोरखंडे स्पष्ट दिसतात. प्राचीन मेसोपोटेमियन लोकांची जहाजे अशीच होती.

वैदिक लोक दर्यावर्दी होते याचा वेदवाङ्मयात भरपूर पुरावा आहे. तुग्र नावाच्या एका राजाने द्वीपांतरवासी शत्रूला जिंकण्यासाठी आपला पुत्र भुज्यू यास सेना देऊन नावेने समुद्रावर पाठविले. ती नाव वादळात सापडली. तेव्हा भूज्यूने अश्विनीकुमारांचा धावा केला. त्या धाव्याने प्रसन्न होऊन अश्विनीकुमारांनी त्याला आपल्या नावेत बसविले व तीन अहोरात्रींनी पित्याजवळ आणले. ऋ. १.१.१६, ३.११७, ५.११० हे उल्लेख असेः-

**अनारम्भणे तदवीरयेथामनास्थाने अग्रभणे समुद्रे।**

**यदश्विना ऊहथुर्भुज्युमस्तं शतारित्रां नावमातस्थिवांसम्॥ १.११६.५**

भुज्यूची नाव ज्या समुद्रात आसऱ्याला जागा नाही अनारम्भणे - व ज्यात आस्थान म्हणजे थोडा वेळ थांबायला बेटासारखी स्थळे नाहीत, व जो नांगर टाकता येणार नाही इतका खोल व वादग्रस्त आहे- अग्रभणे- अशा समुद्रात चालत होती असा स्पष्ट उल्लेख येथे आहे. या नावेला शंभर अरित्रे म्हणजे वल्ही होती.

**ता भुज्युं विभिरद्भ्यः समुद्रात् तुग्रस्य सूनुमूहथू रजोभिः ।**
**अरेणुभिर्योजनेभिर्भुजन्ता पतत्रिभिरर्णसो निरुपस्थात्॥ ६.६२.६**

रजोभिः म्हणजे मार्गांनी असा सायण अर्थ करतो... विभिः रजोभिः म्हणजे पक्षी हेच मार्ग समजून- म्हणजे भूमीकडे उडणाऱ्या पक्षांच्या मार्गदर्शनाने. दुसऱ्या ओळीतील 'अरेणुभिर्योजनेभिः पतत्रिभिः' याचा अर्थ अथांग समुद्रात फिरल्यामुळे ज्याच्यावर कित्येक दिवसांत धुळीचा कणही लागला नाही अशा बांधलेल्या योजनेभिः - पतत्रिभिः म्हणजे डोलकाठ्यांच्या साहाय्याने असा होतो. पतत्रिभिः याचा अर्थ पक्षिभिः असा करणे उचित नाही कारण पक्षांना योजनेभिः हे विशेषण लागू होत नाही... शिवाय पक्षांचा पहिल्या ओळीत विभिः असा उल्लेख असल्यामुळे दुसऱ्या ओळीत पुन्हा पतत्रिभिः या शब्दाने त्यांचा उल्लेख करणे निष्प्रयोजन आहे. पतत्र म्हणजे पंख. शिडांना जहाजाचे पंख व ते ज्यांना बांधले आहेत त्या डोलकाठ्यांना पतत्री म्हटले आहे.

**युवं भुज्युं अवविद्धं समुद्र उदूहथुरर्णसो अस्रिधानैः।**
**पतत्रिभिरश्रमैरव्यथिभिर्दंसनाभिरश्विना पारयन्ता॥ ७.६९.७**

येथे पतत्रिभिः या शब्दाला अस्रिधानैः म्हणजे क्षयरहित न झिजणाऱ्या काठ्यांची, अव्यथिभिः म्हणजे न थकणारी, बाधित न होणारी, अशी विशेषणे दिली आहेत. यावरून येथेही पतत्री म्हणजे डोलकाठ्या असा अर्थ आहे.

प्राचीन खलाशी दिशा कळण्यासाठी पक्षांचा वापर करीत व पक्षांना दिशाकाक असे म्हणत. जमीन कोठे आहे हे पक्षांना दुरूनच कळते व मोकळे सोडले की ते जमिनीच्या दिशेने उडू लागतात. जमिनीला लागायचे असले की अशा पक्षांना मोकळे सोडत. दुसरे काही पक्षी विशिष्ट ऋतूत थव्याथव्याने विशिष्ट दिशेने उडतात. हे देशांतर करणारे पक्षी होत. यांचीही दिशा कळण्यास मदत होते.

शिडांच्या व अथांग समुद्राच्या उल्लेखावरून समुद्रगामी जहाजांचा ऋग्वेदकाली





वापर होत होता हे स्पष्ट आहे.

पक्षांच्या नौकानयनातील या वापरला बव्हेरू जातकातून पुष्टी मिळते. काही व्यापारी-खलाशी अशा दिशाकाकांच्या साहाय्याने बव्हेरूला-बाविलानेला?- पोचले. त्या देशातल्या लोकांनी तसे पक्षीच पाहिले नव्हते. म्हणून त्यांनी त्यांतले काही १०० कहणांना विकत घेतले. दुसऱ्या भेटीत या व्यापाऱ्यांनी एक मोर आणला व तो १००० कहणांना विकला.

## निष्कर्ष

१. सिन्धुसंस्कृतीच्या उत्खननांच्या संदर्भात वेदवाङ्मय वाचले असता 'आर्यांच्या' भारतावरील स्वारीबद्दल काडीचाही पुरावा आढळत नाही.

२. मंत्र व ब्राह्मणे यांपैकी बहुतेक वेदवाङ्मय सिन्धुसंस्कृतीपेक्षा प्राचीन आहे. छान्दोग्य उपनिषद् व त्यानंतरचे वेदवाङ्मय सिन्धुसंस्कृतीच्या नंतरचे आहे.

३. वेदवाङ्मयात प्रतिबिंबित झालेली संस्कृती व सिन्धुसंस्कृती या दोन वेगळ्या संस्कृती मानण्यास काहीच आधार नाही.

## संदर्भ सूची

पुष्कळशा मूळ संदर्भाचा विशेषतः मूळ वेदवाङ्मयाचा उल्लेख लेखातच केलेला आहे. याव्यतिरिक्त आलेले संदर्भ असे-


| | | | |
|---|---|---|---|
| १. | व. दी. राव | : | प्राचीन भारतीय संस्कृतीचा इतिहास. |
| २. | कृष्णशास्त्री घुले | : | लेखसंग्रह. |
| ३. | महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळ | : | विश्वकोश. |
| ४. | सिद्धेश्वरशास्त्री चित्राव | : | ऋग्वेदाचे मराठी भाषांतर |
| ५. | Mc.Donnell and Keith | : | Vedic Index. |
| ६. | A.K. Roy and N.N. Gidvani | : | The Indus Valley Civilization : A Bibloographical Essay. |
| ७. | P. R. Deshmukh | : | Indus Civilization, Rigved and Hindu Civilization. |

| | | | |
|---|---|---|---|
| ८. | Bimal Ghose, Amal Kar and Zahid Hussain Central Arid Zone Research Institute Jodhapur | : | Comparative Role of the Aravali and the Himalaya River Systems in the Fluvial Sedimentation of the Rajasthan Desert. |
| ९. | T. Burrow | : | Sanskrit. |
| १०. | Sudhanshukumar Ray | : | Lecture on the occasion of the Vatuma Foundation Award & personal discussion. |
| ११. | S.R. Rao | : | T.V. Talk and writings on Lothal. |
| १२. | Encyclopedia Britanica | : | |


■ ■